ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-16

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-16 May-Jun -2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*May-Jun -2022 Volume-2 Issue-16*

*On*

## *Relevance of Work and Thoughts of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj*

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**Editor**
**Dr. Sunil Helkar**
Principal,
Prof. Dr. N.D.Patil Mahavidyalaya, Malkapur – Perid
Tal. Shahuwadi Dist. Kolhapur

**Co- Editors**
**Dr. Supriya Khole**
**M.L.Sontakke**

**Published by-** P. R. Talekar, Secretary, Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-16 May-Jun- 2022

CONTENTS


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | "Chh. Shahu Maharaj and the people from VJNT community" **Dr. Vijay Jaysing Mane** | 1-3 |
| 2 | Relevance of Rajarshi Chha. Shahu Maharaja's Thoughts on Emancipation of Women **Dr. Mrs. Vaishali Abhijit Sarang** | 4-5 |
| 3 | छत्रपती शाहू महाराज यांची भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिका : चिकित्सक अभ्यास **प्रा. महादेव लिंबराज सोनटक्के, प्रा.किरण सर्जेराव पवार** | 6-8 |
| 4 | सामाजिक समतेचे पुरस्कर्ते – छत्रपती राजर्षी शाहू महाराज **प्रा. डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे** | 9-11 |
| 5 | राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक धोरण **डॉ.डी.आर.पाटील** | 12-15 |
| 6 | राजर्षी छ. शाहू महाराज यांचे अस्पृश्य उद्धारासाठी केलेले शैक्षणिक कार्य **डॉ. गौतम नामदेव ढाले** | 16-19 |
| 7 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा अध्यादेश आणि कोल्हापूर संस्थानी राज्यातील शैक्षणिक विकास **डॉ. रामचंद्र वसंत कुंभार** | 20-24 |
| 8 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्योध्दाराचे कार्य **डॉ. ज्योती जयवंत व्हटकर** | 25-28 |
| 9 | पुरोगामी धोरणाचा दीपस्तंभ - छत्रपती राजर्षी शाहू महाराज **प्रा.केशव धोंडीबा टिपरसे** | 29-31 |
| 10 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आदर्श आपत्ती व्यवस्थापन **डॉ. मधुकर विठोबा जाधव** | 32-35 |
| 11 | राजर्षी छ. शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरणातील योगदान **प्रा. आप्पासाहेब नामदेव केंगार** | 36-39 |
| 12 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य **प्रा.रमेश शंकर माने** | 40-44 |
| 13 | कोल्हापूर संस्थांनातील शैक्षणिक क्रांती **डॉ. उत्तरा खाडीलकर** | 45-46 |
| 14 | राजर्षी शाहू महाराज यांचे सत्यशोधक समाजातील योगदान **डॉ. राजश्री दिलीप निकम** | 47-49 |
| 15 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य **प्रा.रमेश शंकर माने** | 50-52 |
| 16 | दूरदृष्टीचे लोकनेते राजश्री शाहू महाराज **राजेंद्र भिकू महानवर** | 53-57 |
| 17 | राजर्षी छत्रपती शाहू महारांजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान **प्रा.विनोद आखाडे** | 58-60 |
| 18 | "राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आपत्ती व्यवस्थापन कार्याची सद्यकालीन प्रस्तुतता" **डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव** | 61-65 |
| 19 | राजर्षी शाहू महाराज : वसा आणि वारसा **डॉ. विश्वाधार रामराव देशमुख** | 66-68 |

| | | |
|---|---|---|
| 20 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील कार्य<br>**प्रा. किरण गणपत कुंभार** | 69-72 |
| 21 | राजर्षी छ. शाहू महाराज आणि पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील<br>**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले** | 73-76 |
| 22 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शेतीविषयक धोरण<br>**लेफ्टनंट डॉ. रणजीत माने** | 77-80 |
| 23 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील कला क्षेत्राचा विकास<br>**प्रियांका राजाराम पाटील** | 81-84 |
| 24 | छ.शाहू महाराज यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान<br>**श्री. संजय पाटील, श्री. गणेश लवंगारे** | 85-87 |
| 25 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जलसिंचन धोरणाची प्रस्तुतता<br>**प्रथमेश राजेंद्र सुतार** | 88-90 |
| 26 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि शिक्षणव्यवस्था<br>**सिद्धनाथ मधुकर गाडे** | 91-94 |
| 27 | राजर्षी शाहू महाराज यांचे पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदान<br>**शंकर हरिदास पवार** | 95-100 |
| 28 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि पर्यावरण<br>**चंद्रशेखर काशिनाथ काटे** | 101-105 |

International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# "Chh. Shahu Maharaj and the people from VJNT community"

**Dr. Vijay Jaysing Mane**
Asst. Prof. Yashwantrao Chavan School of Social Work, Jakatwadi, Satara.
Email- mv7080@gmail.com

**Introduction:**

India, the largest democracy in the world is divided into number of religions, castes and tribes, but it is unified as a Nation by its Constitution. It is clear that Indians are equal at political level but are not at all equal when it comes at social and economic level. Denotified tribes are the communities which were notified as registered offenders and criminals by the British Government in 1871 under The Criminal Tribes Act (CTA). Thus, began more than a century long, continuing struggle for these communities against inequality and injustice. The VJNT and NT tribes are known as indigenous tribes but are treated at different levels within the country and in some cases also within the state. Within the state of Maharashtra the VJNT and NT do not enjoy equal Constitutional status, for example Kaikade community belong to SC category in one region while the same community belongs to VJNT category in other region. Though Ramoshi community is termed as a tribe, the community is treated as a caste in the traditional rural society of that time and even presently. Especially the VJNT and NT are the most oppressed communities in Maharashtra. The VJNT and NT communities are most vulnerable and belong to marginalized section of society excluded from the main stream of development since pre-independence period to this date.

**Criminal Tribes Act and VJNT and NT communities:**

All the VJNT and NT communities were employed till the end of Maratha Empire in one or the other way. Few of them were soldiers and lead the leading roles who were confined with various awards. They were given landed property for sustainable livelihood by the ruler's right from King Krishnadevrai from South to Chh. Shivaji. After the British came in power, the land given to these communities was taken away by the later rulers. Hence these communities became unemployed, jobless and wandered from one place to another in search of livelihood. Nothing was left out as a source of earning for them. In revolt to this act of the ruling class, they took up the fight against them for their just rights over the landed property that was given in honor of their bravery and sincerity. These deeds were labeled as antisocial practices such as robbery, dacoity by the British rulers. In order to confine antisocial practices in the year, 1871 the British government declared some communities as "criminal communities". The established society did not oppose this; contrarily they seem to have liked it. Some clauses of this act were:

1. Permission should be obtained from police while shifting from one location to other
2. Government got the right to form a settlement and keep the groups of people there.

The British Government of India passed the notorious "Criminal Tribes Act in 1871." According to this Act certain communities were "notified" as "criminal tribes". The basis for this was very simple, those nomadic people whose source of livelihood was from forest products, who were nomadic cattle grazers, who were wandering singers and acrobats, etc. such people were notified, according to the British. From 1871 to 1944 this Act was amended time and again, new areas and new communities were roped in. In 1952, Government of India officially "denotified" the stigmatised ones, without making any provisions for their livelihood. In 1959, Government of India passed the "Habitual Offender's Act" which is not much different from the "Criminal Tribes Act, 1871". From 1961, Government of India, through the state machineries is publishing state-wise lists of "Denotified and Nomadic Tribes." The indigenous VJNT and NT communities have been treated as criminal by birth and subject to harassment and ill treatment at the hand of the society and the state machinery since this act came into existence in British rule. There is no provision of constitutional safeguards for day-to-day brutality faced by these tribes. Under colonial rule, the relatively autonomous and self-sufficient VJNT and NT communities lost their means of livelihood and had to depend on new occupation. But, due to lack of new skills, they are struggling to sustain their livelihood. Because of such situation, nowadays VJNT and NT communities are the lowest in all hierarchies, social, political and economic. In this era of LPG the rich are becoming rich while the poor have turned to be poorer. The condition of VJNT and NT communities is becoming worst day by day. The local people and the police even today kill them; torture them, like beasts of prey. And, after independence, police and the political and non-political power engaged them in criminal activities. They were forced to

rob and steal. The police and the stolen good receivers took it all, and often had them killed. Their stigma is the curse of their life. All over India, the denotified communities are jailed, mob-lynched, tortured to death in police lock-ups. Worst of all, even India's other tribals treat the denotified tribes as "expendable ones." The VJNT and NT communities belong to marginalized section of society excluded from the main stream of development since pre-independence period to till date. They have been treated as criminals by birth and subject to harassment and maltreatment at the hand of the police, society, and the state machinery since the British rule. This condition of VJNT and NT communities is spoiling their social identity, which leads to discrimination by dominant sections of society. There is no provision of constitutional safeguards for day-to-day atrocities faced by this tribe. MDGs state about eradication of extreme poverty and hunger, achieving universal primary education, promoting gender equality and empowerment of women, reducing child mortality rate and improving maternal health. Grassroots experiences and prima facie evidences do not assert any benefits to the communities. Day in and out the governments in power have promised to bring amendments in the Habitual Offenders Act but nothing has changed till date. The people from criminal communities are booked under the provision of this act and penalised. This is the routine picture and the people from these communities are also accustomed to this. In many cases of robbery, dacoit or in any other such issue apart from the criminals even innocent youth are roped in by the authorities. The health, education and other conditions of the people from these communities has turned to be worst. Women from these communities are more pathetic. They have to suffer discrimination at various levels. At home they are treated secondary and at societal level they are exploited at wide range.

**Chhatrapati Shahu Maharaj and the VJNT and NT communities:**

Rajarshi Shahu Chhatrapati (1874-1922), the great reformer king of the princely state of Kolhapur and a pioneering supporter of the backward classes. Chh. Shahu was a strong advocate of equality among all strata of society and refused to give the Brahmins any special status. Chh. Shahu made great efforts to abolish the concept of caste segregation and untouchability. He introduced the first known reservation policy in government jobs for the people from untouchable castes. His Royal declaration ordered his subjects to treat every member of society as equal, and granting the untouchables equal access to public utilities like wells and ponds, as well as establishments like schools and hospitals. He was the first King in India to excuse notified criminal tribes from their daily attendance at the village choudy (Village administrative Office) in front of the Police Patil. In 1918 Chh. Shahu Maharaj ordered in Kolhapur State to excuse the criminal tribes from their daily attendance before Police Patil. As people from these communities faced many problems for earning money and daily livelihood, he provided them appropriate job according to their skills in his state. Two people from Phase paradhi community were his personal bodyguards. Most of the elder people of first generation were given job in Shahu textile mill. He started special schools for their children. All the efforts were taken to uplift the communities who were stamped as criminals by the notorious act.Phase-Pardhi as their name signifies, are bird and animal trappers. Presently they are treated as the most notorious criminal tribe in Maharashtra. They are nomads and for generation had been shifting from one place to another in search of food and livelihood resources. During this wandering life many Pardhis had arrived into the western part of Kolhapur jungles. Chh. Shahu Maharaj came to know about Pardhis nuisance in the nearby villages and also learned that they had planned to attack Chatrapati’s camp site and rob. Chh. Shahu sent his militants and arrested these Pardhi community people and brought them to the camp site. He didn’t torture them or punished them, but fed them well and provide them with comfort. He already knew their reputation but wished to explore the root cause of their criminal habit. As he came to know that they had no means for livelihood he shifted them along with their families to his favorite place at Sontali camp, near Kolhapur. He accommodated them in temporary shelters and arranged for the daily supply of food grains. Chh. Shahu knew that, Pardhis were courageous and hardworking people. Considering their skills, honesty and their social condition Chh. Shahu Maharaj took certain progressive steps for these people. He raised a unit of Pardhi guards for his Sontali camp. Many from the upper caste were amazed at Maharaj’s courageous deed of trying to convert sinner to saint. In due course of time on many occasions Chh. Shahu Maharaj put on test Pardhi guard’s promptness and watchfulness and they passed his test every time. Chh. Shahu Maharaj wanted the Pardhi community people to interact with other general public and learn the ways of the civilized society. Chh. Shahu rehabilitated these Pardhi community people on a plot of 15 acres land near Ujlaiwadi, Kolhapur. They had formed their cooperative housing society and named it as ‘Shantinagar’.

**Conclusion:**

Though, after independence, Government of India repealed the old law in 1952; the social stigmatisation continues against the members of these tribal communities. While the tribes are de-notified by the law, the stigma and the negligence of the government is still leading to violations and discrimination

against these people even today. For these communities there is a little hope that they will ever be seen as ordinary Indians. Hence there is an urgent need to work amongst these communities, to organize them to liberate themselves from their present-day social and economic miseries. The best gift that we, as a responsible citizens and a more blessed human being, can give to these tribal communities is something that they never had thought off before – a bright and peaceful future!

**References:**

1) Santosh Jadhav, President NIRMAN, Pune: Development Corporations and Policies for Nomadic Tribes in Maharashtra: A Critical Review
2) Government of India document: Sub-Categorization within OBCs
3) BILL of 2015 Government of Maharashtra: BILL to provide for the prohibition of social boycott of a person or group of persons including their family members, and for matters connected therewith or incidental thereto.
4) Captain Alexander Mackintosh (1833): An Account of the origin and present condition of The Tribe Of Ramoossies. American Mission Press, Bombay.
5) Ministry of Home Affairs Government of India, JULY, 2007: Report of the Committee on DRAFT NATIONAL POLICY ON CRIMINAL JUSTICE.
6) Zoya Bilal Qureshi and Juhi Mongia: Beyond the Margins, Stigma and Discrimination Against India's Nomadic and Denotified Tribes, Publisher: Human Rights Law Network, New Delhi, India.
7) Uttam Madane: "A STUDY OF CHANGE IN OCCUPATIONAL PATTERNS OF RAMOSHI COMMUNITY", WITH SPECIAL REFERENCE OF INDAPUR TALUKA OF PUNE DISTRICT (2010) Published by NIRMAN (New Initiative for Reclamation of Mankind) Maharashtra
8) Dattatreya Bhandalkar: EXCLUDING THE 'EX-CRIMINAL TRIBES': UNDERSTANDING DOMINATION AND INTERPLAY OF CASTE IN INDIA: Afro Asian Journal of Social Sciences Volume V, No 4. Quarter IV 2014, ISSN: 2229 – 5313
9) Dr.Babasaheb S.Ghatage: Disabilities and Social Justice for Nomadic Tribal Communities In India: Online International Interdisciplinary Research Journal,{Bi-Monthly}, ISSN2249-9598 , Volume-I, Issue-II, Nov-Dec 2011

International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# Relevance of Rajarshi Chha. Shahu Maharaja's Thoughts on Emancipation of Women

**Dr. Mrs. Vaishali Abhijit Sarang**
Assistant Professor in History, D. D. Shinde Sarkar College,Kolhapur
Email-drvaishalisarang@gmail.com

**Abstract:**

Kolhapur was the leading princely state in the southern Maratha country. Next to Jotiba Phule in importance for the non- Brahmin movement, upliftment of the Dalits, education and emancipation of women in Maharashtra that was the chha. Shahu Maharaja. Chha. Shahu came to the throne of Kolhapur state with full powers in 1894. He had progressive thoughts and outlook in those days regarding the problem of untouchability and rights of women. In 19th century, many ill traditions related to women were prevailed in the society. Such as child marriage, polygamy, Purdah system, prohibition to widow remarriage, restrictions on women education, lack of property rights, sati tradition etc.

**Introduction:**

Chha. Shahu Maharaj thought to improve the condition of women in the male dominant society. According to him Only to provide the education facilities to women is not sufficient for the betterment of them.. So, he thought the necessity of emancipation and empowerment of women. He provided education facilities to women, supported the inter-caste and inter-religion marriages. He passed important laws for emancipation of women. Free and compulsory primary education to all-1917, Inter-caste and inter-religion marriage-1919, widow remarriage Act-1917, Divorce Act and securing of women rights Act, the marriage registration Act- 1919, The prevention of harassment to women Act-1919, Rights of *Jogtini* and Illegitimate Hindu children Act -1920. Considering today's problems related to women the thoughts of Rajarshi chha. Shahu Maharaj are very relevant.

He started first school at Chikhali, Taluka Kaeveer to provide free and compulsory education to all. He sent one lady from his state to take the training of kindergarten, when Pandita Ramabai provided that facility to women at Kedgaon. Rajarshi chha. Shahu Maharaj sent Krushnabai Kelavkar – a clever student to Grant medical college for her medical education. Along with it he appointed Rakhamabai Kelavkar as education officer of Karveer state after the resignation of Miss Little. In this way he provided motivation and support to women in his state. Chhatrapati Shahu took increasingly radical stands in his later Years by supporting intermarriages between different castes within Kolhapur and finally took the step himself of sponsoring for marriage between his own original family of Kagal and the *Dhangar Maharaja* of Indore. such actions in the crucial areas of inter-dining and inter marriage provided an atmosphere of public and radical support for anti-caste reformism and liberation of women.[1] In 1919 chha. Shahu enacted the Marriage registration Act through that he gave legality to inter-caste and inter-religious marriages and widow remarriages. [2]

He increased the age of marriage of girls from 10 to 14 years. And it was milestone in the life of women.[3] The prevention of cruelty to women Act,1919 was another revolutionary step taken by Chh. Shahu Maharaj. He defines cruelty to women as comprising physical and the mental, insults, abuses, verbal assaults and suspicion of women's character by men as acts of cruelty. Finally, he covers the ill treatment of wife, widow and daughter in law, even step mother, under this act giving it in broad sweep. It is believed that this Act is the first of its kind, anywhere in the world.[4]

The Kolhapur divorce Act-1919 passed by chha. Shahu Maharaj considering the pitiable condition of women after marriage. He passed this Act because he thought that men have always enjoyed the right to deny their wives. Hence for the first-time women got a chance to come out from painful marriage life.[5] He gave orders to accept the consent of girls to choose their life patterner after completing the age of 18. It gave the equality to women in the male dominated society. He observed that after the death of husband the life of wife become very pitiable. She did not have any religious rights in the society. She had to live alone. Chha. Shahu Maharaj wanted to protect the rights of such women. So, he passed the Widow remarriage Act in 1917 and provided legal support to widow remarriages.[6]

Since ancient times in India Jogtini tradition was prevailed in the society. There were many people in the society who had cruel and inhuman mentality, such people used to do injustice on the helpless widows and Jogatini. They got children from such illegal relationship. But those children did not enjoy the any legal rights from their natural father. Therefore, to protect their rights chha. Shahu Maharaj passed Rights of *Jogtini* and Illegitimate Hindu children Act -1920.

On 21st September, 1917, he made a provision for free and compulsory primary education to men and women. Regarding that he said, "Free and compulsory primary education is the only invigorating tonic that will enable the lower classes to throw off this incubus of the past. I have commenced free and compulsory education in my state and I have no doubt that the next generation will be literate generation. I am most anxious to give self- government as early as possible to my subjects."[7] People believed that to educate girl is a sin. There was child marriage system in the society. The pardah system was also a difficulty in the path of women education. But Chha. Shahu Maharaj become a revolutionary king as he built a highway of women education.[8]Further he made provision for the alimony of the widows of the employees of his state. Sitabai Ramchandra Gupte took benefit of this provision and got 20RS per month as alimony for her livelihood from the government.[9] To give inspiration to the women educqtion he gave 100% concession in the fees of the girl students of Rajaram college and declared scholarships to needy students.[10]

In short, Chha. Shahu Maharaj efforted a lot for the protection, rights and overall development for women. After the end of Mahatma Phule's movement Chha Shahu Maharaja led the campaign of liberation of women. He not only introduced the different types of laws for the protection of women but he implemented those laws in his state effectively. He gave proper rights, status and education to his widow daughter-in-law, Indumati Ranisaheb. He gave her motar driving training. He gave equal treatment to the women in the royal family. He inspired all the women in his state to improve their condition through education, further he provided all type of assistance and cooperation for their betterment and to become independent. Considering his work for equality, the government decoded to celebrate his birthday as 'Social Justice Day'. And I think, it is a real tribute to his work for the society.

Today, a lot of changes taken place in the society. The standard of living of people increased. The number of educated women and working women increased. They become economically independent as chha. Shahu Maharaja dreamt. They become aware about their rights. So, they started to raise their voice against the injustice done by the men on them. But women are really independent today? Are they safe? Are they really enjoying equal rights in the 21st century? If we try to give the answers to these questions honestly, the answer is NO! That's why to solve these problems in a proper way the thoughts and revolutionary thinking of Chha Shahu Maharaja which he expressed in the beginning of the 20th century is very relevant.

**References:**

1. Omvedt Gail, Cultural revolt in a colonial society, - A non- Brahmin movement in Western India, Scientific Socialist Education Trust, Bombay, 1970, p.129
2. http://www.forwardpress.in
3. Gazette of Kolhapur state, part- 4,12th July 1919
4. Op.cit. http://www.forwardpress.in
5. Rajarshi Shahu Gaurav Granth, Maharashtra Rajya Shikshan Vibhag , Sachivalaya, Mumbai, 2016, pp. 1215-1216
6. Ibid. P. 822
7. Latthe A.B., Memories of His Highness Shri. Shahu Chha. Maharaj of Kolhapur, p.448
8. Suryavanshi K.G., Thokal Prakashan, 1976, p. 186
9. Op. cit. Rajarshi Shahu Gaurav Granth, p. 1192
10. Karveer Gazette,Part-1, 5/4/1913, p.79

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# छत्रपती शाहू महाराज यांची भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील भूमिका : चिकित्सक अभ्यास

प्रा. महादेव लिंबराज सोनटक्के[1] प्रा.किरण सर्जेराव पवार[2]
[1]प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापूर-पेरीड ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर
[2]श्री सद्गुरू गंगागीर महाराज विज्ञान, गौतम कला आणि संजीवनी वाणिज्य महाविद्यालय, कोपरगाव जि.अ.नगर
Email-mlsontakke99@gmail.com

**प्रस्तावना**

भारत देशाला महान महापुरुषांची मोठी परंपरा लाभलेली आहे. भारताच्या विशेषतः आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये अनेक महापुरुषांच्या कार्य आणि विचारप्रणालीचे महत्वाचे योगदान आहे. राष्ट्रवादी मानसिकतेची लाट १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर जेंव्हा भारतात निर्माण झाली तेंव्हा अनेक महान विभूतींनी महाराष्ट्रातील जनमानसात सामाजिक सलोखा, शांतता, बंधुभाव आणि देशप्रेम या मुल्यांची रुजवणूक करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. १९ व्या शतकाच्या मध्यात सामाजिक धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्राचीन काळापासून अस्तित्वात असणाऱ्या अनिष्ठ रुढी पंरपरा, अंधश्रध्देच्या विरोधात येथे प्रदीर्घ चळवळी निर्माण झाल्या. जातीयता, विषमता आणि सामाजिक भेदभाव याविरुध्द आंदोलने निर्माण झाली. स्त्रीदास्यत्व आणि त्यांच्या व्यक्ति स्वातंत्र्यावर मर्यादा घालणाऱ्या प्रथा परंपरेच्या ही विरोधात चळवळी निर्माण झाल्या. प्रस्थापित समाजव्यवस्था आणि त्या समाजव्यवस्थेतील पंरपरागत मूल्य बदलून समता,स्वातंत्र्य आणि बंधूता या मूल्यावर आधारीत समाज रचना निर्माण करण्याचे अनेकांनी प्रयत्न केले. महात्मा ज्योतीराव फुले आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे या परंपरेचे अर्ध्वयू आहेत. प्रस्तुत संशोधनात छत्रपती शाहू महाराजांच्या भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील नेमकी भूमिका काय होती, याविषयी थोडक्यात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**छत्रपती शाहू महाराज आणि इंग्रज**

सन १८१८ मध्ये ब्रिटीशांनी मराठा राज्य संपवून भारतातील अनेक संस्थाने खालसा करून आपल्या अधिपत्याखाली आणली. इंग्रजाबरोबर झालेल्या इ.स.१७६६, १७९२, १८१२, १८२६, १८२९ च्या तहानुसार कोल्हापूर संस्थान ब्रिटिश साम्राज्याच्या अधिपत्याखालील एक संस्थान होते. शाहू महाराज छत्रपती झाल्यानंतर सार्वभौम ब्रिटिश सरकारकडूनच त्यांना राज्याधिकार प्राप्त झाले होते. शाहू महाराज हे राष्ट्रप्रेमी आणि राष्ट्रवादी वृत्तीचे होते. देश आणि रयतेच्या हित त्यांना महत्वाचे वाटत होते, त्यामुळे शाहू महाराजांना त्यांच्या मनातील विचाराना बाजूला ठेवून एक मांडलिक संस्थानिक या नात्याने राजनिष्ठेचे प्रदर्शन करणे अनिवार्य होते. अंतस्थ विचार आणि कृती विरोधाची असली तरी प्रत्यक्षात उघडउघड विरोध करणे म्हणजे संस्थान खालसा करुन घेणे होय. ब्रिटिशाना आपल्या साम्राज्यात कोल्हापूर संस्थान विलीन करुन घेण्याची संधी देणे होय.म्हणून बहुजन समाजाची उन्नती झाली पाहिजे आणि संस्थानही टिकले पाहिजे. अशा प्रकारची तारेवरची कसरत शाहू महाराजांना करावी लागत होती. त्यामुळे महाराजांना इंग्रजाशी निष्ठा व्यक्त करावी लागत होती. पण ही निष्ठा अगदी वरवरची होती. त्याकाळी इंग्रजाशी निष्ठा व्यक्त करणारे फक्त शाहू महाराज एकटेच होते असे नाही. अन्य अनेक संस्थानिक तर होतेच शिवाय त्यावेळच्या राजकीय नेत्यांनीही ब्रिटिशांशी निष्ठा व्यक्त केल्या होत्या. प.मदनमोहन मालवीय, दादाभाई नौरोजी, गोपाळकृष्ण गोखले, न्या.रानडे, फिरोजशाहा मेहता आणि लोकमान्य टिळक अशा नेत्यानी ब्रिटिशांशी निष्ठा ठेवल्या होत्या. या सर्वाना ब्रिटिशांनी भारतात आणखी काही वर्षे राहायला हवे असेच वाटत असे. इ.स. १९०६ साली कॉंग्रेसचे कलकत्ता येथे २२ वे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी हे होते. या अधिवेशनामध्ये स्वराज्य प्राप्ती हे कॉंग्रेसचे ध्येय असेल असे मत मांडले असले तरी स्वराज्याचा अर्थ पूर्ण स्वराज्य असा नव्हता. तर इंग्लंडच्या कॅनडासारख्या वसाहतीत प्रचलीत असलेले स्वयंशासन असाच अर्थ त्याना अभिप्रेत होता.

**छत्रपती शाहू महाराजांची भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील भूमिका**

छत्रपती शाहू महाराज हे ब्रिटीश नियंत्रित संस्थानाचे प्रमुख होते, त्यामुळे मनात कितीही राष्ट्रवादी भावना असूनही त्यांना ब्रिटीश शासनाविरुद्ध कधीही उघड उघड विरोधाची भूमिका घेता आली नाही. तरीही भारतातील स्वातंत्र्यप्रेमी संघटना, क्रांतिकारक आणि घटनांना त्यांनी नेहमी पाठींबा दिलेला दिसून येतो. ब्रिटीशांना विरोध करण्यासाठी इ.स.१८९३ साली शिवाजी क्लब एक महत्वाची आणि प्रभावी संघटना स्थापन झालेली होती. इ.स.१८९७ च्या काळामध्ये शिवाजी क्लबचे सुमारे शंभर सभासद होते. इंग्रज विरोधी भूमिका घेत असलेल्या शिवाजी क्लबचा आणि शाहू महाराजांचा जवळचा संबंध होता. या क्लबला शाहू महाराजाचा पाठिंबा आणि

सहकार्य होते. छत्रपती शाहू महाराजासह राजपरिवारातील अनेक सदस्य शिवाजी क्लबला मदत करत छत्रपती शाहू आणि लोकमान्य टिळक यांचे परस्पर संबंध या पुस्तकामध्ये ग.र. भिडे लिहितात की, कोल्हापूरचा शिवाजी क्लब हा शाहू महाराजांच्या प्रेरणेनेच कार्य करत होता. नानासाहेब गायकवाड, बापूसाहेब गायकवाड झुंजारराव घाटगे इत्यादी आपल्या जवळच्या तरुणांना शिवाजी क्लबचे सदस्य होण्यास शाहू महाराजांनीच प्रवृत्त केले. तसेच महाराजांनी क्लबमधील सदस्यांना बंदुका, घोडे यांची वारंवार मदत करत असत. तालीम करण्यासाठी महाराजांनी या सदस्यांना जुन्या राजवाड्यातील माडीवर जागा दिलेली होती.[१]

लोकमान्य टिळकांपूर्वीच छत्रपती शाहू महाराज स्वदेशीचा पुरस्कार केलेला होता. स्वदेशीचा पुरस्कार म्हणजे स्वातंत्र्य चळवळीचाच एक भाग होय. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास स्वदेशी आंदोलनाशिवाय पूर्ण होत नाही. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये देशी उद्योग उभारण्यावर भर दिला. संस्थानामध्ये निलगिरीचे तेल काढण्याचा व मधमाशा पाळण्याच्या उद्योगाला महाराजांनी प्रेरणा दिली. श्री शाहू छत्रपती मील कंपनी, शाहू छत्रपती स्पिनिग अँन्ड वीव्हींग मील या सुतगिरण्या संस्थानामध्ये काढण्यास महाराजांनी सर्व प्रकारचे सहाय्य दिले. या सुतगिरण्यास जमीण आणि पाणी मोफत देण्यात आले. दोन्ही सुतगिरण्याचे जवळजवळ ५०% शेअर्स खरेदी करुन सुतगिरण्यांना ३० वर्षापर्यंत संरक्षण देण्याचे जाहीर केले. पुण्यातील कापसाची व रेशमाची गिरणी त्याच प्रमाणे पुण्याला जी स्वदेशी कागदाची गिरणी होती त्याचे महाराज आश्रय दाते होते.[२] म्हणूनच शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये कागद तयार करण्याच्या कारखाण्यास महाराजानी सहाय्य केले. संस्थानात तयार होणाराच कागद सर्व कार्यालयानी कामकाजासाठी वापरला पाहिजे. अशा प्रकारच्या सूचना सर्व कार्यालयाना देण्यात आल्या. शिवाजी क्लबचा एक सदस्य उत्तमराव शेणोलीकर यास बापू पाध्ये यांच्या मदतीने इ.स. १९१५ साली वणीता वस्त्र भांडार हे स्वदेशी कापडाचे दुकान काढून दिले. त्याचे दुकान चांगले चालावे त्यासाठी शाहू महाराज या दूकानातुन कपडे खरेदी करत असत.ज्या ज्या वेळी दुकानात नवीन माल येत असे त्या त्या वेळी मी चांगला चांगला माल वाडयावर घेवून जात असे. शाहु महाराज प्रत्येक वेळी दोन तीनशेचा माल खरेदी करत असत व पैसेही रोख मिळत. केवळ मला मदत करण्याच्या हेतून ते माल घेत.[३] अशी उत्तमराव शेणोलीकर यांनी आपल्या आत्मचरित्रात नोंद करून ठेवलेली आहे.

सन १९१६ नंतर मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी करण्यात आली. त्यावेळी अनेक ब्राह्मणेत्तर नेत्यानी खिश्चन मुस्लिमाप्रमाणेच आपणासही आपआपल्या जातीसाठी स्वतंत्र मतदार संघाची आणि राखीव जागेची मागणी केली. स्वतंत्र मंतदारसंघ असावेत की राखीव जागा असाव्यात, तसेच लंडनच्या लिबरल पक्षाशी सहकार्याचे संबंध ठेवावेत की असहकार्य करावे याबाबत ब्राह्मणेत्तरामध्ये वाद निर्माण झाला. शाहू महाराजांनी ब्राह्मणेत्तरामधील या मतभेदात मध्यस्थी केली. शिख मुस्लिम यांच्या प्रमाणेच बहूजन समाजास स्वतंत्र मतदार संघ असावेत आणि त्यासाठी सर्वांनी इंग्रजाकडे आग्रह धरावा अशी भूमिका घेतली. ब्राह्मणेत्तराच्या शाहू महाराजांच्या या मागणीस मात्र विरोध झाला. टिळकांनी आणि काँग्रेसने शाहू महाराजानी ब्राह्मणेत्तराना स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या केलेल्या मागणीस विरोध केला. अशा वेळी छत्रपती शाहू महाराजांनी सन १९१७ मध्ये खामगाव येथील मराठा शिक्षण परिषदेमध्ये जातवार प्रतिनिधित्वाचा फायदा यावर संबोधन केले. ते म्हणतात की,जर हल्लीची जाती व्यवस्थाच कायम राहिली तर ज्या रितीने हल्ली स्वराज्याचा अर्थ समजला जातो. ते स्वराज्य म्हणजे मुठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे होय. याचा अर्थ मी स्वराज्याच्या विरुध्द आहे. असे समजायचे कारण नाही. हे मी पुन्हा एकवार सांगतो. आम्हाला स्वराज्य पाहिजेच. जाती भेदापासून होणारे अनिष्ठ परिणाम नाहीसे होई पर्यंत हल्लीच्या प्रसंगी आपणास ब्रिटिश सरकारचा आश्रय व मार्गदर्शन याची जरुरी आहे. सत्ता केवळ अल्पसंख्याक उच्च वर्गियांच्या हातात जाण्यात स्वराज्याचे पर्यावसन होऊ नये. म्हणून निदान दहा वर्षापर्यंत तरी आम्हास जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. त्यामूळे आमचे हक्क काय आहेत यांचे आम्हाला शिक्षण मिळेल. एकवार ते आम्हाला समजले म्हणजे जातवार प्रतिनिधीत्वाची पुन्हा जरुरी राहणार नाही. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्यामूळे काय अवस्था होते याबाबत आमच्या म्युनिसीपालीटीचा शोचनीय अनुभव आम्हापूढे आहेच.[४] म्हणजेच ब्राह्मणेत्तराना प्रतिनिधीत्वाचा हक्क नसल्याने अल्पसंख्याकाच्याच हिताचेच सरंक्षण होते व सत्तेचा फायदा त्यानाच मिळतो. म्हणून शाहू महाराजांनी इ.स. १९१९ च्या कायद्यामध्ये यासाठी स्वतंत्र मतदार संघाची तरतूद करण्यात यावी यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले. शाहू महाराजांच्या या प्रयत्नामुळे आणि धडपडीमुळे त्यांचे गुरु फ्रेझर यानीही समाधान व्यक्त केले. हा प्रश्न मांडण्यासाठी पश्चिम हिंदूस्थानात आपल्यासारखा प्रवक्ता मिळाला ही मोठी सुदैवाची गोष्ट आहे. आपण चालविलेल्या या झगडयात माझी व्यक्तिशा सहानुभूती आहे. असल्याचे फ्रेजरनी महाराजांना कळविले.[५] शाहू महाराजांची ही धडपड आणि चवळवळीची ब्रिटिशाना दखल घ्यावी लागली. माँटेग्यू चेम्सफर्ड यानी ब्राह्मणेत्तराना विशेषतः मराठा आणि तत्सम जातीना स्वंतत्र मतदार संघ देण्यात यावेत अशी ब्रिटिश पार्लमेंटकडे शिफारस केली.

भारतात क्रांतिकारकांनी मोठ्या प्रमाणात ब्रिटीश शासनाला विरोध करण्याचे धोरण स्वीकारले होते. छत्रपती शाहू महाराजांनीही क्रांतीकारकांच्या कारवायास मदत केली पण त्याचा पुरावा ब्रिटिशांच्या हाती लागणार नाही याची दक्षता घेतली. तथापि शाहू महाराज यांची क्रांतीकारकांना मिळणारी मदत , आश्रय आणि त्याच्या कारवायातील सहभाग इंग्रजाच्यो निदर्शनास आला असता असते तर कोल्हापूरचे संस्थान बरखास्त करण्यास इंग्रजानी विलंब लावला नसता. म्हणून शाहू महाराजांनी या क्रांतीकारकाच्या कार्याचे प्रत्यक्ष नेतृत्व केले नाही. पण त्याना सर्वप्रकारचे साहाय्य करण्याचे मात्र कार्य शाहू महाराजांनी केले. हे करत असताना आपल्या सहभागाचा कसला पुरावा इंग्रजाच्या हाती लागणार नाही याची दक्षता महाराजानी घेतली. इ.स.१८९५ ते १९१० पर्यंत शिवाजी क्लबच्या सदस्यांनी व क्रांतीकारकांनी महाराष्ट्रात बीडपासून ते नाशिकपर्यंत ब्रिटिश सत्तेविरुध्द जे अनेक गुप्त कट रचनण्यात आले त्या कटामध्ये महाराजांचा सहभाग असल्याचा संशय इंग्रजाना आला होता. परंतु महाराजांनी मुत्सद्देगिरीने हा संशय दूर केला आणि आपले कार्य चालू ठेवले.

**समारोप**

छत्रपती शाहू महाराजांची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना अतिशय व्यापक होती. उच्च वर्गाबरोबरच बहुजन समाजालाही जगण्याचे अधिकार आहेत, या मताचे ते होते. महत्वाचे म्हणजे स्वराज्याबाबतचे विचार अत्यंत प्रगल्भ होते. मानवतावादी, समान पातळीवरील राष्ट्रवादास पोषक अशा व्यापक तत्वाचे अधिष्ठान असणारे स्वराज्य महाराजाना हवे होते. अल्पसंख्याक पुढारलेल्या वर्गाने बहुसंख्याक समाजावर राज्य करणे म्हणजे स्वराज्य नव्हे. सर्वात शेवटच्या व्यक्तीस स्वराज्यातील अधिकाराचा लाभ मिळायला हवा. त्यासाठी सार्वत्रिक शिक्षणप्रसार आणि जातीबंधने शिथिल करण्यासाठी सामाजिक सुधारणा या बाबी साध्य केल्याशिवाय स्वराज्यातील अधिकार निरर्थक ठरतात, असे त्यांचे मत होते. थोडक्यात स्वराजाच्या चळवळीसाठी, राष्ट्रीय ऐक्यासाठी हिंदू- मुस्लिमामध्ये समन्वय व ऐक्य जोपासण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. स्वातंत्र्य आंदोलनाची ताकद वाढविण्यासाठी मुस्लिमानाही राष्ट्रीय प्रवाहात आणणे आवश्यक आहे हे ओळखून दोघामध्ये ऐक्य घडवून आणण्यासाठी लो.टिळकांनी जसा प्रयत्न केला व इ.स. १९१७ ला लखनौ करार घडवून आणला होता. शाहू महाराजानीही हीच भूमिका घेवून मुस्लिमानाही स्वातंत्र्य चळवळीच्या प्रवाहात आणण्यासाठी शाहू महाराजानी अनुकूल वातावरण निर्माण केले आणि बहुजन समाजाला जगण्याचा अधिकार देण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ**


१. साळुंके, पी.बी.(संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, मुंबई, १९७६, पृ.क्र.२१०.

२. कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब.शी., शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरनंदन पब्लिकेशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, १९९६, पृ.क्र.६६.

३. डॉ.जाधव, रमेश, लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, १९९७, पृ.क्र.१९७.

४. डॉ.संगवे विलास (संपा), राजर्षी शाहू छत्रपती-पेपर्स व्हॉल्यूम ८, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०११, पृ.क्र.५१९.

५. फ्रेझर यांचे छत्रपती शाहू महाराजांना पत्र, दिनांक १८ जुलै १९१९.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# सामाजिक समतेचे पुरस्कर्ते – छत्रपती राजर्षी शाहू महाराज

प्रा. डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे
इतिहास विभाग प्रमुख बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी.
Email- dattatrayakharade@gmail.com

**प्रस्तावना :**

एकोणिसाव्या शतकात भारतात बरेच संस्थानिक होते. परंतु प्रजेच्या हितासाठी आपल्याकडे असलेल्या सत्तेचा वापर करणारे बडोद्याचे सयाजीराव महाराज व कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज असे संस्थानिक मात्र क्वचितच होते. सयाजीराव गायकवाड यांनी महाराष्ट्रातील माणसांचा संबंध आपल्या संस्थानाशी नसला तरी त्यांनी महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या उत्कर्षासाठी मोलाचे कार्य केले. सयाजीराव गायकवाड यांच्या प्रमाणेच प्रजेच्या हितासाठी झटणारे दुसरे संस्थानिक शाहू महाराज यांचा उल्लेख केला जातो. आपल्याकडील सत्तेचा त्यांनी पददलितांच्या उन्नतीसाठी उपयोग केला. माणसातला राजा व राजामधील माणूस असे त्याचे वर्णन केले जाते. शाहू महाराजांचे कार्य केवळ कोल्हापूर या त्याच्या संस्थानापुरते मर्यादित नव्हते. कायद्याचा आधार घेऊन ज्या सुधारणांचा अंमल त्यांना करण्याचा होता तो त्यांनी कोल्हापूर संस्थानात केलाच परंतु संस्थानाची सरहद्द ओलांडून ब्रिटिश अंमलाखालच्या महाराष्ट्रातील बहुजन समाजात जागृती करण्याचे त्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या उद्धाराची दिशा दाखवण्याचे कार्य ही त्यांनी केले. एका संस्थानाचा अधिपती असून सामाजिक जागृतीचे प्रचंड कार्य करणारी शाहू महाराज ही अपवादात्मक व्यक्ती होती. छत्रपती शाहू महाराजांची विचार सरणी आणि कार्य प्रखर होते. त्यांनी तत्कालीन समाजातील घनिष्ठ प्रथा, परंपरा आणि सामाजिक भेदभाव संपुष्टात आणण्याकरिता कठोर कायदे केले. त्याचबरोबर त्यांनी संस्थानातील कारभार पारदर्शक आणि सामान्य नागरीकांना न्याय मिळवून देण्याकरिता सर्वच जाती धर्मातील स्त्री-पुरूषांना सत्तेत सहभागी होता यावे, याकरिता आरक्षणाची सुविधा केली. शाहू महाराजांनी सर्वच जनतेच्या विकासाकरिता शैक्षणिक सुविधा, शैक्षणिक कायदे, अस्पृश्यता निर्मुलन कायदे, अस्पृश्यांना राजकीय व शासकीय कार्यात सहभाग, स्त्रीयांना पुरूषांसमान अधिकार, जातीभेदाचे निर्मुलन इत्यादीचे विचार प्रखड मांडून आपल्या संस्थानात सामाजिक समता प्रस्थापित करणेचा प्रयत्न केला. त्या धोरणाची अंमलबजावणी चोख व्हावी या करिता कायदे केले. कायद्याचे पालन व्हावे याकरिता स्वतः त्यावर नियंत्रण ठेवले. असा जनहितवादी शाहू महाराजांच्या सामाजिक समतेच्या विचाराचा कार्याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेतला आहे.

समाज परिवर्तन ही केवळ भौतिक गरजांच्या पुर्ततेसाठी करावयाची चळवळ नाही. ती माणसांच्या मुलभूत प्रेरणांच्या पुर्तीसाठी त्यांच्यातील सुप्त शक्तींना मुक्त वाव देण्यासाठी, त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची उर्मी निर्माण करण्यासाठी, त्यांचे हरवलेले माणुसपण पुन्हा मिळवून देण्यासाठी समुह शक्तीच्या जोरावर मानवमुक्तीसाठी उचलावयाचे क्रांतिकारक पाऊल आहे. आजचा हा क्रांतिकारी बदल आपोआप झालेला नाही. तो माणसांनीच घडविला आहे. आणि त्या बदलाबरोबरच माणुस स्वतःही बदललेला आहे. म्हणून आज परिवर्तन करणा-या लोकांचे नव्याने प्रबोधन होण्याची गरज आहे. वास्तवातील बदल आणि माणसातील बदल त्यांच्यातील एकरूपतेकडे क्रांतिकारी कृती म्हणून पाहिल्याशिवाय तो नीट समजू शकणार नाही.[1] राजर्षी शाहू महाराज हे महाराष्ट्रातील परिवर्तनवादी विचारांचे भोक्ते होते. 20 व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात राजर्षी शाहू महाराजांनी अखिल भारतातील परिवर्तनवादी चळवळींना चालना दिली. त्यांना प्रोत्साहन दिले आणि लोकांच्या मनातील आकांक्षा जागृत केल्या. 20 व्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून टाकणारी सामाजिक समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारी, बहुजन समाजाच्या उद्धारासाठी तळमळणारी व मार्गदर्शन करणारी लोकोत्तर व्यक्ती म्हणेज राजर्षी शाहू महाराज होत.

हिंदू धर्मात सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात होती. जाती व पोटजातींमुळे सामाजिक ऐक्य राहिले नव्हते याचा राष्ट्रीय ऐक्याला मोठा परिणाम होत होता तेंव्हा शाहू महाराजांनी समाजातील जातिप्रथेचे उच्चाटन करण्याचे कार्य हाती घेतले सामाजिक विषमते विरूद्ध संघर्ष केला. समाजातील जातिभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी विविध मार्गांचा अवलबं केला. जातीयतेचे उच्चाटन करण्यासाठी स्वतःच्या कृतीने उदाहरण घालून दिले. जातियतेची बंधने तोडून टाकण्यासाठी अनेक व्याख्याने दिली. तसेच अनेक ठिकाणी सामाजिक विषमतेविरूद्ध परिषदा आयोजित केल्या. सार्वजनिक ठिकाणे सर्वांसाठी खुली केली. आपल्या संस्थानात माणगांव येथे 1920 मध्ये सर्व धर्मातील लोकांची परिषद भरवून अस्पृश्य बांधवांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व स्विकारण्यास सांगितले. राजर्षी

शाहूंनी आपल्या संस्थानात रयतेचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध सुधारणा केल्या.[2] महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा वारसा ख-या अर्थाने शाहू महाराजांनी पुढे चालू ठेवला. राजाच्या सामाजिक कार्यामुळे बहुजन समाजाची प्रगती झाली. महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय चळवळी पुढे निघाल्या त्यांचा पाया घालण्याचे श्रेय छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना द्यावे लागते.

धर्मसत्ता-जातसत्ता आणि पुरूषसत्ता यांच्या मगरमिठ्ठीतून बाहेर काढण्यासाठी शाहू महाराजांनी सातत्याने प्रयत्न केले. कारण त्यांची विचारधारा मानवमुक्तीच्या ध्येयाप्रत होऊन जाणारी होती. त्यासाठी समताधिष्ठीत शोषणमुक्त निर्णय व विवेकनिष्ठ समाजनिर्मित मार्ग त्यांनी दाखविलेला होता. त्यातून त्यांना अभिप्रेत असलेला सम्यक समाज व प्रगत क्रांतिकारी तत्त्वज्ञान मांडून त्यांनी संबंध महाराष्ट्राला अस्पृश्यता निवारण्याचा एक नवा विचार दिलेला आहे. राजर्षी शाहू महाराज करवीर संस्थानाचा राजा म्हणून नाही तर भारतातील प्रगतिशील राजा म्हणून त्यांची किर्ती जास्त महत्त्वाची आहे.[3]

शाहू महाराजांनी खामगाव येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या 11 व्या अधिवेशनातील भाषणामध्ये शिक्षण विषयक जे विचार मांडले आहेत त्यात त्यांनी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षण हे अविभाज्य भाग समजुन हे प्रत्येकांनी घ्यावे असे ठणकावून सांगितले. त्याशिवाय पुढील भाषणात ते म्हणतात, "अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये, वीर कधीही निपजणार नाहीत म्हणून सक्तीच्या व मोफर शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत गरज असून याबाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे."[4] शिक्षण घेवून रयत सुधारली पाहिजे व तिने लोकशाहाची पुरस्कार केला पाहिजे. समाज सुशिक्षित साक्षर झाला तरच लोकशाही यशस्वीपणे राबविला जाऊ शकते व यशस्वी लोकशाहीच देशाला चांगले दिवस आणू शकते. यासाठी त्यांनी लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. ख-या अर्थाने शाहू महाराजांनी शिक्षण विषयक विचारांची बैठक ही महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारावर आधारलेली होती.

राजर्षी शाहू महाराज 17 मार्च 1884 रोजी दत्तक विधी पूर्ण होवून कोल्हापूरच्या गादीवर बसले. पुणे सार्वजनिक सभेसह संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला. याच काळात 1895 साली सर जेम्स फर्ग्युसन यांच्या नावाने पहिले स्वदेशी कॉलेज उघडले गेले. त्याचे उदघाटक राजर्षी शाहू महाराज होते. त्यामुळे त्या काळातील पहिल्या पिढीतील कर्त्या स्त्री-पुरूषांना शिक्षण घेता आले. राजर्षी शाहू महाराजांनी जाती निर्मूलन व अस्पृश्य उद्धार केल्यामुळे फुले-आगरकर-लोकहितवादी पुरस्कारित सुधारणांचे राजकीय पुरस्कर्ते म्हणून ते ओळखले जातात.[5]

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरूवात केली त्यांनी शैक्षणिक कार्याव्दारे सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्य समाजातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्याच्या मुलांकरिता स्वतंत्र वस्तीगृहाची स्थापना करून दिली. समाजातील सर्व वर्गांना शिक्षण मिळाले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.[6]

राजर्षी शाहू महाराजांनी 1884-1922 या आपल्या 28 वर्षाच्या राजवटीत समाज सुधारणेसाठी व प्रश्नासन सुधारण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. प्रजाहित दक्ष प्रशासक असा त्यांचा नावलौकिक होता. स्त्री शिक्षणाचे, त्यातुन स्त्री सक्षमीकरणाचे कार्य हे मौलिक होते. कारण "शिक्षणाशिवाय आमचा तरणोपाय नाही असे माझे ठाम मत आहे. शिक्षणा शिवाय कोणत्याच देशाची प्रगती झाली नाही असा इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशाची उन्नती झाली नाही म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदूस्थानला नितांत आवश्यकता आहे."[7] म्हणजे स्त्रियाच्या शिक्षणासाठी ते आग्रही होतो, हे मान्य करावे लागते. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी काही उपाय योजना केल्या. त्यात  सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा मुलीच्या शिक्षणाला उत्तेजन व विशेष प्रयत्नही त्यांनी केले. मोफत शिक्षण, विधवा पुर्नविवाहाचा कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, पडदा पद्धतीस विरोध, काडीमोड व घटस्फोट कायदा, अनौरस संतती व देवदासी जोगीण या विषयाचा कायदा, शिमग्यातील शिव्याना प्रतिबंध, कोल्हापूर संस्थानात मागास जातीला 50 % आरक्षण व त्यांची अंमलबजावणी याबाबतचे निर्णय घेणारे स्वातंत्र्य पूर्व काळातील ते एकमेव संस्थानिक होते. त्याचबरोबर कुलकर्णी वतन नष्ट केले, अस्पृश्यता निवारण्याचे जाहीरनामे काढले. सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेत्तर चळवळ यामध्ये प्रचंड बदल व त्याच्या विचारावर ह्या दोन्ही चळवळींनी महाराष्ट्रातील ब्राह्मणांची मक्तदारी मोडून नवीन दिशा समाज व्यवस्थेला दिली. त्याचबरोबर संस्थानातील शेती व सहकार व दुष्काळ याबाबत महत्वपूर्ण योगदान होते. संस्थानातील मुस्लीम समाजाच्या कल्याणासाठी झटणारे शाहू महाराज हिंदु मुस्लीम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. राजर्षी शाहू महाराजांचे समाजक्रांतीच्या वाटचालीतील योगदान अनन्य साधारण आहे. सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी साधनसंपत्तीच्या समान वाटपासाठी आणि नव्या संस्कृतीच्या निर्मितीसाठी, पददलित, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या अभावग्रस्त वर्ग प्रस्थापितांशी जोराने संघर्ष

करीत आहे. या संघर्षांना वैचारिकदृष्ट्या मजबुत करण्यासाठी क्रांतीकारक प्रगतशील मार्ग दाखविण्यासाठी शाहू महाराजांच्या विचारांची गरज समाजाला मोठ्या प्रमाणात आहे. आज आपणास असे दिसून येते की महाराष्ट्रातील काही विचारवंतांवर शाहू महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव दिसून येतो. तसेच देशाच्या विकास प्रक्रियावर महाराजांच्या विचार आणि कार्याचा प्रभाव आहे. आजच्या पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीस राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचे योगदान आहे. समाज आपोआप घडत नाही तो घडवावा लागतो. समाज घडवणारी माणसं कुणी वेगळी नसतात. समाजासाठी समाजातूनच आकाराला आलेल्या या माणसाला आपण सुधारक म्हणतो आणि म्हणून स्वतंत्र भारताची सामाजिक विकास (उन्नती) होण्यात ज्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यात राजर्षी शाहू महाराज अग्रगण्य असलेले दिसून येतात.

**संदर्भ**

1) डॉ. कांबळे नारायण व इतर (संपा.) राजर्षी शाहू, नव्या दिशा नवे चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2008 पृष्ठ क्र. 137.
2) डॉ. निंबाळकर नाईक सुवर्णा - 'समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज', संस्कृती प्रकाशन, पुणे, 2014 पृष्ठ क्र. 76.
3) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1992 पृष्ठ क्र. 117.
4) राजर्षी शाहू महाराजांचे खामगाव शिक्षण परिषदेतील भाषण, 17 डिसेंबर 1917.
5) डॉ. भोसले एस. एस. (संपा.), क्रांतीसुक्ते राजर्षी शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1975 पृष्ठ क्र. 89.
6) भगत रा. तू., राजर्षी शाहू छत्रपती – जीवन व शिक्षणकार्य, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, 2016 पृष्ठ क्र. 142.
7) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर 2001 पृष्ठ क्र. 38.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक धोरण

**डॉ.डी.आर.पाटील**
**इतिहास विभाग, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज चिखली,**
**ता.शिराळा, जि.सांगली.**
Email- drpatil7090@rediffmail.com

**प्रस्तावना :**

राजर्षी शाहू महाराज एक लोकोत्तर राजे होते. तत्कालीन ब्रिटिश हिंदुस्थानातील सुमारे साडेपाचशे राजे-संस्थांनीक ख्यालीखुशाली आणि मौज मस्तीत आकंठ बुडालेले असताना काही मोजक्या संस्थानिकांनी रयतेची काळजी वाहिली. यामध्ये राजर्षी शाहूंचा अग्रक्रमाने समावेश होतो. या रयतेच्या या राजाने केवळ आणि केवळ जनतेच्या हिताची काळजी केली. त्यांनी सामाजिक समतेची कावड खांद्यावर घेतलीच पण कृषी, उद्योग, क्रीडा आदी क्षेत्रातले त्यांचे काम निर्विवाद अजोड असेच आहे. आपल्या करवीर संस्थानात पायाभूत सुविधा निर्माण करतानाच त्यांनी शेतकऱ्यांसाठी आखलेल्या योजना आणि निर्माण केलेली व्यवस्था एकमेवाद्वितीय अशीच होती. हा राजा प्रयोगशील, उद्यमशील आणि गतिशील विचारांचा होता. म्हणूनच आजची कोल्हापूर जिल्ह्याची शेती, दूध व उद्योग क्षेत्रात झालेली प्रगती आहे त्याचे जनकच राजर्षी शाहू महाराज आहेत असेच आपणाला म्हणावे लागेल. या क्षेत्रातल्या प्रगतीमुळेच कोल्हापूर जिल्हा दरडोई उत्पन्नात देशात कधीकाळी पहिला तर सध्या दुसऱ्या स्थानावर आहे.

**तोफा वितळवून नांगर :**

पहिल्या महायुद्धाच्या परिणामाने विविध क्षेत्रे व्यापण्यास सुरुवात केली होती. याचा थेट परिणाम येथील लोखंडावर हि झाला. लोखंडाची भारतात होणारी आयात युद्धजन्य परिस्थिती मुळे मंदावली. लोखंडी नांगर तयार करण्यास लागणारा माल इंग्लंड, जर्मनी इत्यादी युरोपीय देशातून यायचा. लोखंड व बीडाच्या टंचाईमुळे लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या 'किर्लोस्कर' कंपनी ची मोठी पंचाईत झाली. सहाजिकच यामुळे शेतकऱ्यांना नांगराचा पुरवठा होणे जिकिरीचे झाले. अशावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर क्रियाशील असणाऱ्या या लोकराजाने कोल्हापूर संस्थानातील किल्ल्यांवरील तोफा एकत्र करून त्या वितळवुन नांगर करण्यास परवानगी दिली. गतवैभवाच्या ऐतिहासिक खुणा आणि आठवणीत रमण्यापेक्षा भविष्यातील शेती प्रगतीची वाट अधिक समृद्ध करावी यासाठी हा निर्णय राजर्षी शाहूंनी घेतला. यातून राजर्षी शाहूंचे पुरोगामित्व केवळ सामाजिक सुधारणा पुरतेच नव्हते तर ते त्यांच्या प्रत्येक कृतीत होते हेच यातून दिसून येते. किर्लोस्करांच्या करवी तोफांच्या मागणीचा प्रस्ताव आल्या आल्या ' या शेतकऱ्यांना उपयोगी पडणार आहेत या तोफा. फार चांगली गोष्ट. देऊन टाका या तोफा किर्लोस्करांना. फार शहाणा माणूस आहे तो.'[१] असे म्हणून जणू त्यांनी आदेशच दिला आणि कोल्हापूर संस्थानातील या तोफा रेल्वेने कुंडल येथील किर्लोस्कर कारखान्यात गेल्या पुढे त्या नांगराच्या रूपाने हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी सुपीक करु लागल्या. एका अर्थाने यातून शेती प्रगती मोठी चालना मिळाल्याचे दिसून येते.

**शेतकी संस्था व कृषी प्रदर्शने :**

कोल्हापूर संस्थानातल्या शेतकऱ्यांना शेतीतल्या आधुनिकीकरणाची माहिती व्हावी. शेतीत नवे नवे प्रयोग त्यांनी करावेत, यासाठी राजर्षी शाहू महाराज आग्रही होते. किंबहुना नव-नवे आधुनिक विज्ञान तरुणांनी अवगत करुन संशोधकवृत्ती जोपासावी यासाठीही ते प्रयत्नशिल होते. एवढेच नव्हे तर ते कृतिशील ही होते. खरेतर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने शेती व उद्योगधंदे वाढावेत आणि त्यांना गती मिळावी यासाठी प्रयत्न केले. परंतु कोल्हापूर संस्थानात आधुनिकीकरणाची ही प्रक्रिया राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीच सुरु केली होती. यावरून त्यांची शेती, उद्योगधंद्या विषयीची व्यापक दृष्टी दिसून येते. त्यांनी स्वतः युरोप दौऱ्यावर असताना शेतीही आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने पिकवून अन्नधान्याचे उत्पादन अधिक पटीने घेतले जाते हे प्रत्यक्ष पाहिले होते. म्हणूनच संस्थानात सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी '१९२२ साली त्यांनी कोल्हापुरात किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल

इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापन केली.'[२] या इन्स्टिट्यूटला जोडूनच शेती अवजारांचे एक म्युझियम सुरु करण्यात आले. एवढेच नव्हे तर कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांना सुधारित अवजारे, प्रगत बी-बियाणे, खते, मशागतीच्या आधुनिक पद्धती कळाव्यात किंबहुना त्याचा त्यांनी शेतीमध्ये अवलंब करावा यासाठी खास शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या.

एवढेच नव्हे तर करवीर संस्थाना बरोबरच रयत अंबाबाईच्या रथोत्सव आणि जोतिबाच्या चैत्र यात्रेस मोठ्या संख्येने खेडोपाड्यातून येते हे जाणून येथे इतर वेळीपेक्षा गर्दी जमते, म्हणूनच या ठिकाणी कृषी प्रदर्शने ठेवण्यात यावीत असे आदेश त्यांनी दिले.' अशा प्रदर्शनातून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ठ उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहिती पत्रके आदींची मांडणी केली जावी.'[३] इतकेच नाही तर उत्तम प्रतीची जनावरे लोकांनी पाळावीत व उत्तम जातीच्या जनावरांची पैदास करावी यासाठी ही खास उपाययोजना केली. यासाठी जनावरांची प्रदर्शनेही भरवली. संस्थानात जनावरांचे दवाखाने उभारले. शेतीतील उच्च व आधुनिक शिक्षण घेणाऱ्या गरजू लोकांना ही त्यांनी सरकारी तिजोरीतून मदत केली. 'रामचंद्र धोंडू शेळके, रा. कोल्हापूर, हे मराठे गृहस्थ ॲग्रिकल्चर शिकणे करिता अमेरिकेत जाणार असल्याने त्यांचे समक्ष वि॥ वरुन यास सदर कामाकरिता पंधराशे (१५००) रुपये बिनव्याजी कर्ज व अगर तसंलमात देण्यात यावी.'[४] असा आदेश महाराजांनी १० मे १९१४ रोजी काढला होता. वडगाव (ता.शाहूवाडी) येथील पांडुरंग चिमणाजी पाटील उर्फ पी.सी.पी. थोरात या विद्यार्थ्यांची मॅट्रिक मधील प्रगती पाहून शाहू महाराजांनी त्यांना खास दूत पाठवून बोलावून घेतले. खेड्यातून आलेल्या या मुलाची त्यांनी मराठा बोर्डींग मध्ये राहण्याची व्यवस्था केले. पुढे हेच पांडुरंग पाटील देशातले कृषी कॉलेज चे पुणे येथे पहिले प्राचार्य झाले, मुंबई इलाख्याच्या शेतकी खात्यात उच्च पदावर विराजमान होते. महादेव नारायण देवधर बारामती यांनी शेती सुधारणा नावाचे पुस्तक लिहिले होते. ते पुस्तक शेतीशी उपयुक्त असल्याने कोल्हापूर संस्थानातील शाळेत चालू करण्याचाही आदेश महाराजांनी दिला.

**शेती उत्पादनातील नविन प्रयोग :**

' सारा वसुलीचे काम करताना काही लोक मनमानी करायचे. कुलकर्णी हे मनमानी करून पिळवणूक करायचे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी शेतसारा पद्धतीत बदल घडवून आणण्यासाठी तलाठी नेमले.'[५] यामुळे सारा वसुली मध्ये सुसूत्रता आली व रयतेवर चाललेला अन्याय बंद झाला. एवढेच नव्हे तर कोल्हापूर संस्थानात ऊस मोठ्या प्रमाणावर पिकवला जाई. येथे उत्पादित ऊस गुऱ्हाळघरांवर गाळला जाई. गुऱ्हाळ घरांमध्ये तयार झालेला अत्यंत चांगल्या प्रतिचा गुळ कोकणातील राजापूर बंदरातून बाहेर पाठवला जाई. येथे तयार झालेला गुळ अत्यंत दर्जेदार आणि कणीदार असा होता. मात्र राजापूर बंदरातून बाहेर जात असल्याने त्यास 'राजापुरी' गुळ म्हणून ओळखले जाई. महाराजांना ही बाब खटकली आणि कोल्हापुरात तयार होणाऱ्या शेती उत्पादनांसाठी 'शाहुपुरी' ही बाजारपेठ वसवली व कोल्हापुरी गुळाचे महत्व अबाधित राखले. खरेतर राजर्षी शाहूंचा काळाच्या पुढे पाहणे आणि रहाणे हाच खास गुण होता.

कोल्हापूर संस्थानात पिकवलेला ऊस गुऱ्हाळ घरात गाळप करत असताना लाकडी गाळप यंत्र वापरले जाई. त्यामध्ये ऊस गाळप करताना अनेकांचे हात अडकून दुर्घटना घडायच्या. ऊस गाळपावेळी अपघाताचे प्रमाण जास्त असल्याने महाराजांनी उसगाळताना यंत्रात हात सापडणार नाही असे यंत्र बनविण्यासाठी स्पर्धा लावली. मॅट्रिक झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांची हुशारी पाहून राजर्षी शाहूंनी मदत केली होती त्या पी.सी.पी. थोरात यांनी अशा प्रकारचे लाकडी गाळप यंत्र (घाणा) बनवण्यात यश मिळवले. यामुळे गाळप यंत्रात हात सापडून होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी झाले.

**सिंचन व्यवस्था आणि चहा लागवडीचा प्रयोग :**

संस्थानातील शेती खऱ्या अर्थाने बहरायची असेल आणि शेतीतले उत्पन्न वाढण्याबरोबरच शेती मोठ्या प्रमाणात पीकाखाली आणायची असेल तर सिंचन व्यवस्था करणे गरजेचे आहे. सह्याद्रीच्या कडेकपारित शेकडो इंच पाऊस पडतो त्यावेळी तिथल्या नद्या दुथडी भरुन वाहतात. मात्र पावसाळा झाला की त्या कोरड्या ठणठणीत पडतात. हे पाणी अडवले आणि जिरवले तर याचा शेतीसाठी खूप मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो, किंबहुना तसे करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी राधानगरी धरणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

हाती घेतला.' १९०९ साली राधानगरी धरणाचे प्रत्यक्षात बांधकाम सुरु झाले. १९१८ साला पर्यंत १४ लाख रुपयांची रक्कम खर्ची पडून धरणाचे ४० फुटापर्यंत बांधकाम पूर्ण झाले.'६ या धरणाचे प्रत्यक्षात १९५७ ला बांधकाम पूर्ण झाले. परंतु यामुळे हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आणि राजर्षी शाहूंनी पाहिलेले हरितक्रांतीचे स्वप्न पूर्ण झाले.

प्रयोगशीलता आणि नाविन्यता हा राजर्षी शाहू महाराजांच्या कारभाराचा एक महत्त्वाचा गुण होता. त्यांनी ऊस, भात, ज्वारी, भुईमूग व इतर कडधान्ये ही पारंपरिक पिके नेहमी घेतली जात होती. या पद्धतिला फाटा देऊन कधीच न घेतलेली पिके संस्थानातल्या शेतीत घेतल्यास शेती, शेतकरी आणि राज्याचाही कायापालट होऊन जाईल असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच त्यांनी चहा, कॉफी, रबर याची लागवड संस्थानात करून नवीन प्रयोग करुन पाहिला. परंतु यापैकी चहा लागवडीचा प्रयोग यशस्वी झाला.' पन्हाळ्या जवळील अस्वलडोंग बागेत त्यांनी चहा लागवडीचा प्रयोग यशस्वी केला.'७ या पन्हाळ्याजवळच्या बागेतला चहा कोल्हापूर संस्थांना बरोबरच अगदी बडोद्या पर्यंत प्रसिद्ध होता. 'Panhala Tea No - 4' या नावाने हा चहा प्रसिद्ध होता. हा चहा बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्या आवडीचा खास चहा म्हणून प्रसिद्ध होता. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रयत्नातून कोल्हापुरात चहाचे मळे फुलले मात्र काळाच्या ओघात या नवीन प्रयोगाकडे कोणी गांभीर्याने पाहिले नसल्याने कोल्हापूर संस्थानचा पन्हाळा चहा दुर्दैवाने काळाच्या ओघात इतिहास जमा झाला. राजर्षींनी १९०८ ला हा चहा लागवडीचा प्रयोग संस्थानात यशस्वी केला होता.

असे जरी असले तरी तब्बल ९० वर्षानंतर २००८ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वत रांगेत असणाऱ्या आंबा घाटात बाळासाहेब टेकवडे या प्रयोगशिल शेतकऱ्याने ४५ एकरात चहा लागवडीचा प्रयोग यशस्वी करुन दाखविला होता. चहावर प्रक्रिया करण्यासाठी कर्नाटकातील प्रोसेसिंग प्लँटचा आधार घ्यावा लागत असे. चहाच्या तोडलेल्या पानावर जास्तीत जास्त सात तासांमध्ये प्रक्रिया करणे गरजेचे असते म्हणून बाळासाहेब टेकवडे यांनी यासाठी चहाच्या मळ्यालगतच प्रक्रिया प्लँट उभा केला. एवढे प्रयत्न करूनही दुर्दैवाने याही नविन प्रयोगास 'टी बोर्ड ऑफ इंडीया' या शिखर संस्थेची मान्यता न मिळाल्याने इतिहास जमा झाला.

**निष्कर्ष :**

राजर्षी शाहू महाराज समकालीन कालखंडातील काही मोजक्या संस्थानिक अथवा राजां पैकी एक जनसेवक राजे होते. राजर्षी शाहूंचे समाजउद्धारक म्हणून व सामाजिक समतेच्या क्षेत्रातले काम अजोड आहेच परंतु त्यांचे शेतीच्या अनुषंगाने केलेले काम व त्यांनी राबवलेली ध्येय धोरणे कालातीत होती. म्हणूनच कोल्हापूर जिल्ह्याची आजची शेती, सहकार व उद्योग क्षेत्रात झालेली प्रगती लक्षणीय दिसते. कोल्हापूर जिल्हा देशात दरडोई उत्पन्नात जो अग्रेसर होता व सध्या दुसऱ्या स्थानावर आहे त्याचे जनकत्वच राजर्षी शाहूंच्या कृषी विषकयक ध्येय धोरणांत आहे. राजर्षी शाहूंनी सुमारे शंभर वर्षापूर्वी चहा लागवडीचा प्रयोग यशस्वी केला आणि त्यानंतर महाराष्ट्रात प्रथम शाहूवाडी तालुक्यातील आंबा येथे याच प्रयोगाची पुनरावृत्ती झाली. हाही प्रयोग कमालीचा यशस्वी झाला. दुर्दैवाने शाहू महाराजांचा यशस्वी प्रयोग जसा इतिहास जमा झाला त्याच पद्धतीने आंब्यातला प्रयोग सुद्धा इतिहास जमा झाला. असे जरी असले तरी शाहूंच्या दृष्टीने शेतीमधील आधुनिकता आणि व्यापकता अत्यंत महत्त्वाची होती.

**संदर्भ :**

1. किर्लोस्कर शंकरराव,राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,डॉ.रमेश जाधव (संपा.), महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, तिसरी आवृत्ती, २०१६, पृ.४४२.
2. डॉ.पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, २६ जून२००७, पृ.२०२. उपरोक्त, पृ. २०३.
3. डॉ.जाधव रमेश (संपा), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, तिसरी आवृत्ती, २०१६, पृ. ११४१.
4. न्या. कोळसे-पाटील बी.जी., दैनिक पुढारी, लोकराजा लेख, ६ मे २०२२, पृ. ४.

5. डॉ. पवार जयसिंगराव (संपा.), उपरोक्त, पृ. २०२.श्री. पाटील डी. आर. यांचा ' कोल्हापूर जिल्ह्यातील चहा लागवडीचा यशस्वी प्रयोग ' हा संशोधन पेपर, २००९, पृ. २.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# राजर्षी छ. शाहू महाराज यांचे अस्पृश्य उद्धारासाठी केलेले शैक्षणिक कार्य

डॉ. गौतम नामदेव ढाले
इतिहास विभागप्रमुख, श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर
Email-gautamdhale15@gmail.com

**प्रस्तावना :**

ब्रिटीश राजवटीत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी अनेक जहागीरदारांनी आपले जीवन संपवले. भारतीय राजकारणही त्याच परिस्थितीतून जात होते. पण, त्याला काही अपवाद आहेत. त्यात कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांचे नाव अग्रगण्य आहे. शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या सन्मानजनक जीवनासाठी जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत चळवळ चालवली. त्यांनी अस्पृश्यांना मुख्य प्रवाहातील लोकांप्रमाणे शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. अस्पृश्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक जागृतीबद्दल त्यांना काळजी होती. कारण ते इतरांवर अवलंबून होते. थोडक्यात, वर्तमान संशोधन शाहू महाराजांच्या अस्पृश्य उद्धार या उल्लेखनीय कार्यांवर प्रकाश टाकते. वर्तमान संशोधन लेख तीन भागात विभागलेला आहे. पहिला भाग अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासासाठी शाहू महाराजांच्या कार्याशी संबंधित आहे. दुसरा भाग सामाजिक समतेसाठी केलेल्या त्यांच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकतो. तिसऱ्या भागात अस्पृश्यांमध्ये वैचारिक जागृतीसाठी शाहू महाराजांच्या कार्याचा समावेश आहे. शेवटी, या सर्व पैलूंचे मूल्यमापन त्यात दिले आहे.

**शैक्षणिक कार्य :**

छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी शाळा आणि वसतिगृहे उघडून त्यांच्या विकासाचा मार्ग मोकळा केला. हे करत असताना त्यांनी अस्पृश्य समाजातील पूर्वग्रह नष्ट करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले आणि शिक्षणात समान संधी उपलब्ध करून देण्याचा आग्रह धरला. त्यांनी आपल्या प्रांतात शिक्षणाच्या माध्यमातून मागासलेल्या समाजाच्या उन्नतीचे धोरण स्वीकारले. यासाठी अनेक वसतिगृहे स्थापन केली. कोल्हापुरातील विविध समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी शाळा आणि वसतिगृहे उभारली. १९०८ मध्ये त्यांनी भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, बागल, शिंदे इत्यादी सहकाऱ्यांना सहभागी करून अस्पृश्यांसाठी वसतिगृहेही उघडली. या कामासाठी त्यांनी 'शिक्षण प्रसार मंडळ' (विद्या प्रसारक मंडळ) नावाची संस्था स्थापन केली. या लोकांनी अस्पृश्यांची मुले वसतिगृहासाठी शोधून काढण्यासाठी खूप धडपड केली, तसेच त्यांचा शैक्षणिक दर्जा मुख्य प्रवाहातील लोकांच्या मुलांच्या बरोबरीने वाढवण्याचा प्रयत्न केला. परंतु, अस्पृश्यांची शिक्षणाबाबत उदासीनता असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे कठीण काम होते. त्यामुळे या अडचणींवर मात करण्यासाठी शाहू महाराजांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी त्यांच्या प्रांतात अस्पृश्यांसाठी फक्त पाच शाळा होत्या आणि विद्यार्थ्यांची संख्या 168 होती. 1907-1908 दरम्यान अस्पृश्यांसाठीच्या शाळांची संख्या 16 आणि विद्यार्थ्यांची संख्या 416 होती. महाराजांच्या अविरत प्रयत्नांमुळे अस्पृश्यांसाठीच्या शाळांची संख्या हळूहळू वाढत गेली. 1912 मध्ये अस्पृश्यांसाठी शाळांची संख्या या चार वर्षात 27 झाली आणि विद्यार्थ्यांची संख्या 636 होती.

अस्पृश्यांसाठी शाळा उघडण्यासाठी त्यांनी मनापासून पाठिंबा दिला. या योजनांच्या आर्थिक तरतुदींचे ते स्वतः निरीक्षण करत होते. छत्रपती शाहू महाराज आणि भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्ह्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजातील शिक्षणाच्या प्रसारासाठी निधी संकलनाची अनोखी योजना आखली. त्यांना कुस्तीची खूप आवड होती आणि त्यांच्या आश्रयाखाली अनेक पैलवान होते. त्यांनी कुस्तीपटूंच्या 4-5 जोड्यांची किंमत घेतली आणि नियुक्त केलेल्या समितीकडे सोपवली. कोल्हापूर प्रांतात लोकांना कुस्तीबद्दल खूप रस होता. त्यांनी विविध गावांमध्ये कुस्तीच्या सामन्यांची तिकिटे विकण्याची योजना राबवली आणि त्यातून मिळणारे उत्पन्न शिक्षणाच्या प्रसारावर खर्च केले.

सामाजिक विषमतेचे निर्मूलन शाहू महाराजांनी हिंदू समाजातील पारंपारिक जातीव्यवस्थेचे उल्लंघन करून समानतेवर आधारित नवा समाज निर्माण करण्याचा सदैव प्रयत्न केला. जातीचे उच्चाटन, अस्पृश्यता निर्मूलन,

श्रेष्ठ आणि कनिष्ठ, उच्च आणि खालच्या वर्गातील कृत्रिम भिंती नष्ट करण्याच्या विचारांनी ते प्रेरित होते. शाहू महाराजांनी कोणीही अस्पृश्यांचा अपमान करणार नाही असा आदेश जारी केला. प्रांतात असे घडल्यास त्याला गावातील मजूर, पोलीस सहाय्यक आणि स्थानिक महसूल कर्मचारी जबाबदार राहतील, असा आदेश काढला होता. त्यांनी प्रांतातील सर्व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली. त्यांनी अस्पृश्यांसाठी सार्वजनिक नळ, विहिरी, तलाव, सराया , रुग्णालये, शाळा आणि कार्यालये उघडून त्यांना समान अधिकार बहाल केले. त्यांनी अस्पृश्यांबद्दल भाष्य केले, "माझा विश्वास आहे की खरी राष्ट्रसेवा ही त्यांच्या बेड्या तोडण्यात आहे. अमानुष अत्याचार ज्याने अस्पृश्यांना पूर्णपणे गुलाम केले. खालच्या जातीचे लोक त्यासाठी अविरत प्रयत्न करूनही ते करू शकत नाहीत. उच्चवर्णीय लोकांनी प्राचीन काळापासून वारसा हक्काने उपभोगलेले हक्क सोडून द्यावेत. अस्पृश्यांच्या मुलांना इतरांप्रमाणेच सरकारी शाळांमध्ये आणि उघडलेल्या सर्व स्वतंत्र शाळांमध्ये प्रवेश द्यावा, असा आदेश त्यांनी जारी केला. तसेच, विविध जाती-धर्माच्या मुलांना कोणत्याही प्रकारचा अपमान न करता एकत्रितपणे बसवले पाहिजे. अस्पृश्यांना धार्मिक शिक्षण देण्यामागचा त्यांचा हेतू हा होता की समाजात समानता प्रस्थापित करावी.

समाज म्हणून, त्यांनी धार्मिक शिक्षण सुरू करण्यापूर्वी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी धागा समारंभ (उपनयन विधी) आयोजित केला. शाहू महाराज हे इतिहासातील पहिले सुप्रसिद्ध राजा होते ज्यांनी अस्पृश्यांसाठी धागा समारंभ आयोजित करून वेद संथा दिली आणि त्यांना ब्राह्मणांच्या तथाकथित श्रेष्ठ दर्जाच्या बरोबरीने वर आणले. त्याचा कोल्हापुरातील समाजव्यवस्थेवर अपरिहार्यपणे परिणाम झाला आणि ब्राह्मणवादाची मुळं उद्ध्वस्त झाली. त्यामुळे पुण्यातील काही ब्राह्मणांनी शाहू महाराजाबद्दल तक्रार केली.

महाराजांनी इंग्रजांना राजकीय दृष्ट्या दडपण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ते म्हणाले, "मागासवर्गीयांसाठी सेवा करताना मला पदच्युत झाले तरी मला पर्वा नाही. त्यांनी विरोधी आणि समकालीन ब्रिटीशांना इशारा दिला की शेवटच्या श्वासापर्यंत मी सदैव प्रयत्नशील राहीन."

त्यांनी सामाजिक समतेची चळवळ उभी केली. या चळवळीने अस्पृश्यता निर्मूलनाला संवैधानिक स्वरूप दिले होते. शाहू महाराजांनी हिंदू समाजात प्रचलित असलेल्या हानिकारक रूढी आणि परंपरांना आवर घालून सामाजिक समता विकसित करण्यावर ठळकपणे भर दिला.

**वैचारिक जाणीव :**

शाहू महाराजांनी आपल्या प्रांतातील अस्पृश्यांना शिक्षण आणि रोजगाराच्या समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. या ऐतिहासिक कार्यासाठी संपूर्ण अस्पृश्य समाज कायम ऋणी होता. या कामाचे उत्तम उदाहरण म्हणजे बस्तवाडपेटा रायबाग भागातील करवीर येथील महार जहागीरदारांनी २७ जुलै १९२१ रोजी महारहिवासीबाबत अर्ज सादर केला होता. शाहू महाराजांच्या अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा उल्लेख करताना ते म्हणाले की, "उदार राजाने अनेक प्रकारे प्रयत्न केले. आमच्या उन्नतीसाठी आणि सुधारणेसाठी. तुम्ही बोर्डिंग, शाळा उघडल्या, अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला, काहींनी वकिलीच्या व्यवसायात प्रवेश केला आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव बाजूला सारून राजा आम्हाला आपल्या मुलांप्रमाणे समान प्रेमाने वागवतो. म्हणून, आमचा समाज तुमची देवाप्रमाणे पूजा करतो आणि या उल्लेखनीय कार्यासाठी सदैव ऋणी राहील" (बहिष्कृत भारत पाक्षिक (मराठी) ११). अस्पृश्य हे शाहू महाराजांच्या कार्यापुढे नतमस्तक होते असे सूचित करते. परंतु, अस्पृश्यांमध्ये वैचारिक जागृती करण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. अस्पृश्यतेच्या परंपरेबद्दल ते म्हणाले की, 'महाभारतानंतर वैदिक धर्माचा ऱ्हास झाला तेव्हा द्विज लोक स्वतःला जन्माने श्रेष्ठ आणि शूद्रांपेक्षा (अस्पृश्य) कनिष्ठ समजत होते. त्यामुळे भारतातील बहुतांश लोकसंख्या शिक्षण, धर्म आणि समृद्धीपासून वंचित होती. पण, अस्पृश्यांवर अत्याचार झाले.

बुद्धाच्या काळात ते थांबले. त्यानंतर, वेदांवर आधारित धर्मांध हिंदू धर्माची भरभराट झाली, ज्याची पराकाष्ठा समाजातील वाढत्या जातिवादात झाला. त्याच्या फांद्याही मोठ्या प्रमाणावर फोफावल्या. आजकाल, अस्पृश्यांवर होणारे जातिवाद आणि अत्याचार ही हिंदू धर्मातील आज्ञा मानली जाते". या समस्येवर मात करण्यासाठी मुख्य प्रवाहातील लोकांनी पुढे आले पाहिजे असे शाहू महाराजांना वाटत होते. तसेच, खालच्या

जातीतील लोकांनी स्वत:च्या उन्नतीसाठी आणि वारसाचा दर्जा वाढवण्यासाठी कठोर परिश्रम केले पाहिजेत आणि उच्च जातीच्या लोकांनीही खालच्या जातीतील लोकांसोबत एकत्रितपणे काम केले पाहिजे. हे पद्धतशीरपणे आणि सौहार्दपूर्णपणे जातिवादाचा नायनाट करण्यास मदत करेल. तसेच शाहू महाराजांनी समाजातून जातिवाद नष्ट करण्यासाठी आंतरजातीय संबंध प्रस्थापित केले पाहिजेत असे सुचवले. आंतरजातीय विवाह वाढवण्यासाठी कायदेशीर अडथळे दूर केले पाहिजेत, जे या समस्येवर मात करण्यासाठी फायदेशीर ठरतील. त्यासाठी कायदेशीर तरतुदी कराव्यात.शाहू महाराजांनी मे १९२० मध्ये अखिल भारतीय मागासवर्गीय परिषदेचे अध्यक्षपद भूषवले. त्यांनी परिषदेत स्पष्ट केले की, 'जातीवाद निर्मूलनाच्या प्रमाणावर राष्ट्राचा विकास अवलंबून आहे' .

दिल्ली येथील अखिल भारतीय मागासवर्गीय परिषदेत राजश्री शाहू महाराज म्हणाले, “ब्रिटिश साम्राज्याचा उदय आपल्या जीवनात जागृती आणि पुनर्जागरणाकडे नेतो. आपण ते विसरता कामा नये. तसेच, देशाचे राजकीय भवितव्य संबंधित राष्ट्रांच्या नागरिकांच्या चारित्र्यावर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःचे चारित्र्य सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येकाने दिलेले अधिकार वापरण्याची त्यांची क्षमता त्यांच्या वर्तनातून सिद्ध करावी”. या कार्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले असले तरी त्यांनी कधीही अस्पृश्यांचे नेते म्हणून स्वतःचा प्रचार केला नाही. त्यांनी नेहमीच अस्पृश्यांचे सेवक म्हणून काम केले.

शाहू महाराजांनी नागपुरातील अखिल भारतीय मागासवर्गीय परिषदेत आपले विचार व्यक्त करताना म्हटले होते, “कोणतीही आपत्ती आली तर तुझी सेवा करण्यासाठी मी माझे साम्राज्य राजपुत्राच्या स्वाधीन करीन. ” अस्पृश्यांच्या चळवळीचे नेतृत्व अस्पृश्य समाजातून बाहेर पडल्यास अस्पृश्य मुक्तीचा मार्ग अधिक मोलाचा होईल, असे शाहू महाराजांना नेहमीच वाटत होते. गवई यांना लिहिलेल्या पत्रातून त्यांना हाच संदेश सुचवायचा होता. यामध्ये दिलेल्या पत्रात ते म्हणाले, “तुम्ही तुमच्या समाजाच्या चळवळीचे नेतृत्व इतरांकडे देऊ नका. विश्वासार्ह आणि योग्य नेता स्वत:च्या समाजातून नियुक्त केला पाहिजे. अन्यथा, इतर समाजाचे नेते तुमच्या आणि चळवळीच्या भविष्याशी खेळतील”. त्यामुळे त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या माणगाव परिषदेत त्यांनी डॉ.आंबेडकरांना अस्पृश्यांचे नेते म्हणून जाहीरपणे घोषित केले. त्यानंतर अस्पृश्य समाज निर्धाराने डॉ.आंबेडकरांच्या पाठीशी उभा राहिला परिणामी इतर नेत्यांची कीर्ती हळूहळू कमी होत गेली. डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मानवमुक्तीची चळवळ चालवली.

**निष्कर्ष :**

शाहू महाराजांनी महात्मा फुलेंची सत्यशोधक (सत्यशोधक) चळवळ अविरतपणे वाढवली. त्यांनी समाजातील विषमता संपुष्टात आणण्यासाठी आपली शक्ती वापरली. अवंत-गार्डेची प्रमुख भूमिका म्हणजे लोकांच्या जीवनात रूपांतरित बदल घडवून आणणे, त्यांना मानवतेबद्दल जागरूक करून प्रगतीकडे नेणे. या दृष्टीकोनातून छत्रपती शाहूमहाराज हे एक आयकॉनोक्लास्ट होते. ज्या काळात शाहू महाराजांनी अस्पृश्यता निर्मूलनाचा मुद्दा उपस्थित केला तो काळ आजच्यासारखा अनुकूल आणि पुरोगामी नव्हता. केसरीच्या वृत्तपत्रातील शाहू महाराजांच्या मृत्यूच्या लेखात त्याचे बारकाईने वर्णन केले आहे. केसरीचे लेखक म्हणाले, “कोणीही याला मागे टाकू शकत नाही. आजच्या युगातील ज्ञानशास्त्र, राजकारण आणि समाजशास्त्र यातील शाहू महाराजांचे कौशल्य आणि बौद्धिक क्षमता. लोक त्याच्या प्रचंड आणि कठोर परिश्रमाचे साक्षीदार आहेत” (प्रबोधन पाक्षिक 117). प्रचारक आणि समाजसुधारक ठाकरे यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याकडे विविध समाजाचे लोक व्यापक दृष्टिकोनातून कसे पाहतात हे दाखवण्याचा प्रयत्न केला होता. या संदर्भात ते म्हणाले, “तो चित्पावन समाजातील लोकांचा शत्रू होता. देशस्थ समाजासाठी ते धार्मिक क्षेत्रात बंडखोर होते. ते मुंबई आणि भारत सरकारचे प्रिय मित्र होते, ब्राह्मणेतरांचे पिता होते तर अस्पृश्यांसाठी देवाचे देवदूत होते” (प्रबोधन पाक्षिक (मराठी) 116). हे शाहू महाराजांच्या कार्याकडे लोकांचे विविध दृष्टीकोन स्पष्ट करते. 6 मे 1922 रोजी शाहू महाराजांच्या निधनानंतर त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना 'बहिष्कृत भारत'मध्ये लिहिले होते, “ते आमचे अब्राहम लिंकन होते ज्यांनी हे सिद्ध केले आहे की जर तुम्ही प्रेमाची बीजे रुजवली तर ती तुम्हाला द्वेषाची फळे कधीच देणार नाही. ; तो आमचा गौरव आहे; हिंदूंच्या मनावरील अस्पृश्यतेचा डाग त्यांनी पुसून टाकला आहे. तो आमचा देव होता...” (बहिष्कृत भारत पाक्षिक). डॉ.आंबेडकर यांनी

टिपणी केली, "शाहू महाराजांनी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी अविरत प्रयत्न केले आणि ब्राह्मणांचे गड उध्वस्त केले". अशा प्रकारे, छत्रपती शाहू महाराजांनी नेहमीच अस्पृश्यांच्या विकासाची काळजी घेतली असे सध्याच्या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. अस्पृश्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक जागृतीसाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. शाहू महाराजांचे हे मोठे कार्य आगामी पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

**संदर्भ सूची :**

1. प्रबोधन पाक्षिक (मराठी), 1 जून 1922, 122.
2. गरुड साप्ताहिक, 13 मे 1954.
3. बहिष्कृत भारत पाक्षिक (मराठी), 4 नोव्हेंबर 1927, 4थी आवृत्ती.
4. मूकनायक पाक्षिक (मराठी), 5 जून 1920.
5. बहिष्कृत भारत पाक्षिक (मराठी), 3 जून 1922.
6. गरुड साप्ताहिक, (मराठी), 13 मे 1954.
7. प्रबोधन पाक्षिक, 16 मे 1922, 117.
8. बागल, के. एम., एड. (1933). सत्यशोधक हिरक महोत्सव ग्रंथ (मराठी), हीरक महोत्सवी ग्रंथ समिती.
9. बनसोडे, आर. एच. (1930). अस्पृश्यांची देशभूल (मराठी). गिरिजाशंकर मारुती शिवदास, मुंबई.
10. गोरे, जी. आणि शिरूभाऊ एल. (1973). महाराष्ट्रातील दलित-शोध आनी बोध (मराठी),सहध्यायन पब्लिकेशन, मुंबई.
11. खैरमोडे, C. B. (1978). डॉ. भीमराव रामजी आंबेडकर: चरित्र (मराठी). 3रा. खंड. I. प्रताप पब्लिकेशन, मुंबई.
12. खरात, एस. (1966). डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर (मराठी). ठोकळ भवन, श्री लेखन वाचन घर, पुणे.
13. चंद्र, व्ही., एड. (2002). डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखण आणि भाषाने-भाग दुसरा (मराठी). खंड. 18. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रोत साहित्य प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई.
14. पवार, जे., एड. (2001). राजश्री शाहू स्मारक ग्रंथ. महाराष्ट्र इतिहास अकादमी, कोल्हापूर.
15. "प्रबोधन मासिक (मराठी)." (१९२६), ६४.
16. शेंडे, एन.आर. (1963). विदर्भातिल एक थोर दलित पुढारी G. A. गवई: Vyakti Aani Karya (Marathi). प्रभाकर पांडुरंग भाटकर, अमरावती, ४१.
17. शिंदे, विठ्ठल रामजी (1976). भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न (मराठी). समाज कल्याण, क्रीडा आणि पर्यटन विभाग, मुंबई, २४३.
18. वरखेडे, रमेश (2017). "महाराजा सयाजीराव गायकवाड यांच भाषासंग्रह (मराठी)." खंड. II. सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र प्रकाशन समिती, औरंगाबाद, ३४.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा अध्यादेश आणि कोल्हापूर संस्थानी राज्यातील शैक्षणिक विकास

डॉ. रामचंद्र वसंत कुंभार
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.
Email- kumbhar.ramchandra@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतातील एक समाजक्रांतिकारक राज्यकर्ते म्हणून कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना (इ.स. १८७४ ते इ.स. १९२२) ओळखले जाते. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूरचा सर्वांगिण दृष्टीकोनातून विकास झाला. कला, क्रिडा, शिक्षण, व्यवसाय, शेती, व्यापार, नाटयसंगीत अशा सर्वच क्षेत्रात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत अमुलाग्र बदल घडून आला. कोल्हापूर राज्यातील बहुजन समाजाच्या सर्वांगिन उन्नतीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विशेष प्रयत्न केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणांमुळे कोल्हापूर राज्याच्या शैक्षणिक विकासास सुरूवात झाली. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यातील शैक्षणिक विकासासाठी गाव तिथे शाळा, पाटील शाळा, वसतिगृहांची निर्मिती अशा अनेक उपाययोजना राबविल्या. या उपाययोजनांमधील एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे **'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे'** धोरण होय. राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१७ मध्ये अध्यादेश काढून आपल्या राज्यात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. प्रस्तुतच्या शोध निबंधामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या अध्यादेशाचा सविस्तर आढावा घेऊन त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच या अध्यादेशामागील उद्देश व त्याचा कोल्हापूर राज्यातील शैक्षणिक बदलाबाबतची चर्चा सदरच्या शोध निबंधात करण्यात आली आहे.

**कोल्हापूर संस्थांनी राज्य आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज :**

१८ व्या शतकाच्या सुरूवातीला मराठी स्वराज्याचे विभाजन होऊन सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी महाराणी ताराबाईने इ.स. १७१० मध्ये पन्हाळगडावर मराठ्यांच्या दुसऱ्या राजाची म्हणजेच कोल्हापूर राज्याची स्थापना केली. स्वतंत्र कोल्हापूर राज्याची निर्मिती झाल्यानंतर कोल्हापूरच्या गादीवर अनेक सत्ताधीश येऊन गेले. कोल्हापूरच्या संभाजीच्या (इ.स. १७१४ ते इ.स. १७६०) मृत्यूनंतर त्यांच्या चतुर्थ पत्नी जिजाबाई यांनी शिवाजी दुसरा (इ.स. १७६२ ते इ.स. १८१२) यांच्या नावे इ.स. १७६० ते इ.स. १७७३ पर्यंत कोल्हापूर राज्याचा कारभार पाहिला. जिजाबाईंच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांची सहावी पत्नी दुर्गाबाईंनी राजप्रतिनिधी म्हणून काम पाहिले. दुसरे शिवाजी यांच्या कारकीर्दीत इ.स. १७८८ मध्ये कोल्हापूर राज्याची राजधानी पन्हाळगडावरून कोल्हापूरला आणण्यात आली.[१] दुसरे शिवाजी यांच्यानंतर शंभू महाराज (इ.स. १८१२ ते १८२१); छ. शहाजी दुसरे (इ.स. १८२१ ते १८३७); छ. शिवाजी तिसरे (इ.स. १८३७ ते १८६०); छ. राजाराम दुसरे (इ.स. १८६६ ते १८७०); चौथे शिवाजी महाराज (इ.स. १८७० ते १८७३) इ. राज्यकर्ते कोल्हापूरच्या गादीवर येऊन गेले. दरम्यान इ.स. १८२९ मध्ये कोल्हापूरचे राज्य ब्रिटीशांच्या सार्वभौम सत्तेखाली आले.[२] इ.स. १८२९ पासून भारत स्वतंत्र होईपर्यंत म्हणजे इ.स. १९४७ पर्यंत कोल्हापूरचे राज्य ब्रिटीशांच्या भारतातील साम्राज्यातील एक संस्थानी राज्य (Princely State) होते.

कोल्हापूरचे महाराज चौथे शिवाजी यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८८४ मध्ये कागलकर घाटगे घराण्यातील यशवंतराव यांना दत्तक घेऊन त्यांना छत्रपती शाहू या नावाने कोल्हापूरच्या गादीवर बसविण्यात आले. यशवंतराव अर्थातच राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म इ. स. १८७४ मध्ये झाला. कोल्हापूर राज्यातील बहुजन समाजाच्या सर्वांगिन उन्नतीसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विशेष प्रयत्न केले. दि. २६ जुलै, १९०२ रोजी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात मागासलेल्या जातींच्या लोकांसाठी ५०% जागा राखीव ठेवण्याचा कायदा केला.[३] पुढे बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाहू महाराजांनी दि. २१ सप्टेंबर, १९१७ रोजी कोल्हापूर राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा कायदा केला.[४]

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांपुर्वीची कोल्हापूर राज्यातील शैक्षणिक स्थिती :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांपुर्वीची भारतातील इतर राज्यांप्रमाणे कोल्हापूर संस्थानी राज्यातील शैक्षणिक स्थिती चांगली नव्हती. सन १८५४ च्या मेजर ग्रॅहॅमच्या अहवालानुसार असे दिसून येते की, १९ व्या शतकात कोल्हापूर राज्यात शिक्षण पारंपरिक पद्धतीने दिले जात असे. वडिलांचा धंदा मुलाने शिकून घेणे आणि चालविणे हाच शिक्षण प्रकार सर्वमान्य होता. आधुनिक शिक्षण उच्चवर्गियांपैकी हाताच्या बोटावर माजण्याइतपत लोकांनी घेतले होते. कोल्हापूरात ब्रिटीश सरकारच्या मदतीने काही शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र शाळेची फी न परवडणारी होती. मराठी माध्यमाच्या शाळेची फी महिना एक आणा होती तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेची फी महिना आठ आण्यापासून एक रूपयापर्यंत होती. सन १८५४ मध्ये कोल्हापूर संस्थानात सरकारी शाळा १० होत्या व त्यात ४६६ मुले शिकत होती. याशिवाय कोल्हापूर संस्थानात १२२ खाजगी शाळा होत्या व त्यातून १८२८ मुले शिक्षण घेत होती. कोल्हापुरात मुलींची पहिली शाळा १८५३ साली सुरू झाली. सन १८५५ मध्ये मुलींच्या शाळेत ९० मुली शिक्षण घेत होत्या. सन १८५९ साली कोल्हापूर संस्थानातील सरकारी शाळांची संख्या १७ पर्यंत गेली व विद्यार्थीसंख्या १२०० च्या वर गेली होती.[५] थोडक्यात कोल्हापूर संस्थानी राज्यात १९ व्या शतकात आधुनिक शिक्षणाला सुरुवात झाली असली तरी शैक्षणिक स्थिती चांगली नव्हती.

**दि. २५ जुलै, १९१७ चा मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाबाबतचा आदेश :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दि. २५ जुलै, १९१७ रोजीच्या शाळा खाते ठराव क्र. २०२ नुसार मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाबाबतचा आदेश काढला. या आदेशामध्ये पुढील महत्त्वपूर्ण बाबी आहेत.

**१.** सन १९१७ च्या गणेश चतुर्थीपासून म्हणजेच दि. ३० सप्टेंबर, १९१७ पासून कोल्हापूर राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे ठरले आहे.

**२.** प्राथमिक शाळांमध्ये आकारण्यात येणारी फी वरील दिवसापासून माफ करण्यात येत आहे.

**३.** मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना कशी आमंलात आणायची, त्यासाठी कोणत्या उपाययोजना राबवायच्या याबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली.

**४.** कोल्हापूर राज्याच्या एज्युकेशनल इन्स्पेक्टरांनी राज्यातील प्राथमिक शाळेतील अभ्याक्रमाची योजना तयार करून सादर करावी.

**५.** मोफत प्राथमिक शिक्षणासाठी देवस्थान फंडातून रुपये २०,००० आणि राज्याच्या खजिन्यातून रुपये ८०,००० असे एकूण एक लाख रुपयाचे जास्तीचे अनुदान मंजूर करण्यात आले. या जास्तीच्या अनुदानातील बचतीची रक्कम ट्रेनिंग कॉलेज काढणे, शाळेच्या इमारती बांधणे आणि शालेय साहित्य विकत घेणे इ. साठी वापरावी.

**६.** राज्यातील देशी शाळा (व्हॅरनॅक्युलर स्कूल) पूर्वीच्या पद्धतीनुसार महसूल खात्याच्या नियंत्रणाखाली असतील.[६]

**दि. २१ सप्टेंबर, १९१७ चा सक्तीचे प्राथमिक शिक्षणाबाबतचा जाहीरनामा :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजाच्या दि. २५ जुलै, १९१७ च्या आदेशानुसार मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना राबविण्यासाठी रा. सा. हरी भिकाजी करमरकर, रा. सा. कृष्णाजी धोंडो मराठे व प्रो. पंडितराव इ. सदस्यांची **'सक्तीचे प्राथमिक शिक्षण समिती (Compulsory Primary Education Committee)'** स्थापन करण्यात आली.[७] या समितीने तयार केलेला **'सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा (Compulsory Primary Education Act)'** महसूल खात्याने दि. ११ सप्टेंबर, १९१७ च्या ठराव क्र. ३४३ नुसार मंजूर केला. त्यानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दि. २१ सप्टेंबर, १९१७ रोजी सक्तीचे प्राथमिक शिक्षणाबाबतचा जाहीरनामा आपल्या राज्यातील प्रजेसाठी प्रसिध्द केला. पुढे हा जाहीरनामा दि. २९ सप्टेंबर, १९१७ रोजी करवीर राज्य गॅझेटमध्ये प्रकाशित करण्यात आला. या जाहीरनाम्यातील महत्त्वपूर्ण बाबी खालीलप्रमाणे आहेत.

**१.** सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा संपूर्ण कोल्हापूर राज्याला लागू आहे.

**२.** सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा ७ ते १४ वर्षांच्या मुलांना (boys) लागू आहे.

**३.** पालकांनी अपवादात्मक परिस्थिती वगळता आपल्या मुलांना शाळेत पाठवावे.

**४.** नाव नोंदणी, प्रवेश, दंड, अपील इ. बाबतीत या कायद्याचे योग्यरित्या पालन होते कि नाही हे शाळा, पालक, शालेय व इतर सरकारी अधिकारी यांनी पाहावे.

५. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या कामी गावच्या कुलकर्णींने पाटलाला सर्वतोपरी मदत करावी.
६. या कायद्याच्या संदर्भाने पाटील व कुलकर्णी हे राज्याच्या शिक्षण खात्याचे नोकर मानण्यात यावेत.
७. या कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी सरसुभे यांना आवश्यकतेनुसार अतिरिक्त नियम करण्याची परवानगी आहे.[८]

**करवीर सरकारचे गॅझेट (२९ सप्टेंबर, १९१७) :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजाच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यातील नियम कंपलसरी प्रायमरी एज्युकेशन कमिटीने तयार करून ते करवीर सरकारच्या गॅझेटमध्ये दि. २९ सप्टेंबर, १९१७ रोजी प्रकाशित करण्यात आले. हा जाहीरनामा पाच भागात असून पहिल्या भागामध्ये या कायद्यास सक्तीचे शिक्षणाचे नियम असे नाव दिले असून पहिल्या भागात कायद्याची व्यापकता, व्याख्या स्पष्ट केली आहे. दुसऱ्या भागात या कायद्यातून कोणत्या परिस्थितीत मुलांना सूट मिळू शकते त्याचे नियम दिले आहेत. गॅझेटच्या तिसऱ्या भागात प्राथमिक शिक्षणास योग्य वयाच्या मुलांच्या रजिस्ट्रेशनबाबतचे नियम सांगितले आहेत. तर चोथ्या भागात या कायद्यानुसार आईवडील, शिक्षक, अधिकारी यांना असणाऱ्या अधिकाराचे आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास केल्या जाणाऱ्या शिक्षा व दंड याबाबत सविस्तर नियम दिले आहेत. पाचव्या आणि शेवटच्या भागात या कायद्यासंदर्भातील इतर बाबींची माहिती दिली आहे.[९]

**मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाबाबतच्या कायद्यामागील उद्देश :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी महात्मा फुलेंच्या पावलावर पाऊल ठेऊन आपल्या राज्यातील बहुजनांच्या उद्धारासाठी शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले. शिक्षणाशिवाय बहुजन समाज आपल्या हक्कासाठी व प्रगतीसाठी जागृत होणार नाही म्हणून शाहू महाराजांनी सुरुवातील आपल्या राज्यातील प्राथमिक शिक्षण मोफत केले. मात्र प्रजेतील मागासलेपणा व अज्ञान यामुळे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नव्हते. त्यामुळे शाहू महाराजांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे लागले. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा उद्देश स्पष्ट करताना म्हटले आहे कि, '**करवीर इलाख्यातील आमच्या सर्व प्रजाजनांना लिहिता वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास त्यांनी समर्थ व्हावे म्हणून हा कायदा केला आहे**'.[१०] डॉ. भालबा विभूते यांच्यामते बहुजन समाजाला धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठीच शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. याबाबतीत शाहू महाराज म्हणतातकि, **"खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी धार्मिक जूं लादले गेले आहे ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे. त्याकरिता सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करून तो अमलात ठेवला आहे. असले शिक्षण मी माझ्या रयतेस देण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळे पुढील पिढी तरी लवकर लिहिणारी वाचणारी होईल अशी मला खात्री आहे"**.[११] .

**मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाबाबतच्या कायद्यामधील महत्त्वपूर्ण बाबी :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जाहीर केलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यामध्ये अनेक महत्त्वपूर्ण बाबी आहेत. हा कायदा जरी संपूर्ण कोल्हापूर राज्यासाठी लागू असला तरी हुजूर सरकारला (छत्रपती) एखादा इलाखा या कायद्यातून वगळण्याचा अधिकार होता. या कायद्यानुसार आईबाप म्हणजे फक्त ज्यांच्या पोटी मुल जन्माला आले असे नसून मूळ ज्यांच्या देखरेखीखाली आहे अथवा मुलाच्या रक्षणाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते सर्व आईबाप या संज्ञेत येत होते. तसेच हा कायदा सात ते चौदा वर्षाच्या सर्व मुलांना आणि सरकारी शाळा व सरकारने मदत दिलेल्या, सरकारने परवानगी दिलेल्या सर्व शाळांना लागू होता.[१२] थोडक्यात कोल्हापूर राज्यातील सर्व शाळांना हा कायदा लागू होता.

राजर्षी शाहू महाराजांनी लागू केलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार सर्व पालकांना आपल्या ७ ते १४ वर्षाच्या मुलांना शाळेत पाठवणे बंधनकारक असले तरी विशिष्ठ परिस्थितीत शाळेत पाठवण्याबाबत सवलत मिळत होती. जे मुल शाळेत न येता इतर रीतीने ठरविलेल्या ईयत्तेपर्यंत शिकत आहे किंवा शिक्षण पूर्ण केले आहे, म्हातारपण अथवा आजारपणामुळे आईबापांची सेवा-शुश्रुषा करण्यासाठी मुलांस घरी राहणे भाग असते, शाररीक अथवा मानसिक वैगुण्यामुळे मूल शिक्षणास अपात्र असते, मुलाच्या राहण्याच्या ठिकाणापासून एक मैलाच्या आत शाळा नसेल अशा परिस्थितीत मुलास सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यातून सूट दिली होती.[१३]

जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवत नसत त्यांना विविध स्वरूपाचे दंड आकारले जात होते. सर्वप्रथम मामलेदार पाटील, कुलकर्णी आणि जरूर भासल्यास शाळा खात्यातील नोकर किंवा गावातील सभ्य गृहस्थांच्या मदतीने शिक्षणास योग्य मुलांची यादी तयार करून त्याची एक प्रत चावडीवर आणि दुसरी प्रत शाळेच्या दर्शनी भागामध्ये चिकटवली जाई. शिक्षणास योग्य मुलांची यादी प्रत्येक वर्षाच्या जुलै महिन्यामध्ये तयार केली जाई. या यादीप्रमाणे जे पालक आपल्या मुलांना प्रवेश करून शाळेत पाठवत नसत त्यांना प्रत्येक महिन्यास एक रुपया दंड केला जाई आणि नोटीस पोहोचलेच्या ३० दिवसांच्या आत दंड न भरल्यास पालकाची जंगम मालमत्ता जप्त करून दंड वसूल केला जाई. शाळेत प्रवेशित मुलांना आजारपण, घरातील आजारी व्यक्तीची शुश्रुषा, आईबापाच्या कामामध्ये मदत इ. कारणासाठी पूर्वपरवानगी घेऊन एका महिन्यात जास्तीत जास्त १५ दिवस गैरहजर राहता येई. मात्र जी मुले पूर्वपरवानगी न घेता ६ ते १५ दिवस गैरहजर राहत अशा मुलांच्या पालकांना पहिल्या प्रसंगी दोन आणे आणि पुढील प्रत्येक वेळी एक रुपयापर्यंत दंड केला जाई. जर पालक वरील गुन्हा वारंवार करत असतील तर दंडाची रक्कम पाच रुपयापर्यंत वाढविली जाई. जे पालक दंड भरत नसत त्यांची जंगम मालमत्ता जप्त केली जाई.[१४]

**मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचे परिणाम :**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये शैक्षणिक विकासास गती प्राप्त झाली. १९ व्या शतकाच्या शेवटी कोल्हापूर राज्यातील शाळांची संख्या २२७ होती व त्यामधून शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या १४ हजार पर्यंत गेली होती, तर एकूण साक्षरतेचे प्रमाण ३.९ % आणि पुरूष साक्षरता ७.६ % व स्त्री साक्षरता ०.१५ % होती. त्यावेळी साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त ब्राह्मण पुरूषांचे ७९.१ % होते. मराठा पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८.६ %, मुसलमान पुरूष साक्षरतेचे प्रमाण ७.५ % तर कुणबी पुरूष साक्षरतेचे प्रमाण १.५% होते. याकाळात स्त्रियांची शैक्षणिक स्थिती फारच वाईट होती. सर्वात जास्त साक्षरतेचे प्रमाण ब्राह्मण स्त्रियांचे होते तेही फक्त १.६५ % इतके कमी होते. मराठा व मुसलमान स्त्री साक्षरता ०.०३ % व कुणबी स्त्री साक्षरता ०.०४ % होती.[१५]

२० व्या शतकात कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाल्याचे दिसते. सन१९३१ च्या सेन्सेसनुसार कोल्हापूर संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण ६.६१ % होते. मात्र स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण पुरूषांपेक्षा फारच कमी होते. १९३१ मध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण फक्त १.१३% होते तर त्यावेळी पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण ११.८२% होते.[१६] वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सन १९१७ च्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यामुळे कोल्हापूर संस्थानातील शैक्षणिक स्थिती वेगाने सुधारू लागली.

**निष्कर्ष :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणांमुळे कोल्हापूर राज्याच्या शैक्षणिक विकासास सुरूवात झाली. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यातील शैक्षणिक विकासासाठी गाव तिथे शाळा, पाटील शाळा, वसतिगृहांची निर्मिती अशा अनेक उपाययोजना राबविल्या. या उपाययोजनांमधील एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे **'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे'** धोरण होय. राजर्षी शाहू महाराजांनी सन १९१७ मध्ये अध्यादेश काढून आपल्या राज्यात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. या कायद्यामागील उद्देश आपल्या प्रजेला फक्त साक्षर करणे नव्हते तर बहुजन समाजाला धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे हा होता. राजर्षी शाहू महाराजांनी हा सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा आपल्या राज्यातील सर्व प्रजेला जरी लागू केला असला तरी मुलींना हा कायदा लागू नव्हता.[१७] त्यामुळेच सन१९३१ च्या सेन्सेसनुसार कोल्हापूर संस्थानातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या साक्षरतेपेक्षा फारच कमी दिसते. असे असले तरी सन १९०१ च्या तुलनेत सन १९३१ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील पुरुष व स्त्रियांची साक्षरता कितीतरी पटीने वाढल्याचे दिसते. यामागे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे **'मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे'** धोरण कारणीभूत आहे.

**संदर्भ :**

1. भिडे ग. रं., देशपाडे पु. ल.(संपा.), कोल्हापूर दर्शन(श्रीमान मदनमोहन लोहिया अभिनंदन
2. ग्रंथ), प्रथम आवृत्ती, इंटरनॅशनल पब्लिशिंग सव्हिस, डेक्कन जिमखाना पुणे ४, २३ जानेवारी
3. १९७१, पान नं. ३१.
4. कित्ता पान नं. ६०.

5. पाटील टी. एस., कोल्हापूर संस्थानातील सामाजिक, राजकीय चळवळींचा एक अभ्यास,अप्रकाशित एम. फिल. प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९३, पान. नं. १२.
6. कित्त पान नं. १३.
7. भोसले नंदकुमार, कोल्हापूर राज्यातील समाजिक – आर्थिक परिस्थिती (१९०१ ते १९६०),
8. एम. फिल. प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९०, पान नं. ३१ व ३२.
9. Dr. Sangave Vilas (Ed.), Rajarshi Shahu Chhatrapati Papers, Vol. – II (1914 – 1917 A. D.), Shahu Research Centre, Shivaji University, Kolhapur, Kolhapur, 1997, P. 359.
10. Ibid P. 360.
11. Ibid P. 405.
12. Ibid P.P. 406 – 410.
13. Ibid P. 406.
14. सिंह ब्रिजेश (संपा.), लोकराज्य (मासिक ), शैक्षणिक क्रांतीचे जनक :राजर्षी छत्रपती शाहू महाराज विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, सप्टेंबर
15. २०१८, पान नं. १५.
16. Dr. Sangave Vilas (Ed.) Op. Cit. P. 406.
17. Ibid P. 407.
18. Ibid P. 408.
19. शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्यातील सामाजिक – आर्थिक परिस्थिती (१८५१ – १९००), एम. फिल. प्रबंधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९४, पान नं. ३६.
20. Census of 1931 - Kolhapur and S.M.C. States, Kolhapur Government,Kolhapur, 1932, P.P.- 586 – 624.
21. Dr. Sangave Vilas (Ed.) Op. Cit. P. 411.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 Issue.16 May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अस्पृश्योध्दाराचे कार्य

**डॉ. ज्योती जयवंत व्हटकर**

इतिहास विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी ता. चंदगड, जि. कोल्हापूर

Email- jyotivatkar13@gmail.com

**प्रस्तावना :**

सामान्य जनतेच्या उत्कर्षासाठी आपले राज्यपद पणाला लावणा-या छत्रपती शाहू महाराजांचे व्यक्तिदर्शन उद्बोधक, विचारनीय, मानवी सहानुभूतीने ओथंबलेले म्हणून हृद्य आणि माणुसकीने मोहरलेले म्हणून चिरस्मरणीय आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे प्रथम लोकनेते म्हणून पुढे आले. नंतर ते छत्रपती म्हणून भारताच्या इतिहासात अजरामर झाले. शाहू महाराज हे प्रथम छत्रपती म्हणून लोकांसमोर आले आणि नंतर ते लोकनेते म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर झाले. सामान्य जनतेच्या जीवनाशी त्यांनी स्वत:च्या उध्दारासाठी चालविलेल्या झगड्याशी समरस होऊन त्यांच्यामध्ये वावरणारा राजा त्यांच्या वेळच्या संस्थानिकांत दुसरा कोणी झालाच नाही.

छत्रपती शाहू महाराज हे जरी भारतीय राजकारणात प्रत्यक्ष भाग घेत नव्हते, तरी महाराष्ट्रात ते अप्रत्यक्षपणे सामाजिक क्षेत्रातील टिळकांचे प्रतिस्पर्धी म्हणून मानण्यात येत असत. शाहू महाराज हे अधिकाराने आणि औदार्याने राजे होते. तर टिळक औदार्याने राजे होते. टिळकांचे शिक्षण प्रसाराचे कार्य वरिष्ठ वर्गात घडले. महाराजांचे हेच कार्य बहुजन समाजासाठी झाले. प्रजा सुबुद्ध व्हावी, जागृत व्हावी, तिने राज्यकारभार करण्यास सहकार्य करावे, तिने आपल्या उद्धारासाठी स्वत:च्या पायावर उभे राहावे या हेतूने प्रेरित होऊन त्यांनी शिक्षण प्रसार केला.

छत्रपती शाहू महाराज सामान्य जनतेला, दलितांना आणि पददलितांना सांगत की, "मी माझी मते सोडणार नाही, किंवा जीव वाचविण्यासाठीदेखील शरण जाणार नाही. मी मोडेन पण वाकणार नाही. सरकार रागावेल असे तुम्ही म्हणता. रागावो बिचारे. मला त्रास होईल, यात संशय नाही. पण गरजवंतांना मदत केल्याबद्दल, अस्पृश्यांना हात दिल्याबद्दल नि मराठ्यांचा उध्दार करण्याकरिता माझी शक्ती खर्च केल्याबद्दल परमेश्वराकडून मला खचित न्याय मिळेल".

टिळकांचे हरिजनासंबंधीचे धोरण कचखाऊ होते, उपकारक नव्हते, न्याय्य नव्हते. 'प्रत्यक्ष देव अस्पृश्यता पाळू लागला तर मी त्याला देव म्हणून ओळखणार नाही". असे टिळकांनी कर्मवीर शिंदे यांनी भरविलेल्या ज्या अस्पृश्यता निवारण परिषदेत भाषण केले, त्याच परिषदेत 'मी आपल्या दैनंदिन व्यक्तिगत जीवनात अस्पृश्यता पाळणार नाही.' असे जाहीर करणा-या जाहीरनाम्यावर त्यांनी सही करण्यास नकार दिला. म्हणजेच सामाजिक समता त्यांना मान्य नव्हती. "छत्रपती शाहू महाराज हे मांग, महार, कातकारी, बुरुड ह्यांना पंक्तीत घेऊन जेवत असत. त्यांच्या मडक्यातील ते पाणी पीत असत. महाराज हा आपला महार-मांगाचा परिवार घेऊन १९२० साली मे महिन्यात नागपूरला गेले असता त्या शिवाशिवीच्या भीतीने राजे लक्ष्मणराव भोसले आपला राजवाडा सोडून शिकारीच्या निमित्ताने बाहेर पळाले.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्व दवाखान्यात इतर जातीच्या रोग्यांच्या बरोबर अस्पृश्य रोग्यांनाही त्यांच्या बरोबरीनेच वागविण्यात यावे आणि अस्पृश्यता न मानता त्यांची शुश्रुषा करण्यात यावी असा हुकूम दिला. असे ज्यास करायचे नसेल त्या डॉक्टरांनी, कंपाऊंडर आणि ड्रेसर यांनी राजीनामे द्यावीत असेही फर्मावले. १५ जानेवारी १९१९ या दिवशी सर्व शिक्षकांनी अस्पृश्य मुलांना अस्पृश्य न मानता इतरांच्या बरोबरीनेच वागवावे असा हुकूम काढला. नवीन जातवार पद्धतीने निवडलेल्या कोल्हापूर म्युनिसिपाल्टी मध्ये अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधी निवडण्याचा हक्क दिल्यामुळे एक सुशिक्षित चांभार जातीचे श्री. दत्तोबा पोवार हे गृहस्थ राजधानीच्या म्युनिसिपालिटीत चेअरमन झाले. सार्वजनिक विहिरी, तळी, पाण्याचा नळ वापरण्याचा आणि धर्मशाळांमध्ये इतरांच्या बरोबरीने राहण्याचा अस्पृश्यांना अधिकार आहे असे महाराजांनी जाहीर केले. सोनतळी येथे आणि स्टेशन बंगला येथे दोन नवीन अस्पृश्य विद्यार्थीगृहे काढण्यात आली. अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करून सार्वजनिक शाळांतच त्यांना शिकविले पाहिजे अशी व्यवस्था शाहू महाराजांनी केली. याचवेळी कित्येक अस्पृश्य तरुणांना संस्थानात वकीली करण्याच्या सनदा देण्यात आल्या. यावर महाराजांवर टीकेची झोड उठली. या टीकेस उत्तर देताना दि. ३० मे १९२० रोजी नागपूर येथील बहिष्कृत समाज परिषेदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना महाराज

म्हणाले, "मी ज्या महारा – मांगांना सनदा दिल्या आहेत, त्यांच्याहून कमी पात्रतेच्या आणि शिक्षणाच्या इतर जातींच्या लोकांना दुस-या संस्थानात सनदा देण्यात आल्या आहेत, त्यामुळे समाजाचा अध:पात झाला असे कोणी म्हणत नाहीत. महारा-मांगांना सनदा देण्यात माझा हेतू इतकाच आहे की, रूढी आणि कायदा यांनी लोकांना ज्या धंद्याची दारे बंद केली आहेत, ते धंदे या लोकांना उघडे करून द्यावेत. यामुळे त्यांचा दर्जा वाढून आपण इतर कोणत्याही मनुष्याच्या बरोबरीने आहोत ही भावना त्यांच्यामध्ये रूढ होईल असे मला वाटते."

शाळा, तलाव, रुग्णालये, कचे-या, राजवाडा, राजांची पंगत ही सर्व हरिजनांना शाहू महाराजांनी खुली केली. त्यांची हजेरी आणि अहवेलना बंद करून त्यांना माणुसकीचे हक्क दिले. त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून केवळ नोक-याच न देता त्यांच्यासाठी ५०% आरक्षण देणारे ते एकमेव छत्रपती होते. धंदे काढण्यास उत्तेजन दिले. गंगाराम कांबळे नावाच्या महार जातीतील माणसाला उपहारगृह काढून देऊन त्या उपहारगृहात महाराज स्वत: चहा घेऊ लागले. त्यांनी महारा-मांगांना माहूत म्हणून नोकर नेमले. राजकन्येच्या विवाहावेळी इतर नागरिकांसोबत हरिजनांनाही आदर सत्काराची कामे देऊन महाराजांनी त्यांना त्या समारंभात मिरवले. अशा रीतीने छत्रपतींनी अस्पृश्यांच्या जीवनास एवढी मोठी कलाटणी दिली की त्या विविध समाजातून पुढे अनेक चांगले कार्यकर्ते तयार झाले. ते त्या त्या समाजातून / समाजाच्या उद्धाराचे काम करायला लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर बाहेरील महाराष्ट्रात अस्पृश्यांच्या स्वातंत्र्यासाठी ते झगडू लागले. हरिजनांच्या अनेक परिषदा भरल्या. त्या परिषदांचे अध्यक्ष स्वत: शाहू महाराज झाले. त्यांची भाषणे माणगाव ते दिल्ली आणि नागपूर ते हुबळी पर्यंत झाली. महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात मोठे सहाय्य केले. त्यांनी आर्थिक सहाय्य देऊन डॉ. आंबेडकरांना 'मूकनायक' नावाचे पाक्षिक काढावयास लावले. आपल्या विश्वविद्यालयीन अभ्यासपूर्तीसाठी डॉ. आंबेडकर १९२० साली लंडनला गेले तेव्हाही त्यांना महाराजांनी आर्थिक सहाय्य केले.

१९१८ साली महाराजांनी महारांची बलुते पद्धत बंद करून त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर रयतवारीने करून दिल्या. कोल्हापूर संस्थानातील महारांची महार वतनाच्या गुलामगिरीतून मुक्तता केली. महार-मांगादी अस्पृश्यांना दिलेल्या मानवी हक्कांविरुध्द जे कुणी दंगे धोपे करतील त्यांना कडक शासन होईल असे फर्मान काढले. सा-या महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील इतर प्रांतात अशी महान क्रांती पूर्वी घडली नव्हती. मानवी हक्काचा जाहीरनामा घोषित न करता दलितांना आणि पददलितांना त्यांचे मानवी हक्क परत देण्याची ही कृति म्हणजे युगप्रवर्तक धैर्याची आणि कृतिशूरपणाची पताकाच होय. जी बाब शाहू महाराजांनी १९१८ साली केली, ती बाब मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. खेर यांना १९३७ साली करता आली नाही. पण तीच बाब १९५९ साली यशवंतराव चव्हाण हे व्दिभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होताच त्यांनी केली. आणि महाराष्ट्रातील महारांना त्यांनी गुलामगिरीच्या जाचातून मुक्त केले. जे कार्य एका यशवंतरावांनी म्हणजे छत्रपती शाहू महाराजांनी सुरु केले, ते दुस-या यशवंतरावांनी पूर्ण केले. हा एक योगायोग मानावा लागेल.

"महात्मा ज्योतीराव फुले यांच्या विचारापासून आणि त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन राजे छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक सुधारणेच्या कामाला प्रारंभ केला". हिंदू समाजातील रूढीबध्द जातीय पद्धत मोडून त्या ठिकाणी समतेवर उभा असणारा नवसमाज निर्माण करावा हाच महाराजांचा सतत प्रयत्न चालू होता. त्यासाठी हिंदू समाजातील जातीभेद मोडले पाहिजेत, अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे, समाजातील एक वर्ग श्रेष्ठ आणि दुसरा कनिष्ठ, एक उच्च आणि दुसरा नीच असे पडलेले कृत्रिम भेद नष्ट केले पाहिजेत या विचाराने ते कार्यप्रवण झालेले होते. हिंदू धर्मग्रंथांना आणि रूढीना शह देण्यासाठी महाराजांनी कोल्हापूरला स्वतंत्र असे 'शंकराचार्याचे पीठ' निर्माण केले. त्यांनी महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेले स्वातंत्र्य बहुजन समाजाला प्राप्त करून देण्यासाठी शासन संस्थेचा आणि सत्तेचा कसा उपयोग करून घेता येईल याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. "बहुजन समाजाला या स्वातंत्र्याबद्दल फुले-शाहू यांनी जागृत केल्यानेच ब्राम्हण वर्ग वर्चस्वाला मोठा धक्का बसला. फुले-शाहू यांना ब्राम्हण वर्गाने जातीय मर्यादामध्ये कोंडण्याचा प्रयत्न केला. मुंबई प्रांतातील लोकसंख्येच्या ५ टक्के असणा-या ब्राम्हणांच्या हाती त्या काळात तेथेही राज्य कारभाराची दुय्यम सूत्रे होती. "त्याकाळी मद्रासमध्ये ब्राम्हण ३ टक्के होते. त्यांना २२०० राजपत्रित अधिकारांच्या जागांपैकी ८२० जागा तर लोकसंख्येच्या ६४% असलेले मागासलेले आणि हरिजन यांना २२०० पैकी फक्त ७५ जागा,इतर जागा युरोपियनांना आणि इतरजनांना अशी छत्रपती शाहूंच्या कालखंडानंतरही मद्रासमध्ये परिस्थिती होती.

छत्रपती शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक यांनी आपापल्या ध्येयासाठी निर्भयपणे, नि:स्वार्थीपणे कळकळीने लढा केला. टिळकांनी स्वराज्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले. ते भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे जनक होते. राष्ट्रीय त्यागाचे प्रतीक होते. छत्रपती शाहू महाराजांनी आपले राज्यपद आणि जीवित सामान्य जनतेच्या

हक्कासाठी पणाला लावले. ते म्हणत, "टिळक महान देशभक्त. इंग्रजांशी स्वराज्यासाठी लढले. त्याला साह्य करायचे नाही तर कोणाला करायचे ? तो काय माझा वैयक्तिक शत्रू आहे थोडाच?".

शाहू महाराज हे बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी झटत होते. विद्येमुळे आणि उद्योगामुळे त्यांची त्यांना प्रगती साधायची होती. सामाजिक क्रांती झाल्याशिवाय स्वराज्याचे फायदे कनिष्ठ समाजाला मिळायचे नाहीत असे त्यांचे ठाम मत होते. ते परिषदातील आपल्या भाषणामधून जाहीरपणे सांगत की, स्वराज्य आम्हास पाहिजे आहेच. त्या योगानेच आमच्यात चैतन्य येईल..... परंतु जोपर्यंत आमच्यामध्ये जाती जातीतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत, तोपर्यंत आम्ही आपापसात झगडत राहणार आणि आमच्या हितबुद्धीस अपाय करून घेणार. आमच्यातील अंतस्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हास स्वराज्यात पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक जाती पद्धती झुगारून देणे आम्हांस अत्यंत अवश्य आहे. हीच बाब अधिक स्पष्ट करताना ते म्हणाले, "सुधारकांच्या सर्व चळवळीत पुढाकार घेणे ही उच्चवर्णिय यांची कर्तव्यकर्मे आहेत. जर हल्लीचीच जातीव्यवस्था कायम राहिली तर ज्या रीतीने हल्ली स्वराज्याचा अर्थ समजला जातो, ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे  हे होय. याचा अर्थ मी स्वराज्याच्या चळवळीच्या विरुध्द आहे आहे समजावयाचा नाही, हे पुन: मी एकवार सांगतो. आम्हाला स्वराज्य पाहिजेच. केवळ अल्प सत्ता उच्चवर्गीयांच्या हातातच जाण्यात स्वराज्याचे   पर्यवसान होऊ नये, म्हणून निदान दहा वर्षेपर्यंत तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे". याच परिषेदेत महाराजांनी अस्पृश्य समाजाला सांगितले की, "तुमचे खरे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. माझी खात्री आहे की, ते तुमचा उध्दार केल्याखेरीज राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर ते सर्व हिदुस्थानाचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे".

शाहू महाराजांची लोकांना समजावून सांगावयाची पद्धत वेगळीच असे. प्रात्यक्षिकांवर त्यांचा भर असे. त्यांची याच संदर्भातील एक हकीकत जितकी मनोरंजक होती, तितकीच उद्बोधक होती. महाराज सोनतळीवर विश्रांतीसाठी असताना एक दिवस काही उच्चवर्णिय महाराजांकडे येऊन ते बहुजन समाज आणि मागासलेल्या लोकांना महाराज जी मदत करीत असतात ते कसे चुकीचे आहे हे पटवून देत होते. महाराजांनी त्यावर कोणतीही प्रतिक्रिया न देता नोकरांना बोलावून समोरच्या घोड्यांच्या चंदीच्या कुंडात घोड्यांसाठी चंदी टाकण्यास सांगितले. नोकराने त्याप्रमाणे केले. मग त्यांनी पागेतील सा-या घोड्यांस सोडण्यास सांगितले. जे बलदंड, बळकट घोडे होते त्यांनी गर्दी करून जे दुबळे     घोडे होते, त्यांना ढकलून कुंडातील सारी चंदी त्यांनीच खाऊन टाकली. दुबळी, मरतुकडी घोडी मागेच राहिली. त्यांना चंदी मिळालीच नाही. मग महाराजांनी नोकरांना सांगून त्या दुबळया घोड्यांची स्वतंत्र व्यवस्था करून त्यांना खायला घातले. महाराज तक्रार घेऊन आलेल्याकडे वळले. म्हणाले, " पाहिलात फरक...? समजले मी दीन दुबळयांना का मदत करतो ...? पुढे म्हणाले. "जातीभेद मोडून आपण सारे एक होऊ या. मागे पडलेल्यांना मी सारखे म्हणजे एकाच जातीचे समजतो व त्यांना वर आणण्याचा प्रयत्न करतो. हे माझे पवित्र कर्तव्य आहे असे मी समजतो. असे मी न करेन तर मी कर्तव्यविन्मुख झालो असे माझे मन मला टोचील. या मागासलेल्या जातीला वर आणण्याचा प्रयत्न झाला नाही तर जातीभेदाचे कट्टर अभिमानी वीर तिला दडपून टाकल्याशिवाय राहणार नाहीत. त्यासाठी मागासलेल्यांचा कैवार घेणे हे जातीव्देष वाढविणे नव्हे हे उघड आहे. जातीभेद मोडून केवळ जन्माच्या सबबीवर दुस-यास हीन मानण्याची प्रवृत्ती नाहीशी होईल व अशा रीतीने जाती व्देषाचा नायनाट होईल तो सुदिन असे मी समजेन".

छत्रपतींचा काही दिवस आर्यसमाजाकडे कल झुकला होता असे दिसते, कारण त्यांनी त्यांच्या परिषदांचे महाराष्ट्राबाहेरही दोन तीन वेळा अध्यक्ष पद भूषविले. आर्य समाजाचा वेदांवर निष्ठा  ठेवणारा वैदिक धर्म, वेदोक्त संस्कार नि वेदोक्त कर्म यांचा प्रसार व्हावा अशी महाराजांची इच्छा होती. जातीभेद नष्ट झाले पाहिजेत, अस्पृश्यतेचा नायनाट झाला पाहिजे हेही आर्य समाजाप्रमाणे त्यांना वाटे. शेवटी त्यांची मते निरीश्वर वादाकडे वळू लागली होती असे जाणवते. जातीभेदाचे निर्मूलन आणि समाजिक समतेवरील भर आणि अस्पृश्यतेचे निर्मुलन ही सत्यशोधकांची तत्वे त्यांना मान्य होती. त्यांनी सत्यशोधक आणि आर्य समाज या दोन्ही चळवळींचा फायदा घेऊन सामाजिक समतेची प्रस्थापना, अस्पृश्यतेचे   आणि कनिष्ठ जातींची उन्नती साधण्यासाठी महान प्रयत्न केले. महाराजांच्या अशा अलौकीक उदाहरणांमुळे अस्पृश्य लोक त्यांना आपला देव मानू लागले. "आजपर्यंत प्रत्येक लहान – मोठ्या मनुष्याकडून तिरस्काराशिवाय त्यांस काही मिळत नसे. हिंदू समाजात ज्यांची योग्यता अव्दितीय होती, ज्यांच्याशी हस्तस्पर्श करण्यास मोठमोठे लोक हपापलेले असत, ज्यांच्याशी संबंध करण्यास मोठ- मोठ्या राजे- रजवाड्यानांही अभिमानास्पद वाटे ते छत्रपती आज आपल्या विषयीच्या प्रेमाने भरलेल्या अंत:करणाने आपला उध्दार करण्याकरिता अवतरले आहेत असे सर्वच अस्पृश्यांना वाटू लागले".

गरिबांच्या आणि पद दलितांच्या उद्धाराचे कंकण शाहू महाराजांनी हाती बांधले होते. ते छत्रपती असूनही जरी त्यांना लोकनायकाचे स्थान प्राप्त झाले होते, तरी ब्रिटीश प्रांतात संचार करून त्यांना ब्राम्हणेतर संघटनेचे राजकीय कार्य उघडपणे करता आले नसते. कारण त्यांच्या सामाजिक चळवळीचे जे विरोधक होते, त्यांच्या चिथावणीमुळे म्हणा किंवा छत्रपती असलेली व्यक्ती लोकनेता झाल्यामुळे उद्भवणा-या धोक्यामुळे म्हणा, मुंबई सरकारने त्यांना एक खलिता पाठवून दमदाटी दिली होती की, "महाराजांनी आपल्या संस्थानाबाहेरच्या कक्षेत कोणतीही चळवळ करू नये." त्यावर महाराजांनी बाणेदारपणे सरकारला उत्तर दिले होते की, "तुम्ही मला पदच्युत करण्यापूर्वी मी राजीनामा देईन. पण बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य मी प्राण जाईपर्यंत सोडणार नाही". परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवाने त्यांच्या वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी त्यांचा ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे अकाली आकस्मिक अंत झाला.

या सर्व गोष्टीवरून महाराजांची वैशिष्ट्यपूर्ण थोरवी दिसून येते. जनतेच्या हितासाठी खरा राज्यकर्ता सत्ता कशी राबवतो, त्याचा हा एक उत्तम आदर्श आहे. महाराजांच्या समकालीन संस्थांनी राज्यकर्त्यात दलितांना गुलामगिरीतून मुक्त करणारा, त्यांना त्यांचे मानवी हक्क देणारा, मानवाच्या भौतिक सुधारणेसाठी झटणारा, सामन्यांच्या हिताशी आणि जीवनाशी असा समरस होणारा त्यांच्या कालखंडात क्वचित एखादा राज्यकर्ता झाला असेल. छत्रपती शाहू महाराज हे महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांनंतर पहिले आणि शेवटचे लोकाभिमुख, प्रजाहितदक्ष तसेच लोकोद्धारक नृपती झाले असेच वर्णन इतिहास करील.

**संदर्भ :-**

1. लठ्ठे आ. बा. – श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. कुरणे द. य. (संपा) – कै. राजर्षी शाहू महाराज यांच्या आठवणी
3. कीर धनंजय – श्री. शाहू व्याख्यानमाला १९७०, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4. खरात शंकरराव – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, इंद्रायणी साहित्य, पुणे
5. कीर धनंजय – राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई
6. डॉ. जाधव रमेश – राजर्षी शाहू छत्रपती वाद आणि वास्तव, श्री. महालक्ष्मी प्रकाशन, कोल्हापूर
7. डॉ. पवार जयसिंगराव (संपा) – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर
8. आ. साळुंखे पी. बी. (संपा) – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई
9. दै. सकाळ, २६ जून २०२२
10. लाटकर शास्री वा. आ – (संपा. जयसिंगराव पवार)- श्री. शाहूंचे चरित्र, शिवाजी
11. विद्यापीठ, कोल्हापूर
12. सूर्यवंशी कृ. गो.- राजर्षी शाहू: राजा व माणूस, पुणे
13. नाईक तु. बा. – छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पुणे

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# पुरोगामी धोरणाचा दीपस्तंभ - छत्रपती राजर्षी शाहू महाराज

प्रा.केशव धोंडीबा टिपरसे
मराठी विभाग, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड. ता.शिराळा, जि.सांगली.
E Mail- keshavtiparse@gmail.com

**प्रस्तावना:**

महाराष्ट्रातील एकुण राजवटीत छत्रपती शिवाजी महाराज सोडले तर अनेक राजांचा इतिहास हा जुलमी राजवटीचा आहे. परंतु छत्रपती शाहू महाराज याला अपवाद आहेत. त्यांच्या राजवटीत आपल्या संस्थानात अन्याय-अत्याचार होणार नाही यावर त्यांनी कटाक्षाने लक्ष दिल्याचे जाणवते. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांचे व्यक्तीमत्व एक अष्टपैलू होत. सामाजिक ऐक्य व धार्मिक सहिष्णुता मराठी रंगभूमीचा शिल्पकार, मल्ल विद्येचा आधारस्तंभ अस्पृश्यता निर्वारण, शिक्षण, आधुनिक महाराष्ट्राचा भाग्यविधाता भूमिका त्यांनी यशस्वीरित्या वठविल्या त्याचबरोबर हा लोकराजा लोकशाहीचा व सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा आहे, हे एक वेळ गादी सोडीन; पण बहुजन समाजाचा उध्दार करण्याचे कार्य सोडणार नाही. या त्यांच्या वक्तव्यावरून लक्षात येते. राजर्षी शाहू महाराजांनी स्वतः धोका पत्करून ही ज्या काळात ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी राज्येव्यवस्थेत, लोकशाही, समाजवाद, सामाजिक न्याय यासारख्या गोष्टींचा गंधही जनतेला नव्हता. 'कल्याणकारी शासनव्यवस्था' ही संकल्पनाही त्या काळात रूढ झालेली नव्हती. अशा काळात सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. वयाच्या विसाव्या वर्षी सत्ता हाती आली आणि पहिल्यांदा त्यांनी आपल्या संस्थानातील जनतेच्या हालाखीची पाहणी केली. संस्थानात साक्षरतेचे प्रमाण जमतेम 4 टक्के चातुवर्णव्यस्थेमुळे जातीपातीनी दुभंगलेला सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा सर्वच क्षेत्रात मागे होता. शेतकरी, मजुर, अस्पृश्य यांचे मोठया प्रमाणात शोषण चालू होते या सर्व गोष्टीतून प्रजेला बाहेर काढण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला. एवढेच नव्हे तर उद्योगधंद्यामुळे प्रगती होते म्हणून उद्योगधंदे सुरू केले. शेतीसाठी पाणी, महत्वाचे म्हणून धरणे बांधली. कोल्हापूर संस्थानात स्वतंत्र शेती संस्था स्थापन करण्यात आली. 1912 ला त्यांनी सहकार विषयक कायदा केला. म्हणून आजचे जे वैभवसंपन्न कोल्हापूर दिसते ते या पुरोगामी धोरणामुळे हे आपणास आज मान्य करावेच लागते. मी 'पुरोगामी धोरणाचा दीपस्तंभ छत्रपती राजर्षी शाहू महाराज' या शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या पुरोगामी धोरणाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना मिळालेल्या 28 वर्षाच्या कारकीर्दीत शाहू महाराजांनी त्यांच्या दूरदृष्टीने जी विविध कामे उभी केली, त्याला आजही तोड नाही. उलट त्यांच्या कार्याची प्रस्तुतता ही आज अनेक कामांच्या उभारणीसाठी प्रेरणादायी व स्फुर्तीदायक अशा स्वरूपाची आहे. तरी पुढील प्रमाणे.

**प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे:**

छत्रपती शाहू महाराज गादीवर येताच त्यांनी प्रथमता संस्थानात पाहणी दौरे केले. त्यातून त्यांना लक्षात आले की संस्थानात फक्त 4 टक्के लोकच शिकले आहेत. त्यात बहुजन समाजाची स्थिती तर अजून ही वाईट आहे. त्यामुळे बहुजन समाजामध्ये शिक्षणाच्या अभावी माजलेली दूरवस्था पाहिली. म्हणून समाजाला सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याच्या अनुशंगाने त्यांचा विचार सुरू होता. शिक्षणाचे महत्व महाराजांनी ओळखले होते त्याला वास्तवीक रूप हे खामगांव येथील 'आखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अकराव्या अधिवेशनात दिले ही परिषद दि 27 डिसेंबर 1917 रोजी भरली होती या परिषदेत शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय स्वराज्याचा फायदा बहुजन समाजास मिळणार नाही असा विचार व्यक्त केला. पुढील काळात तो विचार सत्यातही उतरविला हा विचार आजही महाराष्ट्रासाठी मार्गदर्शक आहे. 16 एप्रिल 1920 च्या नाशिक येथील भाषणात शाहू महाराजांनी आपले शिक्षण विषयक विचार व्यक्त केले होते. ते म्हणतात, 'रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे' असे केले नाही तर बहुजन वर्ग तसाच राहिल व त्यांकडे प्रतिकार करण्याची शक्ती प्राप्त होणार नाही. म्हणून मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण करणे आवश्यक आहे. या विधानावरून शाहू महाराजाची शिक्षणाविषयी तळमळ आणि कळकळी बरोबरच कमालीची आस्था आणि आत्मविश्वास ही दिसून येतो.

**आरक्षणातून प्रगती:**

महाराष्ट्रात पहिल्यांदा आरक्षण हे मागासवर्गीय जातीना दिले जावे असा विचार 1869 ला महात्मा फुले यांनी मांडला. दारिद्रय लोकांचे दारिद्रय वाढतच आहे. त्यामुळे सामामजिक न्याय प्रस्थापित करायचा असेल तर मागासवर्गीयाना प्रतिनिधीत्व द्यावे लागेल. अशी मागणी महात्मा फुलेनी केली होती. शाहू महाराजांची जडणघडण ही

सत्यशोधक चळवळीतूनच झाली. भास्करराव जाधव व केशवराव विचारे शाहू महाराजाच्या अगदी जवळचे दोघेही कट्टर सत्यशोधक असल्याने राजर्षी शाहू महाराजावर संस्कार ही तसेच झाले. त्यातच वेदोक्त प्रकरण पुढे आले त्यामुळे आरक्षणाला गती मिळाली. त्या काळात चातुर्वर्णव्यवस्था मोठया प्रमाणात वाढली असल्याने व प्रत्येक जातीनुसार आपले काम करावे लागत असल्याने अस्पृश्य समाज तसाच पिचत पडला. प्रगतीचे काही नाव नाही. पण शाहू महाराजांना अस्पृश्य, मागास लोकांची प्रगती व्हावी, गरीबी संपवावी, त्यांना मान व प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, त्यांचे जीवनमान उंचवावे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या मनातील विचाराना गती दिली. त्याला मूर्त स्वरूप देण्याचे निश्चित केले आणि 26 जुलै 1902 मध्ये करवीर गॅझेटमध्ये एक अपूर्व व चित्तथरारक जाहिरनामा प्रसिध्द केला. त्यामध्ये संस्थानातील सरकारी खात्यात ज्या जागा रिकाम्या होतील. त्यातील 50 टक्के जागांत मागासवर्गीयातील सुशिक्षित तरूणांची भरती करावी. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात आरक्षणाची मूर्तमेढ राजर्शी शाहू महाराजानी रोवली व अस्पृश्य मागासवर्गाची प्रगती साधली.

**अस्पृश्योध्दाराचे व सामाजिक एकोप्याचे कार्य:**

राजर्षी शाहू महाराजांनी 1902 मध्ये सातव्या एडवर्डचा राज्यारोहन समारंभाला उपस्थित राहण्यासाठी लंडनला गेले. तेथील वातावरण पाहून शाहू महाराजांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. येथे कोल्हापूरात वेदोक्त प्रकरण त्याच काळात खूप गाजले यातून महाराजाना वास्तव जातीयतेचा अनुभव आला. हे ब्राम्हण मी या संस्थानचा राजा असताना माझ्या बरोबर असे वागत आहेत. तर सर्व सामान्य जनतेशी यांचा व्यवहार कसा असेल? असा विचार करून त्यांनी जातीव्यवस्था नष्ट करण्याचे ठरविले. त्यांनी आपल्या संस्थानात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील अस्पृष्य लोकांच्या हाल- अपेष्टा त्यांनी जवळून पाहिल्या अस्पृश्य लोकांना माणूस म्हणून त्यांच्याकडे कोणीच पाहत नव्हते. प्राण्याहून ही हीन जीवन त्यांच्या वाटयाला जातीव्यवस्थेने आणले होते. हे राजर्षी शाहू महाराजांनी ओळखले. मी जात नको असे प्रतिपादन करतो. परंतु वर्ग पाहिजे असे माझे ठाम मत आहे. असे शाहू महाराज जातीव्यवस्थेविषयी मत व्यक्त करतात. यातून अस्पृश्योध्दार व सामाजिक एकोपा निर्माण झाली पाहिजे असे महाराजाना वाटत होते. यासाठी महाराजानी अस्पृश्य लोकांना सर्वतोपरी मदत केली गंगाराम कांबळे याना हॉटेल उघडून दिले. स्वतः त्या हॉटेलमध्ये जाऊन शाहू महाराज चहा पीत, तेली, रामोशी , पारधी, मांग, महार, मुस्लीम यांना आर्थिक मदत केली, संस्थानात नेमणूका दिल्या, सरकारी नोकऱ्या दिल्या, वकिलीच्या सनदा दिल्या, जातीयता कमी करण्याचा प्रयत्न करून त्यांना मान सन्मानाने जगण्याचे बळ दिले. म्हणून कोल्हापूर आजही सर्वच बाबतीत आपणास पुढे असल्याचे दिसते. त्याचा पाया राजर्षी शाहू महाराजानी घातला हे आपल्याला मान्य करावे लागते.

**छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर:**

छत्रपती शाहू महाराज हे आपल्या संस्थानातील अस्पृश्यता संपली पाहिजे, म्हणून त्यांनी वेगवेगळया गोष्टी आपल्या संस्थानात सुरू केल्या म्हणून अस्पृश्योध्दारक म्हणून शाहूनां ओळखले जाते. त्यातून 22 मार्च 1920 ला कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे अस्पृश्यतादी जनतेची परिषद भरवली व त्याचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड केली. यावेळी शाहू महाराजांनी प्रमूख वक्ते म्हणून केलेले भाषण अस्पृश्य जनतेस दीपगृहाप्रमाणे प्रेरणा देणारे आहे. शाहू महाराजांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी खूप आदर आणि अभिमान होता. त्यांच्या बुध्दीमतेचा गर्व होता. म्हणून एकावेळी ते स्वतः डॉ. बाबासाहेबाना भेटण्यासाठी मुंबईला त्यांच्या घरी गेले. त्यांचा सत्कार केला व शिक्षणासाठी आर्थिक मदत केली. माणगाव परिषदेत अस्पृश्य बांधवाना डॉ.बाबासाहेबाचा परिचय करून दिला आणि आता पुढचे नेते हे आहेत असे स्पष्टपणे सांगून अस्पृश्योध्दारक म्हणून डॉ.बाबासाहेबाचा उल्लेख केला. अस्पृश्य लोक वतनाच्या मागे लागले आहेत. ते वतन तरी किती? दोन आरे जमीन किंवा पाटीभर धान्य? यात कोणाचेही पोट भरत नाही. त्यामुळे चोऱ्या वगैरे करण्याशिवाय त्यांना पर्याय उरत नाही. म्हणून मी सर्व महार वतनदारास विनंती करतो की, या लहान वतनदारास विनंती करतो की, या लहान वतनामागे लागू नका याकामी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मदत करतील असे शाहू महाराज म्हणाले, इतका विश्वास डॉ.बाबासाहेबावर होता. बहूजन समाजाने जाती-धर्माच्या भिंती तोडून आपला विकास करावा. म्हणून आपल्या संस्थानात अनेक आमुलाग्र बदल केले. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ही योग्यदान मोठया प्रमाणात आहे. ''मनासारखा राजा अन राजा सारख मन'' ही उक्ती छत्रपती शाहू महाराजांना समर्पक वाटते. यशवंतराव चव्हाण यांनी 'मोठया दिलाचा राजा' असे म्हटले आहे.

**वसतीगृह व आंतरजातीय विवाह चळवळ:**

छत्रपती शाहू महाराज हे आपल्या संस्थानात अनेक लोकोपयोगी गोष्टी अमलात आणल्याचे दिसते. जी गोष्ट त्यांच्या मनात आली ती गोष्ट वास्त्वात आणण्याचा प्रयत्न छत्रपती शाहू महाराजानी जीवनाच्या अखेरपर्यंत केला आहे. महाराजानी शिक्षणाचे महत्व ओळखले आणि शाळा काढल्या शिक्षण सक्तीचे केले. गरीब व अस्पृश्य विद्यार्थ्याने बाहेर गावी राहणे शक्य नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी कोल्हापूरात अनेक वस्तीगृहाची निर्मिती केली. त्याकाळातील

जातवास्तव समाज व्यवस्था भयाण स्वरूपाची होती त्यामुळे जातवार एकूण जवळपास वीसएक वस्तीगृहाची निर्मिती केली. त्यामुळे सर्व समाजातील मूल शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजेत हाच ध्यास यामागे दिसतो. एकदा का ती शिकली की त्यांच्या मनातील जातीभेद, धर्मभेदाची भावना आपोआप नष्ट होईल याची त्यांना खात्री होती. यासोबत त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यांच्या प्रगतीबरोबर स्त्रीयांचीही प्रगती झाली पाहिजे, जातीयता नष्ट झाली पाहिजे म्हणून 1918 साली त्यानी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. विधवा विवाहास मान्यता दिली, 1920 मध्ये घटस्फोटाचा कायदा केला. व्यापार, क्रीडा, कला, साहित्य या सर्वच गोष्टींना त्यांनी भरपूर मदत केली. व्यापाराला महत्व देवून संस्थानात सुत गिरण्या काढल्या, शेतीसाठी पाणी महत्वाचे असल्याने राधानगरी धरण बांधले, अशा अनेक लोकोपयोगी गोष्टीं राजर्षी शाहू महाराजांनी अस्तित्वात आणल्या म्हणून त्यांना पुरोगामी धोरणाचा दीपस्तंभ म्हणून उल्लेख करण्यास काहीच हारकत नाही. शाहू महाराज हे सामान्य माणसात मिसळणारे, सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वांना न्याय मिळावा, समानतेची वागणूक मिळावी, माणूस म्हणून जगता यावे यासाठी त्यांनी शेवटपर्यंत सत्तेचा उपयोग केला.

**सारांश :**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा आढावा घेतल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, शाहू महाराजाचे व्यक्तिमत्व लाखात एक होते. 'मनासारखा राजा आणि राजासारखा मन' असा उल्लेख शाहू महाराजांचा केला जातो. त्यामागे त्यांचे कार्य आहे. राजा असूनही शिकारीला गेल्यावर शेतकऱ्यांबरोबर बसून त्यांची कणी-कोडयांची भाकरी खात, त्याच्याशी गप्पा गोष्टी करीत असे महाराज शरीराने धिप्पाड होते. तसेच विचाराने आणि कृतीने ही मोठे होते. ज्या काळात भारतातील कॉंग्रेस पक्ष सुधारणा अंमलात आणण्याचा विचार करत होता. त्या काळात कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी अनेक सुधारणा अंमलात आणल्या होत्या. उदा. आरक्षण, अस्पृश्यता निवारण, सक्तीचे शिक्षण, आंतरजातीय विवाह कायदा, विधवा कायदा, वसतिगृहाची निर्मिती, उद्योगधंदे विषय, सहकार विषय, आणि शेतीविषयीच्या सुधारणा, कला, क्रीडा, नाटय, साहित्य, अशा सर्वच बाबतीत शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात आदेश काढले व ते अंमलात आणले. यावरून छत्रपती शाहू महाराज हे महर्षी शिंदे यांनी म्हटल्याप्रमाणे, त्याचे मन उत्क्रमणशील आणि उत्कर्षशील होते. याची साक्ष छत्रपती शाहू महाराजाचे पुरोगामी धोरणाचा व कार्याचा आढावा घेतल्यानंतर खात्री पटते.

**संदर्भ** :

1) जाधव भगवानराव (संपा.) राजर्षी शाहू महाराजांची भाषणे , लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, जुलै 2001

2) कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि.मुंबई, सहावी आवृत्ती, 2008

3) साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन , कोल्हापूर, पाचवी आवृत्ती, 2009

4) दैनिक सकाळ, मुक्तपीठ, दि.25 जून 2020

5) पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, 2007

6) पवार जयसिंगराव, समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.जा.2021

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे आदर्श आपत्ती व्यवस्थापन

डॉ. मधुकर विठोबा जाधव
इतिहास विभाग,यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी, ता. चंदगड जि. कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ संलग्न
Email- mvjhistory12@gmail.com

**प्रस्तावना :**

शंभर वर्षापूर्वी प्लेगच्या साथीने थैमान घातलेले असताना कोल्हापूर संस्थानात प्लेगाची साथ रोखण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी ज्या उपाय योजना केल्या त्या आजच्या कोरोनाच्या काळातही आदर्शवत व महत्वपूर्ण अशाच आहेत. छत्रपती शाहू महाराज समतेचा आणि ममतेचा सागर होय. दयेचा सर्वासाठी सदैव खुला असे. रयतेच्या सुखात आपले सुख मानणारे छत्रपती एक महान राजे होते. ते नवे नवीन विचारांचे व कार्याचे प्रेषित होत. त्यांनी या भूमीमध्ये सामाजिक समतेचा मानदंड उभा केला. 'गादी सोडेन पण कार्य सोडणार नाही'. ही त्यांची विचारधारा होती. एक आदर्श शासक म्हणून त्यांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे.

**संशोधनाचे उद्देश:**

१. दुष्काळ जन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाय योजना समाजाला समजाव्यात.
२. प्लेगाच्या साथीतून जनतेला बाहेर काढण्यासाठी केलेल्या व्यवस्थापनाची माहिती जाणून घेणे.
३. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवरती छत्रपती शाहू महाराजांचे प्लेगाच्या साथीतील व्यवस्थापन सांगणे.

**गृहीतक:** १. छत्रपती शाहू महाराजांचे आपत्ती व्यवस्थापन आजही समाजाला दिशा देणारे आहे. हे स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती:** प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे .महत्वपूर्ण अशा प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे .याचबरोबर वर्तमानपत्रे ,मासिके ,साप्ताहिके या साधनांचाही वापर करण्यात आलेला आहे .

**आशय विश्लेषण :**सर्व सामान्य माणसाचे कल्याण हे त्यांच्या शासन व्यवस्थेचे मुख्य तत्व होते. त्यांनी कल्याणकारी योजना राबवून सर्वांना सुखी केले. छत्रपती शाहू महाराज विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनाला महत्व देणारे आदर्श राजे होत. प्लेगाच्या साथीमध्ये स्वत: सर्व प्रथम लस टोचून घेणारे ते देवदूत होत.[१] दुष्काळ, महापूर, अवर्षण ही नैसर्गिक संकटे होत. इ.स. १८९६ मध्ये दुष्काळाने उग्र रूप धारण केल्या नंतर राजर्षी शाहू महाराजांनी गडहिंग्लज, रायबाग, कटकोळ या भागाला भेटी देऊन तात्काळ उपाय योजना केल्या. गवत, चारा याची तातडीने मदत केली. इ. स. १८९७ मध्ये भुदरगड व पन्हाळा पेटा येथे स्वस्त मदत केंद्रे उभा केली.[२] स्वस्त धान्य दुकान चालू करून ना नफा ना तोटा या तत्वावर ती चालविली. दुष्काळग्रस्त प्रजेला धान्य अपुरे पडू नये म्हणून म्हैसूर संस्थानातून आणि इंग्रज सरकार कडून धान्याची मदत घेतली.[३]

इ. स. १८९९/१९०० मध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सरकारी खर्चातून केली.विहिरी,तलाव, यांची व्यवस्था रुकडी, वडगाव, शिरोळ येथे केली. संस्थानातील विहिरी, तळी, तलाव यांचा शोध घेऊन त्यामधील गाळ काढण्याची व्यवस्था करून विहिरी व तळे जास्तीत जास्त पाणीदार केली.[४] रस्ते व पुल यांची बांधणी केली. निपाणी-दाजीपूर रस्त्याचे पुल बांधले. सुधारित शेतीचे प्रयोग केले. यासाठी शेतक-यांना मोठ्या प्रमाणात मदत केली. कोल्हापूरात दुष्काळ निवारण कार्यालय सुरु केले.[५] दुष्काळ निवारणासाठी शाहू महाराजांनी श्री.भास्करराव जाधव यांना दुष्काळ आयुक्त नेमले त्यांना खास खाते व अधिकार दिले.[६] "दुष्काळामध्ये मानवतावादी दृष्टीकोनातून त्यानी जनतेसाठी सेवा केली. दुष्काळासंबधी माहिती व मदत देण्यासाठी दुष्काळ मदत केद्र उभारली. दुष्काळी भत्ता देण्यात आला.[७] घर पोच शिधा वाटप केले. म्हातारे, आधोळ, पांगळे, दीन दुबळे यांच्यासाठी अन्नालये उघडली, अपंगांना त्यांच्या घरी धान्य पुरविले. त्याच बरोबर शिजविलेले अन्न म्हणजे घरपोच दररोज शिधा वाटपाचे कार्य केले.[८]

दुष्काळामध्ये ज्या शेतक-यांची परिस्थिती गंभीर आहे त्यांना दाणा गोट्याची व गुरांना गवत पुरविण्याची व्यवस्था केली. शेतक-यांच्या जनावरांवर छत्रपतींचे अतिशय प्रेम होते. महाराजांनी गरिबांच्या गुराढोरांची सरकारी तब्येल्यात सोय केली. जिल्ह्याधिकारी, वनाधिकारी नि कार्यकारी अभिनेते यांना घेऊन शाहू महाराजांनी सर्व दुष्काळी कामांची पाहणी करून उत्तम व्यवस्था लावली. दुष्काळी मदतीने कार्य तेथल्या तेथेच करण्यात आले. दुष्काळामध्ये पिके नष्ट झाल्यामुळे व गुरांना वैरण, गवत मिळत नसल्यामुळे ह्या वर्षी चिंचली येथील यात्रा रद्द

करण्यात आली. शासन दरबाराचा सर्व खजिना जन कल्याणासाठी खर्च केला. प्रजा वत्सल छत्रपती शाहू महाराजांची शासन व्यवस्था आपणास दीर्घकाळ लाभो अशी सर्व सामान्य रयतेने आपल्या कुल दैवतांकडे प्रार्थना केली.[९]

छत्रपतींचे शेतक-यांच्या जनावरांवर अतिशय प्रेम होते. प्रा. विजापूरकर यांनी सुरु केलेल्या आपल्या समर्थ साप्ताहिकामध्ये महाराजांनी गरिबांच्या गुराढोरांची सरकारी तबेल्यात जी सोय केली होती. त्या विषयी त्यांना धन्यवाद दिले. मालकांना शक्य होईल तेव्हा त्यांनी आपली गुरे परत न्यावी अशी आज्ञा होती.[१०] प्लेगाच्या काळात शेतक-यांना आर्थिक मदत मंजूर केली. प्लेग पीडित लोकांच्या निरीक्षणासाठी छावण्या काढण्यात आल्या. लोकांचे आरोग्य सांभाळण्यासाठी शासन खर्चाने मोफत औषधोपचार केले.[११]

छत्रपती गादीवर आले तेव्हा दुष्काळ, हिवताप, कॉलरा, प्लेग ही संकटे निर्माण झाली. या संकटावर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी यशस्वी मात केली. प्लेग साथीवर यशस्वी झुंज देऊन त्यावर मात केली. सध्या औषध आहे. त्याकाळी साथीचे आजार महाभयंकर समजले जात असत. रूढी, प्रथा, परंपरेमुळे सर्व सामान्य जनता रोगप्रतिबंधक लस घेत नसत. इ. स. १८९८-१८९९ मध्ये कराची, मुंबई, भिवंडी, सातारा, बेळगाव आदि. ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्लेगाच्या साथीने थैमान घातले होते. कोल्हापूर शासनाने प्लेगाच्या संकटाच्या विरुध्द लढण्यासाठी अगोदरच उपाय योजना आखून ठेवली होती. प्लेगाचे अज्ञान दूर करण्यासाठी व प्लेगाचे जंतू नष्ट करावेत यासाठी दि. १० डिसेंबर १८९८ रोजी छत्रपती शाहू महाराजांनी सविस्तर माहिती देणारा जाहीरनामा प्रसिध्द केला.[१२]

छत्रपती शाहू महाराजांनी प्लेगाच्या साथीमध्ये केलेले कार्य सर्वश्रेष्ठ आहे. वैद्यकीय क्षेत्र, दळणवळण, आरोग्य, यंत्रणा यांच्यामध्ये प्रगती करून त्यांनी प्लेगाच्या साथीवर मात केली. छत्रपती शाहू महाराजांनी प्लेगाचा सामना सर्व सामान्य जनतेने कसा करावा यासाठी दि. १० डिसेंबर १९९८ रोजी जाहीरनामा काढला. या जाहीर नाम्यात रयतेने घराची स्वच्छता कशी करावी हे सांगितले. एखादा उंदीर अथवा घूस प्लेगामुळे मरून पडला असेल तर तो जाळून कशा प्रकारे नष्ट करावा. या बाबतची माहिती व सूचना छत्रपतींनी दिल्या होत्या.[१३] प्लेग बद्धल शास्त्रशुध्द माहिती देणारी पत्रके लोकांना वाटली. प्लेगाच्या साथीमध्ये तपासणी कामात शासनाने सर्व प्रकारची मदत केली. त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन नेहमी सज्ज असे. ज्या भागात रोगाची लागण होती तेथून लोकांना कोल्हापूरात येऊ नये म्हणून यासाठी प्रतिबंधक उपाय योजना केल्या.[१४]

सुरुवातीला प्लेगाची लागण कोल्हापूर संस्थानातील १८ खेड्यांमध्ये झाली. तेथील सर्व लोकांना गाव सोडून रानात व मळयात राहण्यास मदत केली व घरे बांधून दिली. नवीन वस्त्या व मैदानातील घरे यांच्या संरक्षणासाठी पहारेकरी नेमले. सर्व सामान्य जनतेमध्ये भोळया कल्पना व चुकीच्या समजुती होत्या. जेथे प्लेगाची साथ आहे तेथून साथीचे रुग्ण येऊ नयेत यासाठी शहरातील मार्गावर क्वारंटाईन कक्ष स्थापन करण्यात आले. मुंबई व पुण्याहून कोल्हापुरात प्लेगाचा प्रसार होऊ लागला तेव्हा छत्रपतीनी कोल्हापूर शहरात प्लेग ग्रस्त रुग्णांना प्रवेश होऊ नये म्हणून कोल्हापूरच्या प्रवेश व्दारावर क्वारंटाईनची केंद्रे स्थापन केली. आरोग्य तपासणी झाल्या खेरीज कोल्हापुरात प्रवेश बंदी करण्यात आली. बाहेरून रेल्वेने येणा-या प्रवाशांची वैद्यकीय तपासणी झाल्याशिवाय कोल्हापूर संस्थानात प्रवेश बंदी करण्यात आली. अशा प्रवाशांची तपासणी करण्यासाठी कोल्हापूरच्या सर्व प्रवेश व्दारावर क्वारंटाईनची केंद्रे स्थापन करण्यात आली. प्लेगग्रस्त रुग्णांला तीन ते दहा दिवस क्वारंटाईन राहावे लागत असे. त्यांच्या राहण्याचा व जेवणाचा खर्च शासनाकडून केला जात असे. छत्रपती शाहू महाराज प्लेग छावणीसाठी आवश्यक असलेल्या डॉक्टर, परीचारिका व इतर सर्व कर्मचा-यांच्या नेमणुका व नियुक्त्या स्वत: करीत असत. दि. ४ सप्टेंबर १८९९ रोजी श्री. भास्करराव जाधव यांना दुय्यम प्लेग आयुक्त म्हणून नेमले. पुढे १ जानेवारी १९०० पासून सहाय्यक जिल्हा अधिकारी म्हणून नेमण्यात आले.[१५]

प्लेगाच्या साथीवर मात करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी दि. २ जानेवारी १९०० मध्ये काढलेला जाहीरनामा श्रेष्ठ असा आहे. त्यातील तरतुदी पुढील प्रमाणे : १. हिंदुस्थानात इतर ठिकाणी प्लेगमुले जी प्राणहानी झाली आहे. त्यापेक्षा कोल्हापूर शहरात मृत्यूचे प्रमाण बरेच कमी आहे. २. जाहीरनामा प्रसिध्द झाल्या तारखेपासून आठ दिवसांचे आत शहरात वस्ती करून राहणा-या लोकांनी शहराबाहेर आपली राहण्याची सोय केलेली आहे तेथे राहण्यास गेले पाहिजे. ३. शहरात दुकाने उघडी राहून व्यवहार सुरु ठेऊ दिल्यास लोकांचा पुन: संबंध पृथक जागा ठरविली असल्याने लोकांस जिन्नस पानस मिळण्याची सोय झालेली आहे. ती सध्या आहे तशीच राहण्याची आहे. ४. लोकांनी आपले घराचे वगैरे संरक्षणासाठी जे रखवालदार ठेविले असतील अगर ज्यांना पुढे ठेवण्याचे असतील त्यांनी आमचे कडून त्यांची नावे दाखल करून पास न्यावेत. ५. गावांत कोणी वस्तीस राहिल्याने आढळून येईल. तर त्यास सक्तीने बाहेर काढण्यात येईल. ६. गरिबीमुळे ज्यास झोपड्या बांधण्याची शक्ती नसेल त्यांना कामावर झोपड्या बांधण्याबद्दल सामान मोफत देवविणेची तजवीज करण्यात आलेली आहे. ७. ज्या मजूरदार लोकांस उदरनिर्वाहासाठी रोज मजूरीच केली पाहिजे. त्याचकरिता राहण्यास कळंबे तलावावर सरकारातून झोपड्या बांधण्यात येत आहेत. तेथे राहून तलावाच्या रिफील कामगिरीवर त्यांना मजुरी मिळेल. अशी तजवीज करण्यात आली आहे. ८. होता होईल

तितके लवकर पुन: शहरात येऊन राहण्यास लोकांना परवानगी देनेची असल्याने शहर सर्व खुले होताच डीस इनफेक्शनचे कामास सुरुवात केली जाईल. ९. ज्या कोणास या नियमा संबंधाने अगर डीस इनफेक्शन संबंधाने माहिती घेण्याची असेल त्यांनी आमच्या ऑफिसमध्ये येऊन माहिती मागितल्यास त्यास ती देण्यात येईल. या नियमांचे पालन केल्यास प्लेग निर्मुलन नाहीसा होण्यास विशेष अवधी लागणार नाही. असे जाहीर करण्यात आले.[१६]

प्लेगाच्या साथीची साखळी तोडण्यासाठी उत्सव, यात्रा, जत्रा थांबविल्या. रेल्वेने येणा-यांची वैद्यकीय तपासणी होत असे. शहरात प्रवेश करणा-या चुकार लोकास शोधून त्याची माहिती देणा-या लोकांस दरबार कडून बक्षिस योजना जाहीर केली. ५ ते १५ रुपये बक्षिस जाहीर केले. अधिका-यांना कडक सूचना देण्यात आल्या. त्यामुळे सूचनांची अंमलबजावणी ताबडतोड होत असे. घराघरात स्वच्छता व हवा जास्त खेळती ठेवण्यात आली. गावागावात सुरक्षितता ठेवली. गावातून शेतात राहण्यासाठी मदत केली गेली. जेथे साथ होती तेथे एकही माणूस गावात ठेवला नाही. पोस्टमनला सुध्दा गावात न जाण्याचे आदेश दिले. लस टोचून घेण्याचे प्रमाण कमी होते. लोकांचा कल नव्हता. महाराजांनी महत्व पटवून दिले. नोकरांना लस घेतल्यानंतर दोन दिवस रजा दिली. नोकर नाहीत त्यांना चार आण्याचे बक्षिस ठेविले. सर्वांचे लसीकरण केले प्रथमतः शाहू महाराजांनी लस घेतली.[१७]

प्लेगाच्या साठीमध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जनतेला हक्काचा रोजगार मिळवून दिला. शासन दरबारातून चालू असलेल्या कळंबा तलावावर काम दिले. जे लोक मोल मजुरीसाठी तयार होते त्यांच्यासाठी कळंबा तलावाजवळ अशा लोकांसाठी राहण्यासाठी झोपड्या उभ्या करून दिलेल्या होत्या. स्थलांतरित लोकांच्यासाठी कोल्हापूरच्या बाहेर पंचगंगा नदीच्या काठावर बाजाराची स्वतंत्र व्यवस्था केलेली होती. संस्थानातील एक कर्मचारी प्लेगमुळे मरण पावला. त्याच्या पश्चात त्याची विधवा पत्नी व मुले निराधार होऊ नयेत म्हणून विधवा पत्नीस दरमहा ४ रुपये व दोन मुलांना प्रत्येकी दरमहा ३ रुपये असे एकून १० रुपये पेन्शन रूपाने देण्याने शासनाने मान्य केले.[१८] शाहू महाराजांनी कोल्हापुरातील काटीतीर्थ येथे प्लेग निवारण केंद्र उभा केले. तेथील रुग्णालयाला ते दररोज भेट देत असत.[१९]

शहरातील लोकांना माळरानावर वस्ती करण्यास पाठविले. शहरातील बाजार पेठांची ठिकाणे वाढविली. मोकळ्या मैदानात पंचगंगा नदी काठावर बाजार भरवावा असा आदेश काढण्यात आला. शहर व गाव सोडून बाहेर राहण्यास गेलेल्या लोकांच्या घराला पोलिस संरक्षण देण्यात आले. प्लेगशी दिल्या जाणा-या लढ्याला अधिक वेग यावा यासाठी पन्हाळा ते कोल्हापूर व कोल्हापूर ते रेसिडन्सी अशी टेलिफोनची व्यवस्था निर्माण केली. संस्थानातील सर्व डॉक्टर व म्युनिसिपालिटी कडील प्रत्येक वैद्य यांना जनतेला वाचविणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव करून दिली. त्यासाठी स्वत: अहोरात्र कार्य केले.[२०] प्लेगाच्या व दुष्काळ परिस्थितीमध्ये शाहू महाराजांनी सर्व सामान्य जनतेवर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून मोफत अन्न धान्य वाटपाची सोय केली. प्लेग काळात इतर भागामध्ये धान्याचे भाव वाढविले परंतु कोल्हापूर संस्थानात मात्र धान्याचे भाव स्थिरच राहिले.[२१]

शेतक-यांनी शेती कसण्यासाठी दरबारातून मदत करण्यात आली. अनाथालये उघडून अपंग, अनाथ, आंधळे, पांगळे यांची सोय केली. प्लेगाच्या साथीवरील औषध, त्याचबरोबर घरे निर्जंतुकीकारणासाठी लागणारे औषध रयतेला मोफत शासना मार्फत घरपोच देण्यात आले. वृध्द, रुग्ण यांच्यासाठी शासन दरबाराने नऊ ठिकाणी आश्रम उघडून त्यांना जगण्याचे हक्क दिले. या योजनेचा फायदा जवळ जवळ पन्नास हजार लोकांना झाला. छत्रपतींनी असे अनेक क्रांतिकारी निर्णय घेऊन प्लेगबरोबर यशस्वी झुंज दिली व या महामारीतून जनतेला सुखरूप बाहेर काढले.[२२]

छत्रपती शाहू महाराज दुष्काळ व प्लेग या काळात अविरतपणे कार्य करीत असत. त्यातून त्यांनी प्लेग व दुष्काळ या संकटावर यशस्वी मात केली. इ. स. १८९९ च्या डिसेंबरमध्ये ते आपल्या एका पत्रात म्हणतात 'पन्हाळा राजवाड्यात मी फक्त झोपतो इतर सारा वेळ मी कार्यालयात काम करण्यातच व्यग्र असतो. सकाळचा वेळ मी शहरातील प्लेगची कामे कशी चालली आहेत. यावर देखरेख ठेवतो. थोड्या दिवसापूर्वी ग्रामीण भागातील पिकांची पाहणी स्वत: करता यावी म्हणून मी घोड्यावरून ४० मैल आत गेलो होतो. त्यासाठी मी एकच घोडा घेतला होता व ताशी सुमारे ३ मैल जात होतो. घोड्यावरून जाता जाता चौकशी करीत होतो. त्यामुळे मला अतिशय थकवा आला आहे'. यातून छत्रपती शाहू महाराजांची सर्व सामान्य जनतेसाठी कष्ट करण्याची जिद्द किती होती ते दिसते.[२३]

**सारांश :** छत्रपती शाहू महाराजांचे व्यवस्थापन आजही मार्गदर्शक आहे. प्लेगाच्या व दुष्काळ परिस्थितीमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी सर्व सामान्य जनतेवर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून मोफत अन्न धान्य वाटपाची सोय केली. प्लेग काळात इतर भागामध्ये धान्याचे भाव वाढविले. परंतु कोल्हापूर संथानात मात्र धान्याचे भाव स्थिरच राहिले. शेतक-यांनी शेती कसण्यासाठी दरबारातून मदत करण्यात आली. अनाथालये उघडून अपंग, अनाथ, आंधळे, पांगळे यांची सोय केली. छत्रपतींनी असे अनेक क्रांतिकारी निर्णय घेऊन प्लेगबरोबर यशस्वी झुंज दिली व महामारीतून जनतेला सुखरूप बाहेर काढले. अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी संकट काळात केलेले आपत्ती व्यवस्थापन श्रेष्ठ असेच आहे.

**संदर्भ सूची व टिपा :**

१. शिवाजी विद्यापीठ, श्री. शाहू स्मारक व्याख्यानमाला, व्याख्याते धनंजय कीर, कोल्हापूर, १९७०, पृष्ठ ८३.
२. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, १९१३, पृष्ठ ६५.
३. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ १६८.
४. कठोर दु. म. [संपा], लोकराजा राजर्षी, २०१८, लातूर, पृष्ठ ३४१.
५. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ १६८.
६. कठोर दु. म. [संपा], लोकराजा राजर्षी, २०१८, लातूर, पृष्ठ १९७.
७. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ १६९.
८. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ १७०.
९. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, १९१३, पृष्ठ ६६.
१०. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, १९१३, पृष्ठ ७१.
११. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ ३९४.
१२. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ १७२.
१३. कित्ता, पृष्ठ ३९४.
१४. कित्ता, पृष्ठ १७२.
१५. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, १९१३, पृष्ठ ७०.
१६. संगवे विलास व खणे बी. डी, राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स [खंड २]
१७. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ १७२.
१८. कित्ता, पृष्ठ १७२.
१९. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, १९१३, पृष्ठ ७०.
२०. कित्ता, पृष्ठ ७०.
२१. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, १९१३, पृष्ठ ७८.
२२. साळुंखे पी. बी. [संपा], राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, २०१६, पृष्ठ १७२.
२३. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती, मुंबई, १९१३, पृष्ठ ७१.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छ. शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरणातील योगदान

**प्रा. आप्पासाहेब नामदेव केंगार**
**सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी.**
Email- ankengar@gmail.com

**प्रस्तावना**

समाज ही काही विशिष्ट विचारधारांवर आधारित पर्यावरण-राजकीय-सांस्कृतिक व्यवस्था आहे. त्याचे स्वरूप पितृसत्ताक आहे. जे विविध प्रकारच्या गुप्त माध्यमांद्वारे श्रेणीबद्ध करण्याचे कार्य करते - जीवशास्त्र, राजकारण आणि सामाजिक व्यवस्था विशेषतः कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय असमानता यामुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महिला बहिष्कृत, उपेक्षित आणि नियंत्रित आहेत. यामुळे त्यांचे जीवन दयनीय बनले आहे. त्यांना अशा परिस्थितीतून बाहेर काढणे गरजेचे होते. कोल्हापूरचे राजे आणि बहुजनांचे नेते शाहू महाराज यांनी महिला सक्षमीकरणासाठी काम केले. त्यांनी कायदे आणले, शिक्षण संस्था स्थापन केल्या, फेलोशिप आणि शिष्यवृत्ती दिल्या आणि समकालीन समाजाला (विशेषतः महिला वर्गाला) वाईट प्रथांची जाणीव करून दिली.

कोल्हापुरातील शाहू महाराजांच्या कालखंडातील सामाजिक स्थितीचे वर्णन 1855 ते 1965 या बॉम्बे स्टेटमधील शिक्षणाचा आढावा या ग्रंथात केले आहे: एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला या राज्यातील स्त्रियांची सामाजिक स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. हिंदूंमध्ये स्त्रियांना संपत्तीचे कोणतेही अधिकार नव्हते; बालविवाह हे अत्यंत सामान्य बाब होती; बहुपत्नीत्वाची पद्धत ही उच्च किंवा चांगल्या वर्गात सामान्य होती; स्त्रियांसाठी क्वचितच कोणताही व्यवसाय खुला होता आणि सामाजिक आणि नैतिक संहिता त्यांच्याबद्दल अत्यंत भेदभाव करत होती, उच्च जाती किंवा उच्च वर्गीय कुटुंबांमध्ये विधवाविवाह आणि घटस्फोट निषिद्ध होता. स्त्रियासाठी चूल आणि मूल हे त्यांच्या जीवनाचे क्षेत्र मानले जात असे. ते घरच्या जाळ्यात अडकले होते. शाहू महाराजांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सहकार्याचे हात पुढे करायला सुरुवात केली. शिक्षणाने महिलांच्या जीवनात बदल घडवून आणू शकतात, याची जाणीव त्यांना झाली. त्यामुळे त्यांनी आपल्या शैक्षणिक धोरणाद्वारे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. ते म्हणाले: ब्राह्मणेतर आणि दलितांमध्ये शिक्षणाच्या अभावामुळे राष्ट्राचे मोठे नुकसान झाले. मंदिरांमध्ये पुजारी असंख्य झाले आणि आमच्या शाळांना आमची मंदिरे करून त्यांची ढवळाढवळ थांबवली पाहिजे, खऱ्या धर्माचे ज्ञान समोर आले पाहिजे.

**सर्वांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण :**

शाहू महाराजांनी स्त्रियांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले, तसेच सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्यांनी ८ सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर राज्यातील सर्वांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचा आदेश मंजूर केला. त्यांनी सक्तीचा आणि मोफत शिक्षणाचा कायदा तर केलाच पण पालकांना त्यांच्या मुलांना गैरहजर राहिल्याबद्दल दरमहा एक रुपया या दराने दंड ठोठावून त्याची कठोर अंमलबजावणी केली. त्यांच्या मते "शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाचा विकास अशक्य आहे. निरक्षरतेने ग्रासलेल्या देशात चांगले नेते कधीच उदयास येत नाहीत. त्यामुळे हिंदुस्थानात मोफत आणि सक्तीचे शिक्षण सुरू करणे आवश्यक आहे." हा आदेश ३० सप्टेंबर १९१७ पासून अंमलात आणण्यात आला.

**उच्च शिक्षणावर भर :** त्यांनी केवळ प्राथमिक शिक्षणच नव्हे तर उच्च शिक्षणाचाही प्रचार केला. महिला शिक्षकांची गरज भागवण्यासाठी त्यांनी महिलांसाठी प्रशिक्षण महाविद्यालय स्थापन केले. विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुलींना शाळेत शिकवणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यांनी कृष्णाबाई केळवकर यांना

वैद्यकीय शिक्षणासाठी ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवले. १९०२ मध्ये त्यांनी तिची 'अल्बर्ट एडवर्ड मेडिकल हॉस्पिटल'मध्ये सहाय्यक वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली. त्याने तिला लंडनला गायनॅकॉलॉजीमध्ये स्पेशलायझेशनसाठी पुन्हा शिष्यवृत्ती दिली. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर १९०३ मध्ये त्या पुन्हा कर्तव्यात रुजू झाल्या. १९१०-११ मध्ये त्यांनी १५ विद्यार्थी आणि १९११-१२ मध्ये १० विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी मुंबई, पुणे, मद्रास आणि इतर ठिकाणी पाठवले. त्यांनी काही विद्यार्थ्यांना मेडिकल कॉलेज, बॉम्बे, मेडिकल स्कूल, पुना ट्रेनिंग कॉलेज आणि डेक्कन कॉलेज, पुणे येथे पाठवले. एकदा तोफखाने आणि भास्करराव जाधव यांच्याशी झालेल्या चर्चेत ते म्हणाले, 'महिलांना चांगले आणि वाईट यातील फरक समजेल असे योग्य शिक्षण मिळाले असते तर; चांगल्या नैतिकतेच्या शिक्षकांकडून ते मिळाले तर ते कधीही चुकीच्या मार्गावर जाणार नाहीत.''

**वसतिगृहांची स्थापना :**

शिक्षण संस्थांसोबतच राहण्याची सोयही आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारण्याचा निर्णय घेतला. १८ एप्रिल १९०१ रोजी मराठा विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस सुरू करण्यात आले. नंतर त्यांनी लिंगायत, सारस्वत, पांचाळ, जैन, मुस्लिम, नामदेव शिंपी , दैवज्ञ, वैश्य, ढोर-चांभार , सुतार, नाभिक इत्यादींसाठी वसतिगृहाची सुविधा सुरू केली.

**शिष्यवृत्ती आणि शिष्यवृत्ती :**

त्यांनी बहुजनांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी फेलोशिप आणि शिष्यवृत्ती दिली. त्यांनी 20 मे 1911 रोजी 15% विद्यार्थ्यांना आर्थिक मदत जाहीर केली; ते प्रथम गरीब विद्यार्थ्यांना आणि नंतर इतर विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्यांनी कृष्णाबाई केळवकर या हुशार विद्यार्थिनीला स्त्रीरोगात विशेषीकरणासाठी शिष्यवृत्ती दिली आणि लंडनला पाठवले. तसेच त्यांना शिष्यवृत्ती जाहीर केली. श्री राधाबाई अक्कासाहेब महाराज शिष्यवृत्ती आणि श्री नंदकुंवर महाराणी भावनगर शिष्यवृत्ती या नावाने कोल्हापूर आणि बावडा येथील मराठी माध्यमांच्या शाळांतील मुलींना शिष्यवृत्ती जाहीर केली.

**आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह :**

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह आणि विवाह नोंदणी कायदा १२ जुलै १९१९ रोजी लागू करण्यात आला, ज्या काळात बालविवाहांची परंपरा होती. विठ्ठलभाई पटेल यांनी १९१८ मध्ये केंद्रीय विधिमंडळात मांडलेल्या पटेल विधेयकाचा प्रभाव पडून हा कायदा करण्याचा निर्णय शाहू महाराजांनी घेतला. यापद्धतीने महाराजांनी जातीचे उच्चाटन आणि धर्मांमधील एकात्मतेच्या दिशेने पाऊल टाकले.

**विधवा पुनर्विवाह :**

मागास जातींमध्ये पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य होते, तथापि, उच्च जातीमध्ये कठोर पितृसत्ताक पध्दत होती जी विधवांच्या पुनर्विवाहास परवानगी देत नव्हती. या व्यतिरिक्त ब्राह्मणांमध्ये विधवांचे केस ( केशवपन ) काढण्याची परंपरा होती, विधवा स्त्रियांना अत्यंत वंचित, राखीव आणि अलिप्त जीवन जगावे लागत होते. अशा भक्कम पितृसत्ताक पद्धतींच्या बेड्या शाहू महाराजांनी तोडल्या. विधवा पुनर्विवाहाशी संबंधित कायदा १९१७ मध्ये त्यांच्या कोल्हापूर राज्यात मंजूर केला. त्यात राज्यातील विधवांची संख्याही नोंदवली. नुसताच हा कायदा करून महाराज थांबले नाहीत तर आपली स्नुषा इंदुमातीसाहेब यांच्या समोर त्यांनी पुनर्विवाहाचा पर्याय ठेवला होता. स्त्री उद्धाराबरोबर राष्ट्राच्या एकात्मतेला पुष्टी देणारा आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह कायदा शाहू महाराजांनी १९१९ साली केला.

**बुरखा परंपरा :** बुरखा परंपरा उच्च जातींमध्ये, विशेषत: खानदानी कुटुंबे, मराठा आणि वतनदारांमध्ये पाळली जात होती. हे स्त्रियांच्या घरगुती आणि बाहेरच्या क्षेत्रात मुक्त हालचालींवर ओझे आणि निर्बंध होते. त्याचा स्त्रियांवर विपरीत परिणाम होत होता, म्हणून शाहू महाराजांनी या पद्धतीचा निषेध केला.

**घटस्फोट कायदा आणि घटस्फोटानंतर महिला अधिकारांची सुरक्षा :**

त्यांनी घटस्फोट कायदा आणि घटस्फोटानंतर महिला हक्कांची सुरक्षा आणली. हा कायदा ख्रिश्चन आणि पारशी वगळता सर्व धर्मांना लागू होता. या कायद्यांतर्गत मुस्लिम महिलांना तलाकची प्रथा असली तरी त्यांना संरक्षण देण्यात आले होते; त्यांना त्यांच्या मुलांसह संरक्षण मिळाले. १९२० मध्ये त्यांनी वंशानुगत कायद्यात सुधारणाही केल्या.

**महिलांच्या छळाविरोधात कायदा :**

२ ऑगस्ट १९१९ रोजी महिलांच्या छळ प्रतिबंधाशी संबंधित कायदा लागू करण्यात आला. कायद्यानुसार पुरुषांकडून अपमान, शिवीगाळ, शाब्दिक हल्ले आणि महिलांच्या चारित्र्यावर संशय घेणे हे क्रौर्य कृत्य मानले गेले. यात महिलांवरील जवळपास सर्व प्रकारच्या क्रौर्याचा आणि छळाचा समावेश होता. त्यातून मागासवर्गीय समाज आणि महिलांमध्ये बदल घडून आला.

**देवदासी परंपरेचा निषेध :**

समकालीन समाजात, मुलींना देवाच्या नावाने अर्पण करण्याची परंपरा होती, ती मोठ्या प्रमाणात मागासवर्गीयांकडून पाळली जात होती. त्यातून देवदासींच्या परंपरा निर्माण झाल्या. जगतीन, मुरली, भावीन, इ. मुलीला देवाच्या नावावर अर्पण करणे म्हणजे ती आपल्या नैसर्गिक आई-वडिलांशी असलेले सर्व संबंध तोडून देवाची संतती बनते आणि तिला वारसा किंवा वारसा हक्क नसतो, तर दुसरीकडे तिला देवावर सोडण्यात आल्यापासून तिला संबंधित मंदिरांमध्ये काही विशिष्ट अधिकार मिळत आहेत आणि सामाजिक कायदेशीर दर्जाही मिळत आहे.परंतु त्यांचे लैंगिक शोषण होते आणि विशिष्ट क्षेत्रात त्यांना उपेक्षित केले गेले. तोही अस्पृश्यतेसारखा कलंक होता. हा कलंक दूर करण्यासाठी शाहू महाराजांनी संबंधित कायदा आणला.

**जातीचे उच्चाटन :**

जातिव्यवस्थेतील स्त्रियांची स्थिती आणि त्यांचे अनुलंब आणि शोषण करणारी वर्णव्यवस्था त्यांनी गांभीर्याने विचारात घेतली. वर्ण व्यवस्थेवर आधारित जातिव्यवस्था वैचारिकदृष्ट्या तयार केली गेली आहे जी विशिष्ट विभागाला चुकीची ठरवते आणि दुसऱ्याला टाकून देते. जातिव्यवस्था थेट पितृसत्ताशी जोडलेली आहे जी महिलांना उपेक्षित करते, बहिष्कृत करते आणि विवश करते. त्यांना दोनदा उपेक्षित केले जाते, प्रामुख्याने, बाहेरील लोकांकडून स्त्री म्हणून आणि दुसरे म्हणजे कुटुंबातील स्त्री सदस्य म्हणून तिच्या पुरुष नातेवाईकांकडून. त्यामुळे जातीचे उच्चाटन आणि पितृसत्ताक वैचारिक संस्था नष्ट करणे हे स्त्रीमुक्तीसाठी आवश्यक घटक आहेत. म्हणून त्यांनी जातिव्यवस्थेचा नायनाट करण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्ष :**

थोडक्यात, शाहू महाराजांनी विविध जाती, वर्ग, धर्म, लिंग इत्यादींमध्ये विभागलेल्या समाजाला एकत्र करण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांची स्थिती ओळखून त्यांनी विशेषत: शिक्षण सुरू करून आणि काही कायदे करून महिला सक्षमीकरणाकडे लक्ष दिले. शाहू महाराजांनी महिलांसाठी केवळ कायदेच केले नाही तर तर त्यांना संरक्षण आणि सुरक्षा देखील दिली. महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे योगदान ऐतिहासिक दृष्टिकोनातून आणि सामाजिक अर्थाने महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**

1. मुंबई राज्यातील शिक्षणाचा आढावा. 1855 ते 1965 (बॉबे: बॉम्बे सरकार) 1958.
2. भागवत R.T., शिक्षण विशायक विचार आणि कार्य. चैतन्य प्रकाशन कोल्हापूर. 1981. भिडे जी.आर.कोल्हापूर दर्शन. आंतरराष्ट्रीय प्रकाशन, पुणे. १९७१.
3. भोसले नारायण. महाराष्ट्रतील स्त्रीविषयक सुधर्णवादाचे सत्ताकारण। तैचि प्रकाशन। पुणे. 2008.
4. डेव्हिड एम.डी. आधुनिक भारताचा सांस्कृतिक इतिहास. 3रा एड. बॉम्बे. 1973.

5. कराडकर K. S. मंगुडकर M. P. (Ed). महाराष्ट्रतील समाजप्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य. पुणे विद्यापीठ. पुणे. १९७५.
6. कीर धनंजय. राजश्री शाहू छत्रपती : एक समाजक्रांतीकार राजा. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. 2001.
7. पानसरे गोविंद. राजर्षी शाहू : वसा आणि वारसा । लोकमय वाङ्मय गृह. मुंबई,.
8. फडके वाय.डी. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन. पुणे. पहिली एड. 1986. सबनीस. कोल्हापूरवर आर. व्ही. नोट्स. बॉम्बे. टाईम्स प्रेस. 1928.
9. साळुंखे हिंदुराव. छत्रपती शाहू स्मृतीदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भंडार. कोल्हापूर. 1989.

**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)**
**ISSN – 2347-7075**
**Impact Factor –7.328**
**Peer Reviewed Bi-Monthly**
**Vol.2 Issue.16May-June 2022**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य

**प्रा.रमेश शंकर माने**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड ता.शिराळा, जि.सांगली
E mail rameshmane434@gmail.com

**प्रस्तावना:**

राजेशाहीपेक्षा लोकशाही श्रेष्ठ असते. हे छत्रपती शाहू महाराजांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले होते. त्यांनी आपली राजसत्ता आणि वैभव रयतेच्या, दीनदुबळयांच्या हितासाठी खर्ची घातले होते. आपल्या राज्यातील सर्व प्रजा सुखी, समाधानी असली पाहिजे, हे पहिल्याच जाहीरनाम्यात मांडणारे आणि राजेशाही सुध्दा मानवतेला जाचक ठरू शकते हे स्पष्टपणे सांगणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकोत्तर राजे होते. शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य बहुजनांच्या हितासाठी, सर्व सामान्य रयतेच्या कल्याणासाठी वाहून घेतले होते. असे एकही क्षेत्र नव्हते की, ज्या क्षेत्रात शाहू महाराजांनी कार्य केलेले नव्हते. त्यांच्या सामामजिक कामाबध्दल तत्कालीन मुंबईच्या इंग्रज सरकारने तुम्ही जे कार्य करतातय ते तुमच्या संस्थानात करा, इतरत्र ते करू नका, असे सांगितल्यावर महाराजांनी इंग्रजांना सडेतोड उत्तर दिले होते. सन 1896-97 मध्ये महाभयंकर दुष्काळ पडून देशात 10 लाखापेक्षाही अधिक लोक मृत्यूमुखी पडले होते. परंतु कोल्हापूर संस्थानात एकही भूकबळी गेलेला नव्हता. त्यानंतर लगेच प्लेगची साथ रोखण्यासाठी शाहू महाराजांनी वेगवेगळी उपाय योजना आखली होती.

**संशोधनाचा उद्देश :**

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अजुनही सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचलेले नाही. त्यांचे विचार आताच्या पिढीपुढे नेणे गरजेचे आहे. शाहूंच्या विचारात सर्वसामान्यांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडविण्याची क्रांतीकारी ताकद आहे. सुधारणावादी, प्रगल्भ विचार कृतीत आणणरा राजा, संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात अमूलाग्र क्रांती घडवून आणणारा रयतेचा राजा ही त्यांची खरी ओळख जनमानसात रूजली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी शतकानुशतके ज्यांना अन्यायी व विषम समाजव्यवस्थेमुळे अपार दुःख व अपमान सोसावे लागले, त्या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या, मागास जातीच्या लोकांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखविला. तर छत्रपती शाहू महाराजांनी अशा लोकांना खऱ्या अर्थाने माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे, शिकता यावे, आणि विकासाच्या वाटा त्यांना खुल्या व्हाव्यात, यासाठी ऐतिहासिक कार्य केले. या कार्याची नोंद महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारताचा इतिहास लिहिणाऱ्यांनाही करावीच लागेल. म्हणून 6 मे रोजी करवीर नगरीच्या राजर्षी शाहू महाराजांचे स्मृती शताब्दी वर्ष साजरे करताना या लोकोत्तर राजाच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख या लेखातून मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

**शाहू महाराजांचे सामाजिक कार्य:**

1) **सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा:**

करवीर नगरीतील आपल्या सर्व प्रजाजनांना लिहिता-वाचता यावे आणि त्यातून त्यांनी आपली परिस्थिती सुधारावी म्हणून 29 सप्टेंबर 1917 रोजी शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अंमलात आणला. या कायद्यानुसार करवीर इलाख्यातील सर्व आई बापांनी आपल्या शिक्षणास योग्य वयाच्या मुलांना शाळेत पाठविले पाहिजे असा हुकूम काढला. शिक्षणासाठी योग्य वयाच्या मुलांची यादी प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांच्या आत मुलांच्या आईबापांनी आपली मुले शाळेत पाळविली पाहिजेत. तसेच शाळेत येण्याच्या ठरलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत जर ती मुले शाळेत आली नाहीत, तर अशा मुलांची व त्यांच्या पालकांची नावे सदर शाळेच्या हेडमास्तरांनी मामलेदारास कळवावी. मामलेदारांनी अशा मुलांच्या पालकास समन्स काढून त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. हे म्हणणे संयुक्तीक न वाटल्यास प्रत्येक मुलाबद्दल एक रूपया दंड प्रत्येक महिन्याला तो मुलगा शाळेत येईपर्यंत आकारावा अशी तरतुद कायद्यात करण्यात आली. मुलांना शाळेत घातल्यावर आपली मुले वेळच्यावेळी शाळेत जातात की नाही हे पाहणे आई बापांचे कर्तव्य असल्याचे निश्चित करण्यात आले.

**2) आंतरजातीय विवाह कायदा:**

राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील जातीभेद मोडून काढण्यासाठी आंतरजातीय विवाहाला संमती देणारा "आंतरजातीय विवाह कायदा" 12 जुलै 1919 रोजी अंमलात आणला. आणि तो सर्व करवीर इलाख्यास लागू केला. या कायद्यानुसार मुलाचे वय 18 वर्ष पूर्ण आणि मुलीचे वय 14 वर्ष पूर्ण निश्चित करण्यात आले. तसेच असे विवाह करताना नवरा मुलगा व नवरी मुलगी हे भाऊ-बहिण असू नयेत अशीही तरतुद कायद्यात केली. आंतरजातीय विवाह जेवढया जास्त प्रमाणात होतील तेवढया प्रमाणात हिंदी समाजातील जातीभेद नष्ट होवून देशाची प्रगती होईल, असे शाहू महाराज नेहमी आपल्या भाषणातून सांगायचे. केवळ भाषणातून सांगून महाराज थांबले नाहीत, तर आपल्या जनक घराण्यातील चुलत भगिनी चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरच्या यशवंतराव होळकर यांच्याशी लावला. आणि एका मराठा उच्चकुलीन घराण्याची धनगर समाजाशी वैवाहिक संबंध जोडून प्रत्यक्ष आचरणातही अवलंब केला. पुढे शाहू महाराजांनी असे 25 आतंरजातीय विवाह लावून दिले. याशिवाय महाराजांनी विधवा पुनर्विवाह कायदाही केला होता.

**3) मागासवर्गीयांना शेकडा 50 जागा राखीव:**

भारतातील वर्ण आधारित धर्मव्यवस्थेने समाजातील विशिष्ट्य लोकांना विशेषाधिकार व बहुसंख्य लोकांना गुलामगिरीची स्थिती निर्माण करून दिली होती. त्यातून हिंदू समाजात जातीची उतरंड निर्माण झाली होती. आधुनिक काळात या व्यवस्थेविरूध्द महात्मा जोतीबा फुले यांनी बंड पुकारले. आणि अशा वंचितांना शिक्षण व नोकऱ्यात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे असे विचार मांडले. राजर्षी शाहू महाराजांनी अशा विषमतावादी समाजव्यवस्थेला वठणीवर आणण्यासाठी 26 जुलै 1902 रोजी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांना 50 टक्के जागा राखीव ठेवण्याचा आदेश जारी केला. एकूण सरकारी नोकऱ्यांमध्ये 95 टक्के नोकऱ्यांवर ब्राम्हण जातीचे लोक होते. ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आली होती. म्हणून 26 जुलै 1902 चा हुकूम पोहचल्या तारखेपासून रिकाम्या झालेल्या जागांपैकी शेकडा 50 जागा मागासलेल्या लोकांच्या भराव्यात असे फर्मान काढण्यात आले. मागासलेल्या वर्णाचा अर्थ ब्राम्हण, परभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण, खेरीज इतर सर्व वर्ण समाजावा असा आदेश काढला. याचा अर्थ राजर्षी शाहूंनी मराठा जातीसह सर्व मागासवर्गीयांना 50 टक्के नोकऱ्या राखीव ठेवल्या. भारताच्या इतिहासात एखाद्या राज्यकर्त्याने काढलेला अशा प्रकारचा हा पहिलाच जाहिरनामा होता. म्हणून राजर्षी शाहू महाराजांना "समतावादी आरक्षणाचे जनक" असे म्हटले पाहिजे.

**4) कुलकर्णी वतन नष्ट करणारे आज्ञापत्र:**

कुलकर्णी वतन नष्ट करून ग्रामपंचायती स्थापन करण्याची राजर्षी शाहू महाराजांची इच्छा होती. बिकानेर, त्रावणकोर वगेरे संस्थानात प्रजेसाठी ग्रामपंचायती स्थापन केल्या होत्या. परंतु अशा ग्रामपंचायती स्थापन करताना आपल्या संस्थानात कुलकर्णी वतनदार ही मोठी अडचण निर्माण झाली होती. शेतकऱ्यांच्या आणि मोठया समाजाच्या हितासाठी कुलकर्णी वतनदारी बंद झाली पाहिजे, म्हणून राजर्षी शाहूंनी फेब्रुवारी-मार्च 1918 मध्ये एक वटहुकूम काढून कुलकर्णी वतन रद्द केले व त्याजागी पगारी तलाठी पध्दत सुरू केली. आणि ब्राम्हणेतरांना नोकऱ्यांची संधी उपलब्ध करून दिली. अस्पृश्य नोकर कर्तबगार असले तर त्याला बढती देताना तलाठी पदासाठी प्रथम पसंती देण्यात आली. पुढे अधिकाऱ्यांच्या इतर पदांवरही कर्तृत्व आणि कर्तबगारीला महाराजांनी अधिक प्राधान्य दिले. व्यक्तीच्या कर्तृत्वाच्या आड पारंपारिक जाती व्यवस्था येणार नाही याची दक्षता छत्रपती शाहूंनी घेतली होती.

**5) अस्पृश्यांना समतेची व माणूसकीची वागणूक देण्याचा आदेश:**

शिक्षण खाते, महसूल, न्याय, मेडिकल या सर्व खात्यांमध्ये अस्पृश्य कर्मचाऱ्यांना प्रेमांने व समतेने वागविण्याचा आदेश राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर इलाख्यातील सर्वांना दिला होता. जर कोणी अधिकारी अस्पृश्यांना वरील प्रमाणे वागविण्यास तयार नसेल, तर त्याने हा हुकूम पोहचल्यापासून सहा आठवडयाच्या आत नोटीस देवून राजीनामा द्यावा त्यावेळी त्याला पेन्शनही मिळणार नाही असा हुकूम जारी केला होता. महाराजांनी सर्वांना असे आदेश दिले की, आमच्या राज्यातील कोणाही इसमाला जनावरांप्रमाणे न वागविता मनुष्य प्राण्याप्रमाणे वागवावे. तसेच सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हौसीस, सरकारी अन्न छत्रे, नदीचे पाणवटे, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानण्यात येवू नये. कोणाचाही विटाळ न मानता सर्वांना समतेने वागवावे. तसे न झाल्यास त्या ठिकाणच्या गावकामगार पाटील, तलाठी यांना जोखीमदार धरण्यात येईल असाही आदेश राजर्षी शाहू महाराजांनी जारी केला होता. याशिवाय अस्पृशांना गुन्हेगार जाती समजून दररोज पोलीस पाटलांकडे हजेरी लावण्याच्या अमानुष पध्दती विरूध्द आदेश काढून म्हार, मांग, रामोशी व बेरड या चार जातींची हजेरी बंद केली होती. परंतु यातील कोणी एखाद्या गुन्हयात सापडून शिक्षा झालेला असल्यास त्याला हजेरी माफ केली नव्हती.

**6) महारांची वतनी गुलामी नष्ट करण्याचा आदेश:**

'वतन' म्हणजे महारांना गावकामाच्या मोबदल्यात मिळालेला जमिनीचा तुकडा. या तुकडयासाठी संपूर्ण महार जातीला इतर समाजाची सर्व कामे करावी लागत होती. त्यामुळे पिढयानपिढया वरिष्ठ जातीच्या गुलामगिरीत हा महार समाज पिचला जात होता. गावकीची सर्व कामे या महार समाजाला करावी लागत असल्यामुळे अशा जमिनीवर शेतसारा आकारला जात नव्हता. परंतु हिंदु समाजातील आचार विचारांनी, दुष्ट चालीरीतींनी आणि बंधनांनी या महार समाजाला अस्पृश्य ठरवून, बहिस्कृत करून गावाबाहेर राहणेस भाग पाडले होते. त्यामुळे सर्वतोपरी महार समाजाची मोठी हानी झाली होती. या गावकीच्या गुलामगीरीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी 1918 मध्ये राजआज्ञा काढून महारांची वतनी गुलामी नष्ट केली.

**7) स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा:**

राजर्षी शाहू महाराजांच्या असे निदर्शनास आले की, पाश्चिमात्य शिक्षणाचा मंद प्रसार आणि हिंदूस्थानातील स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यास या शिक्षणाचा फारसा उपयोग होत नाही. तसेच हिंदूस्थानातील लोकांचे जे वेगवेगळे समाज आहेत, तिथे समाजातील पुरुषमंडळी स्त्रियांना वाटेल तशी वाईट वागणूक देत आहेत. सर्वच पुरुषांची अशी समजूत होती की, त्यांच्या धर्मशास्त्रकरांनी विशेषत: हिंदू पुढाऱ्यांनी विशेष प्रसंगी स्त्रियांना हलकेसे शासन करण्याची परवानगी दिली होती. परंतु पुरुषमंडळी स्त्रियांवर अमानुष अत्याचार करत होते. स्त्रियांवरील जाचांचे हे प्रकार इ. पी. कोडच्या मर्यादेत येवू शकत नव्हते. म्हणून अशा जाचांना आळा घालण्यासाठी आणि दुष्परिणामांना आळा बसावा या उद्देशाने छत्रपती शाहू महाराजांनी 2 ऑगस्ट 1919 रोजी स्त्रियांच्या छळवणूकीस प्रतिबंध करणारा कायदा अंमलात अणला. या कायद्यात 'क्रूरपणाची वागणूक' याची व्याख्या करून जो पुरुष अथवा सासू सूनेचा छळ करीत असेल, तिला क्रूरपणाने वागवत असेल तर अशा व्यक्तीस सहा महिने सक्त मजुरी व 200 रू. दंडाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली. छळवणूक प्रतिबंध कायद्यात समजुतीचे वय 16 वर्ष ठरविण्यात आले. आणि जो व्यक्ती समजुतीच्या वयात आलेला असून त्याने स्त्रीशी क्रूरपणाची वागणूक केल्याचे सिध्द झाले आहे. परंतु स्त्री समजुतीच्या वयात आली नसेल तर ही शिक्षा दुप्पट करण्याची तरतुद कायद्यात करण्यात आली होती. याशिवाय शाहू महाराजांनी विवाह, घटस्फोट, अनौरस संततीला संपत्तीत हक्क, स्त्रियांवर होणारे अत्याचार इ. बाबतीत स्त्रियांना स्वातंत्र्य व समतेची वागणूक देणारे अनेक कायदे कोल्हापूर संस्थानात करून त्यांची अंमलबजावणी केली होती.

**8) विवाह विच्छेदन (काडीमोड) कायदा:**

हिंदू समाजातील पुरुष मंडळी आपल्या इच्छेनुसार किरकोळ कारणावरून आपल्या लग्नाच्या बायकोला सोडून देत होते. समाजातील पंचांच्या लहरीपणावर नवरा बायकोशी काडीमोड घेत होता. ही पंचमंडळी समाजातील एखाद्या पुरुषाने मोठा गुन्हा केलेला असतानाही त्याला फारसे शासन करीत नव्हती. परंतु समाजातील एखाद्या स्त्रीने अगदी किरकोळ गुन्हा केला असला, तरी तिला शासन म्हणून उकळत्या तेलातून नाणे बाहेर काढणे, उपवाशी ठेवणे, घराबाहेर काढणे, समाजातून हाकलुन देणे अशा अमानुष शिक्षा देत होते. यामुळे समाजातील "विवाह" या संकल्पनेला बाधा निर्माण होत होती. अशा मानवी, अमानुष प्रथांना पायबंद घालण्यासाठी शाहू महाराजांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांसाठी कोल्हापूर संस्थानात "विवाह विच्छेदन" (काडीमोड) कायद्याची 11 जुलै 1919 पासून अंमलबजावणी सुरू केली. या कायद्याने कोल्हापूर संस्थानातील कोणत्याही जातीमधील प्रचलित असलेल्या चाली-रिती बेकायदा ठरवून काडी मोडणे हे बायकांच्या मर्जीवर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले. काडीमोड किंवा नवऱ्यापासून वेगळे राहण्याचा अधिकार या कायद्याने स्त्रियांनाही मिळवून दिला. जर नवरा वेडा असेल, नपुसंक असेल किंवा त्याला महारोग झालेला असेल तर बायको या कायद्यानुसार नवऱ्यापासून काडीमोड घेवू शकते अशी तरतुद या कायद्यात करण्यात आली होती.

**9) राजर्षी शाहू महाराजांचा शेतीविषयक दृष्टीकोण :**

देशातील 80 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. आणि शेतीचा विकास झाल्याशिवाय संस्थानाची प्रगती होणार नाही, हे ओळखून सन 1902 च्या युरोप दौऱ्यात 'रॉयल ॲग्रिकल्चरल सोसायटी ऑफ इंडिया' या ख्यातनाम शेती संशोधन संस्थेचे सभासदत्व शाहू महाराजांनी स्विकारले होते. इटली व स्कॉटलंड सारख्या विविध देशांना भेटी देवून तेथील शेतीविषयक प्रगत तंत्रज्ञान भारतात आणण्यासाठी राजर्षींनी अथक परिश्रम घेतले होते. शेतकऱ्यांना शिक्षणाची गरज आहे हे ओळखून 1896 मध्ये राजाराम हायस्कूलमध्ये शेती हा नवीन विषय सुरू केला होता. पुढे 1906 मध्ये पी.सी.पाटील या विद्यार्थ्यास पुणे येथील ॲग्रिकल्चर कॉलेजमध्ये शेती शिक्षणासाठी पाठविले होते. राजर्षींनी 1912

मध्ये 'दि किंग एडवर्ड अॅग्रिकल्चरल इंन्स्टिटयूट'ची स्थापना कोल्हापूरात केली होती. 20 जानेवारी 1913 रोजी 'शेती सुधारणा' या पुस्तकाच्या 100 प्रती विकत घेवून त्या संस्थानाच्या ग्रंथालयात ठेवल्या होत्या.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अल्पव्याजदाराने कर्जपुरवठा व्हावा म्हणून शाहू महाराजांनी 1904 मध्ये 'व्हिक्टोरिया मेमोरियल फंडाची' स्थापना केली. 1906-07 ते 1921-22 या काळात राजर्षीनी शेतकऱ्यांना शेती विकासासाठी 25,53,280 रूपये एवढा प्रचंड कर्जपुरवठा केला. जमिनीच्या विभाजनाला महाराजांनी विरोध करून जमिनीचे आकारमान वाढवून जमिनीच्या उत्पादकतेत वाढ व्हावी म्हणून प्रयत्न केले. तसेच शेतीचे आधुनिकीकरण, शेती प्रदर्शने, शेतीला जोडधंदा उभा करून शेतीच्या प्रगतीकडे विशेष लक्ष पुरविले होते.

**10) राजर्षी शाहू महाराज आणि पाणी व्यवस्थापन:**

भारतीय शेती ही मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे हे राजर्षीनी ओळखून 1894 पासून संस्थानातील जलसिंचन सुविधांचा प्रारंभ केला होता. 1902 मध्ये संपूर्ण संस्थानातील जलसिंचनाचा आढावा (इरिगेशन सर्व्हे) तज्ञांकडून घेवून संस्थानातील जास्तीत जास्त जमिनी ओलीताखाली आणण्यासाठी अनेक ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, तलाव, विहिरी बांधल्या व दुरूस्त केल्या होत्या. 'राधानगरी धरण' हा राजर्षी शाहू महाराजांचा सर्वात मोठा आणि महत्वकांक्षी प्रकल्प होता. आर्थिक कुवत नसतानाही संस्थानातील दुष्काळ कायमचा मिटवून शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी राजर्षीनी हा प्रकल्प हाती घेतला होता. त्याकाळात संपूर्ण भारतातील सर्वात मोठा हा प्रकल्प होता. पहिल्या महायुध्दकाळात ब्रिटिशांना युध्दनिधी म्हणून फार मोठी रक्कम द्यावी लागत होती. त्यावेही 13,36,130 एवढा प्रचंड खर्च धरणासाठी झाला होता. पुढे शाहू महाराजांचे पुत्र छत्रपती राजाराम यांनी धरणाचे काम पुर्ण करून आपल्या वडिलांचे स्वप्न साकार केले. या धरणामुळे आज कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांती झालेली दिसून येते.

**निष्कर्ष :**

2 एप्रिल 1894 मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे अधिकार आपल्या हाती घेतल्यापासून 1894 ते 1922 या 28 वर्षाच्या काळात कोल्हापूर सारख्या एका लहान संस्थानाचा सर्वांगिण विकास घडवून आणला. न्याय, समता, शिक्षण आणि सर्वांगिण विकास हे त्यांच्या राज्यकारभाराचे वैचारिक अधिष्ठान राहिले. संस्थानातील, शेतीकरी, कष्टकरी , स्त्रिया पुरुष , नोकरदार, समाजातील मागसलेला व अस्पृश्य घटक, उच्चकुलीन घटक या सर्वांना शाहू महाराजांनी न्याय व समानतेने वागण्यास शिकविले. आपली राजसत्ता आणि वैभव त्यांनी रयतेच्या कल्याणासाठी, उन्नतीसाठी खर्ची घातले. जैन, लिंगायत, अस्पृश्य , सोनार, शिंपी, पांचाळ, गौड सारस्वत, मुस्लीम, इंडियन ख्रिश्चन, प्रभूवैश्य, ढोर चांभार, सुतार, मांग, नाभिक, सोमवंशी, आर्य, क्षत्रिय, कोष्टी अशा विविध जातीधर्मांनसाठी 20 वसतीगृहे राजर्षीनी सुरू केली होती. वसतीगृह ही एक लोकचळवळ त्यांनी उभी केली होती. साधारण पुढील 90 वर्ष महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, कला इ. क्षेत्रातील नेतृत्व करणाऱ्या अनेक व्यक्ती कोल्हापूरच्या या वसतिगृहांनी घडविल्या आहेत.

**समारोप:**

राजर्षी शाहू महाराजांनी कला, क्रीडा, मल्लविद्या, संगीत, नाटय, चित्रकला आणि सांस्कृतिक कार्याला सतत मार्गदर्शन व अर्थसहाय्य केले. शेती, उद्योग, सहकार यांच्या विकासातून कोल्हापूरचा सर्वागिंण विकास घडवून आणला. चहा, कॉफी , रबर, वेलदोडे यासारकी कधीही न घेतलेली उत्पादने घेणे सुरू केले होते. कोल्हापूरचे मल्ल, पैलवान शाहू महाराजांनी जगप्रसिध्द केले.कोल्हापूरात राजवाडयातील लाल आखाडा, बापूसाहेब महाराजांचा आखाडा, काळा इमाम, गंगावेश, घोडणपीर, बावडेकर, बजापराव माने, मोतीबाग तालीम, दिलबहार, नाथा गोळे, पंचगंगा, उतरेश्वर धोत्री, बोडके, शिपुगडे, रंकाळा, महाकाली, तटाकडील, जुना बुधवार, मठ, बाबूजमाल, मंगळवार पेठ अशा अनेक तालमीतून मुन्ना, देवप्पा धनगर, शिवाप्पा बेरड, पांडू भोसले, कृष्णा मर्दाने, गणू, थोरला मामा, इमामभक्ष, गुलाम मोहिद्दिन, हसनबक्ष, गुलाम कादर, कल्लू, बापू सज्जन यासारखे पैलवान तयार केले होते.

शाहू महाराजांची ईश्वर व धर्मावर श्रध्दा होती. हिंदूंच्या देवळांप्रमाणे मुस्लिमांच्या दर्ग्यातही ते जात असत, संस्थानातील महालक्ष्मी, तुळजाभवानी, टेंबलाई, ज्योतिबा इ. देवदेवतांचे उत्सव व यात्रा शाही वैभवाने साजऱ्या केल्या जात असत. राजा म्हणून प्रजेपती आपले ते कर्तव्यच आहे अशी त्यामागची त्यांची भूमिका होती. असे जरी असले तरी

अंध्दश्रध्देला त्यांनी कधीच थारा दिला नाही. मानसाने माणसाशी नेहमी मनुष्यत्वाच्या आणि बंधुत्वाच्या भावनेने वागावे अशी त्यांची धारणा होती.

**संदर्भ** :

1) राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे व आज्ञापत्रे: संपादक - प्रदीप गायकवाड
2) शाहूंच्या आठवणी: प्रा.नानासाहेब साळुंखे
3) आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा.डॉ.जे.एफ.पाटील, डॉ.आर.एस्.म्होपरे, डॉ.आर.ए.वाईंगडे, डॉ..एस्.बी.यादव
4) लोकत्तर राजा: डॉ.जयसिंगराव पवार - (दै.लोकसत्ता लेख)
5) राजर्षी शाहू कार्याचा वसा आणि वारसा - प्रा.रमेश जाधव (दै.पुढारी-लेख)
6) राजर्षी शाहू महाराज: सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ - मयुर डुमने
7) शाहू विचारांचा जागर - इंद्रजीत सावंत (दै. पुढारी - लेख)

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# कोल्हापूर संस्थांनातील शैक्षणिक क्रांती

**डॉ. उत्तरा खाडीलकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण जि. रायगड
Email- uttarakhadilkar1969@gmail.com

**प्रस्तावना :**

बहुजन समाजाच्या उद्धारासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जीवनकार्य मोलाचे आणि चिरस्मरणीय असे आहे. कोल्हापूर सारख्या संस्थानाच्या समाजजीवनाच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. काळजीपूर्वक राज्यकारभाराकडे लक्ष देण्याबरोबर त्यांनी सर्व जाती धर्मियांचा उत्कर्ष साधण्यासाठी शिक्षणाच्या प्रसाराची कास धरली. उद्योग धंद्याबरोबर छत्रपती शाहू महाराज यांनी विविध क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. विशेषतः त्यांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा अत्यंत क्रांतीकारक ठरल्या.

**पूर्वायुष्य :**

छत्रपती शाहूंचा जन्म २६ जून १८७४ ला कागलच्या घाटगे घराण्यात झाला. त्यांच्या आईचे नाव राधाबाई व वडिलांचे नाव जयसिंगराव होते. छत्रपती शाहूंचे मूळ नाव यशवंतराव हे होते. इ.स. १७०८ मध्ये कोल्हापूर या स्वतंत्र राज्याची स्थापना झाली होती. या राज्याचे राजे चौथे शिवाजी यांना वेडसर ठरवून इंग्रजांनी अहमदनगर किल्यात ठेवले. इ.स. १८८३ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. शिवाजीराजे यांच्या पत्नी आनंदीबाई यांना अपत्य नसल्यामुळे त्यांनी घाटगे घराण्यातील जयसिंगराव आबासाहेब घाटगे यांचे पुत्र यशवंतराव यांना इ.स. १८८४ मध्ये दत्तक घेतले व शाहू महाराज या नावाने त्यांचा राज्याभिषेक झाला. त्यांचे शिक्षण राजकोट तसेच धारवाड या ठिकाणी झाले. अभ्यासाशिवाय कुस्ती, शिकार, घोडेस्वारी इ. मर्दानी खेळ उत्तम प्रकारे खेळत असत.

१८९४ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली. 'आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे' हे ध्येय उराशी बाळगून त्यांनी कार्याला सुरुवात केली. त्यांनी समाजजीवनाचे निरीक्षण केले. प्रजेच्या सुखातच राजाचे सुख आहे यासाठी जनहिताच्या विविध कल्याणकारी योजना राबवायला सुरुवात केली. या योजनांमध्ये त्यांनी शैक्षणिक सुधारणांना खूप महत्व दिले. सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून त्यांनी शैक्षणिक सुधारणांना प्राधान्य दिले.

**शिक्षण क्षेत्रात केलेल्या सुधारणा :**

सर्व जातीच्या मुलांना शिक्षण मिळण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ मध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास केला. शाळेत न आलेल्या मुलांच्या पालकांना प्रत्येक महिन्यास एक रुपया दंड आकारण्यात आला. प्राथमिक शिक्षणाचे वय ७ ते १४ असे करण्यात आले. त्यांच्या या प्रयत्नामुळे कोल्हापूर संस्थानात इ.स. १९१८ ला एकूण २७ शाळा सुरु झाल्या तर त्यांची संख्या इ.स. १९२९ पर्यंत ४२० इतकी झाली. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी अनेक शैक्षणिक सवलती जाहीर केल्या व साधारण एक हजार रुपयेपर्यंत शिष्यवृत्ती जाहीर केली. प्राथमिक शिक्षण देण्यासाठी प्रत्येक गाव तिथे शाळा काढून तिथे पगारी शिक्षक नेमले. गाव चावडीत शाळा भरविण्यास सुरुवात केली. खेडेगावातील कारभार व्यवस्थित चालावा म्हणून 'पाटील व तलाठी' शाळा सुरु केल्या. शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्रे सुरु केली. तांत्रिक शिक्षणासाठी 'जयसिंगराव घाटगे तांत्रिक शिक्षण संस्था' स्थापन केली. तर लष्करी शिक्षणासाठी 'इन्फन्ट्री स्कूल' स्थापन केले. कोल्हापूर येथे इंग्रजी शाळा स्थापन केली. त्यांनी स्त्री शिक्षणाकडे सुद्धा पूर्ण लक्ष दिले. मिस लिटल या इंग्रज शिक्षणाधिकारी बाई मायदेशी गेल्या म्हणून फिमेल ट्रेनिंग स्कूल मधील शिक्षिका रखमाबाई

केळवकर यांना शिक्षणाधिकारी केले. मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढावे यासाठी त्यांनी फक्त मुलींच्या शाळा सुरु केल्या. मुलींना शिष्यवृत्ती सुरु केली. विधवा गरीब स्त्रियांनाही शिक्षण दिले.

**वसतिगृहाची स्थापना**

शिक्षण प्रसाराच्या संदर्भात आलेले अत्यंत महत्वपूर्ण व क्रांतिकारक पाऊल म्हणजे कोल्हापुरात सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची स्थापना होय. खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरात जावे लागत होते. अशा वेळी त्यांची रहाण्याची व जेवणाची सोय व्हावी व त्यांच्या शिक्षणात अडचणी येऊ नयेत म्हणून राजाराम महाविद्यालयाला जोडून वसतिगृह स्थापन करण्यात आले होते परंतु त्यांच्या या वसतीगृहाचा लाभ प्रामुख्याने ब्राह्मण विद्यार्थ्यांना झाल्याने महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन करण्याचा निर्णय घेतला. वरील निर्णयानुसार इ.स. १९०१ मध्ये मराठ्यांच्या विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' सुरु केले. पुढे साधारणपणे इ.स. १९०१ ते इ.स. १९२१ या काळात एकूण बावीस वसतिगृहे सुरू केली. यापैकी मिस क्लार्क होस्टेल हे अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरु झालेले पहिले वसतिगृह होते. या प्रत्येक वसतिगृहाच्या स्थापनेचा इतिहास वैशिष्ट्यपूर्ण व महत्वपूर्ण आहे. शाहू महाराजांच्या भरभक्कम पाठिंब्यामुळे ही वसतिगृहे विकसित होऊ शकली. या वसतिगृहांचा लाभ बहुजन समाजातील अनेक विद्यार्थ्यांनी घेतला. किंबहुना या वसतिगृहांमुळेच ते शिक्षण घेऊ शकले. यातील अनेकांनी नंतर समाजकारण, राजकारण क्षेत्रात मोठे कार्य केले. सर्वसामान्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे कार्य शाहू महाराजांच्या शिक्षण चळवळीने केले.

**समारोप :**

सामान्य लोकांच्या प्रगतीसाठी त्यांचे शिक्षित होणे खूप आवश्यक आहे याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती आणि त्यामुळेच संस्थानातल्या शिक्षणाला चालना देण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. सामान्य जनता आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करते हे त्यांना माहीत होते म्हणूनच त्यांनी कायदे करून शिक्षणासाठी आपल्या जनतेवर सक्ती केली अर्थात यामागे जनतेचे भले व्हावे हा बहुजन समाज शिकावा एकमेव उद्देश होता. एकूणच महाराजांच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविध सुधारणा या क्रांतिकारी ठरल्या. ते कृतिशील सुधारक होते. त्यांच्या शिक्षण सुधारणा अत्यंत क्रांतीकारी होत्या. आजही त्या सुधारणांचा अत्यंत सूक्ष्म पद्धतीने अभ्यास केला तर आजच्या आधुनिक शिक्षण व्यवस्थेला प्रगती करण्यासाठीच्या अनेक बाबी त्यांच्या सुधारणांमधून आपणास घेता येतील. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या उत्तम कार्यशैलीतून संपूर्ण देशातच कोल्हापूर संस्थानची वेगळी ओळख निर्माण केली होती.

**संदर्भ**

१. गणेश राऊत,महाराष्ट्राच्या परिवर्तनाचा इतिहास डायमंड प्रकाशन, पुणे

२. य.दि.फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र सागर प्रकाशन, पुणे

३. रा. तु. भगत,शिक्षण महर्षी शाहू महाराज कोल्हापूर १९१९

४. विनोद तावडे , द्रष्टा राजर्षी ( लेख) , लोकराज्य अंक, ३ सप्टेंबर २०१८

५. टी.एस. पाटील, राजर्षी शाहू छत्रपती, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर , सप्टेंबर २०१३

६. धनंजय कीर, प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती,श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर , १९७०

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी शाहू महाराज यांचे सत्यशोधक समाजातील योगदान

**डॉ. राजश्री दिलीप निकम**
कृष्णा महाविद्यालयाल रेठरे बुद्रुक ता. कराड जि.सातारा
Email- rdnikam73@gmail.com

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजात सर्वांगीण समता,स्वातंत्र्य बंधुत्व प्रत्यक्ष कार्यवाहीत व्हावे म्हणून अनेक महापुरुषांनी आपले सर्वस्व पणाला लावले.या मध्ये महात्मा जोतिबा फुले,डॉ बाबासाहेब आंबेडकर,शाहू महाराज यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.आधुनिक काळात जोतिबा फुले यांनी सत्यशोधकी साहित्य निर्माण केले. इ.स.१८५१ मध्ये‘ भट भिक्षुकांना सवाल’ हे आठ पानी पुस्तक प्रसिद्ध केले. २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सुमारे साठ प्रमुख मंडळी उपस्थित झाली व तेथे ‘सत्यशोधक समाज' नाव निश्चित केले.सत्याचा शोध घेणे, सार्वजनिक सत्याचा शोध होय. प्रस्तुत शोध निबंधात शाहू महाराज यांचे सत्यशोधक समाजातील योगदान थोडक्यात अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

**उदिष्टये:-**

१) सत्यशोधक समाजाचा पूर्व इतिहास अभ्यासणे.
२) राजर्षो शाहूमहाराजांचे सत्यशोधक समाजातील योगदान अभ्यासणे
३) शाहूमहाराजांच्या सहकार्याचे सत्यशोधक समाजातील कार्य अभ्यासणे

**सत्यशोधक चळवळीचा पूर्व इतिहास:-**

२४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करून तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणेहे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाजाचचे पहिले अध्यक्ष आणि खजिनदार महात्मा फुले होते त्यामध्ये त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंचे सहकार्य लाभले. अत्याचारातून व गुलामगिरीतून बहूजनांची मुक्तता करणे .त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे. हे सत्यशोधक समाजाचे कार्य होते. सर्वसाक्षी जगत्पती | त्याला नकोच मध्यस्थी | हे या समाजाचे घोषवाक्य होते.

**सत्यशोधक समाज :**

१) सर्व मनुष्य एकाच ईश्वराची लेकर आहेत व तो सर्वांचा मायबाप आहे
२) आईला विनविणयास किंवा बापाला संतुष्ट करणयास लेकराला जशी मध्यस्थी ची गरज नसते तसेच भक्तांना ईश्वराची ओळख करून देण्यासाठी व प्रसन्न करून घेण्यासाठी धर्मगुरू असल्या मध्यस्थीची जरुरी नाही.
३) हे तत्त्वज्यांन मान्य आहे तो सत्यशोधक समाजीयन होय.

**सत्यशोधक चळवळीतील प्रवेश :**

सत्यशोधक समाजाचा प्रवेश निश्चित केला.या समाजात प्रवेश घेणा-या सभास दवारकरी परंपरेत वाढलेले होते.”सर्व मनुष्य एकाच ईश्वराची लेकर आहेत त्यांचे व माझे बंधुतवाचे नाते आहे. हे जाणून वागण्याचा मी नित्य प्रयत्न करीन. देवाची भक्ती उपासना वगैर करताना तसेच धर्मविधी करताना मी कोणाही मध्यस्थीची जरुरी ठेवणार नाही.मी स्वता शिकून मुला मुलींना विद्या शिकवल्याशिवाय राहणार नाही. अशी प्रतिज्ञा घेत शोषणाला आणि अन्यायाला विरोध मानवी हक्कांची शिकवण आणि मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून बहूजनांची मुक्तता ही सत्यशोधक समाजाची त्रिसूत्री होय.

**शाहू महाराजांचे सत्यशोधक चळवळीतील योगदान –**

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कोल्हापूर नगरीत शाहूमहाराजांनी राजकीय,सामाजिक, शैक्षणिक जीवनात दैदिप्यमान कामगिरी करून बहुजन समाजात जागृती निर्माण केली. महात्मा जोतिबा फुले यांच्या अखेरच्या पर्वात

सत्यशोधक समाज अस्तंगत होण्याच्या मार्गावर होता. याच दरम्यान वेदोक्त प्रकरण निर्माण झाले. महाराजांनी सत्यशोधक चळवळीला पाठिंबा दिला. भास्करराव जाधव, लठ्ठे, डोंगरे, यांनी प्रचार दौरे काढून सत्यशोधक समाजाचा प्रचार केला. १९११ मध्ये शाहूमहाराजांनी वृषाली प्रकाशन कोल्हापूर २००६ सत्यशोधक समाजास राजाश्रय देवून त्यांचे कार्य जोमाने पुढे चालू ठेवले.त्यामुळे ब्राह्मणेतर वर्गामध्ये नवचैतन्य, नवजागरण ,नवजाणीव. व नवचरित्रची एक लाट निर्माण झाली.धनंजय कीर सत्यशोधक समाजाच्या कार्याचे मूल्यमापन करताना म्हणतात "सतयशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरी विरुध्द आवाज उठविला आणि सामाजिक न्यायासाठी सामाजिक पुनरघटनेची मागणी केली.राजर्षोनी या सत्यशोधकसमाजाचे सूत्र पकडले.ते वेदोक्त प्रकरणाच्या निमित्ताने जोतिराव फुले यांच्या सामाजिक समतेचे ध्येय आणि यातून आम रयतेच्या उद्धाराचा विचार महाराजांना आकर्षित करत होता.[१]

शाहूमहाराजांच्या सत्यशोधक समाजातील कार्याबद्दल स.मा. गर्गे सांगतात शाहू महाराजांच्या सामाजिक व धार्मिक विचारांची बैठक सत्यशोधक समाजाच्या विचारांपासून तयार झालेली होती. सत्यशोधक समाजाचे प्रमुख नेते आणि शाहूमहाराजांचे सहकारी भास्करराव जाधव यांनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेबदल माहीती दिली.त्यानुसार कोल्हापूरात परशुराम इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली सभा होवून ११ जानेवारी १९११ रोजी प्रत्यक्ष सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यावेळी अध्यक्ष भास्करराव जाधवव उपाध्यक्ष दिवाणबहादूर लठ्ठे यांची नेमणूक करण्यात आली. सेक्रेटरी हरिभाऊ चव्हाण होते. समाजाचे काम पूर्णवेळ करणेसाठी शाहू महाराजांनी विठ्ठल पिराजी ढोणे यांची नेमणूक केली.[२]

**शाहू महाराजानी सत्यशोधक समाजाला केलेले साह्य :-**

शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाला प्रेरणा दिली. सत्यशोधक समाजाची तत्वे आपणास मान्य आहेत हे सांगून आपल्या भाषणातून, खाजगी संभाषणातून महात्मा फुले यांच्याविषयी आदर व्यक्त केला. वि.भ. कोलते आणि चव्हाण यांनी महात्मा फुलेयांची सत्यशोधक चळवळ मोठ्या जिद्दीने पुढे नेली. बाबूराव यादव यांना सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी दोन महिने रजा मंजूर केली. १५ आॅगष्ट १९२० रोजी सत्यशोधक समाजासाठी १५०० रू. देणगी भास्करराव जाधव यांचेकडे द्यावी असा आदेश काढला. तसेच शाहीर लहरी हैदर आणि त्यांचे शिष्य सत्यशोधक समाजाचे भजणे म्हणत म्हणून त्यांना इमारत बांधणेसाठी मोफत जागा दिली. भास्करराव जवळकर यांना तरुण मराठा जयभवानी तलवार ही पत्रके काढण्यास मदत केली.[३]

१९१३ मध्ये कोल्हापूरातील सत्यशोधक समाजाकडून ५१६३ धार्मिक कार्य पार पाडण्यात आली. होम, विवाह, वास्तूशांती, पूजाअर्चा इ. द्वारें ब्राह्मण, भक्तीचा वापर न करता हे विधी सत्यशोधक पध्दतीने करण्यात आले. सत्यशोधक समाजाचे काम पार पाडणे साठी शाहूंनी पुरोहित शाळेसाठी महिना ४० रु. मदत सुरू केली. तसेच समाजाला इमारत लवकर बांधली जावी म्हणून गंगावेशीत सत्यशोधक समाजाला मोफत जागा दिली. ढोणे गुरूजी व हरिभाऊ चव्हाण यांच्या चिकाटीमुळे लवकरच कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची नवी इमारत तयार झाली.त्यात धार्मिक विधी चे प्रशिक्षण,देणगी,शाळा,मोफत ग्रंथालय आणि आठवड्यांची व्याख्यानमाला हे कार्यक्रम सूरू झाले.समाजाच्या स्थापनेपासून सहा महिन्यांच्या आत या समाजाचे कार्य कुरूंदवाड, सातारा, ठाणे या भागात पोचले.[४]

**सत्यशोधक शाळा :-**

धनंजय कीर यांच्या मतानुसार भारतात सामाजिक पुर्णघटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. धनगर समाजातील विठ्ठल ढोणे यांची शिक्षक म्हणून नेमणूक केली. १९१३ साली सत्यशोधक शाळा स्थापन केली. त्यात महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवून सामाजिक समता प्रस्थापित करून परंपरागत रूढी बंधनातून मानवास मुक्त करणे हा या शाळेचा मूलमंत्र होता.

**शाहू छत्रपती आणि क्षात्रजगदगुरूपीठ :-** १९२० रोजी गारगोटी जवळील पाटगाव येथील मौनी महाराजयांच्या गादीवर सदाशिवराव लक्ष्मण पाटील या संस्कृत व तत्वज्ञान विषयाचा विद्यार्थी असलेल्या तरूणांची 'क्षात्रजगदगुरू' म्हणून नेमणूक केली. ते सत्यशोधक विचारांचे होते. अशी खंडेराव बागल यांची नोंद आहे.[५]

**Satya Shodhak Jaladas** :-

Satya Shodhak used Jaladas as their medium of preaching Satya Shodhak Jalasa were different from Tamashas. The teaching of Bhagawat Dharm are carried through this public concert was not to entertain but to awaken the masses [6]

On 27/1/1921 Shahu Maharaj granted a free place at Budhawar peth to Satya Shodhak Bhajano Mandal for practing hymns.

वरील विवेचना वरून असे निदर्शनास येते की महात्मा फुले यांच्या माध्यमातून सत्यशोधक समाजाने समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवले. त्यांच्या अखेरच्या पर्वात शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीला पाठिंबा दिला. भास्करराव जाधव, लठ्ठे, डोंगरे यांनी प्रचार दौरे काढून सत्यशोधक समाजाचा प्रचार केला. ब्राह्मणेतर समाजात नवचैतन्य, नवजाणीव निर्माण केली. त्यांच्या कार्याबद्दल काही शंका उपस्थित झाल्या असल्या तरी शाहू महाराजांच्या सामाजिक व राजकीय विचारांची बैठक सत्यशोधक समाजाच्या विचारां पासून तयार झालेली होती. त्यांच्या सहकार्यातून, योगदानातून सत्यशोधक समाजाचे कार्य समाजातील प्रत्येक व्यक्ती पर्यंत पोहचले हे याचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.

**संदर्भ**

1. साळूंखे नानासाहेब– शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २००६, पान नंबर -१९१.
2. जाधव रमेश– राजर्षी शाहू गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवाल मुंबई, २०१६ पान नंबर -९०४.
3. जाधव रमेश – उपरोक्त, पान नंबर ९०५.
4. जाधव रमेश – लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, १९९७, पान नंबर १९२.
5. भगत रा.तु– राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षणकार्य ,सिध्दराज प्रकाशन पुणे, २००३, पान नंबर १९८
6. Khane B D.- Rajashri Shahu Chhatrapati of Kolhapur,Bharti Mudranalay Kolhapur,2021,p.No. 240.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# सामाजिक क्रांतीचे जनक राजर्षी शाहू महाराजांचे कोल्हापूर संस्थानातील सामाजिक व शैक्षणिक योगदान

**संदीप बळवंत गुरव**
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
Email- armysandip01@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतात ब्रिटिश काळात 563 संस्थानापैकी शाहू महाराजांचे एक संस्थानिक होते. महाराजांनी सामाजिक सुधारणांचे सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांचे महत्वाचे कार्य म्हणजे वंशपरंपरागत चालत आलेली जाती व्यवस्था मोडकळीत काढणे आणि दलितांच्या उत्थनासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे, त्यांच्या सुधारणावादी प्रयत्नांमुळे महात्मा फुले व विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नांना पाठबळ मिळून महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळ अधिक बळकट व प्रभावी झाली. कोल्हापूर संस्थानातील हया जननायकाचा जन्म कागलच्या घाटगे घराण्यात 26 जुन 1874 रोजी झाला. कोल्हापूर संस्थानामधील राजा शिवाजी चतुर्थ यांची विधवा राणी आनंदीबाई यांनी दत्तक घेवून राज्यकारभाराची व शिक्षणाची योग्य ती माहिती झाल्यानंतर 1894 मध्ये शाहू महाराज संस्थानाच्या सिंहासनावर रुढ झाले. शाहू महाराजांनी समाजातील स्त्रीया, दलीत, मागासलेल्या वर्गासाठी जे कार्य केले ते उल्लेखनीय असे आहे. स्वतः अस्पृष्यांबरोबर बसुन जेवण करुन समाजासमोर समाजासमोर नवा आदर्श मांडला. त्यांना समाजातील भेदाभेद जातीव्यवस्था, असमानता नष्ट करायची होती.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1.लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवन परिचयाचा अभ्यास करणे.

2.लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

3.लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

**राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा आढावा:**

भारत कृषिप्रधान देश आहे त्याचप्रमाणे शाहू महाराजांचे कोल्हापूर संस्थान हे देखील शेतीप्रधानच होते. शेतीबरोबर इतर व्यवसाय करुन लोक आपली जीवनचर्या चालवत असत. सर्व गोष्टी या पावसावरती अवलंबून होत्या. कमी किंवा जास्त पाउस झाल्याने संस्थानातील प्रजेला नेहमीच नुकसानाला सामोरे जावे लागत होते. अनिश्चित पावसामुळे दुष्काळाचे सावट राज्यात सतत असल्यामुळे राज्यातील जनतेची हालअपेष्टा थांबवण्यासाठी महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये शेती व पिण्याच्या पाण्यासाठी तलावे, कालवे व धरणांची निर्मिती केली. महाराणी लक्ष्मीबाई तलाव तथा धरणप्रकल्प व कालव्याच्या रुढ पध्दती, नव्या योजना स्विकारुन रयतेची पाणीटंचाई दूर केली. शेतमालाला बाजारपेठ मिळवून देवून प्रजेच्या हिताचे काम केले. तसेच रोजगार निर्मितीसाठी ‘शाहू मिल’ या नावाने भारतातील सहकार क्षेत्रात पहिला उद्योग व पहिली कापड गिरणी स्थापना केली. शाहू महाराजांनी समाजातील स्पृश्य, अस्पृश्य व बाम्हण समाजातील लोकांसाठी अत्यंत महत्वाचे काम केले. वेदोक्त प्रकरणाच्या वादा दरम्यान शाहू महाराजांनी मराठयांचे हक्क अबाधीत ठेवले. समाजातील जाती व्यवस्था उखडून टाकण्यासाठी ते सदैव प्रयत्नशील राहीले. आयुष्याच्या शेवटी त्यांनी ही जाती व्यवस्था नष्ट झाली तर बरं होईल असे म्हटले आहे. संपूर्ण प्रगतीला आळा घालण्यासाठी जाती व्यवस्था ही महत्वाची धोंड आहे. जाती व्यवस्थेचा पुरस्कार हा एक सामाजिक अपराध आहे असे ते म्हणत होते. त्यासाठी त्यांनी नोकऱ्यांमध्ये अस्पृश्यांना प्राधान्य देण्यात आले. तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये तलाठी हे नवीन पद निर्माण केले. विधवा पुनर्विवाहास मान्यता देण्यासाठी कायदा संमत केला. तसेच आंतरजातीय विवाह कायदा रुढ केला.

**राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा:**

सर्वांगीण सुधारणा होण्याची असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे शाहू महाराजांनी जाणून प्राथमिक, आणि उच्च माध्यमिक अनेक शिक्षण संस्था सुरु केल्या. कोल्हापूरमध्ये अनेक वसतीगृहे स्थापन केली. आपल्या संस्थानातील मुलांना इतर शहरामध्ये व परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी पाठविले होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्यांना फी माफ करुन त्यांच्या सर्वतोपरी शिक्षणाचा खर्च महाराजांनी केला होता. तसेच शिक्षणासाठी व परिक्षांसाठी बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराजांनी राहण्याची व भोजनाची उत्तम व मोफत व्यवस्था केली होती. सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी

महाराजांनी 20 वसतीगृहे (बोर्डींग) स्थापन केल्या होत्या. त्याच बरोबर कोल्हापूर बाहेरील वसतीगृहांना सढळ हाताने मदत केली होती.

शाहू महाराजांच्या मते हिंदू धर्मातील असमानता दूर करण्यासाठी शिक्षणा शिवाय पर्याय नाही. त्याकरिता त्यांनी संस्थानातील व शिक्षणाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची, राहण्याची मोफत सुविधा उपलब्ध केली होती. 1910 व 11 मध्ये शाहू महाराजांनी मुलांना मुंबई, पुणे व अन्य काही ठिकाणी उच्च शिक्षणासाठी पाठविले होते. कोल्हापूर हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे प्रेरणादायी शैक्षणिक केंद्र बनले होते. विविध विषयांच्या विशिष्ट अभ्यासाठी देशात व परदेशात विद्यार्थी पाठविण्याची व त्यांना सहायता करण्याचा शाहू महाराजांचा जीवनक्रमाचा एक भागच बनला होता. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर व शंकर बाळाजी ढवळे अस्पृश्य व ब्राम्हण विद्यार्थ्यांसाठी शाहू महाराजांच्याकडे सर्वांठायी शिक्षणाप्रती एकच समभाव होता. धर्मविचार प्रदूषणामुळे स्त्रीया व शुद्र लोक शिक्षणापासून वंचीत झाली होती, एवढेच नव्हे तर शिक्षण घेणे हे आपले काम नाही अशी त्यांची मनोधारणा झाली होती. त्यात त्यांचा दारिद्रयाने पिछाडलेली होती. आर्थिक हालाखीतील लोकांच्या मुलांना माफक फी केल्याशिवाय शिक्षणप्रसार होवू शकणार नाही हे शाहू महाराजांनी ओळखून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्यांसाठी माफक फी करण्याचे पाउल उचलून दि.20 मे 1911 रोजी तसा आदेश पारित केला. शाळांवर नजर ठेवण्यासाठी शाळा पंच नेमण्याची रुढ परंपरा कोल्हापूर संस्थानामध्ये सुरु केली. तसेच वतनी शिक्षण योजना सुरु करुन शिक्षणप्रसार जलदगतीने व्हावा यासाठी सदैव प्रयत्न केला. मानवी जीवनात चैतन्य निर्माण करण्यासाठी संजीवनी म्हणजे शिक्षणाची ही शक्ती ओळखून मोफत व सक्तीचे शिक्षण सुरु करण्याचा चंग बांधला व मुंबई सरकार कडून या योजनेस मान्यता मिळवली. मोफत शिक्षणासाठी शाहू महाराजांनी स्वतंत्र खात्याची निर्मिती केली. या मोहिमेचा प्रारंभ गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर 30 सप्टेंबर 1917 रोजी होईल असा आदेश पारित केला. मुंबई विद्यापीठातून मॅट्रीक परीक्षेचे केंद्र कोल्हापूरात प्रयोगादाखल शाहू महाराजांनी घेतले. तसेच परीक्षेला येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था महाराजांनी केली. स्त्रीशिक्षणासाठी शाहू महाराजांनी राजमार्ग घालून देण्याचे महत्तम कार्य केले. शिक्षण हाच रयतेच्या जीवनातील बदलाचा मार्ग आहे याची जाणीव त्यांना होती. त्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.

सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी शाहू बोर्डींगची स्थापना केली ती पुढीलप्रमाणे:

1.व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (18 एप्रिल, 1901)

2.दिगंबर जैन बोर्डिंग ( एप्रिल, 1901)

3.वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतीगृह (1906)

4.मुस्लीम बोर्डिंग

5.मिस क्लर्क होस्टेल

6.दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (24 डिसेंबर 1908)

7.श्री नामदेव बोर्डिंग (2 एप्रील 1911)

8.पांचाल ब्राम्हण वसतीगृह (1912)

9.श्रीमती सरस्वती गौड सारस्वत ब्राम्हण वसतीगृह (20 मे 1915)

10.इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल (7 जून 1915)

11.रावबहाद्दूर सबनीस प्रभू बोर्डिंग (सप्टेंबर 1915)

12.आर्य समाज गुरुकूल (18 मार्च 1918)

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात जवळपास 20 बोर्डिंग काढल्या व त्याच बरोबर कोल्हापूर बाहेरील पुणे, अहमदनगर, नाशिक व नागपूर येथील वसतीगृहांना सढळ हाताने मदत केली.

**संदर्भ ग्रंथ:**

1.कृ.गो. सूर्यवंशी,'' राजर्षी शाहू राजा व माणूस'' 1984 पृ.1 ते 10

2.डॉ.जयसिंगराव पवार, ''राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ'' 2001 पृ.17,26,71

3.य.दि.फडके, ''शाहू छत्रपती आणि लोकमान्य'' आवृत्ती 3, 2000 पृ.10 ते 30

4.आमदार पी.बी.साळुंखे, ''राजर्षी शाहू गौरव ग्रंथ''कोल्हापूर आवृत्ती 3, 2016 पृ.54 ते 60

5.धनंजय कीर, ‘‘राजर्षी शाहू एक सामाजिक क्रांतीकारक राजा’’ 2011 पृ.86,110

6.करवीर सरकारचे गॅझेट , 18 एप्रिल, 1894, पृ.72

7.करवीर सरकारचे गॅझेट, 28 मार्च, 1896, पृ.54

8.अॅड.पी.बी.साळुंखे, ‘‘वेदोक्त प्रकरण’’

9.विकीपिडीया, ‘‘कोल्हापूर संस्थान’’

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# दूरदृष्टीचे लोकनेते राजश्री शाहू महाराज

**राजेंद्र भिकू महानवर**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
Email- raj7644@gmail.com

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात आणि अर्थकारणात अनेक महापुरुषांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने ठसा उमटविला आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून ते नरेंद्र दाभोळकर यांच्यापर्यंत एक अखंड मालिकाच सांगता येईल. या सर्व महापुरुषांनी केलेल्या कार्याच्या प्रभावाने अनेक पिढ्यांना सन्मानाने, स्वाभिमानाने जगण्याचे बळ मिळाले आहे. म्हणून त्यांचे कार्यकर्तृत्व अजून ही मार्गदर्शक ठरते आहे. त्यांच्या विचारांच्या प्रेरणेने, अनुकरणाने महाराष्ट्रीय समाजाचा उद्धार होऊ शकतो हे वास्तव ठरले आहे. या महापुरुषांनी व्यवस्थापरिवर्तन हे आपल्या चळवळीचे उद्दिष्ट ठरवून आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले आहे. केवळ व्यवस्थापरावर्तित केली नाही तर एक वेगळीच व्यवस्था त्यांनी निर्माण केली आहे. उदा. छत्रपती शिवरायांनी बहुजन समाजातील मावळयांना एकत्रित करून तात्कालीन जुलमी व्यवस्थेला हादरा देत स्वबळावर स्वराज्य स्थापन केले. कार्यकर्तुत्वाने शौर्याच्या बळावएक सामान्य सरदाराचाही मुलगा एक राजा होऊ शकतो हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. जोतिराव फुले यांनी बहुजनांच्या दारिद्र्याचे मूळ कारण अविद्यत आहे. अविद्याने त्यांची पूर्ण वाताहात केली आहे हे सत्यशोधन केले व या समाजाला विद्या प्राप्त करून देण्यासाठी सावित्रीबाई फुले सोबत शिक्षणाची चळवळ उभी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व कर्तुत्वान महापुरुषांच्या स्वातंत्र्य, समता व बंधुता विचारांना भारतीय राज्यघटनेत मूर्त स्वरूप देऊन त्यांना भारतीयांच्या दैनंदिन जीवनातील मूल्य म्हणून प्रस्थापित केले. अशा अनेक महापुरुषांच्या कार्यकर्तुत्वाने महाराष्ट्राची भूमी पावन झाली आहे. त्यापैकीच एक म्हणजे छत्रपती राजश्री शाहू महाराज हे होय.

राजश्री शाहू महाराज हे महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मधील एक महत्त्वाची कडी आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती महाराष्ट्रीय समाजाला असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण काळाच्या ओघात खरे उद्धारकर्ते कोण याचा बहुजन समाजाला विसर पडला आहे. ज्यांनी पूर्वी पासून गुलाम बनविले त्यांचाच उदो उदो करणाऱ्यांना या महापुरुषांचा विसर पडणे सुरू झाले आहे. या महापुरुषांच्या विचारला आणि कृतीला विसरणे म्हणजे पुन्हा गुलामगिरीकडे वाटचाल करणे हे निश्चित आहे.

भारतामध्ये प्रजासत्ताक शासन येण्यापूर्वी हजारो राज्यकर्ते होऊन गेले पण त्यातील सम्राट अशोक, अकबर बादशहा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रमाणे इतिहास घडवणारे जे फार थोडे राजे होऊन गेले त्याच्यातीलच एक महत्त्वाचे राजे म्हणून छत्रपती शाहू महाराजांची नोंद घ्यावी लागेल. यांनी एक राजा असूनही समता, स्वातंत्र्य व बंधुता या लोकशाहीतील आधुनिक मूल्यांवर प्रेम दाखवून ती प्रत्यक्षात आपल्या संस्थानात राबवली. म्हणूनच प्रसिद्ध इतिहास संशोधक बॅरिस्टर आप्पासो पवार यांनी छत्रपती शाहूंना 'भारतीय राज्यघटनेचे संकल्पक' म्हटले आहे. राजा असूनही सामाजिक क्रांती करणाऱ्या या महापुरुषांनी जुन्या रुढी- -परंपरा, मनुवादी नीती नियम झुगारून दिले. त्यांचे संस्थान क्षेत्रफळाच्या दृष्टीने फार मोठे होते असेही नाही. त्यांनी अनेक लढाया जिंकल्या असेही नाही. त्यांच्याजवळ डोळे दिपवणारी संपत्ती होती असेही नाही. तरीही हे सर्व तात्कालीन राज्यांमध्ये श्रेष्ठ ठरले. कारण यांनीही प्राचीन काळातील राजा सिद्धार्थ गौतम यांच्या प्रमाणे मोह-माया, राज्याचा त्याग करून बुद्ध होऊन महामानव झाले त्याप्रमाणे शाहू महाराज यांनीही राजवैभवचा त्याग करून मराठ्यांचे छत्रपती हे ही राजश्री झाले. राजा असूनही जे व्यक्ती राजेपणा विसरून गरीब शेतकऱ्यांची कांदा - भाकरी खाते, त्यांच्या मांडीला-मांडी लावून जेवते, त्यांच्या गाडग्या-मडक्यातील दही-ताक पिते, राज विलाशी जीवन दूर सारून ऋषिमुनीला ही लाजवेल असे सात्विक, कर्मनिष्ठ आचरण करून जीवन जगले असे व्यक्तिमत्त्व म्हणजे राजश्री शाहू महाराज.

राजश्री शाहू महाराजांनी अस्पृश्य उद्धार, शिक्षण, आरक्षण, शेती, उद्योग, कला, संस्कृती, धर्मसुधारणा प्रशासन, मल्लविद्या, नाटक, चित्रपट, जातीभेद निर्मूलन या सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केली. त्यातील त्यांनी अवलंबलेले मार्ग आजही राज्याला दिशादर्शक ठरत आहेत.

छत्रपती शाहू महाराजांच्या गादीवर बसण्यापूर्वीची शिक्षणाची व्यवस्था पाहिली तर शिक्षण ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी असल्याचे दिसून येते. इंग्रजांच्या शिक्षण विषयक उदार धोरणाने पाश्चात्य शिक्षणाची गंगा

महाराष्ट्रात वाहू लागली. तरीपण याचे पाणी विशिष्ट वर्गालाच मिळत होते. तात्कालीन मुंबई प्रांतामध्येच संपूर्ण हिंदुस्थातात ब्राह्मण, पारशी, प्रभू, शेणवी इत्यादी वर्ग त्याचे पाणी चाकत होता. शिक्षण क्षेत्रात हेच पुढे होते. उदा. मुंबई प्रांतामध्ये 'एल्फिन्स्टंट इन्स्टिट्यूट मध्ये १८२७ ते १८४८ या काळात अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या १५२ विद्यार्थ्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणे होती. ७१ प्रभू, २८ पारशी, १६ ब्राह्मण, १६ सारस्वत ब्राह्मण आणि २५ इतर जातीचे. मुंबई शहर सोडून पुणे, कोल्हापूर, नागपूर यासारख्या प्रमुख भागांमध्येही हाच वर्ग अग्रेसर राहिला होता. ब्राह्मणांशिवाय समाजातील दुसरा वर्ग म्हणजे मराठा. या वर्गात ढोबळमनाने राजे, राजवाडे, जहागीरदार, इनामदार, देशमुख, वतनदार आणि यांच्या संख्येने अल्प असा जो वरचा थर होता तो सोडल्यास बहुसंख्य मराठा समाज शेती करणाऱ्या रयत अथवा कुणबी वर्गात मोडत होता. एकोणिसाव्या शतकात मराठ्यात फक्त वरच्या वर्गातील म्हणजेच सरदार अधिकाऱ्यातील लोक लिहिण्या-वाचण्यापुरतेच शिकत होते. एकूणच शिक्षण हे आपले कार्यक्षेत्र नव्हे. ते ब्राह्मणांचे काम आहे अशी या वर्गाची धारणा होती. मराठा समाजातील वरच्या पातळीवरील लोकांची ही कथा तर सामान्य जनतेमध्ये शिक्षणाचा साधा स्पर्शही झाला नव्हता. अशा प्रकारे स्वतःला क्षेत्रीय समजावून घेणाऱ्या मराठा जातीची ही अवस्था होती. अशा परिस्थितीत मराठ्यांशिवाय समाजात असणाऱ्या इतर अठरापगड जाती, शूद्र, अति शूद्र समाज आणि अखिल स्त्री वर्ग शिक्षणापासून वंचित राहिला होता. 'ब्राह्मणांच्या घरी लेहणं, कुणब्या घरी दाणं आणि महाराजांच्या घरी गाणं' ही तात्कालीन समाजात रूढ असलेली म्हण समाजाचे वास्तव दर्शन घडवणारी होती.

शैक्षणिक अधिकार नाकारलेला वर्ग प्रशासनात नसणे त्याकाळी स्वभाविकच होते. शाहू महाराजांच्या राज्यरोहणाच्या वर्षी (इ.स.१८९४) कोल्हापूर दरबाराच्या ७१ अधिकाऱ्यांपैकी ६० ब्राह्मण व ११ इतर समाजातील होते. इतर समाजामध्येही ख्रिश्चन, पारशी, प्रभू ही मंडळी होते. म्हणजेच ज्यांचे हे राज्य समजले जात होते त्या मराठ्यांना प्रशासनात काही स्थान नव्हते. ही सामाजिक विषमता व त्यामधील कारणमिमांसा जाणून राजश्री शाहू महाराजांनी बहुजनांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. देशातील प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे ते पहिले राजे ठरले.

छत्रपती शिवाजी महाराजांना शूद्र ठरवून राज्याभिषेकास विरोध करणाऱ्या, महात्मा ज्योतिराव फुलेंना मित्राच्या लग्नात-वरातीतून शूद्र आहेत म्हणून बाहेर काढणाऱ्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य म्हणून वर्गाबाहेर बसविणाऱ्या धर्माच्या ठेकेदारांनी शाहू महाराजांनीही छळले होते. वेदोक्त प्रकरण हे सर्वश्रुत आहे. कार्तिक स्नानासाठी महाराज पंचगंगा नदीवर पहाटे जात. नोव्हेंबर १८९९ च्या महिन्यात एके दिवशी बंधू बापूसाहेब महाराज, मेहुणे मामासाहेब खानविलकर आणि मुंबईचे समाजसुधारक राजारामशास्त्री भागवत यांच्यासोबत स्नानासाठी गेले असता स्नानाच्या वेळी मंत्र म्हणणारा नारायणशास्त्री भटजी होता. तो पुरणोक्त मंत्र म्हणत असल्याचे राजाराम शास्त्री भागवत यांच्या लक्षात आले. त्यांनी महाराजांना ही गोष्ट सांगितली. त्याविषयी महाराजांनी त्यास विचारले तेव्हा तो म्हणाला "वेदोक्त रीतीने मंत्र म्हणताना अंघोळ करणे आवश्यक असते, तुम्ही शूद्र असल्यामुळे वेदोक्तचा तुम्हाला अधिकार नाही". छत्रपती शाहूंना या वाक्यांनी हादरा बसला. त्यांनी त्याला नोकरीवरून काढले. परिणामी दरबारातील ब्राह्मण मंडळी संतापली. त्यांनी शाहू महाराजांबरोबर असहकार पुकारला. शाहू महाराजांनीही नमते न घेता त्यांची वतने रद्द केली. लोकमान्य टिळकांनी छत्रपती शाहू महाराजांच्या विरोधात केसरी मधून लेख लिहिला. वेदोक्तचा आग्रह न सोडल्यास इंग्रज सरकारकडे तक्रार करू अशी धमकी दिली.

शाहू महाराजांच्या या विषमतेच्या स्व अनुभवातील एक आठवण बॅरिस्टर शामराव केळकर यांना सांगितली होती. महाराज म्हणतात "मी एकदा सातारला गेलो होतो. जेवण आम्हा मंडळीसाठीच चाललं होतं. सोळेकरी ब्राह्मणच होते. जेवणाची वेळ झाली होती. मी स्नान करून जेवण कुठपर्यंत आले हे पाहण्याकरता हिंडू लागलो. बरेचसे हंडे शिजत होते. त्यामध्ये अंतर बरेच होते. एक उघडा बंब सोवळेकरी हातावर मांजर घेऊन हिंडत होता. त्याने मला पाहिलं आणि म्हणाला इकडून हिंडता येणार नाही. आपली शिवाशिव झाली म्हणजे साराच घोटाळा उडून जाईल, हे शब्द कानावर पडतात माझे काळीज कापल्यासारखं झालं. त्या मांजरापेक्षाही मी खालच्या दर्जाचा असाच प्रश्न मी स्वतःला विचारू लागलो. मी छत्रपती असूनही जिथे माझ्या असा अपमान तिथे अस्पृश्यांना किती होत असेल". अशा अनुभवातूनच महाराज आपल्या वाटचालीचे धडे घेत होते. सामाजिक गुलामगिरीवर डजनभर ग्रंथ वाचूनही जे आत्मज्ञान मिळू शकत नाही ते अशा शुल्लक भासणाऱ्या, स्व अनुभवातून क्षणार्धात प्राप्त होते आणि म्हणूनच महाराजांनी या स्व अनुभवाला आपलं गुरु मानले. अशा प्रकारच्या गुलामगिरीला झुगारून देण्याची ताकद बहुजन समाजात निर्माण होण्यासाठी त्यांनी शैक्षणिक चळवळीवर लक्ष केंद्रित केले. शिक्षणाशिवाय समाज दुबळा ठरतो. सुसंस्कृत व सुजान माणसांचा समाज बनवण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. योग्य वयातच शिक्षणाची योग्य व्यवस्था झाली पाहिजे या जाणवेतून त्यांनी सप्टेंबर १९९७ रोजी सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा

जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यानुसार ३० सप्टेंबर १९१९ रोजी अंमलबजावणी सुरू झाली. १५जानेवारी १९१९ रोजी प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयात अस्पृश्य मुलांना इतर मुलांसारखेच समानतेची वागणूक द्यावी म्हणून शिक्षण खात्याला त्यांनी आज्ञा केली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारा कायदा त्यांनी अमलात आणला. देशाला जिथे २०१० सालापर्यंत वाट पाहू लागली तिथं राजश्री शाहू महाराज यांनी हा कायदा शंभर वर्षांपूर्वीच अमलात आणला. म्हणजेच शाहू महाराज हे किती काळाच्या पुढे होते हे स्पष्ट होते. शाळेत मुलांना न पाठवणाऱ्या पालकांना एक रुपये दंडाची तरतूद हे त्यांच्या कायद्याचे वेगळेपण होते. महात्मा फुलेंनी मेकॉले चा झिरपण्याचा सिद्धांत नाकारून शिक्षण खालून वर गेले पाहिजे हा सिद्धांत मांडून प्राथमिक शिक्षण मोफत व शक्तीचे असावे असा आग्रह धरला होता. या तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन शाहूंनी शिक्षणाला आपल्या राज्यात त्याचप्रकारचा अग्रक्रम दिला. त्यावेळी महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व सिंध या भूभागाला मुंबई प्रांत संबोधले जात असे. या भागावर शिक्षणासाठी सरकारने जेवढी तरतूद केली होती त्यापेक्षा जास्त म्हणजे एक लाख रुपये केवळ कोल्हापूर संस्थानाच्या शिक्षणासाठी राजश्री शाहूंनी मंजूर केली होती.

मंदिर, मस्जिद चे उत्पन्न देखील शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राच्या कामी आले पाहिजे असा केवळ आग्रह न धरता त्यांनी तो विचार कृतीत आणला होता. इ.स.१९०६ साली स्वतः पुढाकार घेऊन मुस्लिमातील प्रतिष्ठित मंडळींना सोबत घेऊन 'मोहमेडन एज्युकेशन सोसायटी' त्यांनी कोल्हापूर संस्थानात स्थापन केली. मुस्लिम बोर्डिंग सुरू केले व संस्थानातील मुस्लिम देवस्थानाचे उत्पन्न या बोर्डिंग संस्थेला जोडले. त्यांच्या एका हुकमा नुसार कसबा, रुकडी, फेटा हातकणंगले येथील हजरत पीर दर्ग्याचे देखभाली साठी पाचशे रुपये ठेवून बाकीची सर्व रक्कम मोहमेडन एज्युकेशन सोसायटीला पाठवण्याचे मंजूर केले. कोल्हापूर मधील निहाल मज्जिद, गोडपीर, बाबूजमाल व बारा इमाम या देवस्थानाचे उत्पन्नही मुस्लिम बोर्डिंगला देण्यात आले. पंढरपूरच्या धार्मिक अन्नछत्रावर बंदी आणून बडव्यांच्या शोषक वृत्तीला लगाम लावला व अन्नछत्राचा पैसा ते शिक्षण कार्यासाठी देऊ लागले. हे त्यांचे सर्व कार्य योग्यपरिवर्तन करीत होते असे म्हणावे लागेल.

प्रशासनात सर्व जाती-जमातींना सहभागी करून घेता यावे असे छत्रपती शाहूंना वाटे पण शिक्षणाच्या अभावाने प्रशासनात जाणे बहुजन समाजाला शक्य नव्हते. शहरात जाऊन शिक्षण घेण्याची त्यांची कुवत ही नव्हती. अशा विद्यार्थ्यांसाठी इ.स.१९८६ मध्ये राजश्री शाहू महाराजांनी कोल्हापुरात वस्तीग्रह काढले. विद्यार्थ्यांच्या राहण्याची, जेवणाची मोफत सोय केली. वस्तीग्रहाच्या ब्राह्मण व्यवस्थापकांनी मात्र बहुजन विद्यार्थ्यांना त्रास दिल्याने ते एकेक करून पळून जाऊ लागले व फक्त ब्राह्मण विद्यार्थीच वस्तीगृहात शिल्लक राहू लागले हे पाहून महाराजांनी निरनिराळ्या जातींकरता स्वतंत्र वस्तीग्रह काढले. एवढेच नव्हेतर त्यांनी विविध जातीतील पुढाऱ्यांना वस्तीग्रह काढण्यास प्रवृत्त केले. जाती-जातीतील तेढ नष्ट व्हावा म्हणून ही वस्तीग्रह एकमेकांच्या जवळ असावी असा त्यांनी प्रयत्न केला. त्यामागे सामाजिक समता निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कर्मवीर भाऊराव पाटील हे अशाच वस्तीग्रहाच्या चळवळीचे आपत्य आहेत. राजश्री शाहू महाराजांनी निर्माण केलेल्या वस्तीगृहात शिकून डॉ पी. पी. पाटील, बाळासाहेब देसाई, एन डी पाटील यांच्यासारखी अनेक दिग्गज माणसं शिकून पुढे आली.

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीतील त्यांनी घेतलेला मागासलेल्या लोकांसाठी नोकरीत ५० टक्के आरक्षणाचा निर्णय अतिशय क्रांतिकारी ठरला. या निर्णयामुळे आपण त्यांना आरक्षणाचे जनक असे मानतो. माणसांच्या स्थितीत सुधारणा घडून येण्यासाठी घेतलेला हा निर्णय अतिशय फायदेशीर ठरला. त्यांनी आदेश काढून मागास कोण हेही ठरवले. या आदेशात ते शेवटी सूचना देतात की मागासलेल्या वर्णांचा अर्थ ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण खेरीज करून सर्व वर्ण असा समजावा. आरक्षणाचा निर्णय ही बहुजन समाजाला राजश्री शाहू महाराजांच्या वाढदिवसाची भेट होती. यामुळे बहुजन समाजात आनंदाची लाट उसळली. आजवर नोकऱ्यांत केवळ आपलाच हक्क समजणाऱ्या ब्राह्मणांच्या उच्च भावनेला यामुळे धक्का बसला. त्यांच्यात असंतोषाचा उद्रेक झाला. लोकमान्य टिळकांनी आरक्षण धोरणाला कराडून विरोध केला. कर्नाटकातील अथणी येथे भाषणात लोकमान्य टिळक म्हणाले तेली, तांबोळी, शेतकऱ्यांना कौन्सिलात जाऊन काय नांगर हाकायचे आहेत की तागडी धरायची आहे. टिळकांनी महाराजांच्या या कृतीला असमंजस व बुद्धी भ्रम्हाची कृती म्हटले. त्यांच्या निर्णयाने संस्थानाचे अधिक नुकसान होईल असे भाकीत केले. राजश्री शाहूंनी मात्र कोणत्याही विरोधाला न जुमनता आपल्या निर्णयाचे समर्थन केले व प्रभावी अंमलबजावणी केली. सांगलीचे वकील गणपतराव अभयंकर एकदा छत्रपती शाहूंना म्हणाले महाराज आपण जात पाहून स्कॉलरशिप व नोकऱ्या देता हे चुकीचे आहे. लायकी पाहून त्या दिल्या पाहिजेत. त्यावर शाहू महाराज काही बोलले नाही. ते अभयंकरांना घोड्याच्या तबेलाकडे घेऊन गेले. नोकरांना हरभरे आणायला सांगून ते एका सतरंजीवर टाकण्यास सांगितले. त्याचबरोबर सर्व घोडे धावत आले. त्यापैकी जे सशक्त होते त्यांनी लहान शिंगरे, म्हातारे घोडे तसेच अशक्त घोड्यांना काहीच मिळून दिले नाही. ते दाखवून महाराज म्हणाले पाहिलेत अभयंकर काय झालं ते? तलख्ख व सशक्त घोड्यांनी सारे हरभरे खाऊन घेतले. म्हणून त्यापैकी जे

अशक्त आहेत, त्यांना तोबऱ्यात भरून हरभरे द्यावे लागतात. अभयंकर यांना पुढे काही बोलता आले नाही त्यांना छत्रपती शाहूंचे आरक्षण धोरण मान्य करावे लागले.

अस्पृश्यतेने छळलेल्या, गुलाम बनवलेल्या, स्वाभिमान हरवलेल्या समाजाच्या उद्धारासाठी छत्रपती शाहूंनी केवळ जाहीरनामे काढले नाही तर प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. जाहीरनाम्यातील तत्त्वांचे त्यांनी स्वतः आचरण केले. अस्पृश्यातील बुद्धिवंतांना प्रोत्साहित व सर्व प्रकारची मदत केली. दत्तोबा साळवीच्या माध्यमातून त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी परिचय झाला. इ.स. 1919 साली महाराज मुंबईला आल्यावर स्वतः बाबासाहेब आंबेडकर राहत असलेल्या परळ चालीत गेले. त्यांना चर्चेसाठी आपल्या मुक्कामी पन्हाळा लॉजवर बोलविले. कोल्हापूरला येण्याचे आमंत्रण दिले. अस्पृश्य जातीत जन्मूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर असंख्य संकटांना झुंज देत उच्च विद्या संपादन करतात या गोष्टीचा त्यांना मनस्वी आनंद झाला होता. म्हणून त्यांना कोल्हापूरला बोलवून शहरातून भव्य मिरवणूक त्यांची काढली. त्यांना जरी फटका देऊन हृदय सत्कार केला. पुढील शिक्षणासाठी मदत देऊ केली. मूकनायक या वृत्तपत्रासाठी 2500 रुपयाची मदत केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याला माणगाव अस्पृश्य परिषदे पासून सुरुवात झाली. त्या परिषदेला शाहू महाराज स्वतः हजर राहिले. दलितांना त्यांचा खरा मार्गदर्शक नेता मिळाल्याचे विधान करताना ते उपस्थित दलितांना उद्देशून म्हणाले “तुम्ही तुमचा पुढारी शोधून काढला असून माझी खात्री आहे की आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की ते सर्व हिंदुस्तानचे पुढारी होतील”.

राजश्री शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजातील तरुणांना तलाठी पदावर नियुक्त दिल्या. वकिलीच्या सनद्या दिल्या. राजश्री शाहू चरित्रातील गंगाराम कांबळे तर सर्व परिचित आहेत. एके दिवशी मराठ्यांसाठी असलेल्या हौदाला त्याने स्पर्श केला म्हणून त्याला मराठ्यांनी रक्तबंबळ होईपर्यंत मारले. महाराज त्यावेळी दिल्लीत होते. ते कोल्हापूरला परत आल्यावर गंगाराम आपल्या बांधवांसोबत महाराजांना भेटला आणि आपली रक्ता बंबळ झालेली पाठ उघडी करून दाखवली व न्याय मागितला. महाराजांनी त्याचे सर्व म्हणणे ऐकून घेतले व ज्यांनी गंगाराम ला मारले त्यांना अस्पृश्य मंडळीच्या समोर बोलावून घेतले. घोड्यांची कमची घेतली व त्या सर्वांची पाठ फोडून काढली. हा मराठा, आपल्या रक्त संबंधाचा आहे हा भेद त्यांनी केला नाही. पुढे याच गंगाराम ला बागेतील नोकरीतून मुक्त करून स्वतंत्र धंद्यासाठी प्रोत्साहित केले. राजश्री शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने कोल्हापुरात थांब रस्त्यावर गंगारामने ‘सत्य सुधारक हॉटेल’ काढले स्वतः महाराज ब्राह्मण, मराठा जातीच्या लोकांना आपल्या घोडा गाडीत सोबत गंगारामच्या हॉटेलमध्ये घेऊन जात आणि स्वतः चहा पीत व सोबत आलेत त्यानांही आग्रह करत. अशा प्रकारे अनेक अस्पृश्य लोकांच्या जीवनात शाहू महाराजांनी क्रांती केली.

अस्पृश्यांना हीन समजून गावकोसा बाहेर बहिष्कृत म्हणून ठेवले गेले असले तरी गाव गाड्याचा ते अविभाज्य अंग होते. गावगाड्यात त्यांच्या उदरनिर्वाहासाठी काहींना काही व्यवस्था होती. अगदी हलक्या दर्जाचे का असेना पण बोलुत्याचे हक्क त्यांना होते. झोपड्या का असेनात पण निवारा त्यांच्या जीवनात होता. भटक्या विमुक्त जातींना तर स्वतःचे गावच नव्हते. ते भटकंतीचे जीवन जगत होते. इंग्रज राजवटीत त्यांच्या उदरनिर्वाची साधने नष्ट झाली आणि त्यांनी चोऱ्यामाऱ्याची वाट धरली. इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार जाती म्हणून घोषित केले. अशा गुन्हेगार जातीचा शिक्का बसल्यांना शाहू महाराजांनी जवळ केले. अंग मेहनतीची कष्टाची कामे करणाऱ्या वडार, व रजपूत भामटा यांना घर दरासाठी जागा देऊन त्यांना स्थिर केले. कुंचीकोरवी जमातीचे लोक शिकारीत तरबेज होते. त्यांना शिकारखाण्यात नोकरीस नेमले. फासेपारध्यांना आपल्या निवासस्थानाच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली. काहींना पोलीस खात्यात रोजगार उपलब्ध करून दिला. शाहू महाराजांनी या लोकातील चोर न पाहता त्यांच्यातील माणूस बघितला. बेकारी आणि दारिद्र्य हे त्यांच्या पापाचे मूळ आहे हे जाणून त्यांना मदत देऊन सक्षम बनवल्यास ते पुन्हा माणूस म्हणून स्वाभिमानाने जगू शकतील हा विश्वास महाराजांना होता. आपल्या मुलाच्या लग्नात फासेपारध्यांना रेल्वेने वऱ्हाडी म्हणून घेऊन गेले. अशा समाजाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा राजा वंदनीयच ठरतो. प्रवाहाच्या, प्रघाताच्या विरोधात प्रवास करणारा हा राजा, समाजातील खोट्या प्रतिष्ठांना तीलांजली देणारा हा राजा, जातीभेद निर्मूलनासाठी स्वतःच्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील तरुणाशी लावणारे शाहू महाराज खोट्या प्रतिष्ठेपाई ‘ऑनर किलिंग’ चे प्रकार घडवणाऱ्या जात्यांना कळले असते तर आंतरजातीय विवाहास असणारा विरोध क्षीण झाला असता. कलावंतांची कदर करणारे, भले तो अस्पृश्य की ब्राह्मण असो बुद्धिवंताची पारख असणारे, राजा असूनही ऋषी सारखे वैराग्याचे जीवन जगणारा राजा म्हणून राजश्री, शेतकऱ्यांचे कैवारी ठरतात. सर्वसामान्यांना उद्योजक, कारखानदार बनवणारा राजा, स्त्रीजातीच्या संरक्षणाचे, अधिकाराचे कायदे करून त्यांना प्रतिष्ठा मिळवून देणारा राजा सत्यशोधकांचा मित्र ठरतात. धर्म मार्तंडांना आव्हान देणारा बहादूर राजा, राज्यकर्ता म्हणून अल्प आयुष्य लाभलेला पण अनेक युगाचे काम करणाऱ्या या कृतीयुक्त समाज क्रांतिकारक राजा वंदनीय ठरतो.

**संदर्भ ग्रंथ :**


1. कीर धनंजय, *राजश्री शाहू छत्रपती - एक समाज क्रांतीकारक राजा*, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९.
2. जाधव रमेश, *राजश्री शाहू छत्रपती – वाद आणि वास्तव*, साईनाथ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२.
3. पवार जयसिंगराव, *राजश्री शाहू स्मारक ग्रंथ*, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २००१.
4. पवार जयसिंगराव, *राजश्री शाहू एक दृष्टीक्षेप*, माजुश्री , कोल्हापूर, २००१.
5. तोफखाने वा.द., *राजश्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग*, महाराष्ट्र प्रकाशन कोल्हापूर १९६३
6. फडके य.दी., *शाहू छत्रपती आणि लोकमान्य* श्री विद्या प्रकाशन पुणे,१९८६
7. पंडित भवानी शंकर, *महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे* ,पुणे विद्यापीठ प्रकाशन पुणे, १९६९

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महारांजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

**प्रा.विनोद आखाडे**
इतिहास विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज ,कोल्हापूर.
Email- akhadevinod@gmail.com

**प्रस्तावना :-**

आरक्षणाचे जनक समतासुर्य राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील विविध घटकांच्या सर्वांगीण प्रगती व उन्नतीसाठी जीवनभर प्रयत्न केले. यामध्ये दलित, वंचित, महिला, श्रमिक, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी विविध योजना कार्यान्वित करण्यासाठी क्रांतीकारक निर्णय घेतले. २ एप्रिल १८९४ रोजी राज्यारोहण झाल्यानंतर पहिल्याच जाहीरनाम्यात,"आपणाला मिळालेला राज्य अधिकार हा राजवैभव व राजविलास यांचा उपभोग नसून, तो आपल्या रंजल्या गांजल्या प्रजाजनांच्या विशेषत: गरीब व अज्ञानी जनतेच्या उद्धारासाठी " असल्याचे स्पष्ट केले.

**उद्देश :-**

1) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करणे.
2) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणातून जातीव्यवस्था व जातीअंताच्या संघर्ष कार्याचा आढावा घेणे.
3) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणातून दलित, स्त्रीदास्य मुक्ती चळवळीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-** सदरचा शोध निबंध साधन ग्रंथ, चरित्र ग्रंथ,विविध तज्ज्ञांचे लेख, अग्रलेख,विविध मासिके,वृत्तपत्रे, विविध चित्र प्रदर्शने आणि इंटरनेट इ. आधार घेतला आहे.

**राजर्षी शाहू महाराज यांचा परिचय :-**

छत्रपती शाहू महारांजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कसबा बावडा येथे झाला त्यांचे मुळ नाव यशवंतराव तर वडिलांचे जयसिंगराव आबासाहेब घाटगे तर आईचे नाव राधाबाई होते.१७ मार्च १८८४ रोजी त्याना दत्तक घेण्यात आले. त्यांचे नाव शाहू छत्रपती असे ठेवण्यात आले २ एप्रिल १८९४ रोजी वयाची विसाव्या वर्षी राज्यकारभाराची सत्रे हाती घेतली. तेव्हापासून ते ६ मे १९२२ निधनापर्यंत २८ वर्ष राज्यकारभार केला.

राज्याभिषेकानंतर त्यांनी आपल्या राज्याचा दौरा केला .डोंगरदऱ्यात राहणाऱ्या कष्टकरी ,श्रमकरी, शेतकरी, वंचित, उपेक्षित, भूमिहीन प्रजाजनांच्या हाल अपेष्टा पाहून आपल्या राज्याचा कायापालट करण्याचा संकल्प केला .

**वेदोक्त प्रकरण आणि शैक्षणिक कार्याला प्रारंभ :-**

पंचगंगा नदीवर शाहू महारांजांचे स्नान सुरु असताना नारायण भटजी हे स्वत; स्नान न करता वेदोक्त ऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणतायेत हि बाब महाराजांचे मित्र राजारामशास्त्री यांनी लक्षात आणून दिली.या धार्मिक अन्यायाची चीड शाहू महारांजांना आली जर छत्रपतीना अशी वागणूक मिळत असेल तर माझ्या सामान्य जनतेच काय ? यावर उपाय बहुजन समाजाला शिक्षण दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही तसेच गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी शिक्षण हाच पर्याय हे त्यांनी ओळखले. इथल्या वर्ण व्यवस्थेने केवळ जन्माने उच्च व श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या ब्राम्हणांनाच शिक्षणाचा अधिकार होता ती मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची सोय केली नव्हे तर कायदा केला या कायद्याने ७ ते १४ या वयातील मुलांच्या पालकांनी त्याना शाळेत पाठविणे बंधनकारक करण्यात आले तसे न केल्यास त्याना दंड लावण्यात आला अशा प्रकारचा क्रांतिकारक निर्णय २१ नोव्हे१९१८ म्हणजेच १०४ वर्षापूर्वी घेणारा राजा म्हणजेच राजर्षी छत्रपती शाहू होय . हा निर्णय शासन कर्त्यांना घ्यायला ४ ऑगस्ट २००९ हा दिवस उजाडला (९१ वर्ष ) म्हणूनच आजही राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करण्याची गरज आहे .

**शैक्षणिक कार्य :-**

**राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे**

1. समाजात प्राथमिक शिक्षण सर्वाना उपलब्ध करून देणे व नंतर दुय्यम व शेवटी उच्च शिक्षणाची सोय करणे .
2. समाजातील प्रतिकूल परिस्थितीतील घटकांना शिक्षणाच्यासोयी विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देणे
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षन घेण्यासाठी विविध जाती धर्माची वसतिगृहाची स्थापना
4. प्रथम शिकून तयार झालेल्यांचा शिक्षणावरील विश्वास दृढ व्हावा म्हणून त्यांच्या रोजगाराची सोय करणे

२६ जुलै १९०२ साली ५०% आरक्षणाची तरतूद करणारा आदेश/हुकुम काढला.( करवीर सरकारचे ग्याझीट ,२ ऑगस्ट १९०२ ) अशा प्रकारचे आरक्षण देणारा जाहीरनामा काढणारा जगातला पहिला राजा म्हणजेच राजर्षी छत्रपती शाहू होय.

भारताच्या सामाजिक परिस्थितीत क्रांतिकारक बदल करणारा समाजच्या उन्नतीकरिता एक प्रभावी उपाय सुचविणारा जाहीरनामा म्हणजे दिन दलितांच्या कष्टकरी, श्रमकरी, शेतकरी, वंचित, उपेक्षित, भूमिहीन प्रजाजनांच्या बहुजन मराठ्यांच्या सामाजिक स्वातंत्र्याची सनद आहे

अशा प्रकारे शिक्षण शिक्षणासाठी सवलती शिक्षण पूर्ण झाल्यावर शासकीय सेवेत समावेशन यावर आधारित सामाजिक परिवर्तन. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाची पायाभरणी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केली .

**राजर्षी शाहू महाराजांनी सुरु केलेल्या शाळा :-**

1) रात्रशाळा :- शेतकरी कारागीर शेतमजूर यांच्यासाठी रात्रशाळा सुरु केल्या डोंगरदऱ्यात राहणाऱ्या कष्टकरी श्रमकरी शेतकरी वंचित उपेक्षित भूमिहीन प्रजाजनांचा सहभाग राज्याकारभारात करायचा असेल तर त्याला शिक्षण मिळाले पाहिजे हि भूमिका राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची होती
2) प्राथमिक शाळा :-मोफत आणि सक्तीचे शिक्षण गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांना दंड
3) माध्यमिक शाळा:- कष्टकरी श्रमकरी शेतकरी वंचित उपेक्षित भूमिहीन प्रजेच्या मुलांना शिक्षण एकुण महसुलाच्या ६% खर्च शिक्षणावर पण आज जीडीपीच्या ३% पेक्षा कमी खर्च शिक्षणावर होतो मग काय म्हणाव शासनकर्त्यांना ?
4) पुरोहित शाळा :- शिवाजी वैदिक शाळा यामधून बहुजन प्रजेच्या धार्मिक विधीसाठी
5) तलाठी शाळा :- १५ सप्टे १९१८ कुलकर्णी वतन रद्द केल्यावर पगारी कर्मचारी 'तलाठी' हे पद निर्माण केले व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी तलाठी शाळा सुरु केली
6) पाटील शाळा / दिल्ली दरबार :- बहुतांशी कुलकर्णी साक्षर व पाटील निरक्षर असे त्यामुळे कुलकर्णी खोट्या नोंदी लावणे कारस्थाने करत म्हणून कुलकर्णी वतन रद्द केल्यावर पाटील साक्षर झाला पाहिजे या हेतूने हि शाळा सुरु करण्यात आली
7) उद्योग शाळा :- यामध्ये प्रामुख्याने लोहारकाम सुतारकाम गवंडीकाम यांचा समावेश होता
8) संस्कृत शाळा :- हजारो वर्ष इथल्या वर्ण व्यवस्थेने बहुजन बांधवाना संस्कृत शिकण्यास मनाई केली होती हि मक्तेदारी मोडीत काढण्यात आली
9) सत्यशोधक शाळा
10) सैनिक शाळा
11) बालवीर शाळा
12) डोंबारी मुलांसाठी शाळा
13) कला शाळा

**शिक्षक प्रशिक्षण :-** शैक्षणिक प्रक्रियेतील शिक्षक हा महत्वाचा घटक आहे शिक्षक जर गुणवत्तापूर्ण असेल तर चांगले विद्यार्थी घडतील शिक्षक प्रशिक्षण व शिक्षक मेरीट प्रमोशन या योजना महाराजांनी सुरु केल्या शिक्षक प्रशिक्षणयासाठी जाणार्या शिक्षकांना ६ महिने निम पगारी राजा देण्यात आली .

शिक्षकाची निवड करण्यासाठी परीक्षा घेण्यात येत असे.

**संस्थाना बाहेरील शैक्षणिक संस्थाना मदत**

1. डेक्कन एज्युकेशन सोसायटी
2. श्री शिवाजी मराठा सोसायटी
3. ताराबाई मराठा बोर्डिंग
4. उदाजी मराठा बोर्डिंग
5. चोखामेळा बोर्डिंग नागपूर
6. बनारस हिंदू विद्यापीठ

**वसतिगृह :-** मुले प्राथमिक शिक्षण घेऊन शहरात आल्यावर त्यांच्यासाठी वसतिगृहाची सोय करण्यात आली . मिस क्लार्क हे वसतिगृह हे देशातील अस्पृशांसाठी काढलेले देशातील पहिले वसतिगृह आहे ज्या उद्घाटनासाठी कर्मवीर भाऊराव पाटील गेले आणि त्यांच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली त्यातूनच ' रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली .हि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची प्रेरणा आहे.

व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग . दिगंबर जैन बोर्डिंग, वीरशैव लिंगायत वसतिगृह , किंग एडवर्ड मोहमेडन वसतिगृह , देवेज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग, श्री नामदेव बोर्डिंग , पांचाळ ब्राम्हण बोर्डिंग, श्रीमती सरस्वती गौड सारस्वत ब्राम्हण वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन होस्टेल , रावबहाद्दूर सबनीस प्रभू बोर्डिंग, आर्य समाज गुरुकुल , वैश्य बोर्डिंग, उडहाउस वसतिगृह , ढोर चांभार वसतिगृह , उदाजी मराठा बोर्डिंग , श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग , शिवाजी वैदिक वसतिगृह , सोमवंशीय आर्य क्षेत्रीय वसतिगृह , सुतार बोर्डिंग, भोई समाज बोर्डिंग, श्री देवांग बोर्डिंग, रजपूतवाडी बोर्डिंग, नाभिक विद्यार्ती वसतिगृह , रुकडी बोर्डिंग, शिवकंठी शेष समाज बोर्डिंग,

इत्यादी वसतिगृहाच्या माध्यमातून कोल्हापूरला वसतिगृहाची जननी म्हणून(Mother of hostel ) नवी ओळख राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी निर्माण केली.

**निष्कर्ष :-**

1) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समताधीष्टीत समाज निर्मिती साठीच्या कार्याचा नवा आदर्श घालून दिला.
2) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण शिक्षणासाठी सवलती /शिष्यवृत्ती शिक्षण पूर्ण झाल्यावर शासकीय सेवेत समावेशान यावर आधारित सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी केली. .
3) अस्पृश्यता निवारण्यासाठी शिक्षणाचा वापर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केला.

**समारोप**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सुरु केलेल्या शिष्यवृत्ती च्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकरांसारखा जागतिक दर्जाचा विद्वान भारतीय संविधानाचा शिल्पकार निर्माण झाला त्याचबरोबर गाव तिथे शाळा, गाव तिथे वाचनालय, १०० रुपये पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला शिक्षण कर लावला. शाळा तपासणी , या सारखे क्रांतिकारी उपक्रम राबविण्यात आले

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी एकुण महसुलाच्या ६% खर्च शिक्षणावर केला मात्र आजही जीडीपीच्या ३% पेक्षा कमी खर्च शिक्षणावर होतो मग काय म्हणाव शासनकर्त्यांना ? मोफत आणि सक्तीच शिक्षण द्यायला शाहू महाराजांच्या नंतर १०४ वर्ष जावी लागली. शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श डोळयासमोर ठेवून पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील डॉ पंजाबराव देशमुख डॉ बापुजी साळुंखे यांनी शैक्षणिक संस्थाचा प्रसार केला.

शाहू महाराज म्हणत,"माझी प्रजा मराठी तिसरी शिकून तयार झाली तरी त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन विश्रांती घेईन. " असा विचार करणारा लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि आजचे लोकप्रतिनिधी माझा मुलगा नाही तर नातूसुध्दा आमदार खासदार मंत्री मुख्यमंत्री झाला पाहिजे अशी इच्छा आकांश बाळगून काम करतात .

**संदर्भ :-**

1. राजर्षी छत्रपती शाहू : धनंजय कीर
2. राजर्षी छत्रपती शाहू : प्राचार्य रा.तु.भगत
3. राजर्षी छत्रपती शाहूस्मारक ग्रंथ : डॉ जयसिंगराव पवार
4. क्रांतसुक्ते राजर्षी छत्रपती शाहू : संपादक डॉ एस. एस. भोसले
5. शाहू महाराजांच्या आठवणी : भाई माधवराव बागल
6. राजर्षी छत्रपती शाहू : डॉ श्रीमंत कोकाटे
7. लोकराज्य मासिक विशेषांक ,विविध तज्ज्ञांचे लेख,अग्रलेख ,विविध मासिके, विविध वृत्तपत्रे, विविध चित्र प्रदर्शने आणि इंटरनेट इ.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# "राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या आपत्ती व्यवस्थापन कार्याची सद्यकालीन प्रस्तुतता"

**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी. ता. गगनबावडा जि. कोल्हापूर.
Email- jadhavjj01@gmail.com

**प्रस्तावना :-**

कोल्हापूर संस्थानचे अधिपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणजे एक विचारवंत, आचारवंत आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या ध्येय धोरणानुसार वाटचाल करणारे व्यक्तिमत्व होते. त्यामुळेच खऱ्या अर्थाने छत्रपती शाहू महाराज हे रयतेचे राजे म्हणून ओळखले गेले. २ एप्रिल, १८९४ मध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी खऱ्या अर्थाने कोल्हापूर संस्थांच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. तेव्हा आपल्याला मिळालेले हे राज्यवैभव अधिकार हे उपभोग घेण्यासाठी नसून ते आपल्या गरीब जनतेच्या उद्धारासाठी आहे. याची जाणीव त्यांना झाली होती. आणि म्हणूनच अगदी आपल्या राज्यरोहणाच्या या क्षणापासून त्यांनी आपल्या संपूर्ण संस्थानांचा दौरा करून खेड्यापाड्यातील, डोंगर मुलखातील आपल्या गरीब रयतेची परिस्थिती जवळून पाहिली. गरीब जनतेचे दुःख दारिद्र्य पाहून त्यांचे मन दुःखी होई. आपल्या रयतेचे हे दुःख आणि दारिद्र्य कोणत्या मार्गाने कमी करता येईल यासाठी सतत ते यावर उपाय शोधत असत. विशेषतः १८९८-९९ मध्ये पुण्यामध्ये आलेली प्लेगची साथ, कोल्हापुरातील प्लेगचा झालेला शिरकाव, शाहू महाराजांनी त्यावर केलेली उपाय योजना त्यासंदर्भात शाहू महाराजांनी काढलेले हुकुम किंवा जाहीरनामे आणि आणि त्याची काटेकोरपणे केलीली अंमलबजावणी पाहता त्यांचे हे आपत्ती निवारणाचे कार्य आजच्या कोरोना काळात किती दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरू शकते याची प्रचिती येते. आणि म्हणून प्रस्तुत संशोधनपर लेखात छत्रपती शाहू महाराज यांचे आपत्ती काळातील कार्य आणि आजच्या कोरोना प्रादुर्भाव आच्या पार्श्वभूमीवर त्याचे महत्व या अनुषंगाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे:**

१) छत्रपती शाहू महाराजांचे आपत्ती व्यवस्थापन कार्य समजून घेणे.

२) छत्रपती शाहू महाराजांनी आपत्ती काळामध्ये केलेल्या उपाय योजनाची उपयुक्तता स्पष्ट करणे.

३) छत्रपती शाहू महाराजांची आपत्ती काळातील ध्येयधोरणांचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी प्लेग या साथीच्या रोगांच्या काळात राबवलेली ध्येय-धोरणे आणि उपाययोजना आजच्या कोरोना काळात उपयोगी ठरू शकतात.

**संशोधन पद्धती:**

सदरच्या संशोधन लेखासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा तसेच ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. छत्रपती शाहू महाराज यांच्या वरती लिखित प्राथमिक तसेच दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**महत्व:**

कोल्हापूर संस्थानचे अधिपती छत्रपती शाहू महाराज हे पुरोगामी विचारांचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी इसवी सन १८९४ मध्ये अधिकारीपदाची सूत्रे हातात घेतली तेव्हा त्यांच्यासमोर समोर अनेक प्रकारची

आव्हाने होती. त्यामध्ये विशेषता इसवी सन १८९८-९९ मध्ये आलेली प्लेगची साथ आणि त्यानंतर आलेले दुष्काळाचे संकट या दोन घटना अत्यंत महत्त्वाच्या होत्या. या संकटप्रसंगी शाहू महाराजांनी घेतलेले निर्णय आणि त्याची केलेली अंमलबजावणी ही आजच्या कोरोनाच्या काळात सुद्धा किती मार्गदर्शक ठरू शकते याची प्रचिती येते. कारण संपूर्ण पुणे आणि मुंबई प्रांतात प्लेगची साथ पसरली असताना शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये प्लेगचा शिरकाव होऊ नये यासाठी घेतलेली खबरदारी खूप महत्वाची होती. कारण प्लेगच्या साथीमध्ये पुणे आणि मुंबईमध्ये हजारो लोक जिथे मृत्युमुखी पडत होते. त्यावेळी कोल्हापूर संस्थानांमध्ये हे मृत्यूचे प्रमाण अत्यंत कमी होते. त्याचे कारण म्हणजे शाहू महाराजांची ध्येय धोरणे होत.

आज शंभर वर्षानंतर देशात कारोनाच्या रूपाने प्लेग सदृश्य परिस्थिती किंवा त्याहूनही भयानक परिस्थिती निर्माण झाली असताना शाहू महाराजांचे आपत्ती निवारण संदर्भातील कार्य हे आपल्याला दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरू शकते. म्हणून छत्रपती शाहू महाराजांच्या आपत्तीकालीन व्यवस्थापन कार्य आपण समजून घेतले पाहिजे.

**प्रस्तावना:**

भारताच्या इतिहासामध्ये खूप कमी राजे असे होऊन गेले की ज्यांची इतिहासाने खास नोंद घेतलेली आहे. त्यामध्ये कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव आपणास अग्रक्रमाने घ्यावे लागते. छत्रपती शाहू महाराजांनी त्यांच्या अल्पशा कारकिर्दीमध्ये केलेले कार्य त्यांनी घेतलेले निर्णय हे खरोखरच दूरदृष्टीचे आणि काळाच्या पुढच्या होते. त्यामुळेच आजच्या एकविसाव्या शतकात सुद्धा त्यांचे विचार आपल्याला मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरत आहेत. विशेषता आज जगावर आलेले कोरोनाचे संकट आणि भारतामध्ये झालेला त्याचा प्रसार लक्षात घेतला असता, अशा पद्धतीची परिस्थिती प्लेग या संसर्गजन्य रोगाच्या माध्यमातून शंभर वर्षापूर्वी निर्माण झाली होती. विशेषता मुंबई, पुणे या भागात प्लेग या रोगाचा खूप मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला होता. त्यामुळे मुंबई आणि पुणे येथे मृत्यूचे प्रमाण सुद्धा वाढले होते. अशा परिस्थितीत पुण्यापासून कोल्हापूर संस्थान हे जवळ असल्याने कोल्हापूरला सुद्धा तितकाच धोका निर्माण झाला होता. पण या काळात कोल्हापूर संस्थानचे अधिपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केलेला आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य वेळोवेळी त्यांनी घेतलेले निर्णय आणि त्याची काटेकोरपणे केलेली अंमलबजावणी यामुळे या रोगाचा कोल्हापूर संस्थानांमध्ये होणारा प्रसार रोखण्यात यश आले होते. शिवाय कोल्हापूर संस्थानांमध्ये लोकांच्या मृत्यूचे प्रमाण सुद्धा कमी होते. या पाठीमागे शाहू महाराजांची असणारी नीती आणि त्यांनी केलेल्या उपाययोजना या अत्यंत महत्त्वाच्या होत्या. कारण आजच्या काळात सुद्धा त्यांनी केलेलं हे आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य आणि राबवलेली नीती हे आज सुद्धा आपल्याला मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरू शकते आणि म्हणून प्रस्तुत संशोधन पर निबंध मध्ये छत्रपती शाहू महाराज यांचे आपत्ती व्यवस्थापन कार्य आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर त्याचे असणारे महत्व या अनुषंगाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**रोगाची पार्श्वभूमी:**

इसवी सन अठराशे १८९८-९९ मुंबई प्रांतांमध्ये फार मोठ्या प्रमाणात प्लेगची साथ पसरली होती. हा रोग संसर्गजन्य असून तो उंदरा पासून लोकांना होत असे. त्यामुळे या उंदरांचा बंदोबस्त करणे तसेच लोकांना त्यापासून वाचवणे हे फार मोठे आव्हान होते. या रोगामध्ये रोग झाल्यापासून व्यक्ती तीन दिवसाच्या आत मृत्यूमुखी पडत असे. त्यामुळे या रोगाची दाहकता खूप होती. तसेच लोकांच्यामध्ये एक भीतीचे वातावरण सुद्धा निर्माण झाले होते. अशा परिस्थितीमध्ये ब्रिटिशांनी प्लेग निर्मूलन करण्यासंदर्भात केलेल्या उपायोजना या अघोरी स्वरूपाच्या होत्या. विशेष करून पुण्यामध्ये प्लेग निवारणार्थ नेमलेल्या रँड नावाच्या अधिकाऱ्यांनी जुलमी अत्याचाराने हाहाकार माजवला होता. या इंग्रज अधिकाऱ्यांच्या अत्याचारी वर्तनामुळे अनेक हिंदु धर्माच्या लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. त्याचा बदला म्हणून चाफेकर बंधूंनी या इंग्रज अधिकारी रँडचा खून

केला.१ या घटनेने ब्रिटिश राज्यकर्ते बिथरून गेले. शिवाय याच काळात लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरी साप्ताहिकांमधून जहाल अग्रलेख लिहून राज्यकर्त्यांच्या वरती जहरी टीका केली होती. या अग्रलेखांचा आधारे सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा खटला चालवून त्यांना दीड वर्षांची शिक्षा ठोठावली होती. अशा एकंदरीत परिस्थितीत कोल्हापूर संस्थानांमध्ये प्लेगचा शिरकाव होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक वाटत होते. कारण पुणे आणि कोल्हापूर यांच्यामधील अंतर हे कमी असल्याने तो धोका अधिक होता. त्यामुळे छत्रपती शाहू महाराज यांनी प्राथमिक खबरदारी म्हणून पुण्याहून कोल्हापूरकडे येणाऱ्या प्रत्येक नाक्यावरती वाहनांची तपासणी करून मगच त्यांना कोल्हापूर मध्ये प्रवेश देण्याचे धोरण निश्चित केले होते. तसेच प्लेग सदृश्य लक्षणे आढळल्यास त्यांना कोल्हापूरच्या बाहेरच विलगीकरण लक्षात ठेवण्याची स्वतंत्र व्यवस्था देखील केली गेली होती.

**शाहू महाराजांचे आदेश:**

छत्रपती शाहू महाराज यांनी प्लेग निर्मूलनसंदर्भात २जानेवारी,१९००, २२जानेवारी,१९००, ३फेब्रुवारी, १९०० रोजी जाहीरनामे प्रसिद्ध करून प्लेग संदर्भात उपाययोजना केलेली दिसून येते. त्यानुसार पहिल्या जाहीनाम्याद्वारे कोल्हापूर शहरामध्ये राहणाऱ्या लोकांना शहराच्या बाहेर वस्ती करण्यासंदर्भात आदेश देण्यात आले. त्यानुसार व्यापाऱ्यांना आपली दुकाने बंद ठेवणे, गरीब जनतेस झोपडपट्ट्या बांधण्यासाठी मोफत साहित्यची तजवीज करणे, मजूरदार लोकांना उदरनिर्वाहासाठी कळंबा तलाव या ठिकाणी तलावाच्या कामावरती घेऊन मजुरीची सोय करणे इत्यादी. माध्यमातून शाहू महाराजांनी लोकांना संसर्ग होणार नाही याची काळजी घेतलेली दिसून येते. तर दुसरा जाहीरनामा प्रसिद्ध करून प्लेगच्या साथीत कोल्हापूर मधील घरेदारे तसेच चीजवस्तू निर्जंतुकीकरण यासंदर्भात महत्वपूर्ण आदेश काढलेला दिसून येतो. या आदेशानुसार लोकांनी स्वतःची राहती घरे ही निर्जंतुकीकरण करून घेणे, घरात स्वच्छ सूर्यप्रकाश येईल अशा पद्धतीची तजवीज करणे, घराच्या भिंती चुन्याने अथवा पांढऱ्या मातीने रंगून घेणे, धान्य उन्हात वाळवून घेणे, कपडे गरम पाण्यातून धुऊन घेणे, लोखंडी अवजारे अग्नीमध्ये घालून भाजून काढणे, लाकडी, दगडी सामान यावर गरम पाणी ओतून स्वच्छ करून घेणे, उंदीर, घुशी मेलेले आढळल्यास त्यास हात लावतात त्यास ताबडतोब चिमट्याने उचलून जाळून नष्ट करणे, गरीब लोकांना निर्जंतुकीकरण द्रव्य मोफत देणे, तसेच आपले घर सुरक्षित झाल्या नंतर घरात येऊन राहण्यासाठी अथवा दुकान उघडण्यासाठी असिस्टंट प्लेग कमिशनरच्या सहीचा पास मिळाल्यानंतरच घरी जाऊन राहण्यास परवानगी देण्यात आलेली होती. वरील पद्धतीची उपायोजना लक्षात घेता छत्रपती शाहू महाराजांनी प्लेग निवारण संदर्भात किती दक्षता घेतलेली घेतली होती हे लक्षात येते. ज्यामुळे कोल्हापूर संस्थानांमध्ये प्लेगचा प्रसार रोखण्यास मदत झाली. प्लेग निर्मुलनासंदर्भात वरील सर्व उपाय करत असताना बऱ्याच वेळेला लोकांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेष करून स्वतःची स्थावर आणि जंगम मालमत्ता सोडून लोकांना बाहेर शेतामध्ये अथवा माळरानावरती राहावे लागत होते. अशा परिस्थितीत त्यांच्या जंगम मालमत्तेचे म्हणजेच दागदागिने, दस्तऐवज, रोख रक्कम इत्यादींचे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून उपाय करणे गरजेचे होते. कारण या काळामध्ये चोरीचे अनेक प्रसंग उद्भवले होते. तेव्हा शाहू महाराजांनी ३ फेब्रुवारी, १९०० रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध करून लोकांच्या जंगम मालमत्तेचे संरक्षण करण्याची व्यवस्था केली. त्यानुसार लोकांनी आपले दाग-दागिने, दस्तऐवज एका पेटी मध्ये घालून ती पेटी मोहरबंद करून सरकारात जमा करावी. तसेच जमा केलेली पावती घ्यावी व परत पेटी घेतेवेळी ती पावती दाखवल्यानंतर त्यांचा दस्तऐवज अथवा रोख रक्कम परत दिली जात असे.२ अशा रीतीने छत्रपती शाहू महाराजांनी वेळोवेळी आदेश निर्गमित करून कोल्हापूर संस्थानांमध्ये प्लेगचा प्रसार थांबविण्यासंदर्भात दक्षता घेतली. शिवाय त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केलेली दिसून येते.

**प्लेगनिर्मूलनासाठी उपाययोजना आणि अंमलबजावणी:** कोल्हापूर संस्थानांमध्ये प्लेगचा शिरकाव झाल्यामुळे प्लेग निवारणार्थ छत्रपती शाहू महाराज यांनी वेळोवेळी अनेक आदेश पारित केले होते. हा रोग सांसर्गिक आजार

असल्यामुळे संसर्ग झालेले ठिकाण ताबडतोब सोडून ते घर खाली करण्यासंदर्भात छत्रपती शाहू महाराजांनी सूचना दिल्या होत्या.सुरूवातीस कोल्हापूर संस्थानामध्ये शिरोळ आणि गडहिंग्लज पेठ यातील जवळजवळ अठरा गावामध्ये ही प्लेगची साथ पसरलेली होती ही दोन्ही पेठे लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून मोठी होती. या खेडेगावातून जवळ-जवळ ३१,१४१ इतकी लोकसंख्या वास्तव्यास होती.३ त्यामुळे इतक्या मोठ्या लोकसंख्येमध्ये रुग्ण शोधून काढणे आणि त्याच्या वरती उपाय योजना करणे खूप अवघड गोष्ट होती. याशिवाय लोकांच्यामध्ये अनेक प्रकारच्या धार्मिक, खुळचट कल्पना होत्या. तसेच रोगाच्या संदर्भात त्यांच्या मनामध्ये असणारी भीती आणि गैरसमज सुद्धा दूर करणे तितकेच गरजेचे होते. अशा परिस्थितीमध्ये या रोगाचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीकोनातून छत्रपती शाहू महाराज यांनी केलेल्या उपाययोजना या क्रांतिकारक आणि उपयोगी ठरल्या.

शंभर वर्षांपूर्वी छत्रपती शाहू महाराज यांनी ज्या उपाययोजना केल्या त्या आज एकविसाव्या शतकामध्ये सुद्धा तंतोतंत लागू पडतात हे लक्षात घ्यायला हवे. इतकी शास्त्रीय आणि विज्ञानवादी दृष्टी शाहू महाराजांना होती.

**माहिती देणारी परिपत्रके:**

त्या काळात आजच्यासारखी आधुनिक प्रसार माध्यमे उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्या काळात छत्रपती शाहू महाराजांनी प्लेग निवारणार्थ केलेले कार्य हे खूप महत्वाचे होते. कारण समाज हा अज्ञानी आणि अनेक धार्मिक प्रथा परंपरा यांना मानणारा होता त्यामुळे या रोगाच्या संदर्भात लोकांच्या मध्ये जनजागृती करणे महत्त्वाचे होते. त्यासाठी शाहू महाराजांनी सुरुवातीस लोकांना प्लेग रोगासंदर्भात माहिती देणारी अनेक परिपत्रके काढली आणि ती लोकांच्या मध्ये वाटली. जेणेकरून या रोगाच्या संदर्भात लोकांना माहिती होऊन त्यांच्यामधील या रोगाच्या संदर्भात असणारी भीती नाहीशी होईल. व योग्य ती खबरदारी घेऊन लोकांना या रोगापरून वाचता येईल. ही गोष्ट लोकांच्या लक्षात घेऊन शाहू महाराजांनी १८ गावांच्यामध्ये प्लेग साथीचा प्रसार झाला होता तेथील लोकांना जागृत करण्याचे काम केले.

**विलागिकरण केंद्र:**

शाहू महाराजांनी कोल्हापूर राजाकडे येणाऱ्या महत्त्वाच्या दळणवळणाच्या ठिकाणी विलगीकरण केंद्रे सुरू केलीली होती. त्यामुळे बाहेरून एखादा प्रवासी जेंव्हा कोल्हापूरमध्ये प्रवेश करत असे त्यावेळी त्याची योग्य ती वैद्यकीय तपासणी करून मगच त्यास कोल्हापूरमध्ये प्रवेश दिला जाई.४ तसेच बाधित आढळणाऱ्या रुग्णास त्या विलगीकरण कक्षामध्ये ठेवण्यात येत असे. शंभर वर्षापूर्वी शाहू महाराजांची

**बक्षिसे जाहीर**

याव्यतिरिक्त प्लेग झालेल्या रोग्याला शोधून काढण्यासाठी बक्षीस रूपाने काही रक्कम देण्याचे जाहीर केले होते. जेणेकरून अशा पद्धतीचे रोग शोधून प्रतिबंधक उपाय करणे करणे हा त्या पाठीमागचा उद्देश होता. त्याच बरोबर खेड्यातील अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिली होती की, योग्य ती कारवाई न केल्यास उत्पन्न बंद करण्याचे देखील आदेश काढले होते.

**पहारेकरी नेमणूक:**

ज्या १८ गावामध्ये लेख सत्तेचा प्रसार झाला होता अशा गावातील लोकांच्या घरावरती पहारा ठेवण्यासाठी अधिकचे लोकांची नेमणूक करण्यात आली होती. साथीच्या रोगाचा प्रचार आणि प्रसार रोखण्यासाठी शाहूमहाराजांनी लोकांना स्वतःची घरी मोकळे करून रानामध्ये माळावरती जाऊन राहण्यासाठी आदेश दिले होते इतकेच नाही तर गरीब लोकांना झोपड्या बांधून राहण्यासाठी मोफत साहित्याची तजवीज देखील केलेली दिसून येते.

**लसीकरण:**

प्लेग साकी च्या शेवटच्या टप्प्यामध्ये शाहूमहाराजांनी लोकांना लस टोचून घेण्यासंदर्भात प्रोत्साहित केले लसुन घेणाऱ्या संस्थानातील अधिकाऱ्यांना तीन दिवसाची रजा देखील मंजूर मंजूर करण्याचे धोरण त्यांनी राबवले इतकेच नाही तर श्रमाचे काम करणाऱ्या लोकांना आठवण्याचे बक्षीस आणि संस्थांना मधील लोकांना चाराण्याची पक्षी सुद्धा

शाहू महाराजांनी जाहीर केलेली दिसून येते.५ लोकांच्या मनातील या लसीकरणाच्या संदर्भातील भीती दूर करण्यासाठी स्वतः शाहू महाराजांनी लस टोचून घेतली होती.

शाहू महाराजांनी प्लेग या साथीच्या रोगाच्या संदर्भात शंभर वर्षांपूर्वी केलेल्या उपाय योजना ना त्या संदर्भात काढलेले त्यांचे आदेश आणि जाहीरनामा लक्षात घेतली असता. शाहू महाराज आणि ज्यांनी केलेली उपाय योजना ही किती शास्त्रीय आणि विज्ञानवादी होती हे लक्षात येते.

शंभर वर्षांपूर्वी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानाततून प्लेगला हद्दपार करण्यासाठी केलेले आपत्ती व्यवस्थापन आणि आज देशांमधील कोरण्याचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी केले गेलेले व्यवस्थापन अथवा घेतले गेलेले निर्णय लक्षात घेतले तर छत्रपती शाहू महाराज हे किती विज्ञानवादी विचाराचे होते आणि त्यांनी घेतलेले निर्णय हे किती परिस्थितीसापेक्ष होते. याची प्रचिती येते. पण आज कोरोनाला रोखण्यासाठी आपण केलेला थाळीनाद असो अथवा दिवे बंद करून पणती तेवत ठेवण्याचा प्रकार किती योग्य आणि समर्पक होता. हे लक्षात घ्यायला हवे. आणि म्हणून आजच्या सद्यकालीन परिस्थिती शाहू महाराजांचे कार्य आणि विचार आपल्याला दिशादर्शक आणि मार्गदर्शक ठरू शकतात.

**निष्कर्ष:**

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी शंभर वर्षापूर्वी प्लेग या संसर्गजन्य रोगाच्या निर्मूलनासाठी जी उपाययोजना केली आणि ती आजच्या काळात उपयुक्त ठरू शकते.

२) छत्रपती शाहू महाराज यांनी केलेली उपाययोजना ही शास्त्रीय आणि वैज्ञानिक पद्धतीची होती.

३) छत्रपती शाहू महाराज यांनी प्लेग निवारणार्थ घेतलेले निर्णय आणि केलेली अंमलबजावणी आजच्या काळात मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरू शकते.

४) कोरोना निवारणार्थ थाळया वाजवणे किंवा घरातील दिवे बंद करणे यासारख्या या गोष्टी न करता शाहू महाराजांनी केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्याची अंमलबजावणी करावयास हवी.

**संदर्भ:**

१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ(संपा.), डॉ. पवार जयसिंगराव, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१ पृ.१४.

२) तत्रैव, पृ. ९४३-९४७.

३) तत्रैव, पृ. २२.

४) डॉ. जाधव रमेश (संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. १७२.

५) तत्रैव, पृ. १७३.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी शाहू महाराज : वसा आणि वारसा

डॉ. विश्वाधार रामराव देशमुख
मराठी विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड.
Email- vishvadhard@gmail.com

**प्रस्तावना :-**

**'इतिहासाचे काय करायचे?'** हा समस्त विचारी मानवी समाजापुढील यक्षप्रश्न राहिलेला आहे. उण्यापुऱ्या तीन-साडेतीनशे वर्षांचा इतिहास असलेल्या अमेरिकी समाजासमोर जसा तो प्रश्न उभा आहे तसाच हजारो वर्षांचा इतिहास असलेल्या भारतीय समाजापुढेही तो खडा आहे. इतिहासाला भूतकाळाचे ओझे मानून फेकून द्यायचे की तो आपल्या पूर्वजांशी निगडीत असल्यामुळे त्याला कवटाळून बसायचे? हे मानवी समाज म्हणून आपल्याला अजूनही नीटपणे निश्चित करता आलेले नाही. त्यातही इतिहासातील महामानवांचे काय करायचे? हा सर्वाधिक अडचणीचा भाग आहे. ते मागील काळात होऊन गेले, आता आपण आधुनिक काळात आहोत म्हणून त्यांना विस्मृतीच्या कोशात लोटायचे की आपण त्यांच्या खांद्यावर उभे आहोत म्हणून त्यांच्याप्रती कृतज्ञता बाळगायची? हाही पेच आपण नीटपणे सोडवू शकलेलो नाहीत.परिणामी आपण जेव्हा आधुनिक महाराष्ट्रच नव्हे तर भारतीय इतिहासाला विधायक वळण देणाऱ्या एका महामानवाची पुण्यशताब्दी साजरी करत आहोत,त्यावेळी त्यांचे स्मरण आपण नेमके कशासाठी करायचे? याचे स्पष्ट भान आपणाला असायला हवे.

हे भान बाळगून प्रस्तुत शोधनिबंधातून आपण राजर्षी शाहू महाराज यांचा कोणता 'वसा आणि वारसा' जोपासायला हवा, याचे जागेची मर्यादा लक्षात घेता थोडक्यात विवेचन केले आहे.

कोल्हापूर संस्थानचे अधिपती असलेले राजर्षी शाहू महाराज हे तसे संस्थानिक. स्वातंत्र्यपूर्व भारतात अशी शेकडो संस्थाने होती; पण शाहुंप्रमाणे प्रजेचे प्रेम, आदर आणि सन्मान अन्य कुणाच्या वाट्याला आलेला नाही. यामुळेच त्यांना कोणी 'लोकशाहीचे आद्य प्रवर्तक' संबोधले आहे, कोणी 'समाजक्रांतीकारक राजा' संबोधले आहे, कोणी पौरुष्याचा दीपस्तंभ', कोणी 'ब्राह्मणेतरांचा कैवारी', कोणी 'राजवाड्यात राहणारा लोकनेता' तर कोणी 'आमचा लोकसिद्ध ईश्वर' असे संबोधले आहे. वर उल्लेखलेल्या विशेषणांमधून जसे शाहूंच्या व्यक्तित्वाचे बहुआयामित्व लक्षात येते तसेच आधुनिक भारतातील विचारविश्वाला त्यांच्याप्रती किती आत्मीय आस्था राहिलेली आहे, हेही लक्षात येते.

परंतु ही आस्था समजून घेत असतांना आपण हेही विसरायला नको की एकीकडे शाहूंचा असा गुणगौरव होत असतांना त्यांच्या काळापासून ते अगदी आजपर्यंत त्यांच्याबाबत अनेक आक्षेपही घेण्यात आलेले आहेत. त्यातील काही आक्षेप असे : 'ब्राह्मणशाहीविरुद्ध शाहूंनी बंड केले, पण ब्राह्मणशाहीच्या जागी मराठेशाही प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला', 'ब्राह्मण जगद्गुरुच्या जागी क्षात्र जगद्गुरु आणला', 'वेदोक्ताचा आग्रह धरून इतर दोन वर्णांपेक्षा मराठे क्षत्रिय म्हणून श्रेष्ठ आहेत हे सिद्ध केले', जात्युछेदनाची भूमिका घेऊन प्रत्यक्षात विविध जातिसंघटनांना व जातिपरिषदांना उत्तेजन दिले', 'महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांकडे पाठ फिरवून चातुर्वर्ण्य मानणाऱ्या आर्य समाजाचा पुरस्कार केला' अशा स्वरूपाचे विविध आक्षेप पुरोगामी,परंपरावादी,ब्राह्मण,ब्राह्मणेतर, मराठा, मराठेतर अशा वेगवेगळ्या लोकांनी निरनिराळ्या प्रसंगी घेतलेले आहेत.

एका बाजूला गौरव करणारी विशेषणे आणि दुसऱ्या बाजूला अंतर्विरोध दर्शविणारे आक्षेप यातले काय निवडावे आणि काय नाकारावे याची तौलनिक मीमांसा आवश्यक आहे.

ही मीमांसा करण्यासाठी नरहर कुरुंदकर आणि पुढे शेषराव मोरे यांनी जे सूत्र सांगितले आहे, त्याचा आधार घेणे संयुक्तिक ठरणारे आहे.

कोणत्याही महामानवाचे वेगळेपण समजून घेण्यासाठी त्यांच्या कारकिर्दीचे तीन घटकांत विभाजन करून विचार करायला हवा. त्यातील पहिला घटक म्हणजे त्या महामानवाने मांडलेले तात्त्विक विचार कोणते? दुसरा घटक या तात्त्विक विचारांना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी आखलेले व्यावहारिक किंवा सामाजिक धोरण कोणते? आणि तिसरा घटक या धोरणाच्या आधारे त्यांनी केलेले प्रत्यक्ष कार्य कोणते?

या सूत्रानुसार राजर्षी शाहू महाराज यांचे वेगळेपण समजून घेत असतांना सर्वप्रथम त्यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा विचार करू. हे करतांना आपण हे विसरायला नको की राजर्षी शाहू यांनी आपले तत्त्वज्ञान ग्रंथरूपाने मांडलेले नाही. त्यांच्या विविध भाषणांमधून,पत्रांतून,राजाज्ञांतून हे तत्वज्ञान विखुरलेले आहे. ते प्रत्यक्ष

समाजसुधारक आहेत, सामाजिक तत्त्वचिंतक नाहीत हे आपण लक्षात ठेवायला हवे. त्यांच्या भाषण-पत्र-राजाज्ञा यामधून विखुरलेल्या तत्त्वज्ञानाचा विचार करता ब्राह्मणशाहीविरुद्ध बंड आणि ब्राह्मणेतरांच्या शिक्षणासाठी उत्तेजन,जातिभेदाविरुद्ध आघाडी पण त्याचवेळी जातिसंघटन आणि जातिपरिषदांना उत्तेजन, इहवाद आणि सत्यशोधक विचारांप्रती आस्था पण त्याचवेळी वेदांतील प्राचीन तत्त्वे आणि आर्य समाजाचा पुरस्कार ही त्यांच्या तत्त्वज्ञानातील ठळक तत्त्वे आहेत.

त्यांच्या धोरण आणि प्रत्यक्ष कार्याकडे वळण्यापूर्वी वर उल्लेख केलेल्या तत्त्वांचा थोडक्यात आढावा घेऊ. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी शाहूंचा राज्याभिषेक झाला, त्यानंतर त्यांचे पहिले लक्ष विषमतेची पायाभरणी करणाऱ्या ब्राह्मणशाहीकडे गेले. या काळातील त्यांच्या राजाज्ञा,भाषणे आणि पत्रव्यवहार पाहिला तर ब्राह्मणशाहीचे उच्चाटन हा त्यांचा पहिला प्राधान्यक्रम होता, हे आपल्या लक्षात येते. 'बौद्धिक गुलामगिरीतून सुटून जा!','पृथ्वीवर 'ब्राह्मण' मुळीच नाहीत!' हे त्यांच्या काही भाषणांचे मथळे पाहिले तरी याची सहज प्रचिती येते. एकीकडे ब्राह्मणशाहीविरुद्ध बंड करत असताना दुसरीकडे जे या ब्राह्मणशाहीमुळे शतकानुशतके शिक्षणापासून वंचित राहिले त्या ब्राह्मणेतरांच्या शिक्षणासाठी त्यांचे विशेष लक्ष होते. गुणवत्ता धारण केल्याशिवाय ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांशी स्पर्धा करणे शक्य नाही आणि असे झाल्याशिवाय त्यांना मानसिक गुलामगिरीतून मुक्त होणेही शक्य नाही, हे शाहूंना पक्के ठाऊक होते म्हणून तर 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे!', 'हा विद्येचा समय आहे!', 'विद्यामृतासाठी तुम्हीच कंबर कसा!' असा उपदेश वेळोवेळी त्यांनी आपल्या भाषणांमधून ब्राह्मणेतरांना केलेला आहे.

ब्राह्मणशाहीमुळे जातिभेद टिकून राहिले, म्हणून ब्राह्मणशाहीविरुद्ध बंड पुकारण्यामागील मुख्य हेतू जातिभेदाचे उच्चाटन हा होता यासाठी शाहू राजांनी वेळोवेळी 'जातीचा अभिमान मर्यादित असावा!','जातिभेद मोडून आपण सर्व एक होऊया!' यावर भर दिलेला आहे; परंतु त्याचवेळी 'आपल्या जातीचा पुढारी करा!', 'आपल्या हक्कासाठी झगडा!' अशा भाषणांतून प्रत्येक जातीने आपापले संघटन करून स्वतःचे न्याय्य अधिकार प्राप्त करून घेतल्याशिवाय सामाजिक समतेचा गाडा पुढे सरकणार नाही, अशी भूमिका शाहूंनी घेतलेली आहे.

ब्राह्मणशाहीविरुद्धच्या लढ्याचा भाग म्हणून सत्यशोधक समाजाला शाहूंनी प्रोत्साहन दिले असले तरी वेदांतील प्राचीन तत्त्वांवर त्यांची आत्मीय आस्था होती.म्हणून तर 'जनी जनार्दन शोधणे हाच खरा धर्म!' अशा विचारांतून इहवादाची पाठराखण करणारे शाहू महाराज 'आर्यधर्म समता व राष्ट्रैक्य वाढवील!' असे मानून आर्य धर्माला सर्वश्रेष्ठ धर्म मानतात.

तत्त्व,धोरण आणि प्रत्यक्ष कार्य या त्रिसुत्रीमधील समन्वय लक्षात न आल्याने बहुतेकजण शाहूंच्या भाषणांतील आणि पत्रांमधील मजकूर अधोरेखित करून त्यांच्यावर आक्षेप नोंदवतात. परंतु आपण जेव्हा राजर्षी शाहू यांनी आपल्या तत्त्वाचे अगोदर धोरणांत आणि पुढे प्रत्यक्ष कार्यात कसे रुपांतर केले, हे पाहतो तेव्हा त्यांच्या कारकिर्दीचे मोठेपण आपल्या लक्षात येते.

'ब्राह्मणशाहीचे उच्चाटन' या तत्त्वाचे धोरणांत रुपांतर करतांना राजर्षी शाहू यांनी दूरदृष्टीने कार्यक्रम आखले. कोल्हापूर दरबारांतील ब्राह्मण अधिकाऱ्यांची टक्केवारी कमी करण्याचा निर्णय घेतला आणि या धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून दरबाराच्या नोकरीतील ब्राह्मणांचे प्रमाण ८५ टक्क्यांवरून ३२ टक्क्यांपर्यंत खाली आणले.

'ब्राह्मणेतरांचे शिक्षण' या तत्त्वाला धोरणाचे रूप देतांना अगोदर सर्वांना एकत्रित शिक्षणाचे धोरण आखले; परंतु यातून गळतीचे प्रमाण वाढत असल्याचे लक्षात येताच जातीनिहाय वसतिगृहे आणि अस्पृश्यांसाठी वेगळ्या शाळा आणि वसतिगृहे उघडण्याचा निर्णय घेतला. जातिभेद मोडण्याच्या कामांत अग्रेसर असणाऱ्या शाहूराजांचा हा निर्णय अनेकांना अनाकलनीय वाटतो; 'जातनिरपेक्षपणे सर्वांसाठी एकच संस्था आणि वसतिगृह असणे हे सर्वोत्तम: पण तीव्र जातिभेद शिल्लक असेपर्यंत प्रत्येकाच्या प्रगतीसाठी वेगळ्या व्यवस्था हाच सामाजिक समतेकडे जाणारा व्यावहारिक मार्ग' ही शाहूंची धोरणात्मक भूमिका होती आणि अशी शाळा-वसतिगृहे स्थापन करून त्यांनी ती प्रत्यक्षात आणून दाखविली.

'जातिभेदाविरुद्ध आघाडी पण त्याचवेळी जातिसंघटन आणि जातिपरिषदांना उत्तेजन' या तत्त्वाचे धोरण आणि कार्यातील रुपांतर समजून घेणे मोठे क्लिष्ट आहे. कारण जातिभेदाचे निर्मूलन करण्याचे ध्येय बाळगणाऱ्यांनी जातिसंघटना स्थापन करण्याच्या कामी पुढाकार घ्यावा ही गोष्ट न पटणारी आहे; परंतु अगोदर जातिसंघटन आणि त्यातून पुढे जातिनिमुर्लन असा शाहूंचा कार्यक्रम होता. त्यांनी जातिपरिषदांच्या व्यासपीठावरून केलेली भाषणे पाहिली तर या परिषदांचा सर्वाधिक उपयोग त्यांनी जातिनिर्मूलनविषयक प्रबोधनासाठी केल्याचे दिसते.

'इहवाद आणि सत्यशोधक विचारांप्रती आस्था; पण त्याचवेळी वेदांतील प्राचीन तत्त्वे आणि आर्य समाजाचा पुरस्कार' या तत्त्वाचे व्यावहारिक प्रारूप समजून घेताना राजर्षी शाहू हे धर्माचा कसा डोळस स्वीकार करत होते, हे समजून घ्यायला हवे. 'परमेश्वराला पूजा,श्रद्धा किंवा प्रार्थना यांची काही गरज नाही.तो आपल्याच

कायद्यांनी बद्ध झालेला कैदी असल्यामुळे तो सर्वशक्तिमान नाही....म्हणून स्तुती करावी मनुष्याची,करू नये परमेश्वराची!' इतकी शाहूंची स्वच्छ आणि स्पष्ट भूमिका होती. म्हणजे ते इहवादी होते.यातूनच त्यांनी क्षात्रजगद्गुरू पीठ निर्माण केले, सत्यशोधक समाजाला प्रोत्साहन दिले; परंतु त्याचवेळी वेदांविषयी त्यांना प्रगाढ आकर्षण होते आणि या आकर्षणातूनच ते आर्य समाजाकडे ओढले गेले. यातूनच 'आर्य समाज हा राष्ट्रीय धर्म आहे आणि पुढे तो जागतिक धर्म बनेल' असा आशावाद त्यांनी बाळगला होता. यामुळे आर्य समाजाच्या प्रसार आणि प्रचारासाठी त्यांनी निरनिराळी धोरणे आखली, 'सत्यार्थप्रकाश' हा आर्य समाजाचा ग्रंथ अभ्यासासाठी नेमला. यात भले कुणाला अंतर्विरोध जाणवत असेल; परंतु धर्माला पायदळी तुडवायचे नाही मात्र त्याचवेळी त्याला डोक्यावर घेऊन नाचायचेही नाही हे शाहूंचे स्पष्ट धोरण होते. या धोरणाचे ठळक प्रतिबिंब त्यांच्या प्रत्यक्ष कार्यात पडल्याचे दिसून येते.

वरील चर्चेचा आधार घेऊन आता या पुण्यशताब्दी वर्षांत राजर्षी शाहू महाराज यांचा कोणता वसा आणि वारसा आपण जोपासायला हवा, याचा थोडक्यात वेध घेऊ.

कोणतीही एकंच एक टोकदार भूमिका न घेता समन्वयाचा अंगीकार करणे हे शाहूंच्या व्यक्तित्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते; हा समन्वयाचा वसा आपण जोपासायला हवा.शाहूंनी ब्राह्मणशाहीला विरोध केला,पण ब्राह्मण समाजाविषयी त्यांच्या मनात कटुता नव्हती; म्हणून तर लोकसंख्येने केवळ तीन टक्के असलेल्या ब्राह्मण समाजाचे दरबाराच्या नोकरीतील प्रमाण कमी करूनही ३२ टक्क्यांपर्यंत ते त्यांनी कायम ठेवले. यावरून कोणत्याही समाजाविषयी शत्रुभाव बाळगून राज्य करता येत नसते, हे आपण लक्षात घ्यायला हवे. इहवाद आणि अध्यात्म यांना परस्परांच्या विरोधात उभे न करता किंवा धर्म विरुद्ध विज्ञान अशी वर्गवारी न करता त्यांत सामंजस्य साधायला हवे, यावर राजर्षी शाहू यांचा भर होता. समकाळात त्यांचा हा वारसा आपण निष्ठेने जोपासायला हवा.

थोडक्यात काय तर वर्तमानाचे स्वच्छ आकलन होण्यासाठी इतिहास साह्यभूत ठरणारा असतो तर आपली वाटचाल योग्य दिशेने आहे की नाही याचा पडताळा करण्यासाठी महामानवांच्या पाऊलखुणा पूरक ठरणाऱ्या असतात. त्यांचा सार्थक उपयोग करण्याचा विवेक समाज म्हणून आपल्या अंगी असायला हवा,एवढे मात्र नक्की!

**निवडक संदर्भ :**


1) Edi. P.C.Chatterji, *'Self Images, Identity & Nationality'* Indian Institute of Advanced Study, Shimla, 1989
2) Edi. Sushil Mittal & Others, *Studying Hinduism : Key Concepts & Methods*, Routledge, 2008.
3) Bhikhu Parekh, *Colonialism, Tradition & Reform : An Analysis of Ganndhi's Political Discourse*, Sage Publications, Delhi, 1989.
4) संपा. डॉ. जयसिंगराव पवार, *राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,* महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर,२००१.
5) नरहर कुरुंदकर, *अन्वय* , देशमुख आणि कंपनी,पुणे, १९७६

International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16 May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील कार्य

**प्रा. किरण गणपत कुंभार**
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
Email- kirangkumbhar@gmail.com

**प्रास्ताविक**

शारीरिक, मानसिक, सामाजिक दृष्टिने व्यवस्थित आणि रोगमुक्त असण्याची अवस्था म्हणजेच आरोग्य होय. आरोग्य म्हणजे समाजाच्या किंवा एकूण लोकसंख्येच्या आरोग्याची अवस्था होय. लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे, त्यांची गुणवत्ता वाढविणे व ते सुधारणे यांसाठी समाजाने संघटित केलेल्या प्रयत्नांना 'सार्वजनिक आरोग्य' म्हणतात. सार्वजनिक आरोग्यविषयक कार्यक्रम व सेवा आणि त्यात कार्यरत असलेल्या संस्था यांमध्ये रोगांचा प्रतिबंध करणे, समग्र लोकसंख्येच्या आरोग्यविषयक गरजा भागविणे यांच्यावार भर दिला जातो. रोगांचे प्रमाण, अकाल मृत्यू, शारीरिक दौर्बल्य, अस्वास्थ्य, कुपोषण,साथीचे रोग इ. कमी करणे हे सार्वजनिक आरोग्याचे पूरक उद्दिष्ट असते. तसेच शारीरिक व मानसिक आरोग्य, स्वच्छता, यांचे संवर्धन, संसर्गाचे नियंत्रण करणे, आरोग्यसेवा संघटित करणे आणि मानवी आयुर्मान वाढविणे या गोष्टी सार्वजनिक आरोग्यात येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेविषयी ब्रिटीश सरकार उदासीन असल्याचे दिसते. स्थानीक पातळीवर आरोग्य विषयक सोई सुविधा ब्रिटीश प्रशासनाबरोबर संस्थान प्रशासणातून केल्या जात होत्या. कोल्हापूर संस्थानात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील आरोग्य विभाग कार्य करत होता. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सार्वजनिक आरोग्याकडे अत्यंत गांभीर्याने लक्ष दिले.

**आयुर्वेदिक औषध उपचार**

कोल्हापूर संस्थानातील रयतेला आयुर्वेदिक औषध उपचार सुलभतेने मिळावेत आणि रोग उपचार व्हावेत यासाठी राजर्षी शाहू महाराज प्रयत्नशील होते. १४ डिसेंबर १८९५ रोजी छत्रपती शाहू महाराजांची पणजी अहिल्याबाई राणीसाहेब यांचे देहावसान झाले. कोल्हापुरातील मुलींच्या शिक्षण कार्यात त्या राणीसाहेब उत्साहाने भाग घेत. छत्रपती शाहू महाराजांनी तिच्या स्मरणार्थ आणि कोल्हापूर संस्थानातील रयतेला आयुर्वेदिक औषध उपचार सुलभतेने मिळावेत यासाठी १५ ऑक्टोंबर १८९६ रोजी अनुभवी वैद्यांच्या देखरेखीखाली एक आयुर्वेदिक औषधालय सुरू केले या औषधालयाचा लाभ संस्थानातील गरीब जनतेस झाला.[१]

**प्लगेची साथ**

१८९५-९६ मध्ये दुष्काळाच्या पाठोपाठ प्लगेची भयंकर मोठी साथ मुंबईत सुरू झाली. १८९६ च्या डिसेंबरपासून ती कराची, भिवंडी व पुणे येथे पसरली. कोल्हापूर दरबारने त्या संकटाच्याविरुद्ध अगोदरच उपाययोजना आखून ठेवली होती. प्लेगने सातारा आणि बेळगाव जिल्ह्यांतील खेड्यांतून कहर उडवून दिला होता. कोल्हापूरच्या सरहद्दीवरील मराठा संस्थानामध्येही प्लेगने धुमाकूळ मांडला होता. राजर्षी छत्रपती शाहू यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर दरबारने प्लेगच्याविरुद्ध जी उपाययोजना केली होती त्यामुळे काही दिवस तरी प्लेगचा प्रवेश कोल्हापूर संस्थानात झाला नाही. पुढे १९०० मध्ये कोल्हापूर संस्थानात प्लेग सुरू झाला होता. पावसाच्या अभावी ह्या वर्षी शेती बुडाली होती. भास्करराव जाधवांना ४ सप्टेंबर १८९९ पासून दुय्यम प्लेग आयुक्त म्हणून नेमण्यात आले. शिवाय १ जानेवारी १९०० पासून त्यांना सहायक जिल्हा अधिकारी म्हणून नेमण्यात आले. आधुनिक यंत्रसामुग्रीचा राज्यकारभारात योग्य उपयोग करावयास शाहू कधी चुकत नसत. दुष्काळाच्या व अवर्षणाच्या काळात अधिकाऱ्यांना निर्णय त्वरित देता यावेत म्हणून त्यांनी पन्हाळा येथील राजवाडा व कोल्हापूरचा राजवाडा तसेच ब्रिटिश राजप्रतिनिधीचे कार्यालय ही दूरध्वनींनी जोडली होती. यामुळे प्लेगच्या बाबतीतील

अडचणींचा व तक्रारींचा झटपट निर्णय करून घेण्याची सोय झाली. प्लेग व दुष्काळ यांचा अधिक प्रसार होऊ नये म्हणून तातडीच्या उपाययोजना अमलात आणण्यात आल्या. दरबारने स्वस्त दराने गवत विकण्याची सोय केली. ज्या गुरांना त्यांचे धनी पोसू शकत नव्हते त्यांच्याही दाणागोट्याची सोय करण्यात आली. शेतकऱ्यांना जमीन महसुलाची तहकुबी देण्यात आली. प्लेगच्या ह्या काळात छत्रपतींनी २५ नोव्हेंबर १८९९ रोजी रे यांना पन्हाळयाहून पत्र लिहिले की, ‘कोटितीर्थ येथील प्लेग रुग्णालयाला मी दररोज भेट देत असे तशी भेट आता देऊ शकत नाही. तथापि मी कोल्हापूरला मधून मधून जात असतो आणि शहरात सर्व व्यवस्थेची पाहणी करून आवश्यक तेथे सूचना करतो जुना आणि नवा राजवाडा यांतही प्लेगचे उंदीर पडले हे पाहून हळहळ वाटते. जंतुनाशक औषधांनी ते राजवाडे स्वच्छ करण्यात येत आहेत आणि थोड्याच काळात ते राहण्यास योग्य होतील असे वाटते. दुष्काळपीडित भागाला भेट देण्यासाठी मी थोडे दिवस बाहेर जात आहे. सध्या ह्या भागात शेतकरी पिके गोळा करीत आहेत आणि शेतकी कार्यासाठी मजुरांना अजूनही मागणी आहे’ दुष्काळ व प्लेगच्या काळात छत्रपती शाहू महाराज अविरतपणे काम करीत असत. १८९९ च्या डिसेंबरमध्ये ते आपल्या एका पत्रात म्हणतात, "पन्हाळा राजवाड्यात मी फक्त झोपतो, इतर सारा वेळ मी कार्यालयात काम करण्यातच व्यग्र असतो. सकाळचा वेळ मी शहरातील प्लेगची कामे कशी चालली आहेत.[२]

**प्लगेची आणि पटकी साथीवरील उपययोजना**

खेड्यांतील लोकांना व शेतकऱ्यांना आपली गाऱ्हाणी व अडचणी प्रत्यक्ष आपल्या राजासमोर मांडता याव्यात म्हणून महाराजांनी आपले वास्तव्य पन्हाळगडावरच ठेवले होते. आजूबाजूच्या खेड्यांतून पाहणी करीत फिरत असलेल्या, निरनिराळया जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांना त्यांना तेथे भेटणे सोईचे झाले. त्या भयंकर प्लेगच्या दिवसांत शाहूंनी स्वस्त धान्याची दुकाने उघडलीच; शिवाय काही अनाथालयेसुद्धा उघडली. लोकांत निर्माण झालेली बेकारी निवारण्यासाठी जेथे पाण्याचा पुरवठा होता तेथे त्यांनी सरकारी सार्वजनिक कामे सुरू करून बेकारीला आळा घालण्याचा प्रयत्न केला. प्लेगच्या काळात शेतकऱ्यांना तगाई मंजूर केली. पटकीच्या दिवसांत खेड्यापाड्यांत स्वच्छता राखली. पिण्याचे पाणी दूषित होऊ नये म्हणून खबरदारी घेतली. लोकांचे आरोग्य सांभाळण्यासाठी सरकारी खर्चाने फुकट औषधोपचार केले. त्या भयंकर काळात यात्रा स्थगित केल्या होत्या. प्लेगची बातमी देणाऱ्यांना बक्षिसे देण्यात आली. प्लेगपीडित लोकांच्या निरीक्षणासाठी छावण्या काढण्यात आल्या. दुर्बल आणि गरीब जनतेला अन्न मोफत पुरविण्यात आले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानात दुष्काळापासून होणाऱ्या हालअपेष्टांची तीव्रता कमी झाली. शिरोळ, रायबाग आणि कोकण भागांतील लोकांनी प्लेगचा प्रादुर्भाव झाला आहे किंवा नाही याची माहिती दिली नाही व त्या बाबतीत सहकार्य केले नाही हीच शाहूंची खरी विवंचना होती. त्यावेळी मित्राला लिहिलेल्या एका पत्रात चिंताग्रस्त झालेल्या शाहूंनी असे म्हटले की, 'प्लेगच्या धुमश्चक्रीमुळे परिणाम असा झाला आहे की, दुसऱ्या ठिकाणी वस्तूंचे भाव कडाडले आहेत आणि ते कोणत्या शिखरास पोहोचतील हे सांगता येत नाही.' पण योग्य सावधगिरी बाळगल्यामुळे तशी परिस्थिती निर्माण झाली नाही.[३] प्लेगची साथ पसरली तेव्हा या साथीला सूक्ष्मपणे तोंड देण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करून घराची स्वच्छता कशी राखावी, प्लेगचा उंदीर कसा जाळावा, कोणत्या औषधांचा वापर करावा याच्या सूचना देण्यात आल्या. प्लेगची लागण झालेल्या रुग्णांनी शेतात रहावे याकरिता झोपड्या बांधण्यासाठी सरकारकडून अल्प दराने साहित्याचा पुरवठा करण्यात आला. निर्जंतुकीकरणाची औषधी मोफत देण्यात आली. कोल्हापूर शहरात येणाऱ्या प्लेगच्या रुग्णांकरिता 'क्वॉरंटीन कॅम्प' सुरू केले. रूग्णांकरिता कोटीतीर्थ येथे हॉस्पिटल सुरू केले. सन १९१०-११ मध्ये महाराजांनी आपले कुटुंबीय आणि सेवकवर्ग या सर्वांसहित स्वत:लाही प्लेगची लस टोचून घेतली. प्लेगव्यतिरिक्त इन्फ्लूएन्झा आणि कॉलरा या दोन रोगांवरही उपाययोजना करण्यात आल्या.[४] नवीन ब्रिटिश राजनैतिक प्रतिनिधी ए. एम. टी. जॅक्सन हे शाहूंच्या कार्याचे निरीक्षण करीत होते. आपल्या प्रजेच्या अत्यंत वाईट परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी अविरतपणे

झटणाऱ्या शाहूंचे कार्य पाहून त्यांना अत्यंत समाधान झाले. १९०० च्या एप्रिलमध्ये जॅक्सन म्हणाले, 'आपण जातीने प्लेगच्या काळात त्रस्त झालेल्या जनतेला केलेल्या यशस्वी शासकीय मदतीबद्दल आपले अभिनंदन मी करणे यथोचित होईल.'[५]

सन १९०६ च्या प्रारंभी कोल्हापुरात प्लेग सुरूच होता. त्याचा कहर कमी होताच कोल्हापुरावर दुसरे संकट कोसळले. त्यामुळे संस्थानला अनेक दिवस चिंतेत कंठावे लागले. पाण्याच्या कमतरतेमुळे १९०६ साली मार्च-एप्रिलमध्ये कॉलरा सुरू झाला. आणि मृत्यूचे प्रमाण भरमसाट वाढले. शाहूंच्या धीरोदात्त मार्गदर्शनामुळे व उत्तेजनामुळे कोल्हापूर त्या भयंकर संकटातून बाहेर पडले.[६]

**होमिओपॅथिक उपचार पद्धती**

डॉक्टर बोरकर या होमिओपॅथिक उपचार पद्धती चे तज्ञ वैद्यकीय व्यवसाय करीत होते. त्यांच्या होमिओपॅथिक उपचार पद्धतीचे ज्ञान लक्षात घेऊन राजश्री शाहू यांनी बोरकर यांना राजाश्रय दिला. आणि आपले होमिओपॅथिक ज्ञान वाढवण्याची संधी त्यांना उपलब्ध करून दिली १८९८ च्या प्लेग साथी वेळी महाराजांनी होमिओपॅथीचे साईज घेण्याचेही ठरवले होते आणि डॉक्टर बोरकर यांच्या सहाय्याने कोल्हापुरात होमिओपॅथी चा दवाखाना सुरू केला. या दवाखान्यात गरजू चे मोफत इलाज केले जात होते. हा करवीर राज्यातीलच नव्हे तर सर्व देशातील पहिला होमिओपॅथिक सार्वजनिक दवाखाना होता. वैद्यकीय क्षेत्रातील होमिओपॅथिक उपचार पद्धतीचा स्वीकार व प्रसार हे त्यांच्या अशा प्रयोगशीलतेचे व जनतेचे कल्याण करण्याच्या दृष्टी चे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.[७]

**वैद्यकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग**

स्त्रियांमध्ये सेवा व सुश्रूषा करण्याचा नैसर्गिक गुण असतो हे छत्रपती शाहू महाराज जाणून होते . तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात स्त्रियांच्या योगदानाचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टिकोनाने कृष्णाबाई केळवकर यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवून त्यांना डॉक्टर बनविले आणि कोल्हापूरच्या एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल मध्ये. वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणून दिली. पुढे महाराजांच्या प्रोत्साहनाने व अर्थसहाय्याने त्या उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्लंडला गेल्या आणि उच्चविद्याविभूषित होऊन कोल्हापूर संस्थानाच्या सेवेत पुन्हा रुजू झाल्या.[८]

**संस्थात्मक कार्य**

अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटलची सन १८८१ मध्ये पायाभरणी केली आणि हे हॉस्पिटल सन १८८४ मध्ये बांधून पूर्ण झाले. सन १८९६ मध्ये राणी अहिल्याबाई देशी दवाखाना सुरू करण्यात आला. सन १९०१ मध्ये राणी सकवारबाई युनानी दवाखाना सुरू करण्यात आला. सन १९१६ मध्ये क्षयरोग्यांकरिता त्र्यंबोली येथे क्लॉड हिल सॅनिटोरियम बांधण्यात आले. सन १९१५ मध्ये शाहू छत्रपती आर्योषधी कारखाना सुरू केला. शाहू महाराज एकदा नृसिंहवाडीला गेले असता तेथील महारोग्यांची दीनवाणी अवस्था त्यांनी पाहिली. या महारोग्यांकरिता वेगळी वसाहत करावयास हवी याची महाराजांना जाणीव झाली. त्यांनी सन १८९७ मध्ये कोल्हापुरात 'व्हिक्टोरिया लेपर अझायलम' या नावाने महारोग्यांची वेगळी वसाहत निर्माण केली. शेंडापार्कात असणारी ही वसाहत पुढे अणुस्कुरा घाटाकडे स्थलांतरित करण्यात आली.[९]

**समारोप**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सर्व क्षेत्रातील कार्य अलौकिक आहे. सामाजिक सुधारणेबरोबरच राजर्षींनी साहित्य, कला, कुस्ती, शेती सुधारणा, जलप्रकल्प उभारणी अशा विविध क्षेत्रांत अजोड कामगिरी केली या सर्व क्षेत्रा बरोबर सार्वजनिक आरोग्य यावरही शाहू महाराजांनी लक्ष दिल्याचे दिसते. महाराजांनी आपल्या संस्थानात केलेल्या लहान-लहान सुधारणा या संस्थानातील गोरगरीब रयतेच्या हिताच्या होत्या. आरोग्यव्यवस्था राज्यातील प्रजा सुखी आणि निरोगी राहावयाची असेल तर आरोग्य व्यवस्था सक्षम असावयास हवी या जाणिवेतून शाहू महाराजांनी सार्वजनिक आरोग्य सुविधा आणि साथीच्या रोगांच्या काळात सक्षमतेने आणि मानवतावादी भूमिकेतून कार्य केले.

शाहूंना अशा अनेक अडचणींतून आणि त्रासातून मार्गक्रमण करावे लागले. शाहू महाराजांनी आपल्या प्रजाजनांना प्लेगच्या व दुष्काळाच्या आणि प्लेगच्या तावडीतून सुखरूपपणे बाहेर काढण्यासाठी अविरत प्रयत्न केले. महाराजांची उपाययोजना इतकी तातडीची, दूरगामी व सर्वव्यापी होती. प्लेग साथीमध्ये केलेल्या उपाय योजनांमुळे कोल्हापूर संस्थानात प्लेगचा प्रादुर्भाव कमी झाला. लोकांना रोग अवस्थेतून लवकरात लवकर बरे वाटावे म्हणून महाराजांनी आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक उपचार पद्धतीचा उपयोग केला. वैद्यकीय क्षेत्रात काम करण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहित केले. आरोग्य विषयक संस्थात्मक काम करून रयतेला दिलासा दिला.

**संदर्भ**


१. किर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती,२०११, पृ.६५

२. कित्ता, ७५

३. कित्ता ८३

४. डॉ. फाळके केदार, जडण-घडन, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची प्रशासकीय व्यवस्था, संपा डॉ. रघुनाथ माशेलकर, सागर देशपांडे , मे २०२२, पृ.४१

५. किर धनंजय, उपरोक्त, पृ. ८४

६. कित्ता, पृ. १७२

७. डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.७०७

८. कित्ता, पृ. १२३

९. डॉ. फाळके केदार, उपरोक्त, पृ.४१

International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छ. शाहू महाराज आणि पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
प्राध्यापक, इतिहास विभाग, प्रा. डॉ.एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर – पेरीड ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर
शिवाजी विद्यापीठ संलग्न
Email- supriyakhole33@gmail.com

**प्रस्तावना**

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या शैक्षणिक वाटचालीचा इतिहास राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. ब्रिटिश अधिसत्तेच्या अंतर्गत त्यांना मिळालेले अधिकार आणि संपत्ती याचा वापर त्यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी केला. शिक्षण घेण्यात या लोकांना नेमक्या कोणत्या अडचणी येतात याची जाणीव असणाऱ्या शाहूराजांनी त्या अडचणी दूर करत शिक्षण प्रसारासाठी अथक प्रयत्न केले. त्यांनी सुरू केलेली वसतिगृहे ही या वाटचालीतील मैलाचा दगड ठरली. या वसतिगृहांचा फायदा या काळात हजारो जणांनी घेतला. कोल्हापूर शैक्षणिक केंद्र बनले. येथे शिकलेल्या अनेक तरुणांनी महाराष्ट्राच्या त्याचप्रमाणे भारताच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली. यापैकीच एक अत्यंत महत्त्वपूर्ण नाव म्हणजे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील. खेड्यापाड्यात शिक्षणाची गंगा पोहोचविणाऱ्या कर्मवीरांची सुरुवातीची जडणघडण कोल्हापुरात झाली. प्रत्यक्ष शाहू राजांचा आश्रय त्यांना लाभला. शाहूराजांचे व्यक्तिमत्व, त्यांचे कार्य या सर्वांचा त्यांच्यावर दूरगामी परिणाम झाला. समाज सुधारणेकडे त्यांचीही वाटचाल सुरू झाली. या गुरूंचे स्मरण कर्मवीरांनी सतत ठेवले आणि शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून त्यांना आदरांजली वाहिली.

**शोधनिबंधाचा उद्देश -**

बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आपल्या सत्तेच्या अधिकाराचा वापर करणारे शाहू महाराज आणि त्यांना प्रेरणास्थानी ठेवणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य खूप महत्वाचे ठरले. राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या कार्याचा, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर पडलेल्या प्रभावाचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कोल्हापूरातील वास्तव्य**

लहानपणापासून अत्यंत बंडखोर आणि हुड स्वभावाच्या कर्मवीरांचे प्राथमिक शिक्षण विविध गावात पूर्ण झाले. कारण त्यांचे वडील महसूल खात्यात क्लार्क म्हणून काम करत असल्यामुळे त्यांच्या विविध गावात बदल्या झाल्या. इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी त्यांना सन १९०२ मध्ये कोल्हापूर येथे ठेवले. त्यांनी राजाराम हायस्कूल मध्ये प्रवेश घेतला. [१] कोल्हापूर संस्थांनाची राजधानी असलेले कोल्हापूर शहर हे या काळात शैक्षणिक केंद्र बनले होते. यामागचे सर्वात महत्वाचे कारण होते ते म्हणजे राजर्षी छ. शाहू महाराजांनी शैक्षणिक विकासासाठी केलेले प्रयत्न ! बहुजन समाजाला शिक्षण मिळावे यासाठी शाहूराजांनी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी अनेक कायदे केले. संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचा करणारा कायदा तर क्रांतिकारी होता.[२] समाजातील जातिभेद सहजासहजी नष्ट होणे शक्य नाही याची जाणीव महाराजांना होती. कोल्हापूरातील महाविद्यालयांला जोडून असलेल्या सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्रित हॉस्टेलचा प्रयोग यशस्वी झाला नव्हता. बऱ्याच विचाराअंती त्यांनी विविध जातीधर्माच्या विद्यार्थ्यांच्या राहण्या जेवणाची व्यवस्था करत कोल्हापूर शहरात वसतिगृहे स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन द्यायला सुरुवात केली. १८ एप्रिल १९०१ मध्ये कोल्हापूरातील पहिले वसतिगृह व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग स्थापन झाले. वसतिगृह चळवळीची सुरुवात झाली. पुढे १९२० पर्यंत शाहू राजांच्या मदतीतून इतर जातीधर्मियांची वीस वसतिगृहे उभी राहिली. याचा फायदा कोल्हापूरात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या खेड्यापाड्यातील अनेक विद्यार्थ्यांना झाला.[३]

दक्षिण भारत जैन सभेने १९०२ मध्ये कोल्हापूरात सुरू केलेल्या दिगंबर जैन वसतिगृहासही शाहू राजांनी खूप मदत केली. जैन समाजातील अनेक विद्यार्थ्यांनी या वसतिगृहात प्रवेश घेतला. कर्मवीरांच्या वडिलांनीही त्यांना येथे ठेवले. कोल्हापूरातील वास्तव्य, येथील शैक्षणिक - सामाजिक वातावरण, शाहूराजांनी बहूजन समाजाच्या उद्धारासाठी केलेले विविध प्रयत्न या सर्वांचा तरुण वयातील कर्मवीरांच्या मनावर परिणाम झाला. कोल्हापूरातील कर्मवीरांचे वास्तव्य त्यांच्या भावी शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवणारे ठरले.[४]

**वसतीगृहातील कर्मवीरांची बंडखोरी**

दिगंबर जैन समाज हा पारंपारीक नीती नियम पाळणारा, सोवळे – ओवाळे सांभाळणारा होता. जैन वसतिगृहाचेही तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनेक नियम होते. उदा. बाहेरून आल्यावर विद्यार्थ्यांनी आंघोळ करावी, जेवणा अगोदर दाढी करावी, सोवळे नेसूनच जेवण करावे इ.नियमांचे पालन न करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षा केली जात असे. जाती भेदाचा तिटकारा असणाऱ्या आणि कालबाह्य सामाजिक प्रथा परंपराना अगोदर पासूनच विरोध करणाऱ्या कर्मवीरांना हे नियम मान्य होणे केवळ अशक्य होते. यामूळे वसतिगृहात अनेकदा संघर्षाचे प्रसंग आले. विशेषतः कधीही न धुतले जाणारे सोवळे नेसून जेवायला बसायचे त्यांनी अमान्य केले. ही सोवळयाची वस्त्रे अंथरूण म्हणून स्वयंपाकी लोक रात्रीच्या वेळी झोपायला घेतात ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. तेंव्हा विरोध अधिकच वाढला. यावेळी बोर्डिंगचे व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या श्री. भारदोरे यांच्या बरोबर कर्मवीरांचे यावरून वाद झाले. त्यांनी कर्मवीरांना शिक्षाही केली पण कर्मवीरांनी सोवळे वापरण्यास पूर्ण नकार दिला.[५]

**वसतिगृहातून कर्मवीरांची हकालपट्टी**

कोल्हापुरात शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने हरिजन विद्यार्थ्यांसाठी 'मिस क्लार्क हॉस्टेल 'सुरू करण्यात आले. याच्या उद्घाटन समारंभाला कर्मवीर हजर राहिले. समारंभ संपल्यावर ते जैन वसतीगृहात परतले. व्यवस्थापक भारदोरे यांना ही गोष्ट समजली तेंव्हा त्यांनी कर्मवीरांना आंघोळ करून शुद्ध व्हायला सांगितले. केवळ हरिजन वसतिगृहाच्या उद्घाटनास गेल्यामुळे आपण विटाळले आहोत हेच कर्मवीरांना मान्य नव्हते. त्यांनी आंघोळ करण्यास स्पष्टपणे नकार दिला. कर्मवीरांना जेवण देण्यास प्रतिबंध केला गेला. भोजनगृहाचे दरवाजे बंद करण्यात आले. रागावलेल्या कर्मवीरांनी खिडकीची काच फोडून भोजनगृहात प्रवेश केला आणि जेवण केले. हे प्रकरण शेवटी वसतिगृहाचे मुख्य अधीक्षक श्री. आण्णासाहेब लठ्ठे यांच्याकडे गेले. वसतिगृहाचे नियम मोडणाऱ्या या विद्यार्थ्यास त्यांनी वसतिगृह सोडण्यास सांगितले. कर्मवीरांनी वसतिगृह सोडले परंतू अस्पृश्यतेचे पालन करणाऱ्या प्रथेला असलेला विरोध सोडला नाही.[६]

**राजवाड्यात वास्तव्य**

दिगंबर जैन वसतिगृहातून बाहेर पडल्यावर कर्मवीर आपले साहित्य घेऊन स्टेशनच्या दिशेने निघाले होते. त्यावेळी वाटेत त्यांचा शाळेतील मित्र बाळासाहेब खानविलकर भेटला. या मित्राचे वास्तव्य शाहू राजांच्या वाड्यात होते. त्याचे वडील हे राजांचे नातेवाईक होते. या मित्राने त्यांना वाड्यावर नेले. भाऊरावांच्या बंडखोरीबद्दल शाहू राजांना सांगण्यात आले. हे ऐकून शाहू राजांना आनंद झाला. या काळात त्यांनी काही विद्यार्थ्यांना राजवाड्यावर ठेवून घेतले होते. कर्मवीरांचीही राजवाड्यात सोय करण्यात आली. आता कर्मवीर राजवाड्यातून शाळेत जाऊ लागले. १९०९ पर्यंत त्यांचे राजवाड्यात वास्तव्य होते.[७] या काळात शाहू राजांना खूप जवळून पाहण्याची संधी त्यांना मिळाली. राजांचे अस्पृश्योद्धाराचे, समाजसुधारणेचे कार्य त्यांनी खूप जवळून अनुभवले. अंगपिंडाने मजबूत असलेल्या कर्मवीरांवर शाहू राजांची विशेष मर्जी होती. उत्तम दर्जाचा खुराक, कुस्ती यामुळे कर्मवीरांची तब्येत चांगलीच सुधारली मात्र अभ्यासात मात्र त्यांची प्रगती यथातधाच राहिली. कर्मवीर इंग्रजी सहावी वर्गात होते त्यावेळी वार्षिक परीक्षेत अंकगणित विषयात त्यांना खूप कमी मार्क मिळाले.त्यामुळे मॅट्रिकच्या वर्गात जाऊ शकले नाहीत. भार्गवराव कुलकर्णी या कडक शिस्तीच्या शिक्षकांकडे वरच्या वर्गात घालण्यासाठी विनंत्या केल्या. अगदी शाहू महाराजांकरवीही सांगून बघितले. शाहू महाराजांनी चिठ्ठीही दिली मात्र त्यांनी पूर्णपणे नकार दिला. यामुळे कर्मवीरांना शिक्षण थांबवावे लागले. कोल्हापूरातील एकूण सात वर्षाचे कर्मवीरांचे वास्तव्य त्यांच्या पुढील कार्याची पायाभरणी करणारे ठरले. शाहू राजांचा समाजसुधारणेचा, बहुजनांचा उद्धाराचा दृष्टीकोण त्यांच्यातही निर्माण झाला. कोल्हापूर सोडून कर्मवीर घरी परतले. [८]

**रयत शिक्षण संस्थेची स्थापना**

कर्मवीर कोल्हापूरातून बाहेर पडले पण एका दुर्दैवी प्रकरणामुळे त्यांना १९१४ मध्ये कोल्हापूरात यावे लागले. ते म्हणजे एडवर्ड पुतळयाला डांबर फासल्याचे प्रकरण. या प्रकरणी ज्यांच्यावर संशय होता त्या अण्णासाहेब लठ्ठे यांच्या विरोधात जबाब देण्यासाठी कर्मवीरांवर प्रचंड दबाव आणला गेला. यावेळी लठ्ठे विरोधात खोटी साक्ष देण्यास नकार देणाऱ्या कर्मवीरांचा संस्थानाच्या पोलिसांनी खूप छळ केला, त्यांना तुरुंगात टाकले. या सगळयाला कंटाळून कर्मवीरांनी आत्महत्येचाही प्रयत्न केला. अखेरीस या खोट्या प्रकरणातून ते सुटले. त्यांनी राजांबद्दल कोणतीही कटुता मनात ठेवली नाही.[९]

नोकरी व्यवसायासाठी त्यांचे प्रयत्न सुरू झाले. विविध ठिकाणी त्यांनी नोकरी केली. याच दरम्यान सत्यशोधक चळवळीशी ते जोडले गेले. सांगली जिल्ह्यातील दूधगाव येथील आश्रमाचा यशस्वी शैक्षणिक प्रयोग

त्यांनी १९१० मध्ये केला होता. व्यवसायानिमित्त खेडोपाडी हिंडताना समाजाची बिकट अवस्था त्यांनी जवळून बघितली. यामुळे शिक्षण प्रसाराचे त्यांचे ध्येय अधिक भक्कम बनले. सत्यशोधक समाजाच्या २५ सप्टेंबर १९१९ साली झालेल्या परिषदेत रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली गेली. संस्थेच्या कार्याची सुरुवात काले येथे विद्यार्थी वसतिगृह स्थापन करून झाली. या वसतिगृहात मराठा, जैन, मुस्लिम, कोष्टी, परीट इ. जाती धर्मातील वीस मुले एकत्रित राहत होती. जातीभेद निर्मूलनाचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेवून संस्थेची वाटचाल सुरू झाली. मात्र काले येथून संस्थेचे कामकाज चालविणे अवघड होऊ लागले. अखेरीस १९२४ मध्ये सातारा येथे त्यांनी स्थलांतर केले.[१०]

साताऱ्यातही संस्थेच्या कार्याची सुरुवात वसतिगृह स्थापनेने झाली. सर्व जाती धर्माची मुले येथे एकत्र राहत होती,जेवत होती. या वसतिगृहाला चांगला प्रतिसाद मिळाला. वसतिगृहाचे नामकरण श्री छत्रपती शाहू बोर्डिंग सातारा असे करण्याचे त्यांनी ठरविले. यामागची आपली भूमिका स्पष्ट करताना कर्मवीरांनी म्हटले की, शाहू महाराजांनी राजवैभव बाजूला सारून अस्पृशांना आपलेसे म्हटले. त्यांच्यासाठी आपला देह झिजविला. म्हणूनच वसतिगृहाला त्यांचे नाव दिले आहे. वसतिगृहाचा नामकरण सोहळा महात्मा गांधींच्या हस्ते दि. २५ फेब्रुवारी १९२७ रोजी पार पडला. यावेळी गांधीजींनी कर्मवीरांना विचारले, ‘ महाराजसे कितना पैसा लिया है ?’ कर्मवीरांनी उत्तर दिले, ‘मैने ऊनसे कुछभी पैसा नही लिया । ऊनसे सिर्फ बडा दिल लिया है ।’ यावेळी गांधीजींनी कर्मवीरांचे या कार्याबद्दल खूप कौतुक केले.[११]

१९४३ साली शाहू महाराजांच्या जयंती निमित्त कर्मवीरांनी भाषण केले. त्यावेळी ते म्हणाले की, माझे सुदृढ शरीर आणि ध्येय हे मला शाहू राजांकडून मिळाले. मी जे कार्य करीत आहे त्याचे सर्व श्रेय शाहू महाराजांच्या शिकवणूकीलाच आहे.[१२] शाहूराजांच्या कर्मभूमीत म्हणजेच कोल्हापूरात आपल्या संस्थेचे कॉलेज असावे अशी कर्मवीरांची इच्छा होती. त्यांच्या हयातीत ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. नंतर कोल्हापूरातील कीर्ती कॉलेज रयत शिक्षण संस्थेच्या ताब्यात आले. १९६१ मध्ये या कॉलेजचे नामकरण राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज असे करण्यात आले. या कॉलेजने बहुजन समाजातल्या अनेक गरीब विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केले. ही शाहू राजांच्या कार्याला खरी आदरांजली ठरली.[१३]

**समारोप**

शिक्षण क्षेत्रातील एक उत्तुंग नाव म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील ! शिक्षण प्रसार व्हावा यासाठी अथक प्रयत्न करणाऱ्या कर्मवीरांनी शैक्षणिक क्षेत्रात अक्षरश: क्रांती घडवून आणली. बहुजन समाजातील हजारो मुलांना शिक्षण प्रवाहात आणले. कर्मवीरांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था शिक्षण क्षेत्रातील दिपस्तंभ ठरली. सर्वसामान्य कर्मठ, परंपरा सांभाळणाऱ्या जैन कुटुंबात जन्म घेतलेल्या कर्मवीरांना अनेक मोठ्या व्यक्तींचा सहवास लाभला. यापैकी एक महत्वाचे नाव म्हणजे राजर्षी छ. शाहू महाराज ! खऱ्या अर्थाने लोकराजा असलेल्या शाहू राजांचे व्यक्तिमत्व, जीवन, कार्य, विचार यांचा कर्मवीरांवर खूप परिणाम झाला. त्यांच्या कार्यात याचे प्रतिबिंब पडले. केवळ शिक्षणच सामान्य लोकांच्या प्रगतीचा मार्ग बनू शकते ही कर्मवीरांची धारणा बनली. भाऊराव पायगोंडा पाटील ते कर्मवीर भाऊराव पाटील हा त्यांचा प्रवास सोपा नव्हता. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी त्यांची आंतरिक तळमळ होती. वैयक्तिक आयुष्यात अनेक गोष्टींचा त्याग केलेल्या कर्मवीरांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला अधिक व्यापक केले.

**संदर्भ**

१ कडियाळ रा. अ., *कर्मवीर भाऊराव पाटील: काल आणि कर्तृत्व*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, फेब्रुवारी १९९८

२ विभूते भालबा, *शैक्षणिक क्रांतीचे जनक* ( लेख ) लोकराज्य , अंक ३ सप्टेंबर २०१८ , पृ. १४-१५

३ पाटील टी. एस., *राजर्षी शाहू छत्रपती ( १८७४- १९२२ )* श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर ,२०१३ पृ. ६८-६९

४ कडियाळ रा. अ.,उपरोक्त, पृ. १९

५ मॅथ्यू ए. व्ही., *कर्मवीर भाऊराव पाटील,* अनुवाद : वि.स. वाळिंबे, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९८८, पृ. ३२

६ नलावडे विजय, *रयतेचे शिलेदार,* सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा,२०१६, पृ. ०३

७ मॅथ्यू ए. व्ही., उपरोक्त, पृ. ३३

८ कित्ता पृ. ३८-४० ; पवार जयसिंगराव ( संपा. ) *राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,* महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी

कोल्हापूर, २००७, पृ.५७६

९ कडियाळ रा. अ.,उपरोक्त, पृ.३०-३५

१० मगदूम विष्णुदास, *दृष्टा महात्मा भाऊराव पाटील*, हरिश्चंद्र – रुक्मिणी धर्मादाय संस्था केनवडे,२०१५ पृ.३५

११ पवार जयसिंगराव, शिंदे विजयराव ( संपा.), *विजयी मराठा : राजर्षी शाहू दर्शन,* विजयी मराठा प्रकाशन, कोल्हापूर,२०११ पृ. ३४०-३४१ ; कडियाळ रा. अ.,उपरोक्त, पृ. ५४

१२ कित्ता पृ. ३१

१३ पाटील अजित, *माणसातील देव,* मॅकमिलन इंडिया, पुणे २०१०, पृ. ५९

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शेतीविषयक धोरण

**लेप्टनंट डॉ. रणजीत माने**
सहाय्यक प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
**Email-** ranjitpapamane@gmail.com

*प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां तु हिते हितम् ।*
*नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम् ॥*

प्रजा सुखी तर राजा सुखी, प्रज्येच्या हितामध्ये राजाचे हित आहे, राजाचे हित प्रजेला तो प्रिय वाटला पाहिजे यामध्ये आहे. हेच तत्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे मुख्य प्रधान सूत्र होते. हे स्वराज्य शेतकऱ्यांचे आहे, शेती करणे हे रयतेचे मुख्य बलस्थान आहे, संपूर्ण प्रजेचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे, शेती हे केवळ जीवनावश्यक साधन नसून, रयतेच्या उत्पन्नाचे स्त्रोत आहे याची महाराजांना जाणीव होती. त्यानुसार महाराजांचे शेती, माती आणि माणसांविषयीचे विचार आज्ञापत्र, बखरीमधून दिसून येते. त्याच राजघराण्याचा वारसा चालविणारे राजर्षी छत्रपती शाहू महारज यांनी हि आपल्या राज्यकारभारातून जनकल्याणारी योजना आखून कोल्हापूर संस्थानाची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे योगदान शेती, जलसिंचन, शिक्षण, आरोग्य, उद्योग या सारख्या सर्वच क्षेत्रात आहे. प्रस्तुत लघुशोधानिबंधाच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज यांच्या शेतीविषयक धोरणाचा आढावा घेण्यात आलेला आहे. या शोधनिबंधासाठी दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

१. **सन १८९६-९९ चा दुष्काळ**: हवामानाचा लहरीपणा हे भारतीय लोकांच्या आयुष्यावर परिणाम करणारा एक महत्वाचा भाग आहे. सन १८९६ चा दुष्काळ हा संपूर्ण भारतामध्ये पडलेला एक मोठा दुष्काळ होता. ज्याचा परिणाम सर्वांच्यावर झाला. देशभरात अनेक लोक मृत्युमुखी पडले होते. पण कोल्हापूर संस्थानामध्ये याचे प्रमाण अत्यंत अल्प होते, याचे कारण म्हणजे शाहू महाराजांचे प्रशासन होय. दुष्काळामध्ये रयतेला खायला अन्न व प्यायला पाणी लागते हि बाब लक्षात घेवून शाहू महाराजांनी स्वस्त धान्य शेतकऱ्यांना/ जनतेला उपलब्ध करून देण्याची व्यवस्था निर्माण केली.[१]

२. **दुष्काळ निवारण विभाग**: कोल्हापूर संस्थानातील दुष्काळ निवारणासाठी त्यांनी हुजुर कार्यालयातच 'दुष्काळ निवारण विभाग' सुरू केला आणि त्याचे अधिकारी म्हणून संस्थानाच्या दिवणांचीच नेमणूक केली. केवळ कोल्हापूरातच कचेरी काढून ते थांबले नाहीत तर त्यांनी सर्व संबंधित मामलेदार कचेऱ्यांत सुध्दा खास दुष्काळ निवारण विभाग सुरू केला. त्या विभागामार्फत लोकांना दुष्काळ निवारणासाठी लागणारी उपकरणे, हत्यारे, अवजारे आणि इतर साधने पुरवली जात. या साहित्याच्या खरेदीवर एका वर्षात त्यावेळी २६,००० रूपयांहून अधिक खर्च करण्यात आला होता. साधने किंवा उपकरणे नाहीत म्हणून लोकांना शेतीची, विहीरींची किंवा रस्त्याची कामे देतांना अडचण येवू नये, याची पूर्ण खबरदारी घेतली जात असे हे यावरून दिसून येते.[२] थोडक्यात छत्रपती शाहु महाराजांनी दुष्काळ निवारणासाठी कराव्या लागणाऱ्या सर्वच बाबींचा सखोल विचार केला होता.

३. **सार्वत्रिक पाटबंधारे धोरण**: वारंवार पडणारे दुष्काळ व जनतेचे/ शेतकऱ्यांचे होणारे हाल लक्षात घेवून त्याच्यातून कायमचा मार्ग काढण्याच्या हेतूने सार्वत्रिक पाटबंधारे धोरण तयार केले होते. संस्थानामध्ये पडलेला दुष्काळ यशस्वीपणे मुकाबला केल्याने कोल्हापूर संस्थानामध्ये फारशी जीवितहानी झाली नाही. पण वारंवार पाडणाऱ्या दुष्काळस सामोरे जाण्यासाठी आणि या प्रश्नवर मात करण्यासाठी त्यांनी सन १९०२ मध्ये सार्वत्रिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. कोल्हापूर संस्थानामध्ये जलसिचनांसाठी स्वातंत्र्य पाटबंधारे खात्याची निर्मिती केली आणि त्यासाठी शंकर सीताराम गुप्त या अधिकाऱ्याची नेमणुकाही केली. या खात्याच्या मार्फत संस्थानातील गावांचा सर्व्हे करण्यात आला आणि नवीन विहिरी काढणे, जुन्या विहिरी दुरुस्त करणे, तलावांची

निर्मिती करणे अशी कामे हाती घेण्यात आली. संस्थानामध्ये सन १९०५-०६ मध्ये ११७०० विहिरी होत्या. त्यांची संख्या सन १९२०-२१ पर्यंत १२८०० पर्यंत गेली. सरकारने जुन्या विहिरी दुरुस्त करणे आणि नवीन विहिरी दुरुस्त करणे या कामी तगाई स्वरूपात कर्जपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली होती. याच बरोबर शिरोळ, रुकडी, शहापूर, वडगाव या ठिकाणी नवीन तलावांची निर्मिती केली. तर भेडसगाव, कटकोळ, अतिग्रे या ठिकाणच्या तलावांची दुरुस्ती केली.[३] याचा परिणाम संस्थानातील गावे पाण्यासाठी समृद्ध होण्यास सुरवात झालीच, पण महाराजांनी हि कामे दुष्काळाच्या काळात काढल्याने जनतेला दुष्काळी काळात काम उपलब्ध होवू शकले. शिवाय शेतकऱ्यांच्या जनावरांचा हि प्राण वाचण्यास मदत झाली.

४. **राधानगरी धरण**: शाहू महाराजांच्या काळात तर कोल्हापूर संस्थानचा शेती हाच मुख्य व्यवसाय होता. पुरेशा सिंचन सुविधांचा अभाव, अज्ञान यामुळे शेतकऱ्यांची अवस्था कमालीची दयनीय झाली होती. शाहू महाराजांनी १९०२ च्या दरम्यान युरोपचा दौरा केला. नैसर्गिक साधनसंपत्तीचा युरोपात होत असलेल्या काटेकोर वापराने महाराज प्रभावित झाले. कोल्हापूर जिल्ह्यातून पंचगंगा, वारणा, भोगावती यांसारख्या मोठ्या नद्या आहेत यांचे पाणी समुद्रास जाऊन मिळते त्या पाण्याचा उपयोग संस्थानास झाला पाहिजे. ते पाणी शेतीकडे वळविले पाहिजे, यासाठी त्यांनी एक योजना आखली. कोल्हापूर संस्थानात वाहणाऱ्या एखाद्या नदीवर मोठे धरण बांधावे, असे त्यांनी ठरविले. त्यानुसार आधीच त्यांनी संस्थानाचे पाटबंधाऱ्यांच्या दृष्टीने सर्वेक्षण केले होते. धरण बांधण्यासाठी राधानगरी तालुक्यात भोगावती नदीवर फेजिवाडी व दुधगंगा नदीवर फराळे येथे धरण बांधण्यासाठी जागा निश्चित केली. तत्कालीन कोल्हापूरचे दिवाण सबनीस यांचे मित्र अभियंता सर विश्वेश्वरराय यांचा सल्ला घेऊन धरण बांधून कालव्याच्या सहाय्याने शेतीस पाणी उपलब्ध करून देण्याची योजना आखली.[४] त्या योजनेची फलश्रुती म्हणजे उभे असलेले राधानगरी होय. हे धरण दरवर्षी पूर्ण क्षमतेने भरते आणि लोकांचे जीवन समृद्ध करते. हे धरण त्यांच्या कल्पकतेचे, द्रष्टेपणाचे स्मारक आहे. त्यांनी स्वतंत्र जलनीती आखली आणि त्याची अंमलबजावणी केली. सन १९०९ साली राधानगरी धरणाच्या बांधकामास सुरवात झाली. पण त्याच पूर्णत्व शाहू महाराजांच्या मृत्युनंतर राजाराम महाराजांच्या काळात झाले. या धरणामुळे २२००० एकर जमिन पाण्याखाली आली. राधानगरी धरण म्हणजे कोल्हापूरच्या हिरव्यागार शेतीचे गमक आहे. हे धरण राजर्षी शाहू महाराजांनी बांधले नसते तर पाऊस जसा पडतो. तसेच त्याचे पाणीही वाहून गेले असते आणि जिल्ह्याला दुष्काळ समोरे जावे लागले असते. पण शाहू महाराजांच्या दूरदृष्टीतून असंख्य अडचणींना तोंड देत १९५७ च्या आसपास धरणाची उभारणी पूर्ण झाली आणि पिण्याच्या, पिकासाठीच्या पाण्याची त्या वेळच्या परिस्थितीत चिंता मिटली. या धरणाचे बांधकाम संथ गतिने झाले. तरीही धरणाच्या पायात शिसे ओतून पाया भक्कम करण्यात आला आहे. धरणाचे काम दर्जेदार व्हावे म्हणून खूप कसोट्या लावण्यात आल्या. शाहू महाराजांनंतर छत्रपती राजाराम महाराजांनी धरणाचे काम पूर्णत्वास नेले.

५. **आधुनिक शेतीचा प्रयोग:** शाहू महाराजांच्या काळात ८० टक्के पेक्षा जास्त जनता ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी व्यवसायावर अवलंबून होती. आपल्या संस्थानातील शेतीमध्ये शाहूमहाराजांनी वेगवेगळे प्रयोग केले. दक्षिण भारतात कॉफीचे उत्पादनात मोठ्या प्रमाणात होते असे जेव्हा कळले तेव्हा त्यांनी कॉफीचे उत्पादन आपल्या संस्थान घेण्याचा विचार केला. दक्षिण भारतातील भौगोलिक परिस्थिती हवामानाची पाहणी करून तज्ञांकडून सल्ला घेवून वर्षभर कोल्हापूर संस्थानात पाऊस पडत नव्हता, तरीही डोंगराळ भागातील जमीन पडीक राहू नये म्हणून पहिल्याच वर्षी कॉफीची लागवड केली. दोन वर्षात हा प्रयोग भुदरगड पेठ्यातही केला. १५ एकर मध्ये कॉफीची लागवड केली होती.[५] शेतकऱ्यांची सर्वांगीण प्रगती व्हायची असेल तर शेतकऱ्यांनी नगदी पिकांकडे वळले पाहिजे असे शाहू महाराज यांचे विचार होते. त्यामुळे त्यांनी पन्हाळा येथे कॉफी, रबर, यांचे खास मळे तयार केले. सोबतच बेळगावी बटाटे, कापूस ताग, रेशीम यासारखी पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांनी केलेला चहा उत्पादनाचा प्रयोग काहीसा यशस्वी झाला होता. पन्हाळा चहा नंबर ४ या नावाने हा चहा प्रसिद्ध होता. पण शाहू महाराजांच्या मृत्यूबरोबर हा चहाचा लागवडीचा प्रयोग बंद पडला. शाहू महाराजांनी संस्थानातील पश्चिम भागात भरपूर पाऊस पडत असलेल्या सह्याद्रीच्या भागात अशा नवनवीन पिकांची लागवड केली. संशोधित वाणांची लागवड शेतकऱ्यांनी करावी या दृष्टीने अनेक रोपवाटिका सरकारतर्फे तयार केल्या होत्या.[६] शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यासाठी आधुनिक शेती कशी किफायतशीर आहे हे दाखवून दिले होते.

६. **किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची स्थापना :** शाहू महाराजांनी राज्यकारभार स्वीकारल्या नंतर सर्वप्रथम त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्या समस्या अडीअडचणी समजावून घेतल्या, शेतकऱ्यांचे दुःख दारिद्र्य जवळून पाहिले, शेतीच्या दुरावस्था यामुळे शेतकऱ्यांचे दारिद्र वाढते. तसेच शेतीची उत्पादकता कमी असल्यामुळे उत्पन्न कमी होते. हे त्यांनी माहित असल्याने शेतकऱ्यांना या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी आधुनिक पद्धतीने शेती करण्याची गरज आहे हे ओळखून मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यासाठी विदेशातील शेती उत्पादनाचे तंत्र शेतकऱ्यांनी आत्मसात करावे यासाठी अनेक प्रयोग केले. यापैकीच एक प्रयोग म्हणजे १९१२ मध्ये कोल्हापूर येथे किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूटची स्थापना. या इन्स्टिट्यूटला महाराजांनी पाच हजाराची मदत म्हणून दिले तसेच एक हजार वर्षे ग्रंड संस्था सुरु केली होतो. या संस्थेच्या माध्यमातून बी-बियाणे, रासायनिक खते, सुधारित तंत्र याबद्दलची माहिती देण्यासाठी खास तज्ञ कृषी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. अद्ययावत शेती अवजारांचे प्रदर्शन भरवून अन्नधान्य, पशू प्रदर्शनात शेतकऱ्यांना या बाबतीत अध्यावत माहिती देऊन खऱ्या अर्थाने प्रगतशील बनवले.[७] एवढेच नव्हे तर शेती उपकरणांच्या अध्यावत संग्रहालय देखील निर्माण केले होते.

एका भाषणात शाहू महाराज म्हणतात की शेती काम हे इतके पवित्र आहे की वैदिक काळात इथल्या चक्रवर्ती सम्राट व त्यांचे मंत्री सुद्धा नांगर चालत असत. त्यामुळे दाणे टाकलेल्या एक दाण्यातून हजारो दाने तयार होऊन अनेक लोक आपला उदरनिर्वाह करतात अशा कृषी कामाला मी वाईट किंवा कमी मानत नाही. अशा दृष्टीनें शाहू महाराजांचा कोल्हापूर संस्थानातील शेती आणि शेतकऱ्यांचे कायापालट करून टाकला.[८] **कृषी प्रदर्शन**: संस्थानातील यात्रा व महोत्सव अशा निमित्ताने लोक एकत्र येत असतात तर त्याचा उपयोग करून लोकशिक्षण द्यावे या उद्देशाने शाहू महाराजांनी महालक्ष्मी रथोत्सव व ज्योतिबा यात्रा या कालावधीमध्ये कृषी प्रदर्शन भरविण्याचा निर्णय घेतला होता. याची जबाबदारी शाहू महाराजांचे बंधू बापूसाहेब महाराज व राजाराम कॉलेजचे प्राचार्य डार्बी यांच्यावर सोपवली होती.[९] १९१४ मध्ये भरलेल्या पहिल्या शेतीविषयक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना शाहू महाराज म्हणतात की माझ्या संस्थानात अशा प्रकारचे शेतीचे प्रदर्शन पहिल्यांदाच भरविले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गावर त्यांचे चांगले परिणाम लवकरच दिसून येतील प्रदर्शनाचे तीन भाग करण्यात आले होते. पहिला विभाग जनावरांचा होता तर दुसरा विभाग शेतीसाठी होता आणि तिसरा विभाग कला आणि उद्योगासाठी होता. यासाठी बक्षीसही ठेवले होते. या प्रदर्शनात सुधारित पद्धतीने शेती कशी करावी, तसेच शेतीचे नवनवे प्रयोग कसे केले जातील या विषयावर मार्गदर्शन आणि सखोल अशी व्याख्यान आयोजित करण्यात आले होती. या प्रदर्शनाला पुण्याच्या शेतकी कॉलेजचे त्यावेळची प्राचार्य डॉक्टर हेरॉल्ड मॅन यांनी सदिच्छा भेट दिली.[१०] प्रदर्शनामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी वर्ग यावा यासाठी कुस्त्यांची दंगल, मर्दानी खेळाचे सामने यासारखे करमणुकीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

७. **शेतकऱ्यांना सरकारकडून कर्जपुरवठा**: शेतकऱ्यांना अपुऱ्या उत्पादनामुळे दारिद्र्यात जीवन काढावे लागते. बरेच शेतकरी शेतीसाठी सावकाराकडून कर्ज घेतात. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेवून सावकार शेतकऱ्यांना लुबाडतात यावर उपाय करण्यासाठी सन १८९५ मध्ये कर्जबाजारी शेतकऱ्यांना दरबारामार्फत कर्जपुरवठा करण्यास सुरवात केली. व्हिक्टोरिया राणीच्या स्मरणार्थ एक निधी गोळा करून सावकारांनी शेतकऱ्यांच्या जप्त केलेल्या जमिनी सोडविण्यासाठी भरघोस अशी मदत केली. एक १८९९ मध्ये वटहुकूम काढून सावकारांवर अनेक निर्बंध आणले. या हुकुमानुसार उभी पिके जप्त करण्यावर बंदी आणली.

८. **बाजारपेठेची निर्मिती**: शेतीमध्ये आधुनिकीकरण करत असताना शेतीमधून उत्पादित मालाला बाजारपेठ हि आवश्यक आहे हे शाहू महाराज यांनी जाणले होते. त्यामुळे शेतीमधून उत्पादित मालाला बाजारपेठ मिळावी म्हणून कोल्हापूरात बाजारपेठा सुरु केल्या. कोल्हापूरमध्ये वसविण्यात आलेली बाजारपेठ आज शाहूपुरी या नावाने प्रसिद्ध आहे. १९१७ मध्ये शिरोळ रेल्वे स्टेशन जवळ एक पेठ वसविली त्याचे नामकरण जयसिंगपूर असे केले.[११] या बाजारपेठांच्या विकासासाठी व्यापाऱ्यांना सवलती देवू केल्या. बाजारपेठेच्या विकासासाठी दळणवळण सुविधा महत्वाची असते हे ओळखून रेल्वे सारखे आधुनिक दळणवळणाचे साधन कोल्हापूर संस्थानाचे खर्चाने सुरु केले. त्यामुळे कोल्हापुरातील शेती उत्पदान भारतातील इतर बाजारपेठेपर्यंत पोहचण्यास मदत झाली

छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची ओळख आज महाराष्ट्राला पर्यायाने संपूर्ण भारत देशाला आहे. छत्रपती शाहू महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे अनुकरण करून छत्रपती पदास साजेसे कार्य केले आहे. त्यांनी स्वतंत्र्य जलनीती आखली आणि नुसती अखालीच नाही तर त्याची कार्यक्षमपणे आणि प्रभावी अंमलबजावणी केली. त्याचा परिणाम कोल्हापूर जिल्हा सुजलाम सुफलाम बनला. पारंपारिक पिक पद्धतीला फाटा

देवून चहा, कॉफी यासारख्या व्यापारी/ नगदी पिकांच्या लागवडीस संस्थानात सुरवात केली. फक्त इतकेच नव्हे तर शेतीतील उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ हवी याची जाणीव असल्यामुळे व्यापारी पेठांच्या निर्मितीस सुरवात केली. याचा परिणाम आज आपल्याला जाणवत आहे, शाहूपुरी आणि जयसिंगपूर या व्यापारी पेठांच्या माध्यमातून. बाजारपेठा इतर पेठांशी जोडायला हव्यात. ज्यामुळे आपल्या पेठेतील माला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचू शकेल आणि त्याचा फायदा शेतकऱ्यांनाच होईल. यासाठी प्रभावी दळणवळण आवश्यक असते हे ओळखून संस्थानाच्या खर्चाने रेल्वे कोल्हापूरपर्यंत आणणारे शाहू महाराजाच आहेत. आज कोल्हापूरची कला, क्रीडा, कृषी, जल, अशा सर्वच क्षेत्रात जी प्रगत वाटचाल सुरु आहे त्यामागे राजर्षी शाहू महाराजांचा द्रष्टेपणा, कल्पकता हि करणे आहेत. त्यांच्या या कार्यामुळेच कोल्हापूरचा शेतकरी आज साधन बनला आहे. तो दुष्काळस तोंड देण्यास सक्षम बनला आहे. जलसाक्षरता व जलसंधारण क्षेत्रात आजही मार्गदर्शक ठरावे, असे मौलिक कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केले. संस्थानाचा आकार, आर्थिक कुवत आणि तंत्रज्ञानाची मर्यादित उपलब्धता हे लक्षात घेता शाहू महाराज यांनी आखलेली व कार्यान्वित केलेली राधानगरी धरणाची योजना त्यांच्या महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीच्या धोरणाचे प्रतीक आजही मानली जाते असे एक ना अनेक प्रयोग व धोरण त्यांनी यांनी राबवली. शेतीचा विकास म्हणजेच देशाचा विकास हे सूत्र लक्षात घेऊन संस्थान काळात नवनवीन प्रयोग केले.

**संदर्भ साधने:**


1. https://www.esakal.com/sampadakiya/dr-ramesh-jadhav-writes-article-about-rajarshi-
2. shahu-maharaj-312664)
3. कुलकर्णी ब.शी. कुलकर्णी मीना, श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण गौरी-नंदन प्रकाशन, कोल्हापूर, १९७५ पृष्ठ क्र. १४८
4. पाटील टी. एस., राजर्षी शाहू छत्रपती, (चरित्र ग्रंथमाला) श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर २०१२ पृष्ठ क्र.१००४. कित्ता
5. Latth A B., Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaja of
6. Kolhapur, Vol.I, Times Press, Bombay, 1924 p. 103)
7. पाटील टी. एस., राजर्षी शाहू छत्रपती, (चरित्र ग्रंथमाला) श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर २०१२,पृष्ठ क्र. १०२
8. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, संपादक महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर २००७,पृष्ठ क्र. २०३
9. राजश्री शाहू स्मारक ग्रंथ
10. करवीर गॅझेट भाग., ता. १३ सप्टेंबर १९१३
11. राजश्री शाहू स्मारक ग्रंथ
12. शामराव पाटील, (संकलक) भास्कर दाटावकर (सं), शाहू छत्रपतींचे निवडक आदेश भाग १, मुंबई,
13. १९८८; भाग २(सं) अ.प्र. जामखेडकर, मुंबई १९८९ पृष्ठ क्र.143

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील कला क्षेत्राचा विकास

**प्रियांका राजाराम पाटील**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email- priyasujit2607@gmail.com

**प्रस्तावना :-**

भौतिक गोष्टींबरोबर मानवाच्या जडण-घडणीत आणि विकासात कला अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडते. वेग-वेगळया कला प्रकारांनी मानवी जीवन समृद्ध व सुसंस्कृत केले आहे व करत आहेत. प्रागैतिहासिक कालखंडात मानवाला भाषा अवगत नव्हती तेव्हा मानव गुहेतील भिंतीवर रेघा चितारूनच आपल्या भावना व्यक्त करत होता. भिंतीवरील या रेघा मानवाच्या संवादाचे प्राथमिक रूप असले तरी पुढे विकसित होत गेलेल्या कला-प्रकाराचे बीज येथेच रूजल्याचे दिसते. निसर्गातच आधिवास असलेल्या मानवाने निसर्गातील प्रत्येक गोष्टीकडे सौंदर्यात्मक दृष्टीकोनातून पाहिले. व यातूनच नव-नवीन कल्पना करून सुंदर कलाकृती निर्माण होत गेल्या. या कलाकृतीतूनच मानवाने विविध कला प्रकारांना जन्म दिला. मानवाची उत्क्रांती होत गेली तशी हे कला प्रकारही समृद्ध व विकसित होत गेले. विविधांगी कलांमुळे मानवी जगण्याला कलात्मक आणि आनंदी परिमाण लाभले. जगभरातील विविध संस्कृती, प्रदेश शहर, शहरांच्या प्रगतीत कलेने महत्वपूर्ण वाटा उचलला आहे.

**संशोधन पद्धत :-**

प्रस्तूत शोध पेपरसाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**कोल्हापूरची कला परंपरा :-**

प्राचीन काळापासून कोल्हापूर शहराला ऐतिहासिक वारसा आहे. ते ब्रम्हपीठ, दक्षिणकाशी म्हणूनही ओळखले जाते. मध्ययुगीन कालखंडात कोल्हापूर शहराला मराठ्यांच्या राजधानीचा दर्जा मिळाला. छत्रपतींचे वारस असलेले हे शहर दक्षिण महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आहे. कोल्हापूर शहर हे जिल्ह्याचे मुख्य प्रशासकीय ठिकाण असून, विविध संस्थांचे ते प्रमुख केंद्रही आहे. कोल्हापूर शहराला सामाजिक, राजकीय परंपरा जशी आहे. तशीच वैभवशाली कला-परंपराही आहे. शाहूपूर्व काळात कोल्हापूर संस्थानात ललित कलांचे विविध प्रकार अस्तित्वात होते. ललित कलांमध्ये संगीत, नाट्य व चित्रकला ही प्रमुख दालने मानली जातात. राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीत मिळालेल्या राजाश्रयाने ही दालने समृद्ध झाली. तसेच या कलांनी महाराष्ट्रात अनेक किर्तीवंत कलाकार घडले. ज्यांनी आपल्या कलाविष्काराने कोल्हापूरचे नाव देशभरात लौकिकाला आणले. कोल्हापूरची 'कलापूर' म्हणून ओळख दृढ होण्यात राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहनाचा महत्वाचा वाटा आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात कला क्षेत्रात झालेल्या विकासाचा आढावा प्रस्तूत शोध पेपरमध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संगीत :-**

छत्रपती शाहू महाराजांचे जनकपिते आबासाहेब यांना संगीत कलेची आवड होती. छत्रपती शाहू महाराजांचे दत्तक विधान होवून ते छत्रपतींच्या गादीवर येण्यापूर्वी कोल्हापूर गायन समाज ही संस्था कोल्हापूरमध्ये स्थापन झाली होती. १८९२ मध्ये 'देवल क्लबची' स्थापना झाली. शाहू महाराजांनी या संस्थेला जागा देवून अर्थसाहाय्य

केले. त्यांच्या पाठबळामुळे ही संस्था पुढे अखिल भारतीय स्तरावर नावारूपाला आली. आज देशामध्ये विविध सांगितिक घराणी प्रसिद्धीला आली आहेत. त्यांची सुरवात वा जडण- घडण कोल्हापूरच्या कला क्षेत्राने दिलेल्या पाठबळामुळे झाली आहे. देवल क्लब हा कोल्हापूरच्या कला-परंपरेतील एक महत्वाचा घटक म्हणावा लागेल. शाहू महाराजांच्या राजाश्रयाने ललित कलांमध्ये कोल्हापूरची समृद्ध परंपरा निर्माण झाली. संगीताच्या क्षेत्रामध्ये गौरी-शंकर मानले गेलेले महान कलावंत म्हणजे गानमहर्षी अल्लादियाँ खाँ. १९८५ मध्ये शाहू महाराजांनी त्यांना दरबारात गायक म्हणून निमंत्रित केले. त्यांनी कोल्हापूरचे नाव देशभर केले. याशिवाय 'किराणा' घराण्याचे अध्वर्यू हैदरबक्ष खाँ, अब्दुल करीमखाँ, अंजनीबाई मालपेकर, गानचंद्रिका लक्ष्मीबाई जाधव, मेणका शिरोडकर, आजमभाई, सरदारभाई, सी.बालाजी, आप्पासाहेब देशपांडे या सर्वांनी शास्त्रीय संगीतात मोलाची कामगिरी बजावत कोल्हापूरची कला-परंपरा देशाच्या पटलावर आणली. भजनसम्राट तुकारामबुवा सरनाईक यांचे सुपूत्र शंकरराव सरनाईक यांना शाहू महाराजांनी गोविंदराव ठेंबे यांच्या नाटक कंपनीत जाण्याचा आग्रह धरला. यामुळे रसिकांकडून महाराष्ट्र कोकीळ ही पदवी मिळालेला हा गायक महाराष्ट्राला लाभला. शाहू महाराजांच्या काळातील कला परंपरेपासून प्रेरणा घेत स्वातंत्र्योत्तर काळात निवृत्ती सरनाईक, जगन्नाथबुवा पुरोहित, विश्वनाथबुवा जाधव, आनंदराव लिमये, आप्पासाहेब देशपांडे यांनी कोल्हापूरची संगीत परंपरा पुढे नेली. पुढील काळातही कोल्हापूरच्या संगीत क्षेत्राने ठसा उमटविला; पण याचे मूळ शाहू महाराजांच्या काळात विकसित होत गेलेल्या परंपरेत दडले आहे.

**नाट्य :-**

संगीत कलेबरोबर नाट्य कलेला छत्रपती शाहू महाराजांनी बरोबरीचा राजाश्रय दिला. महाराजांच्या प्रोत्साहनामुळे कोल्हापूरचे सांस्कृतिक जीवन समृद्ध झाले. छत्रपती शाहू महाराजांनी नाट्य कलेला उत्तेजन दिल्यामुळे बालगंधर्व व संगीतसूर्य केशवराव भोसले यांसारखे महान कलावंत कोल्हापूरने मराठी रंगभूमीस दिले. वासुदेव शास्त्री खरे, गोविंद बल्लाळ देव, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, गणपतराव जोशी, दत्तोपंत भोसले, गोविंदराव टेंबे या कलावंतांनी मराठी रंगभूमीचे क्षेत्र गाजवले. १९१६ साली केशवराव भोसले आपली कंपनी घेवून कोल्हापूरला आल्यावर छत्रपती शाहू महाराजांनी त्यांचा गौरव केला. तसेच त्यांना १० हजार रूपयांची मदतही केली. केशवरावांचे 'मृच्छकटिक' कोल्हापूरच्या जनतेस पाहायला मिळावे म्हणून रू.२५,०००/- प्रेक्षक बसतील एवढे खुले नाट्यगृह पॅलेस थिएटरच्या मागे खासबाग मैदानात तयार करून घेतले होते. पुढे महाराजांनी रोमन नाट्यगृहाप्रमाणे भव्य व वैभवशाली नाट्यगृह बांधले. महाराष्ट्रातील अनेक मोठ्या कंपन्या आणि कलावंतांना त्यांची कला प्रदर्शित करण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ मिळाले. पॅलेस थिएटर हे त्या काळातील भव्य व राजेशाही थिएटर होते. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र शासनाने या थिएटरचे संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह असे नामकरण केले. छत्रपती शाहूंच्या काळातील एका महान कलावंताच्या नावाने असलेले हे कला स्मारक कोल्हापूरच्या कला परंपरेचे महत्वाचे प्रतीकच म्हणावे लागेल. किर्लोस्कर नाटक कंपनी, महालक्ष्मी प्रासादिक नाटक मंडळी, कोल्हापूर संगीत नाटक मंडळी, केवळ स्त्रियांनी सुरू केले शेषासनी स्त्री संगीत नाटक मंडळी या संस्थांनी रंगभूमी गाजवली ती शाहू महाराजांचे कृपाछत्र लाभल्यामुळेच.

**चित्रकला :-**

भारतात ब्रिटिश सत्ता स्थिर झाल्यावर १८५६ मध्ये मुंबई येथे जे. जे. कला महाविद्यालय सुरू झाले. यामुळे भारतीयांना कला शिक्षण उपलब्ध झाले. जे.जे. कला महाविद्यालय हे चित्रकला क्षेत्रातील एक मानदंड आहे. या संस्थेत कोल्हापूरचे आबालाल रेहमान यांनी शिक्षण घेतले. विद्यार्थी दशेत असतानाच त्यांच्या एका चित्रसमुहाला व्हाईस रॉय गोल्डमेडल मिळाले होते. कोल्हापूरच्या चित्रकलेची ही सुरवात मानली जाते. रेहमान यांच्या उच्चतम कलानिर्मितीतून कोल्हापूरच्या चित्रकलेची ओळख देशाला होवू लागली. पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने

येथील चित्रकलेने देशभर किर्ती मिळवली. माधवराव बागल, दत्तोबा दळवी, बाबा गजबर या कोल्हापुरातील मोठ्या चित्रकारांनाही शाहू महाराजांचा राजाश्रय लाभला होता. त्यांच्याच प्रेरणेने पुढे आलेल्या धुरंधर, मसोजी, आनंदराव पेंटर, कलामहर्षी बाबुराव पेंटर यांसारख्या दिग्गज कलाकारांनी ही किर्ती आणखी वृध्दिंगत केली. बाबुराव सडवेलकर, गो.नी.जोशी, अरूण कोल्हटकर, दि.वि. वडणगेकर या चित्रकारांच्या मूळ वाटा कोल्हापूर शैलीत संस्कारित झाल्या. गणपतराव वडणगेकरांपासून ते शामकांत जाधव यांच्यापर्यंत प्रतिभावान चित्रकारांची पिढी कोल्हापुरात घडली.

**चित्रपट :-**

नाट्यकला परंपरेचा धागा पकडून मराठी रंगभूमी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात उदयास आली. सुरवातीला चित्रपट कला मुकपट होती. नंतर तिचे बोलपटात रूपांतर झाले. मुकचित्रपटांचे युग दादासाहेब तोरणे व दादासाहेब फाळके यांनी सुरू केले. तोरणे यांचा 'पुंडलिक' हा भारतातील पहिला चित्रपट होता (१९१२) त्यानंतर फाळके यांचा ‘राजा हरिशचंद्र’ हा चित्रपट प्रदर्शित झाला, असे चित्रपटसृष्टीचे अभ्यास सुर्यकांत मांडरे यांचे मत आहे. असे असले तरी फाळके यांनाच 'भारतीय' चित्रपटसृष्टीचे जनक मानतात.

कोल्हापूर हे भारतीय चित्रपटसृष्टीची माहेरघर बनले ते कलामहर्षी बाबूराव पेंटर यांच्या कामगिरीमुळे. बाबुराव पेंटर कोल्हापूरतील अभिजात कलावंत, शिल्पज्ञ, तंत्रज्ञ, नवनिर्मितीची आस असणारे होते. बाबूराव पेंटर व त्यांचे बंधू आनंदराव या दोघांनी १९१३ साली कोल्हापूरमध्ये चित्रपट प्रदर्शनासाठी ‘महाराष्ट्र सिनेमा' सिनेमागृह स्थापन केले. छत्रपती शाहू महाराजांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले. छत्रपती शाहूंच्या शाबासकीने पेंटर बंधूच्या विचारविश्वात क्रांती केली. आणि कोल्हापूरच्या भावी वैभवशाली चित्रपटकलेचे बीजारोपण झाले. बाबूराव पेंटर यांनी १९१७ ला संपूर्ण स्वदेशी बनावटीचा हिंदुस्थानातील पहिला मुव्ही कॅमेरा बनवला. आणि 'महाराष्ट्र फिल्म कंपनीची' स्थापना केली. पुढे महाराजांनी त्यांना मंगळवार पेठेत जागा देवून बळ दिले. कंपनीच्या 'सैरंध्री' या पहिल्याच चित्रपटनिर्मितीसाठी विष्णुपंत दामले, एस. फत्तेलाल, बाबा गजबर, नानासाहेब, सरपोतदार लिमये, धर्माधिकारी या सर्वांसह बाबूराव पेंटर यांनी तयार केलेल्या कॅमेऱ्यावर व प्रिंटिंग मशीनवर चित्रण केले. हा चित्रपट सर्वाधिक लोकप्रिय ठरला.

बाबूराव पेंटर यांनी 'महाराष्ट्र फिल्म कंपनीचे' व इतर कंपन्यांच्या चित्रपटांचे दिग्दर्शन केले. पुढे त्यांच्या शिष्यांनी 'प्रभात फिल्म कंपनी' (१९३२) स्थापन करून ‘अयोध्याचा राजा' यांसारखे बोलपट निर्माण केले. या काळात बाळसाहेब यादव, दत्तोबा पवार, बाळ गजबर, बाबूराव पेंढारकर, किशाबापू बकरे, व्ही शांताराम, विष्णुपंत पागणीस, स्टंटकिंग गणपतराव बकरे इ. कलाकार प्रसिद्धीस आले. तसेच गोविंदराव टेंबे, जयशंकर दानवे, गोपाळ मांडरे, विष्णुपंत औंधकर, केशवराव दाते, दुर्गा खोटे, राजा परांजपे, बालगंधर्व, हंसा वाडकर, जयराम शिलेदार इ. कलावंतांनी चित्रपट सृष्टीत निर्माण केलेल्या वैभवशाली परंपरेचे दर्शन होते. ही परंपरा निर्माण होण्यामागे शाहू महाराजांच्या राजाश्रयाने बाबूराव पेंटर यांनी कोल्हापूरात उदयास आणलेल्या चित्रपटसृष्टीची पार्श्वभूमी आहे. गानकोकीळा लता मंगेशकर यांच्या कारकीर्दीचा प्रारंभही कोल्हापूरातच झाला आहे.

**निष्कर्ष :-**

१) राजर्षी शाहू महाराजांच्या काळापूर्वीही कोल्हापुरात विविध कला अस्तित्वात होत्या; पण त्याचे स्वरूप मर्यादित होते.

२) शाहू महाराजांनी कलाकार आणि कलांना राजाश्रय दिल्याने कोल्हापूरातील कला विकासाला सुरवात झाली.

३) अल्लादियाँ खाँ, बालगंधर्व, संगीतसूर्य केशवराव भोसले, बाबूराव पेंटर, शंकरराव सरनाईक, आबालाल रेहमान या देशभर किर्ती मिळवलेल्या महान कलाकारांच्या कारकीर्दीचा प्रारंभ कोल्हापूरात आणि राजर्षी शाहू महाराजांच्या काळात झाला.

४) कला संस्थानाही राजर्षी शाहू महाराजांनी पाठबळ दिले.

५) कोल्हापूर भारतीय चित्रपटसृष्टीची माहेरघर बनले, याला राजर्षी शाहू महाराजांनी दिलेले प्रोत्साहन कारणीभूत आहे.

**संदर्भ साधने :-**

१) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, भारती मुद्रणालय, पहिली आवृत्ती, जानेवारी २००१

२) चौधरी कि. का (संपादक), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा, महाराष्ट्र शासन, सुधारित आवृत्ती १९८९

३) जाधव शामकांत, रंग चित्रकारांचे, ऋतुगंध प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००२

४) काशिद सुधाकर, कोल्हापुरच्या पाऊलखुना, सकाळ प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर २००५

५) शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास (१८३८ ते १८९४), निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर २००९

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# छ.शाहू महाराज यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान

**श्री. संजय पाटील[1] श्री. गणेश लवंगारे[2]**
[1]शांता रामकृष्ण दातार इंग्लिश स्कूल, हुपरी, जि. कोल्हापूर.
[2]राजर्षी छ.शाहू कॉलेज, कोल्हापूर
Email- sanjayspatil99@gmail.com

**प्रस्तावना**

कोल्हापूर ही एक ऐतिहासिक नगरी म्हणून प्रसिद्ध आहे. शाहू महाराज यांचा जन्म कोल्हापूर येथे २६ जून १८७४ रोजी झाला. महाराज १९०२ साली राज्यारोहण समारंभासाठी इंग्लंडला गेले होते. युरोपमधील रूम शहरात येऊन त्यांनी विविध खेळांचे मैदाने पाहिले . त्याच धर्तीवर त्यांनी कोल्हापुरात खासबाग मैदान एक ऐतिहासिक कुस्तीचे मैदान तयार करून कोल्हापूरची शान वाढवली. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षाच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि आणि शारीरिक विकास झाला. कोल्हापूर नगरीमध्ये मल्लविद्याला उदार आश्रयाने व प्रोत्साहनाने बुलंद मल्लांची पंढरी निर्माण झाली.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) छत्रपती शाहू महाराज यांचे कुस्ती खेळातील योगदानाचा आढावा घेणे.
२) छत्रपती शाहू महाराज यांचे मैदानी खेळातील योगदानाचा आढावा घेणे.

**१. छ. शाहू महाराज यांचे कुस्ती खेळातील योगदान:**

कोल्हापूरच्या मातीत ' मल्लविद्या' रुजविण्याचे, जोपासण्याचे व वाढवण्याचे काम केवळ राजश्री छत्रपती शाहू महाराज यांनीच केले .महाराजांना ज्यावेळी मुख त्यारी मिळाली त्यावेळी कुस्त्यांचे विज अंगी मैदान भरवले गेले. पुढे त्यांनी जुन्या राजवाड्यातील भव्य मोतीबागेत १८९५ साली'मोतीबाग तालीम' ची स्थापना केली . तालमीच्या प्रवेशद्वारावर एक भली मोठी पाटी एक महाराजांनी आवर्जून लावण्यास सांगितले त्या पाटीवर लिहिले होते,"पहिली शरीर संपत्ती ,दुसरी पुत्र संपत्ती व तिसरी धनसंपत्ती असेल तोच पुण्यवान."निरनिराळ्या समारंभाला सणासुदीला उरुसाला मैदाने होऊ लागली .३१ जुलै १८९७ रोजी महाराजांना पुत्ररत्न प्राप्त झाल्यानंतर त्यावेळी त्यांनी एक जंगी मैदान भरून उत्तरेकडील चंद्रन कल्लू, लंबू यासारखे प्रचंड ताकतीचे मल्ल बोलावून कुस्ती फड आयोजित केला. या फडात आपल्या भागातील सर्व मल्लांचा उत्तरेकडील मल्लांनी क्षणार्धात पराभव करताच महाराज मनोमन नाराज झाले.रुस्तुम ए हिंद च्या तोडीस तोड मल्ल निर्माण करण्यासाठी महाराज सज्ज झाले. कोल्हापुरात मग ईर्षेने जवळ जवळ १०० वर तालमी उभ्या राहिल्या . या तालमीतून एका पेक्षा एक वरचढ पैलवान तयार होऊ लागले राजवाड्यातील लाल आखाडा , बाबासाहेब महाराजांचा आखाडा , काळा इमाम, गंगावेश ,मोतीबाग ,दिलबहार ,उत्तरेश्वर, महाकाली, तटाकडील ,जुना बुधवार, मंगळवार पेठ वगैरे अनेक तालमीतून मुन्ना ,देवाप्पा धनगर ,शिवाप्पा बेरड, पांडू भोसले ,कृष्ण मर्दाने ,गणू ,थोरला गामा ,इमाम बक्ष, गुलाम मोहिद्दिन ,हसनबक्ष असे पैलवान तयार होऊ लागले. या पैलवानांना तयार करण्यासाठी स्वतः वस्ताद यांची भूमिकाही त्यांनी स्वीकारली. महाराज स्वतः कुस्तीत वाकबगार व डावपेचात अग्रेसर होते. सहा फूट पाच इंच उंचीच्या महाराजांच्या देह यष्टीत हत्तीची ताकद होती तर सिंहाची चपळाई ही होती. अशा महाराजांनी पैलवानाना स्वनिधीतून खुराक देण्यास सुरुवात केली. कुस्तीची पंढरी कोल्हापूरला बनविण्याचे श्रेय हे केवळ राजश्री छत्रपती शाहू महाराज यांनाच जाते. शाहू महाराज बादशहाच्या राज्यारोहण समारंभासाठी १९०२ साली इंग्लंडला गेले होते. त्यावेळी रोमला ही

भेट या नगरीतील ओलंपिक कुस्ती मैदान पाहिल्यानंतर त्यांचे हृदय भरून आले. आपल्या करवीर नगरीत देखील अपूर्व असे कुस्त्यांचे मैदान असावे, ही महाराजांची मनोमन इच्छा होती. कोल्हापूरला परत येताच रूम सारखे कुस्ती मैदान उभे करण्याचा निर्णय घेऊन ते कामास लागले. महाराजांनी गावालगतची खासबाग ही जागा निवडली . मैदानाची वैशिष्ट्ये म्हणजे दक्षिण, पश्चिम व उत्तर या तीन बाजूंनी प्रचंड, दगडाच्या मजबूत भिंती उभ्या उरलेल्या पूर्व बाजूला दोन्ही बाजूंनी चिरेबंदी तटबंदी उभी केली व मधल्या मोकळया भागात एक टुमदार, देखणी इमारत उभी केली व इमारतीच्या दोन्ही बाजूंनी प्रवेशद्वार उभे केले. संपूर्ण मैदान वरून खाली उतरणीला लागून संपूर्ण भरून घेतले.महाराजांनी तालमी जशा उभ्या केल्या , तसेच खुराक व मेहनत देऊन मल्ल घडविले. अशा मल्लांच्या लढतीसाठी पन्नास-साठ हजार कुस्ती शौकीन सामावतील असे जंगी खासबाग मैदान महाराजांनीच उभे केले .शेकडो लोकांच्या सहा वर्षाच्या घामातून लाखो रुपये खर्च करून हे मैदान उभे केले. उंचीवरून सखलाकडे जाणाऱ्या या मैदानात कुठेही बसले तरी कुस्ती स्पष्ट दिसते . या मैदानात सुमारे २५ ते ३० हजार लोक भारतीय बैठकांवर बसू शकतात . मैदानाच्या कोणतेही कोपऱ्यात बसले तरी प्रत्येकाला कुस्ती दिसते हेच या मैदानाचे वैशिष्ट्य आहे .असे मैदान भारतात इतरत्र कोठेही नाही .अशा या मैदानात भारताच्या कानाकोपऱ्यातून विशेषतः पंजाबातून आलेले मल्ल महाराजांचा आशीर्वाद, बिदगी, मानाचा जरीचा फेटा, चांदीची गदा घेऊन गेलेले आहेत.

या मैदानाच्या उद्घाटनाच्या वेळी जगज्जेता पैलवान गामा याचा भाऊ इमाम बक्ष व गुलाम मोहिद्दिन यांच्यात लढत झाली होती. हे दोन्ही मल्ल अफाट ताकदीचे असल्याने यावेळी जोरदार लढत पहायला मिळाले होती. यात इमाम बक्ष विजय झाला. शाहू महाराज यांनी चांदीची गदा बक्षीस दिली तसेच पराभूत मल्लालादेखील बक्षीस दिले .तेव्हापासून चांदीची गदा देणे व पराभूत मल्लांचाही सन्मान करणे या परंपरेलाही सुरुवात झाली.

**खासबाग मैदानात गाजलेल्या काही कुस्त्या...**

1. १९१३ गुलाम मोहिद्दिन विरुद्ध इमाम बक्ष.
2. १९१६ जगविख्यात जर्मन पैलवान व्हेन कॅमल विरुद्ध मलाप्पा तडाखे.
3. १९२४ ज्ञानू माने विरुद्ध गुल महंमद कला वाला.
4. १९४० गामा पंजाबी विरुद्ध शिव गौडा मुल्नाळे.
5. १९७६ युवराज पाटील विरुद्ध विजय कुमार.
6. १९७८ युवराज पाटील विरुद्ध सतपाल.
7. १९७८ दादू चौगुले विरुद्ध सादिक पंजाबी.
8. १९७९ विष्णू फडतरे विरुद्ध रामा माने
9. दादू चौगुले विरुद्ध सतपाल
10. १९८३ तारीख लोहार वाला विरुद्ध बाळू पाटील.
11. १९८४ युवराज पाटील विरुद्ध सतपाल
12. लक्ष्मण वडार विरुद्ध बाळू पाटील.

**२. शाहू महाराजांचे मैदानी खेळातील योगदान..**

कोल्हापूर ही कलानगरी, क्रीडानगरी म्हणून ओळखली जाते. राजश्री शाहू महाराजांमुळे या नगरीत कला ,क्रीडाक्षेत्र नावारूपाला आले.या नगरीतल्या कलाकारांनी खेळाडूंनी जगभर कोल्हापूरचा नावलौकिक निर्माण केला .राजश्री शाहू महाराज हे लहानपणापासून विविध खेळात पारंगत होते. शालेय वयापासूनच ते घोडेस्वार ,कुस्ती ,मर्दानी खेळ यांचे प्रशिक्षण घेत होते. तसेच त्यांना निसर्ग व प्राण्यांची आवड होती. कुस्ती बरोबर शाहू महाराजांनी मर्दानी खेळांचा पुनर्जीवन केले. दांड पट्टा ,फरीगदा, विटा, जांबिया आदी हत्यार चालविले जाणारे खेळ नामशेष

होते. कारण या हत्यारांची होणाऱ्या लढाया बंद झाल्या होत्या. आता बंदुका, मशीनगन आणि तोफांचा वापर लढायात होऊ लागला होता.तरी या या मर्दानी खेळात जे थोडेबहुत लोक शिल्लक होते .उदारणार्थ.. दादू माळी , यशवंत साळुंखे, गणपत सासणे ,बाबा नलवडे यांच्या मदतीने या खेळाला परत चालना दिली. तालमीत कुस्ती बरोबर हे खेळ संगतीने सुरू झाले.

**संदर्भग्रंथ**:

१) डॉ. जयसिंगराव पवार," राजश्री शाहू महाराज स्मारक ग्रंथ", महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी प्रकाशन

२) प्रबोधनकार ठाकरे ,"माझी जीवन गाथा", नवता बुक वर्ल्ड प्रकाशन, २०१६.

३) विकिपीडिया ,"कोल्हापूर संस्थान".

४) प्रा. नानासाहेब साळुंखे," शाहूंच्या आठवणी" वृषाली प्रकाशन, आवृत्ती २९, २०१६.

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जलसिंचन धोरणाची प्रस्तुतता

**प्रथमेश राजेंद्र सुतार**
विद्यार्थी, बी.ए.भाग-३, इतिहास विभाग, प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय मलकापूर - पेरीड, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.
Email- psutar162@gmail.com

**प्रस्तावना :**

देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी त्या देशातील शेती आणि उद्योग क्षेत्रांच्या समस्या सोडवाव्या लागतात. शेतीला दुष्काळापासून वाचवण्यासाठी अनेकविध प्रयत्न राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केले. एक राजा आपल्या हातातील सत्ता व संस्थांनातील साधन संपत्ती याचा प्रजेच्या कल्याणसाठी किती तळमळीने वापर करतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे शाहू महाराज. संस्थांनातील प्रजेच्या गरजा आणि समस्या लक्षात घेऊन त्या सोडवण्याचे काम शाहू महाराजांनी केले. म्हणूनच प्रजा त्यांना लोकराजा असे संबोधते. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अनेक शैक्षणिक आर्थिक सुधारणा घडवून आणल्या.

**शोध निबंधाचा उद्देश :-**

स्वत:च्या देशातील उद्योगधंदयाना पोषक असेल असेच धोरण ब्रिटिश राज्यकर्त्ये भारतात राबवत होते. याचा आर्थिक क्षेत्रावर अत्यंत वाईट परिणाम झाला होता. बहुसंख्य समाजाची आर्थिक परिस्थिति खालावली होती. अशा काळात कोल्हापूर संस्थानात लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या प्रजेला या आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी व दुष्काळासारख्या आपत्तीवर मात करण्याच्या उद्देशाने भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधण्याची योजना आखली. यामुळे या क्षेत्रातील शेती सुजलाम- सुफलाम झाली. या भागातील लोकांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचा वेग वाढला. राजर्षी शाहूंच्या विचारातून इतका विस्तीर्ण सिंचन क्षेत्र कशा पद्धतीने निर्माण झाले व त्याचे अनेक फायदे या भागातील जनतेला झाले याचा आढावा घेणे हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

**विषय विवेचन :-**

छत्र. शाहू राजांनी संस्थानाची अधिकार सुत्रे हाती घेतल्यापासून शेती पिकासाठी प्रयत्न सुरू केले. कोल्हापूर संस्थांनातील लोकांच्या उपजीविकेचे साधन शेती व्यवसायच होते. त्यात शेतीचा आकार लहान आणि पीक उत्पादकता कमी होती. अशा परिस्थितीतील शेतकऱ्याचा विकास करण्याची जबाबदारी महाराजांनी उचलली. पण राज्यारोहणानंतर कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच संस्थांनामध्ये दुष्काळाला तोंड द्यावे लागले. आणि या दुष्काळाचा सामना करण्यासाठी जुन्या तलावांची दुरूस्ती करणे, त्यासोबतच नवीन तलावांची बांधणी करणे.मोठ्या तलावांच्या योजना हाती घेतल्या. प्रजेला पिण्याचे पाणी उपलब्ध झाले पाहिजे तसेच शेतीला वेळोवेळी पुरेसे पाणी मिळाले पाहिजे आणि त्यातून शेतीचे उत्पादन वाढले पाहिजे. त्यातून पुढे जाऊन आधुनिक पद्धतीने शेती करता येईल, शेतीला जोड व्यवसाय करता येईल. शेतीमालावर आधारित उद्योग सुरू करता येतील. यातून सहकार वाढेल व पर्यायाने संस्थांनातील लोकांचा आर्थिक स्तर उंचावेल. रोजगार निर्माण होईल. व जनता सुखी होईल असा महाराजांचा विचार होता आणि म्हणूनच शेतीला पाण्याची जोड उपलब्ध करून देण्यासाठी एक दीर्घकालीन योजना महाराजांनी योजली आणि ती योजना म्हणजे राधानगरी धरण होय. ही कल्पना महाराजांना इंग्लंडच्या प्रवासात सुचली.

आपल्याकडे उपलब्ध असणाऱ्या जलसंपतीचा आपण आपल्या संस्थानाच्या विकासासाठी कशाप्रकारे वापर करू शकतो. याचा विचार सतत त्यांच्या मनात चालू होता. ३ फेब्रुवारी १९०२ ला आर.व्ही.सबनीस- दिवाण करवीर सरकार यांच्या सहीने त्यांनी एक जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यात कोल्हापूर संस्थांनासाठी सार्वत्रिक

पाटबंधारा धोरण जाहीर करण्यात आले. संस्थानाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात पाटबंधारे हा स्वतंत्र विभाग बनविण्यात आला. शंकर सिताराम गुप्ते यांना ' इरिगेशन ऑफिसर' म्हणून नेमण्यात आले. यांच्यावर संस्थानात अस्तित्वात असणाऱ्या पाटबंधाराच्या सोईंची गावानुसार तपशीलवार पाहणी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. पाटबंधारे विभागाला आपले दिलेले काम लवकर करता यावे यासाठी एक ड्राफ्ट्समन, एक मेस्त्री व एक कारकून यांची नेमणूक करण्यात आली. आणि साहित्याकरिता सहाशे रुपयेची ग्रँट मंजूर करण्यात आली. इरिगेशन ऑफिसरला लागेल ती माहिती पुरविण्याचे व मदत करण्याची जबाबदारी तालुक्यातील रेव्हिन्यू ऑफिसवर दिली. आणि हा सर्वे व महाराजांच्या मनातील विचार, १९०१-०२ चा कोल्हापूर संस्थांनातील प्रशासकीय अहवाल याचा आधार मिळाला. आणि दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी पाटबंधारे सोयीचा विस्तार करण्याचा महाराजांचा विचार झाला. आणि त्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. आणि पाटबांधाऱ्याच्या कोणत्या सुविधा राबविता येतील. याबाबत अहवाल सादर करण्यास सांगितले. यांनी पाणीपुरवठ्याच्या सोई वाढविण्याच्या दृष्टीने रावसाहेब डी.ए. विचारे, एक्झिक्युटिव इंजिनियर कोल्हापूर स्टेट यांनी सुचविलेल्या योजनांचाही मोठा वाटा होता.

१९०६-०७ मध्ये जो अहवाल प्रकाशित झाला यानुसार दोन तलावांची पाहणी करण्याची जबाबदारी मि. मित्तर यांच्यावर सोपविण्यात आली. त्यासाठीच त्यांची खास नेमणूक करण्यात आली. पहिली योजना होती फेजिवडेनजीक भोगावती नदीवर धरण बांधण्याची आणि दुसरी होती भुदरगड तालुक्यात फराळेनजीक दूधगंगा नदीवर धरण बांधण्याची. या योजनांनुसार दोन मोठे तलाव बांधण्याच्या दृष्टीने पाहणी करण्यात आली. या दोन्ही योजना लक्षात घेऊन महाराजांनी १९०७ च्या सुरूवातीला भोगावती नदीवर धरण बांधण्याचा निर्णय घेतला. धरण बांधण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याबाबतीत जे जे प्रयत्न करता येण्याजोगे होते ते ते सर्व त्यांनी केले. आपली सत्ता, साधनसामग्री असोत किंवा ब्रिटीशांशी असणारे चांगले संबंध असेना या सगळयाचा वापर शाहू महाराजांनी राधानगरी धरणाच्या उभारणीसाठी केला. त्यांनी वेळोवेळी त्यावेळीचे गव्हर्नर, गव्हर्नरचे सल्लागार मंडळ, मुंबई राज्याचे सार्वजनिक बांधकाम खाते यातील इंजिनियर्स या सर्वांशी विचार विनिमय केला व योजनेत थोडा-फार बदल केला. मुंबई सरकारच्या पाठिंब्याशिवाय प्रकल्प पुरा होणे अवघड आहे. याची जाणीव त्यांनी गव्हर्नरला करून दिली व वेळोवेळी पाठपुरावा देखील केला. त्यावेळीचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लमिंगटन होते. त्यांनी या प्रकल्पाला भेट द्यावी म्हणून पाठपुरावा देखील केला व गव्हर्नरनी दाजीपूर येथील या धरण बांधकामाच्या ठिकाणी भेट दिली. गव्हर्नरच्या भेटीमुळे प्रकल्पाचे काम वेगाने होईल असा महाराजांचा त्यामागे विचार होता. त्यानंतर गव्हर्नरनी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. या सर्व प्रयत्नांनंतर धरणाचे प्रत्यक्ष बांधकाम नोव्हेंबर १९०९ मध्ये सुरू झाले. महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांच्या शुभहस्ते या कार्यास आरंभ करण्यात आला आणि तलावाला त्यांचे नाव दिले.

**धरणक्षेत्रातील भौगोलिक स्थिती :-**

कोल्हापूरच्या पश्चिमेला ६० मैलांवर सह्याद्रीच्या घाटात भोगावती नदी उगम पावते. डोंगराळ भागातून नागमोडी वळण घेत कोल्हापूरच्या सपाट भू-प्रदेशात येते. या क्षेत्रात पावसाळयात २०० इंचापेक्षा अधिक पाऊस पडतो . या परिस्थितीचा विचार करून महाराजांनी येथे धरण बांधण्याचा निर्णय घेतला. १९१८ साली जवळजवळ चौदा लाख रुपये खर्च करून चाळीस फूट उंचीचे हे धरण पूर्ण झाले. महाराजांच्या कारकिर्दीत धरणाचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. दुसरे महायुद्ध, आर्थिक अडचण यांमुळे काम लांबत गेले. १९४६ नंतर बांधकामात गती आली. १९४९-५३ या काळात दोनशे पंचेचाळीस लाख रुपये खर्च करून त्यात ८३६२ दशलक्ष घनफूट पाणी साठवले जाऊ लागले. मुळातच कालवे काढून शेतीला पाणी पुरवठा करणे आणि दुष्काळावर मत करणे असा या धरणाचा उद्देश होता. नंतर याच धरणातून वीजनिर्मिती व कोल्हापूर शहराला पाणी पुरवठा अशी तिहेरी भूमिका याच धरणाच्या पाण्यातून करण्यात आली. महाराष्ट्रातील पहिलं व देशातील दूसरा जलविद्युत प्रकल्प याच धरणावर उभारून वीज प्रश्न काही प्रमाणात सोडविण्यात आला. सुरूवातीला धरणात साठविलेले पाणी कालवे काढून शेतीला पुरविण्याचे नियोजन होते. परंतु दोन डोंगरांच्यामधील दारीतून नदी वाहत असल्यामुळे धरण

बांधलेल्या भागात उंच डोंगराचे फुगीर उतार नदीच्यापात्रापर्यंत येतात आणि आणि अशा ठिकाणी बोगदे काढून किंवा कालवे काढून जलसिंचांनासाठी पाठ काढणे व्यावहारिक दृष्ट्या न परवडणारे होते. डोंगराळ भागातून सपाट मैदानात नदी आल्यावरच कालवे, पाट,व इतर जलसिंचनाच्या सोयी वापरता येतात. सुरूवातीला धरणातून नदीमध्ये वाहणारे पाणी दरवेळी कच्चा बंधारा घालून पाणी साठवून शेतीसाठी उपसले जायचे.पण पाणी सोडताना बांधाऱ्याची झीज व्हयायची पाणी गळून जाऊ नये याकडे ही लक्ष द्यावे लागत. अशा कच्चा बंधाऱ्यातून पाणी पुरवठा करणे खर्चीक होत असे म्हणून कोल्हापूर येथे राजाराम महाराजांनी पहिला कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधला व कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची सुरुवात झाली. आणि आता हीच पद्धत महाराष्ट्रातील बऱ्याच भागात वापरली जाते.

सध्या धरणाच्या खालच्या बाजूला भोगावती व पंचगंगेवर सरकारी व खाजगी मिळून तेरा बंधारे आहेत. त्यामध्ये साठवलेले पाणी पिकाला देण्यासाठी शेतीपंप बसविले आहेत. बंधाऱ्यात साठविलेले पाणी नद्यांच्या तीरावर असणाऱ्या शेतीला पुरवून शेती उत्पन्न वाढविले जाते. आज याच धरणामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील शेती सुजलाम-सुफलाम झाली आहे.

**निष्कर्ष –**

या धरणामूळे ऊस आणि इतर पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन मिळाले. कारखानदारीचा विकास झाला. परिणामी रोजगार वाढला. कारखान्यांची संख्या वाढू लागली. व्यापार, वाहतूक, दळणवळणाच्या सोयी निर्माण झाल्या. पायाभूत सुविधांचा विस्तार झाला. अन्नधान्य व कारखानदारसाठी लागणारा कच्या मालाचे मोठया प्रमाणात उत्पादन वाढू लागले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे व कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांच्या हातात पैसा येऊ लागला. शैक्षणिक, सामाजिक,आर्थिक व आरोग्य विषयक सुविधा पूर्ण होऊ लागल्या. त्यांच्या जीवनमानाचा दर्जा पूर्वीपेक्षा उंचावला. साक्षरतेचे प्रमाण वाढले. शेतीवर आधारित जोड व्यवसाय व पशुपालन होऊ लागल्याने शेतकयांना दुहेरी उत्पनाच्या संधी मिळाल्या. कोल्हापूर जिल्ह्यातील अर्थचक्राला चालना देण्याचे काम या धरणामूळे झाले.

**संदर्भ –**

१ राजर्षी शाहू गौरव ग्रंथ – शिक्षण व सेवायोजन विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई

२ पवार जयसिंगराव ( संपा. ) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २००७,

३ पाटील टी. एस., राजर्षी शाहू छत्रपती ( १८७४- १९२२ ) श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर ,२०१३

४ पुढारी दैनिक वृतपत्र व पुढारी ऑनलाइन , २६/६/२०२१

५ साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, २०१६

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि शिक्षणव्यवस्था

**सिद्धनाथ मधुकर गाडे**
संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email- siddhanathgade0@gmail.com

**प्रस्तावना:-**

भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात राजर्षी छ. शाहू महाराज यांचे नाव अग्रगण्य स्थानावर आहे. करवीर संस्थानात त्यांनी केलेल्या समाजसुधारणेच्या कार्यामुळे त्यांची ओळखत 'उपेक्षितांचा राजा' अशी केली जाते. त्यांना मिळालेल्या राजपदाच्या संपूर्ण कार्यकाळात बहुजन समाज्याच्या उन्नतीसाठी त्यांनी करवीर संस्थानात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले होते. यातील सर्वात क्रांतिकारक निर्णय हा मागासवर्गीय समाज्यासाठी राखीव जागांच्या बाबतीत घेतलेला होय. २६ जुलै १९०२ रोजी करवीर संस्थानातील उपेक्षित व मागासवर्गीय असलेल्या जनतेस शैक्षणिक व राजकीय क्षेत्रामध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यांचा हा निर्णय अखिल भारतीय स्तरावर ऐतिहासिक व क्रांतिकारक मानला जातो. कारण त्यांच्या या निर्णयाचे प्रतिबिंब आपल्याला संविधानात आरक्षणाच्या रूपाने आल्याचे दिसून येते. संविधानातील आरक्षणाची तरतूद भारतातील मागासवर्गीय जनतेस मूळ प्रवाहात आणण्यासाठी खूप महत्त्वपूर्ण ठरली आहे. राखीव जागांच्या बरोबरच शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी दुसरा एक क्रांतिकारक निर्णय घेतला होता. तो म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीकरणाचा होय. शाहू महाराज्यांच्यावर महात्मा फुलेंच्या शिक्षण विषयक विचारांचा खूप मोठा प्रभाव होता. शिक्षण हीच सर्व सामाजिक सुधारणांची व प्रगतीची जननी आहे आणि समाजातील मागासलेल्या वर्गाची बौद्धिक गुलामगिरी नष्ट होण्यास शिक्षण गरजेचे आहे. यासाठी किमान प्राथमिक शिक्षण समाजाला उपलब्ध करून दिले पाहिजे, असा विचार म. फुलेंनी मांडला होता.[१] म. फुलेंच्या या विचारामुळे शाहू महाराजांना जाणीव झाली की, अस्पृश्य लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर जे जुलूम केले जात आहेत ते झुगारून देण्याची शक्ती फक्त शिक्षणात आहे. यासाठी या वर्गातील लोकांना किमान मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. याच जाणीवेतून महाराजांनी संस्थानात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. या नंतर करवीर संस्थानात शैक्षणिक चळवळीचा मोठा पाया रोवला गेला. हाच पाया पुढे महाराष्ट्राबरोबरच भारतातील शैक्षणिक चळवळीस खूप मोठा आधार ठरला. त्यामुळे प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून रा. छ. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

**शाहू महाराजांचा शिक्षण विषयक विचार:-**

म. फुलेंच्या शिक्षण विषयक विचारांच्या बरोबरच तत्कालीन असलेल्या अनेक शैक्षणिक घडामोडी महाराजांच्यावर प्रभाव निर्माण करीत होत्या. या प्रभावातून महाराजांना शैक्षणिक विषयक अनेक गोष्टींची जाणीव झाली. याच जाणीवेतून महाराजांनी पुढे अनेक शिक्षणविषयक विचार मांडले. 'पिढ्यानपिढ्या अज्ञानाच्या अंधकारात राहिलेल्या, व आंधश्रद्धा आणि दारिद्र्याच्या खाईत पिचत पडलेल्या समाज्याला यातून बाहेर काढणेसाठी शिक्षणाच्या इतका चांगला उपाय कोणताच नाही असा विचार त्यांनी मांडला.' याच विचाराच्या जाणीवेतून त्यांनी समाजाच्या अंगणी ज्ञानगंगा पोहचवण्याचे कार्य केले होते. शिक्षण विषयक आणखीन विस्तृत विचार मांडताना महाराज म्हणतात की, 'अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही असणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत गरज आहे.[२] याच विचाराला मूर्त रूप देण्याचे कार्य महाराजांनी सक्तीच्या व मोफत शिक्षण विषयक निर्णयाच्या माध्यमातून घेतला. ही शिक्षणाची व्यवस्था घालून देताना महाराज नेहमी म्हणत की, इंग्रजी शिक्षणापासून भारतवासियांना तिसरा डोळा प्राप्त झालेला आहे. हा तिसरा डोळा जो पर्यंत समाजातील सर्व जाती-धर्मांमध्ये प्रसारीत होत नाही, तोपर्यंत त्यांना स्वराज्य देण्यात काही अर्थ नाही. याच विचारातून पुढे महाराजांनी कोल्हापूर मध्ये अनेक जाती आणि धर्मासाठी विविध वसतिगृह काढलीत. त्यामुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या लोकांना शिक्षण अगदी योग्य व सोप्या पद्धतीने घेण्यास मदत झाली.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य:-**

शाहू महाराजांचे व्यक्तिमत्व अत्यंत क्रियाशील होते. म्हणूनच त्यांनी शिक्षणाला समतेची गुरुकिल्ली मानून कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांकरिता शिक्षणाची द्वारे खुली केली होती. समाजात ऐक्य व समानतेचा पुरस्कार करून त्यांनी शिक्षण कार्यात नेत्रदीपक यश संपादित केले. ज्याची शिक्षणक्षेत्राच्या इतिहासात तोड नाही. आपल्या समाजातील व्यक्तीच्या सुखदुःखाना स्वतःचीच सुखदुःखे मानणाऱ्या या युग प्रवर्तक शासकाने आपल्या

प्रयत्नांमुळेच दक्षिणेतील काशी म्हणून नावलौकिक मिळवलेल्या कोल्हापूर नगरीला शिक्षण काशीचा बहुमान प्राप्त करून दिला. या सुप्रसिद्ध विद्या प्रसारक आणि असंख्य प्रज्ञाने समाजास ज्ञानाच्या प्रकाशात आणण्याकरिता सर्व प्रथम प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य दिले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या हक्काचे व कर्तव्याचे उत्तरदायित्व पटवून देण्याकरिता उच्च शिक्षणाशिवाय पर्याय नाही. याचबरोबर संपूर्ण समाजाला सुज्ञ बनविण्याचे सामर्थ्य उच्च शिक्षणात आहे, हे ओळखून महाराजांनी उच्च शिक्षणाला चालना देणेचे धोरण आखले. या धोरणातुनच त्यांनी बंद होण्याच्या बेतात असलेल्या कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजला आर्थिक साहाय्य दिले. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालय व इतर संस्थांनापण त्यांनी सक्रियपणे साह्य केले. उच्च शिक्षणाबरोबरच महाराजांनी संस्थानात धर्म व तंत्रज्ञान विषयक शिक्षणाला चालना देणेचे धोरण ही आखले होते. यातूनच त्यांनी विविध शैक्षणिक संस्थाची उभारणी संस्थानात केली. यामध्ये पुरोहित शाळा (१९१३), युवराज शाळा, पाटील शाळा (१९१३), उद्योग शाळा, (जयसिंगपूर घाटके टेक्निकल इन्स्टिट्यूट-१९१२), संस्कृत शाळा (१९१७), सत्यशोधक शाळा (१९१३), सैनिक शाळा, इन्फंट्री स्कूल इत्यादींचा समावेश आहे.[३]

शैक्षणिक संस्थाची नुसती उभारणी न करता त्या संस्थाचे कार्य सर्वसमावेशक असावे असा विचार महाराजांचा होता. शिक्षणाच्या या सर्वसमावेशकते बाबत बोलताना महाराज म्हणतात की, 'समाजातील एकूण एक व्यक्तीला त्याची जात, पात, पंथ, भेद लक्षात न घेता शिक्षण द्यावे, स्वतःचे जीवनमान उंचावण्यास त्यास उद्युक्त करावे. समाजातील अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी.'[४] फक्त जाती व पंत भेद नष्ट झाल्याने शिक्षणाचे धोरण सर्वसमावेशक होत नाही. तर या शिक्षणाच्या माध्यमातून पुरुषांच्या बरोबरीने स्त्री पण शिकली तरच हे शिक्षण सर्वसमावेशक होऊ शकते. याच भूमिकेतून महाराजांनी संस्थानात मुला-मुलींसाठी एकत्र शाळा काढल्या होत्या. मात्र या एकत्रित असलेल्या शाळेत मात्र फक्त मुलेच प्रवेश घेत होती.[५] कारण तत्कालिक असलेल्या सनातनी समाजास महाराजांचा हा दुरदुष्टीचा निर्णय न पचणारा असा होता.

**मोफत व सक्तीचे शिक्षण :-**

इ.स. १८५४ च्या वूडच्या खलित्यापासून भारतात इंग्रजी शिक्षण व्यवस्थेची पायाभरणी करण्याचे कार्य इंग्रजांनी केले. यानंतर पुढे १८८२ साली इंग्रजांनी हंटर कमिशन नियुक्त करून माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाला चालना देणेचे धोरण आखले. या हंटर कमिशनला म.फुलेंनी १८८२ साली एक निवेदन सादर केले. या निवेदनात म. फुले म्हणतात की, इंग्रज राज्यकर्त्यांचे धोरण वरिष्ठ बालकांच्या शिक्षणाच्या मक्तेदारीसाठी पूरक होते. परंतु या शिक्षणाच्या प्रवाहात खालच्या वर्गातील मुलांना संधी दिली जात नाही. शिक्षणाशिवाय कनिष्ठ वर्गाची ऐहिक व बौद्धिक गुलामगिरीतून सुटका होणार नाही. त्यामुळे बारा वर्षाच्या आतील सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत द्यावे. हाच म. फुलेंचा विचार पुढे शाहू महाराज्यांच्यावर प्रभाव निर्माण करून गेला. याचे प्रत्यंतर शाहू महाराजांनी नाशिक येथे केलेल्या भाषणातून दिसून येते. ते म्हणतात की, 'खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जड व जुलमी जू लादलेले आहे, ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीचा व मोफत प्राथमिक शिक्षणाची खूप गरज आहे.'[६] नाशिक येथील सभेत केलेले भाष्य प्रत्यक्ष प्रयोगात आणणेसाठी महाराजांनी करवीर संस्थानात एक कायदा पारित केला. तो कायदा म्हणजेच मोफत व सक्तीचा प्राथमिक शिक्षण विषयक कायदा होय. प्राथमिक शिक्षणासाठी महाराजांनी संस्थानाच्या अंदाजपत्रकात एक लक्ष रुपयाची तरतुद केली होती. हे एक लक्ष रुपये कोणत्या पद्धतीने खर्च करावेत यासाठी महाराजांनी एक कमिटी नेमली. या कमिटीच्या शिफारशी नुसार कोल्हापूर शहरात व संस्थानातील सर्वच गावात सक्तीचे शिक्षण देण्याचा हुकुम त्यांनी सप्टेंबर १९१६ साली दिला. सन १९१८-१९ च्या अखरे, या सक्तीच्या योजनेस विस्तृत स्वरूप देऊन निरनिराळया खेड्यात ९६ नवीन शाळा उघडण्यात आल्या. यापैकी पहिली शाळा करवीर संस्थानातील चिखली येथे दिनांक ०४ मार्च १९१८ या दिवशी स्वतः महाराजांनी उघडली.[७] याच बरोबर १९१८ साली आपल्या संस्थानात सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी स्वतंत्र खाते स्थापन करून 'डायरेक्टर' व 'एज्युकेशनल इंस्पेक्टर' या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या होत्या. १९१७ ते १९१८ सालात प्राथमिक शाळा योजनेत २७ शाळा व १२९६ मुले होती. यात १९२१ ते १९२२ मध्ये वाढ होऊन ४२० शाळा व २२०७७ मुले इतकी झाली होती.[८]

**वसतिगृहांची स्थापना :-**

शिक्षण विषयक कायदे करून महाराज थांबले नाहीत. तर हे शिक्षण घेणेसाठी शहराच्या ठिकाणी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्यासाठी अनेक सुविधा निर्माण केल्या पाहिजे असा विचार शाहू महाराजांच्या मनात घर करून गेला. याच विचारातून महाराजांनी उच्च शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय व्हावी यासाठी महाराजांनी कोल्हापुरात १९०१ साली भारतातील पहिले व्हिक्टोरिया मराठा वसतिगृह सुरु केले.[९] दिनांक २५ सप्टेंबर १९०१ मराठा वसतिगृहाच्या इमारतीचा शुभारंभ करण्यात आला होता. याकामी महाराजांनी ४७,०००

देणगी आणि गावातील जमीन दिली होती. त्याशिवाय रुपये ५५० वार्षिक अनुदान ही या वसतिगृहासाठी दिले होते. या वसतिगृहाच्या अंगणामध्ये त्यांनी एक शैक्षणिक संकुल पण उभे केल. त्यामध्ये आज शहाजी छत्रपती आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, होमिओपॅथी कॉलेज, डिप्लोमा फार्मसी कॉलेज, श्रीपतराव बोंद्रे इंग्लिश मीडियम स्कूल व साई हायस्कूल यांचा समावेश आहे. या सर्व शाखांचे कार्य छत्रपती शाहू शिक्षण संस्थेच्या अधिपत्याखाली चालवल्या जातात.[१०] १९०१ साली स्थापन केलेल्या या वसतिगृहात केवळ मराठाच विद्यार्थी नव्हते तर, शाहू महाराजांनी दिलेल्या आज्ञेनुसार त्या वसतिगृहामध्ये इतर धर्माचे विद्यार्थीही राहत असत. मात्र या वस्तीगृहात इतर समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नाही ही गोष्ट लक्षात आले नंतर महाराजांनी नंतरच्या आठ-दहा वर्षात आपल्या राजधानीत प्रत्येक जाती करिता एक अशी जातवार बोर्डिंग सुरू केली. यामध्ये दिगंबर जैन बोर्डिंग (१९०१)लिंगायत विद्यार्थी वस्तीग्रह (१९०६), मुस्लिम बोर्डिंग (१९०६), मिस क्लार्क होस्टेल (१९०८), दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (१९०८), श्री नामदेव बोर्डिंग (१९११), पांचाल ब्राह्मण वसतिगृह (१९१२), श्रीमती सरस्वतीबाई गोड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह (१९१५), इंडियन ख्रिश्चन हॉस्टेल (१९१५), रावबहाद्दूर सबनीस प्रभू बोर्डिंग (१५१५), आर्यसमाजी गुरुकुल (१९१८), वैश्य बोर्डींग (१९१८), ढोर चांभार बोर्डिंग (१९१९), शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह (१९२०), श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊस (१९२०), सुतार बोर्डिंग (१९२१), नाभिक विद्यार्थी वसतिगृह (१९२१), सोमवंशी आर्यक्षत्रिय बोर्डिंग (१९२०), देवांग बोर्डिंग (१९२०), अशी एकंदर वीस व कोल्हापूर बाहेर पुण्याला छत्रपती ताराबाई मराठा बोर्डिंग (१९२०), अहमदनगरला श्री छत्रपती करवीर चौथे शिवाजी महाराज मराठा बोर्डींग (१९२०), नागपूरला चोखामेळा वसतिगृह (१९२०), आणि नाशिकला श्री शाहू छत्रपती बोर्डिंग (१९१९), उदाजी मराठा वसतिगृह (१९२०), वंजारी समाज वसतिगृह (१९२०) यांचा समावेश आहे.[११] महाराजांनी जातनिहाय सुरु केलेल्या वसती गृहांच्यामुळे कोल्हापुरात ब्राह्मणेत्तर जातीमधील मुले खेड्यातून कोल्हापुरात येऊ लागली व शिकू लागली. यामुळेच पुढे कालांतराने कोल्हापूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनले. तसेच कोल्हापूरची ओळख विद्यार्थी वसतिगृहाची जननी अशी होऊ लागली.[१२] या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रारंभापासूनच राष्ट्रप्रेम, सहकार्य स्वावलंबन, ऐक्य, शिस्त, इ. विविध गुण जोपासले जात होते. व त्यामुळेच जातीभेदाची तीक्ष्ण धार बोथट होऊन अनेकांना स्वंयप्रयत्नातून सुधारणा घडवून आणण्यास प्रेरणा मिळत होती.

**निष्कर्ष:-**

ब्राह्मणेतर बहुजन समाज खेडोपाडी विखुरलेला होता. पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून वंचित असल्यामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात तो मागासलेला होता. मागासलेल्या लोकांची उन्नती साधण्यासाठी त्यांच्यात शिक्षण प्रसार करणे गरजेचे आहे, हे ओळखून शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्यासाठी प्रयत्न केले. शाहू महाराजांनी समाजातील वंचित उपेक्षित दुर्बल घटकांना जवळून पहिले होते. जाती व्यवस्थेला आव्हान देऊन अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यासाठी त्यांनी प्रस्थापितांच्या विरुद्ध तीव्र संघर्ष केला. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे अमूल्य साधन असल्याचे ध्यानात घेऊन त्यांनी आपल्या अठरापगड जातीतील लोकांच्या शिक्षणासाठी आपले कर्तृत्व आणि सिंहासन पणाला लावले. राजदंड ही शोभेची वस्तू नसून ते सेवेचे साधन आहे असे ते म्हणत होते.

शिक्षण कार्याद्वारे महाराष्ट्राच्या समाजात बांधिलकी निर्माण करणाऱ्या व आपली अस्मिता पुरविणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना, मद्रासच्या 'Justice' या वृत्तपत्राने त्यांच्या 'A Prince among men and a man among princes' असे संबोधले तर 'Times of India' या वृत्तपत्राने लिहिले की, 'कोल्हापूरचे छत्रपती हे दुसऱ्या कालखंडात जन्माला आले असते, तर त्यांनी साम्राज्य स्थापन केले असते.' शाहू महाराजांनी दलित जाती-जमातीसाठी लागू केलेल्या शिक्षण विषयक व इतर सुधारणा बघून राष्ट्रपिता महात्मा गांधींनी राजर्षींच्या कार्याचा गौरव 'निस्वार्थ मिशनरी भावनेचे अद्वितीय उदाहरण' असे संबोधून केला आहे. राजर्षी शाहूंची विधवा सून राणी इंदुमती देवीचे शिक्षक श्री. भागवराव शाहू महाराजांच्या शिक्षण विषयक तत्वांना पारखून त्यांना "Really a Philosopher Prince" असे संबोधतात. तर महाराजांचे आदरणीय गुरु एस. एस. फ्रेजर म्हणतात, "Outstanding features which explain Sir Shahu Chhatrapati's work is his combination of a broad humanity with uncompromising courage." महाराजांच्या या

कामगिरीमुळे त्यांना महाराष्ट्रातील व भारतातील नव्हे तर, संपूर्ण जगातील सामाजिक सुधारणांच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**संदर्भ साधने:-**

1) डॉ. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू छत्रपती आणि मोफत सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा, अध्यक्ष, राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट कोल्हापूर, २०१७, पृ. १०.

2) नवभारत, फेब्रुवारी १९८४, पृ.१.

3) उपरोक्त, नवभारत, पृ.४

4) कांबळे नारायण (संपा), राजर्षी शाहू नव्या दिशा नवे चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०११, पृ. १५७

5) Prof. Dr. Khane D. B., Rajarshi Shahu Chhatrapati of Kolhapur (1884 A.D. – 1922 A.D), Kolhapur, 2021, p.n. 112

6) डॉ. कांबळे बाबासाहेब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विचार, सम्यक विचार प्रकाशन, कोल्हापूर २०२१, पृ. २१

7) डॉ. पवार जयसिंगराव(संपा.), श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८, पृ. ३६१

8) तैत्रव, पवार जयसिंगराव (संपा), पृ. १५-१६.

9) डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००७ पृ.९

10) साळुंखे नानासाहेब, शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन कोल्हापूर, २०२०, पृ.२२५

11) तैत्रव्य, नवभारत. पृ. ५

12) डॉ. भोसले अरुण, दक्षिण महाराष्ट्र राजकीय चळवळी व नेतृत्व, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०२२, पृ.१०३

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# राजर्षी शाहू महाराज यांचे पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदान

**शंकर हरिदास पवार**

संशोधक विद्यार्थी, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Email- shnkrpawar3@gmail.com

कोल्हापूर संस्थानचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे प्रजाहितदक्ष राजे होते. त्यांनी प्रजेच्या कल्याणासाठी शिक्षणाचे महत्त्व जाणले आणि शिक्षणासोबतच शेती, उद्योग, सहकार आदी क्षेत्रात मोठे काम केले. तसेच त्यांनी सामाजिक सुधारणांसाठी पुढाकार घेतला. समाजसुधारणेचे कार्य करत असतानाच शाहू महाराजांना वर्तमानपत्रांच्या सामर्थ्याची जाणीव झाली. याच जाणीवेतून त्यांनी आपल्या संस्थानातील आणि संस्थानाबाहेरील लोकांना प्रत्यक्ष सहाय्य करून वर्तमानपत्रे सुरू करण्यास प्रवृत्त केले. या कार्यामुळेच त्यांची कारकीर्द कोल्हापूर जिल्ह्यातील पत्रकारितेच्या विकासाला पोषक ठरली. तरीही शाहूपूर्व काळातच कोल्हापूर संस्थानात वर्तमानपत्रे निघू लागली होती.

**शाहूपूर्व काळातील वर्तमानपत्रे**

मराठी वृत्तपत्रसृष्टीला १८३२ मध्ये मुंबईत प्रारंभ झाला. बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केलेल्या ‘दर्पण’ला पहिल्या वर्तमानपत्राचा मान जातो. त्यानंतर पुणे आणि महाराष्ट्रातील इतर शहरातही वर्तमानपत्रे निघू लागली. शाहूपूर्व काळातच कोल्हापूर संस्थानात काही वर्तमानपत्रे सुरू झाली होती. कोल्हापूर संस्थानात पहिले वृत्तपत्र सुरू करण्याचा मान नाना मोरोजी त्रिलोकेकर यांच्याकडे जातो. १८५२ मध्ये त्यांनी ‘ज्ञानसंग्रह’ हे वृत्तपत्र सुरू केले.[i]

कोल्हापुरातील दुसरे वर्तमानपत्र संस्थानातील पॉलिटिकल एजंट कर्नल अँडरसन यांनी ‘वर्तमान संग्रह’ या नावाने सुरू केल्याची नोंद मिळते. ‘दरबारच्या कामकाजाची माहिती प्रजेला व्हावी,’ या उद्देशाने हे वर्तमानपत्र सुरू करण्यात आले होते. पुढे नारायण रघुजी मंत्री यांचे ज्ञानसागर (१८७०), सुज्ञानामृत (१८७४) आणि रेव्ह. डी. जे. टेलर यांनी ख्रिस्ती धर्मप्रचारासाठी सुरू केलेले ‘शुभवर्तमानदर्शक’ ही वर्तमानपत्रेही सुरू झाली. १८८६ मध्ये शंकरशास्त्री गोखले यांनी ‘विद्याविलास’ नावाचे मासिक सुरू केले. विद्याविलास दोन वर्षांत साप्ताहिक आणि नंतर दैनिक रुपात निघू लागला. कोल्हापूर संस्थानातील पहिले दैनिक होण्याचा मान ‘विद्याविलास’कडेच जातो.[ii]

**शाहूकालीन वृत्तपत्रे**

कोल्हापूर संस्थानात शाहूपूर्व काळात सुरू झालेली बहुतांशी वर्तमानपत्रेही धार्मिक उद्देशानेच सुरू झाली होती. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत अनेक प्रकारची वृत्तपत्रे उदयास आली. त्यातील बरीच वर्तमानपत्रेही धार्मिक स्वरुपाचीच होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातील शाहू महाराजांचा सामाजिक सुधारणांकडे ओढा वाढला. त्यातूनच त्यांचा संबंध सत्यशोधक समाज आणि ब्राह्मणेतर चळवळीशी आला. या चळवळींना प्रोत्साहन देण्यासाठी महाराजांना वर्तमानपत्रांची आवश्यकता वाटत होती. त्यामुळे त्यांनी ब्राह्मणेतर तरुणांना नवीन वृत्तपत्रे काढण्यास प्रोत्साहन आणि आर्थिक मदत दिली. त्यांनी केवळ ब्राह्मणेतर वर्तमानपत्रांनाच आश्रय दिला असे नाही तर सुधारणावादी ब्राह्मणी वर्तमानपत्रांनाही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहाय्य केले.

**ब्राह्मणी वर्तमानपत्रांना सहाय्य**

शाहूकाळातील पहिले वृत्तपत्रकार म्हणून प्रो. विष्णू गोविंद विजापूरकर यांना ओळखले जाते. राजर्षी शाहूंच्या राज्याभिषेकाच्या मुहूर्तावरच राजाराम महाविद्यालयाचे प्राध्यापक असणाऱ्या विजापूरकर यांनी ‘ग्रंथमाला’ हे मासिक सुरू केले. शाहू महाराजांनी विजापूरकर यांना त्यासाठी १८९४ मध्ये ५०० रुपये अर्थसहाय्य करून भक्कम आधार दिला होता. ‘स्वदेश, स्वधर्म, स्वभाषादिकांचा | जगी मान व्हावा, असा हेतू साचा ||’ हे ग्रंथमालेचे ब्रीद वाक्य होते. [iii] कोल्हापूर दरबार तर्फे शंभर प्रती शैक्षणिक संस्थांमध्ये दिल्या जात. मुंबई, बडोदा या शहरांत वर्गणीदार नेमून ग्रंथमालेसाठी वर्गणीदार मिळवण्यात आले.[iv] पुढे विजारपूरकरांनीच राष्ट्रीय शिक्षणासाठी वाहिलेले ‘समर्थ’ नावाचे साप्ताहिक १८९८ मध्ये सुरू केले. त्यात राजकीय स्वरुपाचे लिखाणही विजापूरकर करत होते. विशेषत: कोल्हापूर संस्थानच्या राजकारणावर टीकात्मक लेखन ते करत होते. वेदोक्त प्रकरणाच्या काळात विजापूरकर यांनी शाहू महाराजांच्या विरोधात भूमिका घेतली. ग्रंथमाला आणि समर्थ मधून छत्रपतींवर कडवट टीका केली जावू लागली. त्यामुळे विजापूरकरांचा राजाश्रय तुटला. तसेच शाहू महाराजांनी ग्रंथमालेस सात वर्षे

दिलेले अनुदान १९०१ पासून बंद केले. पुढे कोल्हापूर दरबारने जामीन मागितल्याने १९०९ मध्ये विजापूरकरांनी 'समर्थ'ही बंद करून टाकले.[v] दरम्यानच्या काळात विजापूरकरांनी 'विश्ववृत्त' नावाचे आणखी एक मासिक सुरू केले होते. याच मासिकात १९०८ मध्ये पं. श्री. दा. सातवळेकर यांनी 'वैदिक प्रार्थनेची तेजस्विता' हा प्रक्षोभक लेख लिहला होता. यामध्ये छत्रपतींची बदनामी केल्याच्या आरोपात विजापूरकरांवर खटला दाखल झाला आणि त्यांना तीन वर्षांची साध्या कैदेची शिक्षा झाली.[vi] तरीही विजापूरकर यांचा ब्राह्मणी वृत्तपत्रांच्या क्षेत्रात मोठा गाजावाजा झाला.

वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांचा ब्राह्मणी वृत्तपत्रांसोबत संघर्ष सुरू झाला. त्यानंतरही शाहू महाराजांनी काही ब्राह्मणी वर्तमानपत्रांना मदत केली. त्यात गोपाळ गणेश आगरकर यांचा 'सुधारक' आणि अच्युतराव कोल्हटकर यांचा 'संदेश' यांची नावे प्रामुख्याने घ्यावी लागतील. १८९५ मध्ये आगरकरांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या काही चाहत्यांनी सुधारक जिद्दीने चालवला. परंतु, पुढे आर्थिक अडचण निर्माण झाल्याने सुधारक बंद पडण्याच्या अवस्थेत होता. तेव्हा शाहू महाराजांनी तत्कालिन संपादक विनायक रामचंद्र जोशी यांच्याकडे कोल्हापूर दरबारमार्फत अर्थसहाय्य पाठवून दिले. १९०६ च्या जुलैमध्ये जोशी यांनी शाहू महाराजांच्या मदतीबद्दल आभार मानणारे पत्र पाठवले होते.[vii] शाहू महाराजांना न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले यांच्या सोबत उदारमतवादी आणि सुधारणांचे समर्थक असणाऱ्या आगरकरांबद्दल आदर होता. सनातनी ब्राह्मण वर्गाविरुद्ध सुधारकने दिलेल्या लढ्याच्या जाणीवेतूनच शाहू महाराजांनी ही मदत देऊ केली.

शाहू महाराजांनी आर्थिक अडचणीत सापडलेल्या कोल्हटकरांच्या 'संदेश'लाही मदत केली. कोल्हटकर हे टिळक पक्षाचे होते. तरीही १९१९-२० मध्ये 'टिळक फंडा'च्या प्रश्नावरून त्यांनी संदेशमधून टिळकांवरच शरसंधान साधले. त्यामुळे त्यांना टिळक भक्तांच्या रोषाला सामोरे जावे लागले. संदेशचा खप घटला आणि वर्तमानपत्र संकटाच्या भोवऱ्यात अडकले. ही बातमी शाहू महाराजांपर्यंत पोहोचली. तेव्हा टिळक पक्षाविरोधात उभ्या राहणाऱ्या वर्तमानपत्राला आधार देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यामुळे त्यांनी चार हजार रुपये कर्ज रुपात कोल्हटकरांकडे पाठवले.[viii] शाहूंनी कोल्हटकरांना आर्थिक आधार दिला असला तरी त्याचा त्यांनी गैरफायदा घेतल्याचे दिसत नाही. कारण शाहूंची मदत पोहोचल्यानंतर 'आपण शाहूंच्या बाजूचे आहोत आणि दरबार जो मजकूर पाठवेल तो आपण प्रसिद्ध करू' असा प्रतिसाद कोल्हटकरांनी दिला. तसेच ते संदेश मधून न्याय्य बाजू मांडू लागले. तेव्हा शाहूंनी कोल्हटकरांना लिहले की, "आपण आपल्या वर्तमानपत्रात माझ्या बाजूचे समर्थन करता. त्या योगाने आपल्या लोकांत अप्रियता संपादन करीत आहात. तरी आपण यापुढे आपल्या लोकप्रियतेस धक्का लागेल म्हणून माझ्या बाजूचे समर्थनपर लेख न लिहल्यास बरे असे मला वाटते."[ix] या घटनेनंतर शाहू महाराजांवर प्रतिकूल टीकाही संदेशमधून होऊ लागली. तेव्हा शाहूंनी कोल्हटकरांकडे कर्जाऊ रक्कम देणाऱ्याला प्रॉमिसरी नोट फाडून टाकण्याचा निरोप दिला. "आपल्या जवळची प्रोमिसरी नोट फाडून टाका! नाही तर सूड उगवण्याच्या बुद्धीने या नोटीचे पैसे वसूल करण्याची आम्हास वासना होईल. अशा तऱ्हेची दुर्बुद्धी आमच्या मनात उत्पन्न होणे अशक्यच करून ठेवूया!" [x] यामधून शाहूंची वृतपत्र स्वातंत्र्याबद्दलची दृष्टी आणि 'संदेश'कारांना मदत करण्याचा निरपेक्ष भाव दिसतो.

**ब्राह्मणेत्तर वर्तमानपत्रांना सहाय्य**

शाहू महाराजांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणांचा प्रयोग आपल्या संस्थानात सुरू केला होता. याच काळात शाहू महाराजांचे लक्ष वृत्तपत्रांच्या क्षेत्राकडे वळले. शाहूंनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळीला राजाश्रय दिला. तसेच 'कुलकर्णी वतन' रद्द करण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला. तेव्हापासून महाराष्ट्रातील सनातनी ब्राह्मणी वर्तमानपत्रांनी त्यांच्या विरोधात मोहीम सुरू केली. एवढेच नाहीतर काही वृत्तपत्रांनी शाहू आणि त्यांच्या राजपरिवार यांच्या वैयक्तिक निंदानालस्तीची मोहीम चालवली. त्यामुळे शाहू महाराजांना ब्राह्मणेतर समाजाची बाजू मांडण्यासाठी आणि ब्राह्मण्यवाद मोडून काढण्यासाठी वर्तमानपत्रांची गरज जाणवू लागली. वृत्तपत्र हे लोकशिक्षण आणि समाज जागृतीचे माध्यम आहे, याची त्यांना जाण होती. त्यामुळे त्यांनी बहुजन समाजातील अनेकांना वृत्तपत्र काढण्यास उद्युक्त केले. तसेच ज्यांनी वृत्तपत्र स्वेच्छेने काढली त्यांना भरघोस मदत आणि पाठिंबा दिला.

**शाहू महाराजांनी सहाय्य केलेली ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रे**

| अ. क्र. | वृत्तपत्राचे नाव | संपादक | ठिकाण |
|---|---|---|---|
| 1. | विजयी मराठा | श्रीपतराव शिंदे | पुणे |
| 2. | जागृती | भगवंतराव पाळेकर | बडोदा |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | दीनमित्र | मुकुंदराव पाटील | अहमदनगर |
| 4. | तरुण मराठा | दिनकरराव जवळकर | कोल्हापूर |
| 5. | राष्ट्रवीर | शामराव देसाई | बेळगाव |
| 6. | डेक्कन रयत | वालचंद कोठारी | पुणे |
| 7. | जागरुक | वालचंद कोठारी | पुणे |
| 8. | हंटर | खंडेराव बागल | कोल्हापूर |
| 9. | ब्राह्मणेत्तर | व्यंकराव गोडे | वर्धा |
| 10. | प्रबोधन | केशवराव ठाकरे | पुणे |
| 11. | सुबोधमाला | काशिराव देशमुख | अमरावती |

राजर्षी शाहू महाराजांनी भास्करराव जाधव या उच्च शिक्षित तरुणाला संस्थानच्या सेवेची संधी दिली. सत्यशोधक समाजाचे मुळ पत्र असणारे 'दिनबंधू' हे पत्र बंद झाल्यानंतर १९०१ मध्ये जाधव यांनी 'मराठा दिनबंधू' हे वर्तमानपत्र सुरू केले. शाहू महाराजांच्या प्रोत्साहनामुळे कोल्हापुरातून अनेक सुशिक्षित ब्राह्मणेतर तरुणांनी नियतकालिके काढण्यात पुढाकार घेतला. १९११ मध्ये बळवंत कृष्ण पिसाळ यांनी 'विश्वबंधू' हे पत्र सुरू केले. ब्राह्मणांच्या मक्तेदारीवर विश्वबंधू मधून कठोर प्रहार केले जात.[xi] १९२१ मध्ये महाराजांनी मुंबई सरकारच्या रॉबर्टसन या गृहसचिवास विश्वबंधूचा एक अंक पाटवला होता. तसेच सोबत पाठवलेल्या पत्रात म्हटले होते की, "या पत्राचा संपादक एक सामान्य माणूस आहे. मात्र तो नेहमीच टिळकांच्या मतांना विरोध करतो. त्यामुळे त्याचे पत्र चालत नाही. त्याला मी मदत करणार आहे."[xii] शाहूंच्या प्रोत्साहनामुळेच पुढे पिसाळांनी १९१९ साली 'गरिबांचा कैवारी' आणि 'भगवा झेंडा' ही पत्रे काढली. तर सखाराम पांडुरंग सावंत यांनी १९२० साली 'तरुण मराठा' व 'छत्रपती' ही वृत्तपत्रे सुरू केली.

पुण्यात लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाला दिनकरराव जवळकर आणि केशवराव जेधे या जोडगोळीने आव्हान निर्माण केले होते. ते ब्राह्मणेतर पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ते होते. शाहू महाराजांनी जवळकर यांना पुण्याहून कोल्हापूरला आणले. महाराजांच्या प्रेरणेनेच जवळकर 'तरुण मराठा'चे संपादक झाले. वर्तमानपत्रातून जवळकरांनी टिळक पक्षावर तिखट भाषेत हल्ले सुरू केले. त्यांच्या आक्रमक आणि जहाल भाषेमुळे इंग्रज सरकारकडे अनेक तक्रारी झाल्या. औंधच्या संस्थानिकांनीही तक्रार केली. ब्रिटिश रेसिडेंटने शाहू महाराजांकडे खुलासा मागवला. मात्र, जवळकरांच्या तिखट लेखणीचा बचाव त्यांनाही करता आला नाही. तेव्हा जवळकरांनी कोल्हापूर सोडून जावे, असा हुकूम महाराजांना द्यावा लागला.[xiii]

शाहू महाराजांच्या प्रोत्साहनाने सुरू झालेले आणखी एक वर्तमानपत्र म्हणजे 'विजयी मराठा' होय. भुजंग कृष्णाजी गायकवाड यांच्या संपादकत्वाखाली १९०७ मध्ये हे वर्तमानपत्र सुरू झाले. गायकवाड यांना वृत्तपत्र चालवण्याचे प्रशिक्षण मिळावे म्हणून शाहू महाराजांनी प्रयत्न केले. आपल्या बरोबर मुंबईच्या 'इंदुप्रकाश'च्या कार्यालयात त्यांना नेले होते. तेथे संपादक न. र. फाटक यांच्याशी गायकवाड यांच्या भेट घालून दिल्याची नोंद सापडते. [xiv]

सत्यशोधक समाजाचे खंदे पुरस्कर्ते वाचलचंद कोठारी यांनी १९ जुलै १९१७ रोजी पुण्यात 'जागरुक' हे पत्र सुरू केले. महाराजांना कोठारी यांच्या प्रयत्नांचे कौतुक होते. त्यामुळे तीन हजार रुपयांची मदत त्यांनी कोठारींना पाठवली. तरीही कोठारींनी स्वतंत्र बाण्याने हे पत्र चालवले. प्रसंगी संस्थानशी त्यांचे मतभेदही झाले. पुढे विजयी मराठा विरुद्ध जागरूक वैचारिक संघर्ष निर्माण झाला. तेव्हा शाहू महाराजांनी मध्यस्थाची भूमिका पार पाडली.[xv]

१९१८ मध्ये वालचंद कोठारी यांच्या मदतीने आण्णासाहेब लठ्ठे यांनी पुण्यात 'डेक्कन रयत' नावाचे इंग्रजी पत्र सुरू केले. ब्राह्मणेतरांची बाजू ब्रिटिश सरकार आणि इंग्रजी जाणणाऱ्या वर्गापुढे मांडण्याची पत्राची भूमिका होती. हे पत्र वर्गणीदारांअभावी डबघाईला येऊन बंद पडले. तेव्हा शाहू महाराजांनी लठ्ठे यांना एक पत्र लिहले. "आपण 'डेक्कन रयत पत्र' पुन्हा सुरू करावे असा माझा सल्ला आहे. या पत्राचा आपल्या कार्यास मोठा उपयोग आहे. मी त्यासाठी दोन हजारांची मदत करण्यास तयार आहे,"[xvi] असे या पत्रात म्हटले होते. ४ ऑक्टोबर १९२० रोजी शाहू महाराजांनी चार हजार रुपये लठ्ठे यांच्याकडे चेकने पाठवल्याने 'डेक्कन रयत' पुन्हा सुरू झाला होता. मुळचे कोल्हापूरकर असणाऱ्या श्रीपतराव शिंदे यांनी 'विजयी मराठा' हे पत्र १ डिसेंबर १९१९ रोजी पुण्यात सुरू केले.

श्रीपतराव ब्राह्मणेतर पक्षाची बाजू धडाडीने मांडत आहेत आणि पत्राचा कारभार चांगला चालवत आहेत, हे पाहिल्यावर शाहू महाराजांनी त्यांना वेळोवेळी भरघोस मदत केली.

शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते मुकुंदराव पाटील यांनाही वृत्तपत्र चालवण्यासाठी पाठबळ दिले. मुकुंदराव हे अहमदनगर जिल्ह्यातील सोमठाण्यासारख्या खेड्यातून 'दीनमित्र' हे वृत्तपत्र चालवत होते. हे पत्र अडचणीत आल्यानंतर शाहू महाराजांनी केलेल्या सहाय्यामुळे 'दीनमित्र'ला जीवदान मिळाले. याबाबत 'विजयी मराठा'ने १९२२ च्या अंकात केलेली नोंद लक्षवेधी आहे. "दीनमित्र छापखाना गहाण पडला असताना आणि दीनमित्र पत्राचा प्राण कंठी आला असताना बाबुराव यादवांनी (शाहू) महाराजांकडून हवे होते एवढे द्रव्यसहाय्य मिळवून देऊन त्याचा प्राण वाचविला आणि सोमठाण्याच्या वाळूच्या ढिगाऱ्यावरून त्याला तरवडीच्या खडकावर स्थिर केले."[xvii] अहमदनगरप्रमाणेच बेळगाव परिसरामध्ये समाजसुधारणेच्या कार्यासाठी शाहू महाराजांना वृत्तपत्राची गरज वाटत होती. त्यासाठी शाहू महाराजांनी रावसाहेब बिरजे, भुजंगराव दळवी, शामराव भोसले, शामराव देसाई यांच्याशी चर्चा केली. ९ मे १९२१ रोजी शिवजयंतीच्या मुहूर्तावर बेळगावात 'राष्ट्रवीर'चा पहिला अंक निघाला. शामराव देसाई हे त्याचे संपादक होते. या वर्तमानपत्रासाठी छापखाना घालावयास शाहू महाराजांनी अनुकूलता दर्शवल्यानेच 'राष्ट्रवीर' प्रसिद्ध व प्रकाशित करणे शक्य झाले.[xviii] पुढे याच 'राष्ट्रवीर'ने दक्षिण महाराष्ट्रात महात्मा फुले आणि शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रसार केला.

१९२१ मध्ये केशवराव बागडे व कीर्तिवानराव निंबाळकर यांनी पुण्यात 'शिवछत्रपती' हे पत्र सुरू केले. त्यामागेही शाहू महाराजांचे प्रोत्साहन होते, अशी नोंद मिळते.[xix] ब्राह्मणेतर चळवळीचे कार्यकर्ते दत्तोबा पोवार यांनी छत्रपती शाहूंना अस्पृश्यता चळवळीतील तरुण कार्यकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत माहिती दिली. अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी आंबेडकर कार्यरत आहेत हे समजल्यावर शाहू महाराज त्यांना भेटले. तसेच त्यांनी आंबेडकरांना मुकनायक आणि बहिष्कृत भारत या वृत्तपत्रांसाठी सहकार्य केले. शाहू महाराजांच्या मदतीने आणि प्रेरणेनेच कोल्हापूर संस्थानसह पुणे, बेळगाव, अहमदनगर, अमरावती, बडोदा परिसरात नवी वर्तमानपत्रे जन्माला आली. यामध्ये राष्ट्रवीर, विजयी मराठा, जागृती, प्रबोधन, दीनमित्र, सत्यप्रकाश, हंटर, कैवारी या पत्रांचा समावेश होतो. बहुजन समाजामध्ये जागृती घडवण्यासाठी या वर्तमानपत्रांनी मोलाची कामगिरी बजावली.

**शाहू महाराजांचा वृत्तपत्रविषयक दृष्टीकोन**

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात कुठल्या प्रकारची वृत्तपत्रे वाचली जातात याची माहिती घेतली होती. कोल्हापूर संस्थानात १६५ वर्गणीदार 'केसरी' या वृत्तपत्राचे होते. या यादीचे अवलोकन केले असता बहुजन समाजाची संख्या नगण्य होती. त्यामुळे बहुजन समाजाने वृत्तपत्र क्षेत्रात पदार्पण करावे, अशी महाराजांची भूमिका होती. या हेतूने त्यांनी ११ मे १९१८ रोजी 'पॉलिटिकल डिपार्टमेंट ऑफ द गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे' या विभागाचे सिनिअर ऑफीसर म कर्टिस यांना वृत्तपत्र प्रसिद्ध करण्याबाबत आपली योजना असल्याचे स्पष्ट केले होते. "माझी मद्रास येथील 'Justice' या इंग्लीश वृत्तपत्राप्रमाणे साप्ताहिस सुरू करण्याची योजना आहे. याच्या मदतीने बहुजन समाजात जागृती घडवून आणावयाची आहे,"[xx] असे शाहू महाराज म्हणतात.

शाहू महाराजांना ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनी ब्राह्मणेतर संस्थानिकांवर बिलकुल टीका करू नये असे वाटत होते. या वृत्तपत्रांनी निष्पक्षपाती न्यायाधिशाची भूमिका न घेता ब्राह्मणेतर चळवळीचे वकील बनून तिची बाजू मांडावी, अशी त्यांची भूमिका होती. बडोद्याचे 'जागृती'कार भगवंतराव पाळेकर यांना महाराजांनी एक पत्र लिहले होते. त्यात त्यांचे धोरण स्पष्ट होते. "आपण करवीरी आला होता तेव्हा बडोदे संस्थानच्या प्रत्येक खात्याविषयी लिहण्याचा आपला विचार होता. त्या लिहिण्यापासून संस्थानचे, जातीचे व मराठा पार्टीचे नुसकान आहे असे मी बोललो व वेळ नसल्याने थोडक्यात सांगावे लागले. 'लोकसंग्रह', 'राजकारण', 'केसरी' आदीकरून सर्व पत्रे कधीही ब्राह्मण संस्थानिकांविरुद्ध लिहीन नाहीत; मग 'जागृती', 'विजयी मराठा' आदी पत्रांनी गायकवाड अगर इतर मराठा संस्थानिकांविरुद्ध का लिहावे? केव्हाही आपल्या पक्षाच्या, आपल्या मालकाच्या विरुद्ध लिहणे चांगले नाही. आपण आपले मालक बडोद्याचे महाराज किंवा आपल्या पार्टीची मंडळी यांची चूक झाल्यास स्वत: जाऊन अगर पत्राद्वारे त्यांची कानउघाडणी करावी, त्यांच्याबरोबर पाहिजे तसा वाद घालावा व पाहिजे तसे आपले मत मांडावे;... परंतु, वर्तमानपत्रांतून आपल्या मालकाची अगर पक्षाची वाईट बाजू मांडून ती वैऱ्यांच्या हाती देणे अतिशय निंद्य होईल असे मला वाटते."[xxi] शाहू महाराजांनी ही भूमिका मांडली तेव्हा वर्तमानपत्रे ही केवळ बातमी पत्रे नव्हती. तर ती मतपत्रे म्हणून काम करत होती. त्यामुळे सध्याच्या काळातील वृत्तपत्र मुल्यांच्या दृष्टीने हे मत पटणारे नसले तरी शाहू महाराजांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याचा नेहमीच आदर केल्याचे दिसते. कारण 'संदेश'कार कोल्हटकरांना सहाय्या केल्यानंतरही "माझ्या बाजूचे समर्थनपर लेख न लिहल्यास बरे असे मला वाटते," हे लिहतात. पाळेकरांना लिहलेल्या पत्रात तत्कालिन संघर्षाचा विचार करता शाहू महाराजांचे मत संयुक्तीक वाटते.

शाहू महाराज ज्याप्रमाणे वृत्तपत्र स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. तसेच ते व्यक्ती स्वातंत्र्य आणि मत स्वातंत्र्यांचेही पुरस्कर्ते असल्याचे दिसते. १९२० मध्ये त्यांनी 'जागरुक'कारांकडे एक पत्र प्रसिद्धीसाठी दिले होते. त्यात शाहू महाराज म्हणतात की, "मी बऱ्याच वर्तमानपत्रांना मदत केली आहे. परंतु त्यातून प्रसिद्ध झालेल्या मतांबद्दल किंवा लेखांबद्दलची जबाबदारी मजवर नाही. ही वर्तमानपत्रे कदाचित मजविरुद्ध काही लिहित नसल्यास ही त्यांची मजवर मेहरबानी आहे. मी स्वत:चे वर्तमानपत्र ज्यावेळी काढीन त्याचवेळी त्या पत्रांतील मतांची किंवा लेखांची जबाबदारी माझेवर येईल. साधारणत: व्यक्ती तितकी मते असावयाची. त्याप्रमाणे माझीही काही स्वतंत्र मते असतील, पण ती मी लोकांपुढे मांडायला तयार नाही. कारण चांगला अनुभव आल्याशिवाय मते लोकांपुढे मांडणे योग्य नाही. ज्यांना माझी अशी काही स्वतंत्र मते ठाऊक असतील त्यांनी ती माझी म्हणून त्याप्रमाणे वागू नये. परंतु ती मते स्वत:ची समजून पाहिजे तर त्याप्रमाणे वागावे, अशी माझी सर्वांना विनंती आहे."[xxii]

शाहू महाराज दरबारात सर्व मराठी आणि इंग्रजी पत्रे मागवून घेत असत. त्यामधील आपल्याविषयी, कोल्हापूर संस्थानचा कारभार आणि राष्ट्रीय चळवळीबद्दलचे लेख आणि बातम्यांबद्दल ते जागरुक असत. संबंधित मजकुरांच्या कात्रणांची फाईल करून ती रोज दिवाण सबणीस यांच्या नजरेखालून घालण्याची व्यवस्था त्यांनी केली होती. संदर्भासाठी या फायली पॅलेस लायब्ररीत जतन करून ठेवल्या जात. तसेच महाराजांनी या कामासाठी महादेवराव डोंगरे यांची 'वृत्तपत्र निरीक्षक' म्हणून खास नेमणूक केली होती.[xxiii] यावरून शाहू महाराजांची वृत्तपत्रांचे सामर्थ्य आणि त्यांच्या कार्याप्रती असणारी सजगता दिसून येते.

कोल्हापुरात १९०१ ते १९२२ या काळात विविध विषयांना वाहिलेली जवळपास २० हून अधिक साप्ताहिके आणि मासिके सुरू झाली. समाजातील विविध घटकांकडून ती चालवली गेली. महाराजांनी थेटपणे वृत्तपत्रांना आर्थिक मदत देऊ केली. ते कोल्हापूर संस्थानच्या जाहिरातींच्या माध्यमातूनही वृत्तपत्रांना मदतीचा हात देत होते. केवळ ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनाच त्यांनी आश्रय दिला असे नाही तर सुधारणावादी ब्राह्मणी वर्तमानपत्रांनाही त्यांनी सहाय्य केले. वृत्तपत्रांना सहाय्य करणे एवढ्यापुरतेच त्यांचे योगदान मर्यादित नाही तर त्यांनी चांगले पत्रकार घडवण्यासाठीही प्रयत्न केल्याचे दिसते. महाराष्ट्रात विसाव्या शतकात ब्राह्मणेतर वृत्तपत्रांचे जाळे निर्माण होण्यात शाहू महाराजांचे योगदान अमुल्य आहे. वर्तमानपत्रांच्या क्षेत्रातील उच्च वर्गाची मक्तेदारी त्यांनी मोडीत काढली. वृत्तपत्र हे सामाजिक सुधारणांचे अस्त्र म्हणून बहुजन समाजातील तरुणांच्या हातात सोपवण्यात त्यांचे योगदान मान्य करावेच लागेल. महाराजांच्या या कार्यामुळेच महाराष्ट्रात समाज जागृतीच्या कार्याला दिशा मिळाली. त्यामुळे वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचे योगदान लक्षवेधी आणि दिशादर्शक ठरणारे आहे.

**संदर्भ**


1. **गर्गे ,.स. मा ,करवीर रियासत.५७६पृ. ,१९८०दुसरी आवृत्ती, ,**
2. **लेले ,.रा. के ,मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.पुणे , १९८४ .६२८-६२७पृ. ,**
3. **पाटील ,.एम. पी ,शाहूकालीन कोल्हापूर संस्थानातील वृत्तपत्रे ,डॉ ,(जयसिंगराव पवार (संपा .राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ६७८पृ. ,**
4. **वरखडे.८०६पृ. १,२०१८, -सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास खंड-रमेश नारायण, महाराष्ट्राच्या सामाजिक ,**
5. **राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ.६८०पृ. ,**
6. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास.६३०पृ. ,**
7. **लठ्ठे ,.आ.बा ,पवार जयसिंगराव ,(संपा)श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र२१०पृ. ,२००८ ,**
8. **पवार ,(जयसिंगराव (संपा ,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ.२३६ ,**
9. **कीर.४१३पृ. ,२०११धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, ,**
10. **राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ.२३७-२३६ ,**
11. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास.६३१पृ. ,**
12. **फडके ,.य. दि ,विसाव्या शतकातील महाराष्ट्र ,(१९२०-१९१४)खंड दुसरा ,पृ.२०४ .**
13. **मराठी वृत्तपत्रांचा इतिहास.७९३पृ ,**
14. **राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ.६८१पृ. ,**
15. **विसाव्या शतकातील महाराष्ट्र.२०९पृ. ,**

16. कित्ता.२०५पृ.  ,
17. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ.२३४पृ.  ,
18. पाटील, वि ,.रा .राष्ट्रवीर वृत्तपत्राचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील जनजागृतीचे कार्यअप्रकाशित  , .२८-२७पृ. ,२०११शोधनिबंध,
19. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास.७९९ ,
20. पाटील ,.वि. रा ,उपरोक्त.२२पृ.  ,
21. विसाव्या शतकातील महाराष्ट्र.२०७-२०६पृ.  ,
22. येडेकर ,श्याम ,राजर्षी .१५९एक व्यक्तिदर्शन, पृ.   -
23. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ.२३८पृ.  ,

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.16May-June 2022

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि पर्यावरण

चंद्रशेखर काशिनाथ काटे
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, कोल्हापूर
Email- chandrashekharkate09@gmail.com

**प्रस्तावना –**

आधुनिक भारताच्या इतिहासाचा धांडोळा घेतला असता आपणास ब्रिटीशकालीन भारतात अनेक संस्थाने कार्यरत होती असे दिसते. यातील हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच संस्थाने ही लोककल्याणकारी संस्थाने या वर्गात मोडत होती. यामध्ये महाराष्ट्रातील कोल्हापूर हे संस्थान विशेष असे प्रसिध्द होते. याचे कारण म्हणजे २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन ते तीन दशकामध्ये कोल्हापूरचे अधिपति म्हणून राहिलेले छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे होय. राजर्षी शाहू महाराज यांनी विविध लोककल्याणकारी कामे केली. एक उत्तम व मुत्सद्दी प्रशासक म्हणून त्यांनी आपली छाप जनमाणसावर पाडली होती. त्याचबरोबर ते एक शिक्षण सुधारक, एक कलाप्रेमी, गोरगरीबांचे कैवारी, समाज न्यायदाता म्हणून प्रसिध्द होते. राजर्षी शाहू महाराजांनी पर्यावरण हा विषय सुद्धा अतिदक्ष राहून हाताळला. पण या विषय संदर्भाने अधिक संशोधन न झाल्याने मी हा विषय शोधनिबंधासाठी निवडला आहे.

पर्यावरण हा मुद्दा आजमितीस खूप महत्त्वाचा मानला जातो. आजचे जग हे विज्ञान-तंत्रज्ञानामुळे खूपच जलद बनले आहे. आज पर्यावरणाच्या कितीतरी समस्या आपल्या आजूबाजूला पहावयास मिळतात. त्या आकाश, जल, हवा आणि भूमी अशा स्तरावर निर्माण झालेल्या आहेत. प्रशासन त्याची किती खबरदारी घेत आहे हे आपण पहातच आहोत. अंमलबजावणी अभावी या समस्यांचा समूळ नायनाट होताना दिसत नाही. मात्र आजपासून शंभर वर्षापूर्वी राजर्षी शाहू महाराज यांनी तत्कालीन पर्यावरणीय समस्या जाणून घेतल्या. त्यासाठी वेळोवेळी आदेश, जाहीरनामे काढले आणि त्या सोडवण्याचा प्रयत्न केला.

**राखीव अभयारण्ये –**

राजर्षी शाहू महाराजांनी काही जंगले वन्यप्राण्यांसाठी राखीव ठेवलेली होती. त्यांचे प्राण्यांवर विशेष असे प्रेम होते. शाहू महाराजांनी कोलीक आणि पडसाळी, जी गगनबावडा आणि पन्हाळा या तालुक्यांच्या सीमारेषांवर येतात, तेथे 'शिवारण्य' नावाचे अभयारण्य उभारले होते. येथेच हत्तींचे पालन आणि त्यांची पैदास केली जात असे. काहींच्या मते, ते हत्ती विदेशी होते. येथील हत्ती मानवी वस्तीत येऊ नये म्हणून या अभयारण्याभोवती चर मारला होता. तो चर आजही आपणास पहावयास मिळतो. या ठिकाणीच त्यांनी वन्यप्राण्यांना पाणी पिण्यासाठी तलाव खोदला होता. त्यांनी राधानगरी धरणाच्या मागील बाजूस ओलवण परिसरात पसरलेले वन 'दाजीपूर राखीव वन' म्हणून जाहीर केले. याच जंगलात गव्यासारख्या प्राण्यास माणसाळण्याचा प्रयत्न ही महाराजांनी केले.

**राखीव जंगले –**

जंगल संरक्षणासाठी शाहू महाराजांनी करवीर संस्थानांत काही नियम केले होते. या नियमानुसार जंगलाचे दोन विभाग पाडले होते. एक म्हणजे राखलेले जंगल आणि दुसरे म्हणजे संरक्षित केलेले जंगल. या जंगलासंबंधी सर्वसामान्यांसाठी काही नियम केले होते. यानुसार राखलेल्या जंगल क्षेत्रामध्ये फॉरेस्ट ऑफिसर यांच्या परवानगी शिवाय कोणासही जंगलात प्रवेश नव्हता. पण अशा जंगलातून रस्ते असतील तर त्या मार्गाने येण्या-जाण्यास प्रतिबंध नव्हता. जंगलाशिवाय जर गुरास पिण्यासाठी पाणी नसेल तर त्या ठिकाणी जाण्यास मोकळीक होती. मात्र रस्त्याने व पाणवठ्याकडे जाताना जंगलास अथवा जमिनीस उपद्रव देणे, राखीव जंगलात आगी लावणे, गुरे चारणे, झाडे अथवा लाकडे कापणे, साल काढणे, खाणी खणून चुना व कोळसा काढणे, शिकार करणे आदीस येथे प्रतिबंध होता.

याप्रमाणेच संरक्षित केलेल्या जंगलात ज्या त्या गावच्या लोकांस ठरवून दिल्याप्रमाणे आपापल्या गावाच्या हद्दीतच गुरे चारणे, फॉरेस्ट ऑफिसर जाहिरात काढेल त्याच वेळी फळे, पाने, फुले, गावात, कंद काढण्यास परवानगी असे. जळणासाठी लागणारी लाकडे ही खाली मोडून पडलेली किंवा वाळलेली असणे अपेक्षित होते.

उदाहरण म्हणून कौन्सिल ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन च्या ठराव नं. ६, १८९१ नुसार इलाखा करवीर पैकी पेटा भुदरगड येथील मौजे फराळे तर्फ मैनघोल गाव जमीन सरकारी जंगलात दाखल केले होते. त्यातील एका कलमानुसार गावातील लोकांनी वाळलेली जळाऊ लाकडे नेण्यास हरकत नव्हती.
राखीव व संरक्षित केलेल्या जंगलाचे कोणी नुकसान केल्याचे आढळल्यास त्या विरुद्ध कोर्ट त्या व्यक्तीला शिक्षा देत असे. सहा महीने कारावास किंवा पाचशे रुपये दंड किंवा काही वेळेस दोन्ही शिक्षा एकाचवेळी दिली जात असे. जंगल संरक्षणाबाबत जसे कडक नियम करण्यात आले होते. त्याचप्रमाणे एखाद्या गावातील गावकामगार अथवा गाव रहिवाशाने जंगल सुधारणा व बंदोबस्तासाठी मदत केली समजले असता त्या व्यक्तीस त्याच्या श्रमाचा मोबदला म्हणून ५० रुपये किमतीची लाकडे बक्षीस म्हणून देण्याचा नियमही करण्यात आला होता. जेणेकरून त्या गावातील अथवा सामान्य रयतेने ही जंगल संरक्षणाबाबत जागरूकता दाखवावी हाच या मागचा उद्देश होता.

राजर्षी शाहू महाराजांनी काही जंगले राखीव ठेवलेली होती. त्यासाठी रयतेच्या जमिनी जंगलासाठी घेतल्या होत्या. तसेच घेतलेल्या जमिनीचा मोबदला म्हणून जमिनी व वेळप्रसंगी रोखीने मोबदला दिला जात होता. कोणत्याही कारणास्तव जमीन संपादित करताना प्रथम त्या व्यक्तीस मोबदला देऊन मगच जमीन संपादित करावी असा शाहू महाराजांचा कटाक्ष होता. मौजे जैन्याळ, पेटा गडहिंग्लज आणि मौजे मानवले, पेटा भुदरगड येथील जंगलास लागून असलेल्या लोकांच्या जमिनी जंगलात समाविष्ट केल्याने त्यांना बदल्यात भरपाई देण्यात आली होती. शाहू महाराजांनी जंगल खात्याची हद्द ठरविण्यासाठी मोठया प्रमाणात कोरफड लागवडीचा प्रयोग केला होता. कारण कोरफडीचा उपयोग वनौषधी बरोबरच कुंपण म्हणूनही केला असे. सन १८९४-९६ या सालात मिळून ३७ मैल कोरफडीची लागवड केली होती. परंतु, येथे कोरफड हि वनस्पती नसावी, तर कोरफड सदृश्य 'केकताड' नावाची वनस्पती असावी. तिचाच उपयोग जंगलात कुंपण म्हणून केल्याची अनेक उदाहरणे सापडतात. तसेच कोरफड वनस्पतीचा उपयोग कुंपण म्हणून होऊच शकत नाही. सन १८९४ साली मौजे बालिंगे येथे वनौषधी बाग करण्यासाठी आठ एकर क्षेत्र फॉरेस्ट खात्याच्या ताब्यात देण्यात आले होते. तसेच जंगल भाग असलेल्या कात्यायनी येथे बोटॅनिकल पार्क निर्माण करून औषधी वनस्पती लावण्यात आलेल्या होत्या. हातकणंगले ते इचलकरंजी रस्त्याच्या बाजूला झाडे लावण्यासाठीचा खर्च संस्थानातून अदा करण्याचे आदेश महाराजांनी दिले होते. ही झाडे जगावीत म्हणून झाडांना पाणी घालण्यासाठी खास एका कामगाराची नियुक्ती केली होती. सन १८९८ मध्ये मौजे अतिग्रे येथील तब्बल १२५ एकर १६ गुंठे जमीन जंगलात सामील करण्याबाबत शाहू महाराजांनी हुकूम दिला होता. याच हुकूमात महाराज म्हणतात की, "सदर जमीन जंगलात सामील केल्यामुळे ब्लॉक चांगला होऊन झाडांचे संरक्षणही चांगल्या प्रकारे होईल".

**शाहू महाराजांचे वृक्ष प्रेम -**

शाहू महाराजांनी सन १९०० साली काढलेल्या जाहिरनाम्यानुसार रस्त्याच्या बाजूची झाडे, फांद्या, पाने, शिरी, मुळ्या, कोंब हे ज्या खात्याच्या ताब्यात आहेत, त्याची लेखी परवानगी न घेता तोडल्यास अथवा झाड खुंटेल असे कृत्य केल्यास व त्याने हा हुकूम अमान्य केल्यास तो शिक्षेस पात्र होईल. तसेच रस्त्याच्या बाजूच्या झाडांचे रक्षण व्हावे, त्याच्या फांद्या कोणी तोडू नये यावर अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे म्हणून महाराजांनी ६ नोव्हेंबर १९०३ रोजी आदेश दिले होते. या हुकूमावरून शाहू महाराजांनी झाडे वाढविण्यासाठी तसेच रस्त्याच्या कडेला झाडांची काळजी घेतलेली दिसून येते. कळंबा तलावाचे पाणी कोल्हापूर शहरात ज्या पाटाने येत होते, त्या पाटात झाडांच्या मुळ्या आल्या होत्या त्याबाबत शाहू महाराज म्हणतात की, "मुळ्या तोडल्या तरी त्या पाटात येणार आणि झाडे तोडलेपासून विशेष उपयोग न होता रस्त्यावरील छाया नाहीशी होईल सबब पाटात लोखंडी नळ घालणे" या एका वाक्यावरून महाराजांची झाडांच्या महत्त्वाबाबतची तळमळ दिसून येते.
झाडे तोडणाऱ्या ठेकेदारांनी एकदा पन्हाळयावरील घाणेरीची झाडे तोडण्याची परवानगी महाराजांकडे मागितली होती. त्यावेळी महाराजांनी असा आदेश दिला की, सदरहू जातीची झाडे तोडू द्यावीत, पण सदरची झाडे तोडताना इतर झाडे न तुटतील असा बंदोबस्त ठेवण्यात यावा. बावडे गावच्या लोकांनी रस्त्याकडेची झाडे तोडून नेली. हे कृत्य केल्याबद्दल ते शिक्षेस पात्र होते व त्यांचेकडून नुकसानही भरून घेणे रास्त होते. पण त्यांना प्लेग व दुष्काळ असल्याने एकवार माफी देण्यात येऊन पुन्हा जर असे कृत्य केले तर रीतीप्रमाणे कज्जे (खटला) करून शिक्षा देण्यात येईल अशी ताकीद दिली. या उदाहरणावरून शाहू महाराज हे या बाबतीतील कडक शिस्त व कडक निर्बंध पाळणारे असे द्रष्टे राजे होते हे दिसते.

**शिकारीस बंदी -**

करवीर सरकारने सन १८९४ मध्ये जाहिरनामा काढून असे प्रसिध्द केले की, "वागजाई व मंडपाळयाचे डोंगर व त्या आसपासच्या प्रदेशातील दरे, खोरी वगैरे रान श्रीम्नमहाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांस खुद्द शिकार खेळण्याकरिता राखून ठेविले आहे. यास्तव सदरी नमूद केले रानात यापुढे हुजूराचे परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची शिकार करू नये". यावरून असे समजते की, त्याकाळी काही ठिकाणी फक्त खास व्यक्तींच शिकार करत असत. इतरांना शिकारीची परवानगी नव्हती.

याच बरोबर जंगलात ज्यास लहान अथवा मोठी कसलीही शिकार करावयाची असेल तर त्या त्या प्रकारची शिकार पासाशिवाय करावयाची नाही असा सक्त आदेश होता. प्रथम परवानगी मिळाल्यावरच शिकार करायची परवानगी होती, पास दरवर्षी नवीन घ्यावा लागे. हे पास हुजूर ऑफिसात मिळत असत. पासाशिवाय कोणीही शिकार केल्यास इं. पि. कोड कलम १८८ प्रमाणे दंड होत असे. मे. थोरले दत्ताजीराव इंगळे व हुजूर सनिंध जगदेवराय सुर्वे यांनी पासाशिवाय शिकार केलेप्रकरणी महाराजांनी निकाल दिला होता की, "आम्हा सनिंध जरी कोणी असले तरी प्रत्येक इसमाने पास बाळगणे जरुर आहे". पुढे महाराजांनी सन १९११ साली रानडुकराच्या शिकारीबद्दल वटहुकूम काढला होता. त्यानुसार करवीर इलाख्यात जागोजागी शिकारी संबंधाने जंगलात रानडुकरे राखलेली आहेत ती आजूबाजूच्या शेतकरी लोकांच्या पिकात जाऊन त्यांची नासाडी करतात. अशी डुकरे शेतकरी लोकांनी आपल्या शेताच्या हद्दीत आल्यावर बंदूकीशिवाय इतर साधनांनी ठार मारावीत. जंगलात जाऊन मारायची नाहीत अशा आज्ञा दिल्या होत्या.

**पाण्याचे महत्त्व जाणले –**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये अनेक तलाव आणि विहिरी बांधल्या. नवीन तलाव किंवा विहिर बांधण्यासाठी अथवा दुरूस्तीसाठी बराच खर्च केला. राजर्षी शाहू छत्रपतींनी ज्या वेळी तलाव बांधले त्या वेळी त्या तलावाकडे घेतलेल्या जमिनी सरकारात घेतल्या आणि त्या लोकांना मोबदला म्हणून शेतीसाठी नवीन जमिनी दिल्या. महाराजांनी आवश्यक त्या ठिकाणी मोठमोठे नवीन तलाव व विहिरी तर बांधल्याच, पण जेथे जुन्या विहिरी अथवा तलाव होते त्यांच्यातील गाळही काढला.

कळंबा तलाव बांधण्यासाठी महाराजांनी संस्थानातून खर्च केला होता. या तलावाचे पाणी संपूर्ण शहरात पिण्यासाठी आणले होते. पण तलावाच्या आसपासची जनता ते पाणी प्रदूषित करत आहे असे समजल्यावर त्यांनी न्याय खात्यामार्फत एक आदेश काढला की, "कळंबे तलावात स्नान करितात, जनावरे घालतात, कपडे धुतात जेणेकरून पाणी खराब होते. सबब सदरहू कळंबे तलाव भरपूर भरला म्हणजे जी पाण्याची मर्यादा रेषा राहते त्या रेषापासून आणखी पलीकडे ४०० वारावर दुसरी रेषा आखली असता जशी निघेल त्या रेषेच्या आतील तलावाच्या सर्व भागास १५ माहे जुलै १८९५ इसवी पासून सन १८६७ चा डिस्ट्रीक्ट पोलीस ॲक्ट ७, कलम ३१ लागू करण्यात आले आहे". याच प्रमाणे विहिरीही लोकांनी अशाच पद्धतीने प्रदूषित केले असता महाराजांनी जाहीरनामा काढून त्यांस ताकीद दिली. सन १९०७ मध्ये कोल्हापूर शहरात प्लेगची साथ आलेली होती. त्यावेळी कळंबे गावातील लोक रानातील झोपडीत रहायचे. तेव्हा त्यांना पिण्याच्या पाण्याची अडचण येते होती. त्यासाठी कळंबे तलावातून घागरी भरून पाणी नेण्याची परवानगी महाराजांकडे मागितली होती. त्यावेळी लोकांनी पाणी न्यावे पण तलावात भांडी, कपडे वगैरे काही धुऊ नये असा प्रतिबंध घातला होता. असाच एक ठराव शिरोली तलावा संदर्भात सन १९२१ मध्ये देखील केला गेला होता. रंकाळा तलावातही कपडे धुऊ नये म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी रंकाळयातील पाण्याचा वापर करून दुधाळी येथे धुण्याच्या चाव्या बांधल्या. दगडी कट्टे बांधून जवळपास १२० नळ येथे जोडले आहेत. आजमितीस प्रत्येकाच्या घरात नळ आल्याने प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यातील काहीच नळ सध्या सुरू आहेत. यावरून त्यावेळी रंकाळा जलप्रदूषण मुक्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. याबरोबरच येथील पाण्याचा उपयोग शेतीसाठीही केला.

राजर्षी शाहू महाराजांनी सह्याद्रीच्या डोंगररांगात आजच्या राधानगरी तालुक्यात राधानगरी धरणाची पायाभरणी केली. सन १९०८ ते १९५७ दरम्यान हे धरण बांधून पूर्ण झाले. या धरणामुळे कोल्हापूर हे अधिक निसर्ग व साधनसंपन्न बनले.

**मूल्यमापन -**

शाहू महाराजांच्या काळात खास त्यांच्यासाठी राखलेल्या वनामध्ये शिकार करण्याच्या निर्णयाच्या किंवा एकूणच त्यांच्या शिकार करण्याकडे आजच्या पर्यावरण विरोधी दृष्टीकोनातून संस्थानिकांचा एक छंद म्हणून न पाहता

क्षत्रियत्त्वाचे प्रतिक म्हणून अथवा तत्कालीन एक दरबारी रितीरिवाज म्हणून पाहता येईल. त्या काळात संस्थानिकांनी शिकार करणे गैर मानत नसत. समजा तरीही प्राण्यांची शिकार करणे हा त्यांचा छंद मानला तरी त्या छंदापायी त्यांनी कधीही प्राण्यांची सरसहा शिकार केली नाही. त्यावर त्यांनी स्वत:हून काही प्रतिबंध घातलेले दिसतात.

शाहू महाराजांनी त्यांच्या काळात अनेक गावांच्या जमिनी सरकारात दाखल करून त्या जमिनी संरक्षित जंगलामध्ये रुपांतरीत केल्या. तेथे विविध प्रकारची झाडे लावली. विशेषत: हा उपक्रम त्यांनी सह्याद्रीच्या पर्वतरांगामध्ये वसलेल्या गावांना यात समाविष्ट केले होते. कारण या भागात पाऊसाचे प्रमाण अधिक असल्याने झाडांची अधिक निगा राखण्याची गरज नव्हती. राधानगरी धरणाच्या परिसरात दाजीपूर अभयारण्य उभारले. यात विविध वन्यप्राण्यांना आसरा मिळाला. गव्यांचे महाराष्ट्रातील वसतीस्थान बनले. हे १९५७ साली स्वतंत्र भारताच्या महाराष्ट्रातील पहिले अधिकृत अभयारण्य ठरले. यातच महाराजांची दूरदृष्टी दिसून येते. पाणी प्रदूषणाचा विचार करता महाराजांनी किती दक्षता बाळगली होती हे कळंबा तलाव आणि विहिरीतील पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून काढलेल्या हुकूमातून दिसून येते.

राजर्षी शाहू महाराजांना लोकराजा, रयतेचा राजा अशा अनेक उपाध्या त्यांचे अफाट कार्य पाहूनच लोकांनी दिल्या आहेत. महाराजांनी हयातभर अविरत कार्य केले ते समाजाच्या उन्नतीसाठी, समाजाच्या अडी-अडचणी जाणून घेऊन त्या सोडवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, अशी महाराजांची तळमळ होती. या तळमळीतून शंभर वर्षापूर्वी तत्कालीन जगाच्या दोन पावले पुढे टाकत दूरदृष्टीने समाज प्रगतीपथावर नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले. राजर्षी शाहू महाराजांनी राज्य कारभार करत असताना पर्यावरणाविषयी घेतलेले निर्णय आजही आपणास खरोखरच प्रेरणादायी आहेत.

**संदर्भ**

1 डॉ. जाधव, रमेश, राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, मुंबई, २०१६, पृ. ९५४. याच अभयारण्यात 'मुडागड' हा किल्ला वसलेला आहे.

2 कणबरकर, रा. कृ. (संपा.), राजर्षी शाहू महोत्सव, राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट, कोल्हापूर, १९९३, पृ. ७७.

3 करवीर सरकारचे ग्याझिट, ७ सप्टेंबर, १८९५, पृ. १९२. या जाहिरनाम्यानुसार गुरे, शेळी व मेंढी चारण्यासाठी काही रक्कम आकारली जायची. ती रक्कम त्या जनावराच्या वयोमानानुसार वेगवेगळी होती.

4 करवीर सरकारचे ग्याझिट, ४ जानेवारी, १८९४, पृ. ७३.

5 प्रो. लठ्ठे, आ. बा., पवार जयसिंगराव (संपा.), श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८, पृ.२०६- २०७.

6 करवीर सरकारचे ग्याझिट, १८९८, पृ. ५२२.

7 करवीर सरकारचे ग्याझिट, ५ डिसेंबर १९०३, पृ. २२८.

8 उपरोक्त, डॉ. जाधव, रमेश, पृ. ९५५.

9 करवीर सरकारचे ग्याझिट, १८ एप्रिल, १८९४, पृ. ७२.

10 करवीर सरकारचे ग्याझिट, ३१ मे १९०२, पृ. १०८.

11 करवीर सरकारचे ग्याझिट, १२ सप्टेंबर १९०८, पृ. ५९.

12 करवीर सरकारचे ग्याझिट, १६ जानेवारी, १८९५, पृ. १०२

13 करवीर सरकारचे ग्याझिट, ११ जानेवारी, १८९६, पृ. २. इंजूल, पेटा पन्हाळा येथे विहीर बांधण्यासाठीचे टेंडर करवीर सरकारने काढले होते.

14 करवीर सरकारचे ग्याझिट, २९ जून, १८९५, पृ. १४४.

15 करवीर सरकारचे ग्याझिट, २८ मार्च, १८९६, पृ. ५४. मौजे वाडी रत्नागिरी, पेटा पन्हाळा येथे कापूरबाव नावाची सार्वजनिक पाणी पिण्याची विहीर प्रदूषित करणाऱ्यांच्या विरोधात डिस्ट्रीक्ट पोलीस ॲक्ट ७, कलम ३१ लागू करण्यात आले होते.

16 सकाळ, २६ मे, २०२०. धुण्याची चावी म्हणजे कपडे धुण्यासाठी, अंघोळ करण्यासाठी, जनावरांच्या पाण्यासाठी किंवा त्यांना धुण्यासाठी एकाच ठिकाणी केलेली बहुआयामी योजना आहे.

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**Editor**
**Dr. Sunil Helkar**
Principal,
Prof. Dr. N.D.Patil Mahavidyalaya, Malkapur – Perid
Tal. Shahuwadi Dist. Kolhapur

**Co- Editors**
**Dr. Supriya Khole**
**M.L.Sontakke**